म. ग्रं. सं. ठाणे
निबंध
नं. 7043

# भक्तीचा
# कल्प-वृक्ष

RFFBK-0010888

भा. पं. बहिरट. एम.ए.

# भक्तीचा कल्पवृक्ष

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २०८०१ वि: ...
क्रमांक १०४३ नों: दि: १३/४/५५

भा. पं. बहिरट एम्. ए.

'संतवाणीचा अमृतकलश', व 'The Philosophy of Jnanadeva'
या ग्रंथांचे लेखक

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
स्था. क्र. १२८८९
ठाणे (स्थळ प्रत)

मूल्य ३ रुपये

पंढर ... ाशन

REFBK-0010888

लेखक–प्रकाशकः–

**भा. पं. बहिरट** एम्. ए.

अध्यक्ष, पंढरपूर संशोधन मंडळ,

महाद्वार–पंढरपूर.

सर्व हक्क लेखकाचें स्वाधीन

प्रथमावृत्ति–१९५६

**मुद्रक–कृ. ना. घळसासी**

श्रीपांडुरंग मुद्रणालय, पंढरपूर.

# समर्पण

‘ भक्तीचा बहु पंथ शीतळ असे या या त्वरेनें चला ।
नारी, बाळ, तरूण, वृद्ध अथवा हो दुष्ट किंवा भला ।।
सारे प्रेमधना लुटा, निजकृपें ज्या संत सांभाळती ।’
सांगे विश्वसखा तुका सकळिका, अर्पू तया ही कृती ।।

स्थलप्रत.
२०४७१ वि.
क्रमांक ...१०४३... नों: दि:

# निवेदन

आठ महिन्यापूर्वी कार्तिक व॥. १३ स आळंदी मुक्कामीं श्रीज्ञानेश्वर माउलीचें चरणीं अर्पण करून " संतवाणीचा अमृत–कलश " हा ग्रंथ प्रकाशित केला. सहामहिन्याच्या अल्पावधींतच त्याची प्रथमावृत्ती जवळ जवळ संपत आली. यांत त्या ग्रंथाच्या थोरवीपेक्षा संतवाङमयाभ्यासाची आवड सुशिक्षित वाचकांमध्यें अधिकाधिक प्रमाणांत वाढत असल्याचें तें द्योतक आहे असें मला वाटतें. वाचकांकडून मिळालेल्या उत्तेजनामुळें पुढील प्रयत्नास उत्साह वाटला व त्याचें फळ म्हणजे प्रस्तुतचा " भक्तीचा कल्पवृक्ष " होय.

या ग्रंथाची रूपरेषा सांगण्यापूर्वी थोडीशी पूर्वीची हकीकत सांगणें अप्रयोजक होणार नाहीं. सन १९२७ सालीं तत्वज्ञान हा ऐच्छिक विषय घेऊन बी. ए. झाल्यापासून संतवाङमय व तत्वज्ञानाच्या अभ्यासाची गोडी लागली. त्याच कालांत सत्संगतीचा लाभ होऊन संतवाणीच्या गाभाऱ्यांत शिरता आलें. ज्ञानेशांच्या व तुकोबांच्या अमृतवाणीच्या वर्षावानें दुथडया भरून ओसंडणाऱ्या वारकरी संप्रदायाच्या पावन प्रवाहांत यथेच्छ अवगाहन करण्याची, आपलें संपूर्ण जीवन त्याच्याशी समरस करण्याची सुवर्णवेलाही लाधली. त्या घडीपासून संतवचनें ही जीवनाचा महत्वाचा भागच बनलीं. १९३७ सालीं संताच्या बोधास वाहिलेलें 'प्रेमबोध' मासिक सुरू झालें. त्यांत वेळोवेळी संतबोधावर लिहावें लागलें. १९४० सालीं पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजांतील तत्वज्ञान–मंडळाचा रौप्य महोत्सव होता. त्याप्रसंगीं तेथे उपस्थित असतांना एम्. ए. करितां एकादा निबंध लिहावा असें वाटून टर्मस् भरल्या व The Philosophy of the Amritanubhava हा विषय घेऊन कच्चा खर्डा लिहिण्यास घेतला. १९४३ चे उन्हाळयाचे सुट्टींत हल्ली

बेळगावच्या लिंगराज कॉलेजमध्यें मराठीचे प्राध्यापक असलेले व "ज्ञानेशांची अमृतवाणी" या पुस्तकाचे लेखक प्रा. शेणोलीकर हे डेक्कन कॉलेजतर्फे संशोधनाचे कामासाठीं पंढरपुरीं आले. त्यावेळी त्यांचा एम्. ए. चा अभ्यास चालू असून त्यांना "अमृतानुभव" नेमलेला होता. तो वाचण्याकरिता तें मजकडे येऊं लागलें. आम्हा दोघांचा एक महिना त्या अमृत-पानांत अत्यानंदांत गेला. त्यामुळें अमृतानुभवासंबंधी अधिक चिंतन होऊन विचार स्थिर होण्यास मदत झाली. पुढील सालीं. प्रा. शेणोलीकर यांच्या निमंत्रणावरून मराठी अभ्यास मंडळापुढें एम्. ए. च्या विद्यार्थ्यांकरितां "अमृतानुभवा" वर पुण्याच्या महाराष्ट्र–साहित्य–परिषदेच्या दिवाणखान्यांत व्याख्यानें देण्याचा योग आला. त्यामुळें त्या ग्रंथाचा अभ्यास होण्यास अधिक सहाय्य झाले. लिहावयास घेतलेला निबंध पुरा झाला, पण कांहीं अडचणीमुळें बरीच वर्षे तसाच राहिला. शेवटीं १९५३ मध्यें तो मुंबई युनिव्हर्सिटीकडे पाठविला व १९५४ मध्यें त्यास एम्. ए. करितां मान्यता मिळाली! १९५५ चे कार्तिकांत वर उल्लेखिल्या प्रमाणें "अमृत–कलश" प्रसिद्ध केल्यावर इंग्रजी निबंधाच्या प्रकाशनाच्या प्रयत्नास लागलों. पूर्वीच्या निबंधांत जरूरती भर घातली. संपूर्ण अमृतानुभवाचें इंग्रजी रूपांतर तयार केलें व अखेर चालू सालचे फेब्रुवारीमध्यें The Philosophy of Jnanadeva हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. संतप्रेमी वाचकांनीं त्याचेंही प्रेमानें स्वागत केलें. अमृत–कलशा करितां लेख निवडतांना बरेच लेख बाजूस ठेवावे लागले ते एकत्र गुंफून पूर्वी आश्वासन दिल्याप्रमाणें प्रस्तुत पुस्तकाच्या छपाईस सुरवात चैत्र शु॥ १ स केली व आज आषाढ शु॥ ११ च्या शुभदिनीं ती संपूर्ण होऊन वाचकांचे हातीं हा "भक्तीचा कल्पवृक्ष" देण्याचा सुयोग येत आहे हें पाहून मनापासून समाधान वाटत आहे.

प्रस्तुत लेख संग्रहांत प्रामुख्यानें संतांच्या भक्तिपंथाच्या स्वरूपाचें विवरण व भक्त–कथा असल्यामुळें या ग्रंथास "भक्तीचा कल्पवृक्ष" असें नांव दिलें आहे. यातील लेखांपैकी "ज्ञानेशांच्या विरहिणीची भूमिका" हा लेख 'रोहिणी' मासिकाच्या जानेवारी १९५६ चे अकांत, "बुडता हे जन न

देखवे डोळा "–हा " माउली " च्या एप्रिल १९५६ चें अंकांत व " वारकरी संप्रदायकी प्रेमसाधना " हा " कल्याण " च्या मे १९४२ चे अंकांत प्रसिद्ध झालेला आहे. बाकीचे सारे लेख प्रेमबोधांतून सन १९३७ ते १९५४ चे कालावधींत निरनिराळ्या वेळीं प्रसिद्ध झालेले आहेत. त्यापैकीं कांहीं लेख विषय सादृश्यामुळें एकत्र गुंफिलें आहेत.

संतवाङमयाच्या अभ्यासकांनीं संतांचा भक्तिविषयक बोध स्पष्ट समजून घेण्याची अत्यंत आवश्यकता आहे. त्यादृष्टीनें ' संतांचा भक्तिपंथ " या लेखांत भक्तीचें स्वरूप, भक्तीची सुलभता व प्रत्यक्षता, भक्ती आणि वैराग्य, भक्ती व व्यवहार, भक्ती व योग, भक्ती व मोक्ष इत्यादि विषयांचा उहापोह केला आहे. ज्ञानेशांच्या विरहिणीवरील लेखांत संतांचा प्रेमविरह म्हणजे प्रेमाचा विहार कसा आहे हें दाखविलें आहे. तुकोबासारखे संत प्रसंगीं कठोर टीकाकार असतात परंतु त्या टीकेच्या मुळाशी त्यांच्या हृदयांत कसा जीवमात्राविषयी अथांग करुणार्णव हेलावत असतो हें " बुडता हे जन न देखवे डोळा " या लेखांत विशद केलें आहे. मानवी जीविताचें सुख दुःख बोधावर अवलंबून असते. बोध व ज्ञान यामध्यें फरक असून ज्ञान बोधरूप बनणें कसें आवश्यक आहे आणि प्रियबोधानें व्यापक प्रभू हृदयांत कसा सांठवितां येतो याचें विवेचन 'देवाची सांठवण' या लेखांत आलें आहे.

' साहित्य व जीवन ' या लेखांत मानवी हृदयाच्या भाव–संशुद्धीच्या दृष्टीनें संतवाङमयाचें केवढें महत्व आहे तें सांगून ' संतवचनांचे एक आंग्लरूपांतरकार ' या लेखांत डॉ. निकल मॅकनिकल यांनीं केलेल्या रूपांतराचा परिचय करून देण्याच्या निमित्तानें संतवाङमयांत अद्वैत व भक्तीचें झालेलें मधुर मीलन व हिब्रू प्रार्थना गीताहून संताच्या करूणावचनाचें श्रेष्ठत्व दाखविलें आहे.

भक्तांचीं चरित्रें वाचकांच्या हृदयांत भक्तीचा नंदादीप उजळतात. या दृष्टीनें कृष्णप्रभूच्या प्रेमांत रंगलेल्या श्रीगौरांग प्रभू, नरसीमेहता,

सूरदास, नजीर, रसखान, रहीम या प्रेमळांच्या कथा त्या त्या लेखांत वर्णिल्या आहेत. 'तुका झालासे कळस' ही उक्ती कशी सार्थ आहे हें 'अवताराचा कळस' या लेखांत विवरण करून तुकोबांच्या संगतीनें ज्यांची आयुष्यें धन्य व पावन झाली त्या 'बहिणाबाई' व 'कचेश्वर' यांची जीवनकथा त्या त्या लेखांत वर्णिलीं आहे. 'प्रगति,' 'धर्म आणि समाजव्यवस्था' व 'जडवाद' हे तात्विक स्वरूपाचे लेख असून त्यांत प्रगतीची खरी व्याख्या, धर्माचा आणि समाजधारणेचा जिव्हाळ्याचा संबंध, जडवादाच्या जीवविषयक व विश्वविषयक दृष्टिकोनांतील अपुरेपणा या गोष्टी सांगितल्या आहेत.

'संतवाङमयाभ्यासाची आधुनिक दिशा' या लेखांत संतवाङमयावरील कांहीं आधुनिक लेखकांच्या लेखांतील अपुरे दृष्टीकोन दाखविले आहेत. अनुभवामृतांच्या तात्विक भूमिकेसंबंधीं असलेल्या विद्वानांच्या मतभेदांचे परीक्षण व त्या ग्रंथाचा शेवट पंढरीच्या वारींत कसा आहे हें 'अनुभवामृताचा परिपाक' या लेखांत उघड केलें आहे. वारकरी संप्रदायाचें स्वरूप, देवता, आचार, दिनचर्या याची थोडक्यांत रुपरेषा 'वारकरी संप्रदायकी प्रेमसाधना' या शेवटच्या लेखांत दिली आहे.

या ग्रंथप्रसिद्धीस माझें स्नेही प्रा. श्री. ना. बनहट्टी, एम्. ए., श्री. वें. शा. बलकुंदी, बी. ए. एल्एल्. बी., व श्री. पं. रा. मोकाशी, एम्. ए. यांनीं उत्तेजन दिलें त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. त्याच प्रमाणें मुद्रितें तपासणें, सुची तयार करणें, लेख निवडणें वगैरे कामीं श्री. बाळासाहेब गोडबोले, एम् ए. एल्.एल् बी. व प्रा. य. ज. धारुरकर एम्. ए. एल्.एल्. बी. एम्. अेड्. यांनी मित्रभावानें सहाय्य केल्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

पंढरपुरच्या श्रीपांडुरंग मुद्रणालयाचे मालक श्री. बाबुराव घळसासी यांनीं अल्पावधींत सुबक रीतीनें पुस्तक छापून दिलें व त्यावरील रंगीत वेष्टनाचें सुंदर काम पुण्याच्या चित्रशाळा प्रेसच्या व्यवस्थापकांनीं केलें याबद्दल दोघांचाही आभारी आहे.

पुढील लिखाणाबद्दल कांहीं गोष्टी योजिल्या आहेत. ‘महाराष्ट्रांतील भक्तिपंथा’वर सांगोपांग व महाराष्ट्रांबाहेरील भक्तिपंथाशी तुलनात्मक विवरण करणारा ग्रंथ लिहिण्याची मनीषा आहे. “संकल्पासी अधिष्टान। नारायण गोमटा ॥” असें संतवचन आहे. त्यास अनुसरून संकल्प बोलून दाखविण्यानें अधिष्टानभूत नारायणावर तो पुरा करवून घेण्याची जबाबदारी आहे.

पंढरपूर, आषाढ शु॥ ११
शके १८७८

**भा. पं. बहिरट**

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| संतांचा भक्तिपंथ | १ |
| ज्ञानेशांच्या विरहिणीची भूमिका | ३० |
| "बुडतां हे जन न देखवे डोळा–" | ३७ |
| देवाची सांठवण | ४९ |
| साहित्य व जीवन | ६५ |
| संतवचनांचे एक आंग्ल रूपांतरकार | ७२ |
| श्रीगौरांग प्रभु | ८६ |
| प्रगति | १२३ |
| धर्म आणि समाज व्यवस्था | १२९ |
| जडवाद | १३५ |
| महावैष्णव नरसीमेहता | १५४ |
| भक्तश्रेष्ठ सूरदास | १६५ |
| नजीर | १७६ |
| रसखान | १८१ |
| रहीम | १८४ |
| कबीर व नामदेव | १८७ |
| अवतारांचा कळस | १८९ |
| बहिणाबाई | १९४ |
| कचेश्वर | २०१ |
| संतवाङमयाभ्यासाची आधुनिक दिशा | २०५ |
| अनुभवामृताचा परिपाक | २१२ |
| वारकरी संप्रदायकी प्रेम-साधना | २२० |
| सूची | २२९ |

# भक्तीचा कल्पवृक्ष

अनुक्रम २०४७१ वि:
क्रमांक १०४३ नों: दि: २३।५।४१
दा. क्र. १०८८

# संतांचा भक्ति-पंथ

सकल जीवमात्रांच्या कल्याणाकरितां संतांनीं भक्तीचा राजमार्ग तयार केला. ते स्वतः याच मार्गानें गेले व पुढिलांकरितां तोच मार्ग त्यांनीं ठेविला. तुकोबा म्हणतात—

"मारगें बहुत । याचि गेले साधुसंत ।।
ऐसी गर्जती पुराणें । नका जाऊं आडरानें ।।
चोखाळल्या वाटा । नलगे पुसाव्या घोपटा ।।
झळकती पताका । गरुड टके म्हणे तुका ।।"

इतर सर्व साधनें डावलून जन्मोजन्मीं भक्तीचा रस सेवन करण्याचाच त्यांनीं निश्चय केला.

"न करी तप साधन रे मुक्तीचे सायास ।
जन्मोजन्मीं हाचि गोड भक्तीचा रस ।।"

जीवनांतील श्रेष्ठ अवस्था भक्तिमार्गानें प्राप्त होतात.

"अवघ्या दशा येणें साधती । मुख्य उपासना सगुण भक्ति ।।"

भक्ति हा सिद्ध पंथ आहे असें तुकोबा सांगतात—

"पुढे गेले त्यांचा शोधित मारग । चला जाऊं माग घेत आम्ही ।।
जन्ममरणाच्या खुंटतील खेपा । होइल हा सोपा सिद्धपंथ ।।"

"जाईन सिद्धपंथें अवघ्या चुकतील खेपा ।।"

भक्ति ही कधीही न तुटणारी स्नेह-ग्रंथी आहे.

"भक्ति-वालभ न तुटे चराचरीं ।।"

भक्ति हा देवाचा प्रसाद आहे. हा सेवन करण्याचा अधिकार साऱ्यांना आहे. हा प्रसाद भरपूर, सर्वांना पुरून उरणारा असून वाढणाराही समर्थ आहे–

**देवाच्या प्रसादें करा रे भोजन । व्हाल कोण कोण अधिकारी ते ।।**
**ब्रह्मादिकांसी हें दुर्लभ उच्छिष्ट । नका मानू वीट ब्रह्मरसीं ।।**
**अवघियांपुरतें वोसंडलें पात्र । अधिकार सर्वत्र आहे एथें ।।**
**इच्छादानी येथें वोळला समर्थ । अवघेंचि आर्त पुरवीतो ।।**
**सरे येथें ऐसें नाहीं कदाकाळी । पुढती वाटे कवळी घ्यावें ऐसें ।।**
**तुका म्हणे पाक लक्ष्मीच्या हातें । कामारी सांगातें निरुपम ।।**

संतप्रणीत भक्तिपंथाच्या कांहीं अंगांचें विवेचन प्रस्तुत लेखांत करण्यात्रें योजिलें आहे.

## भक्तिमार्गाची स्वाभाविकता व श्रेष्ठता

भक्तिमार्ग हा स्वाभाविक व श्रेष्ठ कसा आहे तें स्वामी विवेकानंद व लो. टिळक यांच्या पुढे दिलेल्या उताऱ्यांत स्पष्ट केलें आहे.

"भक्तियोग हा केवळ निसर्गसिद्ध आहे. तसेंच त्यांत कांहीं धडपड अगर कष्टही नाहींत. भक्तियोगाचा मार्ग अगदीं सरळ आणि स्पष्ट आहे."

"भक्तीचा मार्ग अधिक स्वाभाविक म्हणूनच अधिक सोपा आहे. यांत कोणत्याही प्रकारचा अट्टाहास नाहीं. यांत हट्टानें कांहींही सोडावयाचें नसतें. भक्ताचा त्याग हा सोपा आणि सरळ मार्गानें चालणारा असतो. पूर्ण चंद्रमा प्रकाशित होत असतां तारांगणें अदृश्य होतात. सूर्योदय झाल्या-बरोबर चंद्रही फिक्का पडतो. भक्तियोगाच्या सिद्धीस्तव ज्या त्यागाची अपेक्षा आहे, तो त्याग कोणत्याही प्रकारच्या अट्टाहासानें सिद्ध करावा लागत नाहीं. तो स्वाभाविकपणें आपोआपच सिद्ध होत जातो. मोठ्या प्रकाशापुढें लहान प्रकाश जसा आपोआपच फिक्का पडत जातो आणि अखेरीस त्याचा मागमूसही लागत नाहीं, तसा भक्ताचा त्यागही आपो-आपच सिद्ध होत जातो. त्याच्या दृष्टीनें इंद्रियगत आणि बुद्धिगत सुखांचा

प्रकाश हळूहळू मंदावत जातो आणि अखेरीस नष्ट होतो. ईश्वरी प्रेमाचा दिव्य प्रकाश त्याच्या चित्तांत फांकला म्हणजे तेथले बाकीचे सारे प्रकाश आपोआप नष्ट होतात."

"भक्तियोग हें उच्चप्रेमाचें शास्त्र आहे. प्रेमाची दिशा कशी असावी, या भावनेचें योग्य नियमन कसें करावें, तिजवर ताबा कसा मिळवावा, तिचा उपयोग कसा करावा, तिला नव्या दिशेकडे कसें वळवावें, आणि तिजपासून अत्यंत उच्च आणि अत्यंत उज्ज्वल असें साध्य कसें साधावें, हें भक्तियोग आपणास शिकवितो. सर्वस्वाचा त्याग करा असें भक्तियोग आपणास सांगत नाहीं–तो आपणास प्रेम करावयास सांगतो. अत्यंत उच्च अशा स्वरूपावर प्रेम करा असें भक्तियोगाचें आपणास सांगणें आहे. अशा प्रकारचें अत्युच्च दर्जाचें प्रेम आपल्या ठिकाणीं उदय पावलें म्हणजे आपल्या ठिकाणचा कनिष्ठ भाव आपोआप गळून जाईल."

"कोणताही विकार अट्टाहासानें दाबून टाकण्याचें काम भक्ताला करावें लागत नाहीं. त्या विकाराची योजनाही तो दैवी प्रेम वाढविण्याकडेच करीत असतो."

**–स्वामी विवेकानंद.**

"सर्वज्ञ, सर्व शक्तिमान्, सर्वव्यापी व निराकार ब्रह्मस्वरूप तसें म्हणजे सगुण आहे. पण तें केवळ बुद्धिगम्य व अव्यक्त म्हणजे इंद्रियांना अगोचर असल्यामुळें उपासनेला क्लेशमय होते. यासाठीं या दोन्ही परमेश्वर स्वरूपापेक्षां जो परमेश्वर अचिंत्य, सर्वसाक्षी, सर्वव्यापी व सर्व शक्तिमान् जगदात्मा असूनही आपल्याप्रमाणें आपल्याशीं बोलेल, आपल्यावर ममता करील, आपल्याला सन्मार्गाला लावून सद्गति देईल, ज्याला आपण आपला असें म्हणू शकूं, आपल्या सुखदुःखाचा ज्याला कळवळा येईल, किंवा जो माझे अपराध पोटांत घालील, ज्याचा मी आणि जो माझा असें प्रत्यक्ष संबंध जेथें आमच्यामध्यें उत्पन्न होतील, जो माझें पित्याप्रमाणें रक्षण करील, माझी माउली होईल अगर माझी गति, माझा पोषणकर्ता, माझा धनी, माझा साक्षी, माझ्या निवाऱ्याचें व आरामाचें घर, माझा अखेरचा आधार व विसांवा, माझा सखा व कैवारी, म्हणून लेंकराप्रमाणें मी ज्याचें

प्रेमानें व लडिवाळपणानें आकलन करूं शकेन, असा सत्यसंकल्प, सकलैश्वर्य-संपन्न, दयासागर, भक्तवत्सल, परमपवित्र, परमोदार, परमकारुणिक, परमपूज्य, सर्वसुंदर, सकलगुणनिधान किंवा थोडक्यांत सांगणें असल्यास जिव्हाळयाचा सगुण, प्रेमगम्य व व्यक्त म्हणजे प्रत्यक्ष रूपधारी सुलभ परमेश्वरच मनुष्य 'भक्तीसाठीं' स्वभावतः स्वीकारीत असतो..परमेश्वर सर्वव्यापी असतां पांडुरंग किंवा विठोबा लहान कां झाला? या प्रश्नास–

**हरि तुका म्हणे अवघा एकला। परि हा धाकुला भक्तीसाठीं ॥** असें तुकारामबुवांचें उत्तर असून तोच सिद्धांत वेदांतसूत्रांत दिला आहे.

..भगवंतानीं गीतेंतही भक्तीचा हा मार्ग–

**राजविद्या राजगुह्यं पवित्रमिदमुत्तमम्।**
**प्रत्यक्षावगमं धर्म्यं सुसुखं कर्तुमव्ययम्।**

"सर्व विद्यांमध्यें व गुह्यांमध्यें श्रेष्ठ (राजविद्या व राजगुह्य) असून उत्तम, पवित्र, प्रत्यक्ष दिसणारा, धर्मानुकूल, सुखानें आचरण करण्यासारखा, आणि अक्षय्य होय" (गी. ९, २) असें वर्णन केलें आहे..

स्मार्तमार्गांत चतुर्थाश्रमाचें जें महत्त्व आहे तें भक्तिमार्गांत किंवा भागवतधर्मांत रहात नाहीं. वर्णाश्रमधर्माचें वर्णन भागवतधर्मानेंही केलेलें असतें; पण त्या धर्माचा मुख्य कटाक्ष भक्तीवरच असल्यामुळें ज्याची भक्ति उत्कट तो सर्वांत श्रेष्ठ, मग तो गृहस्थ असो, वा वानप्रस्थ अगर वैरागी असो, त्याबद्दल भागवत धर्मांत कांहीं विधिनिषेध मानीत नाहींत. (भाग. १८, ११, १२, १४ पहा).

गीतेंत जो गोडवेपणा, प्रेमळपणा किंवा रस भरला आहे तो त्यांत प्रतिपादन केलेल्या भक्तिमार्गाचाच परिणाम होय.

..अनेक मार्गांच्या अथवा प्रतीकोपासनांच्या भानगडींत पडून मन गांगरून जाण्याचा संभव असल्यामुळें चित्तशुद्धीचें अनेक धर्ममार्ग सोडून "तूं एकटया मलाच शरण ये; मी तुला सर्व पापांपासून मुक्त करीन, भिऊं नको" असें अर्जुनासच नव्हे तर अर्जुनाला निमित्त करून सर्वांसच भगवंताचें अखेरचें निश्चित आश्वासन आहे. तुकारामबुवाही–

जळो ते जाणीव जळो ते शहाणीव । राहो माझा भाव विठ्ठलपायीं ।।
जळो तो आचार जळो तो विचार । राहो मन स्थिर विठ्ठलपायीं ।।

(गा. ३४६४) असेंच सर्वधर्मनिरसनपूर्वक देवापाशीं अखेरचें मागणें मागतात. निश्चयपूर्वक उपदेशाची किंवा प्रार्थनेची ही सीमा झाली."

—लोकमान्य टिळक.

## भक्तीची सुलभता आणि प्रत्यक्षता

प्रो. एडिंग्टन या विख्यात भौक्तिकशास्त्रज्ञानें "भौतिक जगाचें स्वरूप" या नांवाच्या आपल्या ग्रंथाचे अखेरीस धर्मातील अनुभवासंबंधानें आपले विचार प्रगट केले आहेत. ते म्हणतात कीं,—

In history religious mysticism has often been associated with extravagances that cannot be approved...... A point that must be insisted on is that religion or contact with spiritual power, if it has any general importance, must be a commonplace matter of daily life and it should be treated as such in any discussion.

—Sir **A. S. Eddington.**

The Nature of the Physical World pp. 340.

(इतिहासांत धार्मिक अनुभवास नाना तऱ्हेच्या अद्भुत गोष्टी चिकटलेल्या दिसून येतात. त्या आपणास मान्य होण्याजोग्या नसतात. धर्म अगर ईश्वरी शक्तीशीं संबंध ही जर सर्वांच्या करितां आणि महत्त्वाची अशी गोष्ट असेल तर ती आपल्या रोजच्या आयुष्यक्रमांतील नेहमीं घडणारी अशी साधी गोष्ट असली पाहिजे, व तिचें विवेचन करतांना आपण हीच दृष्टि ठेविली पाहिजे.) त्यांच्या म्हणण्याचा उद्देश असा कीं भौतिक शास्त्रज्ञ ज्याप्रमाणें प्रत्यक्ष जगांतील वस्तुस्थिति पहातो व घडणाऱ्या गोष्टीवरून निसर्गाचे नियम काढतो त्याप्रमाणें धर्मविषयक गोष्टीही प्रत्यक्ष अवलोकन करून दिसणाऱ्या पाहिजेत. त्यास निष्कारण गूढपणाचें आवरण

घालतां उपयोगी नाहीं. त्याचप्रमाणें कोणाही मानवी प्राण्याच्या आयुष्य-क्रमांत नित्य घडत असणाऱ्या गोष्टींतच त्याचें रूप प्रगट व्हावयास पाहिजे. ही त्यांची विचारसरणी न्याय्य आणि तर्क व विवेचकबुद्धि यांना पटणारी आहे. आधुनिक धार्मिक विचारपद्धतींत अशा तऱ्हेची सरणी नसल्यामुळें निरनिराळे वाद, गुंतागुंती, पक्षभेद आणि घोटाळे दृष्टोत्पत्तीस येतात आणि मानवी जीवनाचें सर्वांत श्रेष्ठ सुख प्रगट होण्यास, त्याचा सर्वांना सोपेपणानें अनुभव येण्याचे मार्गांत, अडचणी व अडथळे मात्र उत्पन्न होतात.

वास्तविक परमेश्वराची भक्ति हा अत्यंत श्रेष्ठ असा धार्मिक अनुभव असून मानवी जीवनांतील आत्यंतिक सुखाचें स्थान आहे. असें असून आधुनिक सुशिक्षित वर्गांत तद्विषयीं उदासीनता दिसून येते. याचें कारण भक्ति ही केवळ भावनामय, अशिक्षित लोकांसाठींच आहे, शहाण्या व विचारी लोकांचा मार्ग याहून निराळा असला पाहिजे ही समजूत होय. त्याचप्रमाणें भक्तीविषयक प्रचलित निरनिराळ्या कल्पनाही यास कारणीभूत असतात. खरें पाहिलें तर भक्ति ही–शहाणा, अज्ञ, गरीब, श्रीमान्, स्त्री, पुरुष, बाल, वृद्ध–कोणीही असो त्या सर्वांकरितां असून ती उघड सोपी पायवाट आहे असें भागवतधर्मी संतांनीं अट्टाहासानें सांगितलें आहे. भक्ति ही सर्वांकरितां असून नित्याच्या व्यवहारांतच तिचें रूप सहजपणें प्रगट आहे.

जगांत ईश्वरी सत्ता आहे हें लक्षांत येण्यास ग्रंथाचें वाचन, अभ्यास, विद्वत्ता, अधिकार यांपैकीं कशाचीही जरूरी नाहीं. समजा कीं एकाद्या रानांत एक अगदीं रानटी माणूस झोपीं गेलेला आहे. तो जागा झाल्याबरोबर त्यास पृथ्वी, सूर्य, जलाचे ओघ, वृक्षराजी, पर्वत वगैरे दृश्यें दिसतील. ही कांहीं आपण तयार केलेली नाहींत व आपणांस तयार करतांही यावयाचीं नाहींत, तेव्हां यांना तयार करणारी अशी एक वरिष्ठ सत्ता असली पाहिजे हें त्याच्या सहज लक्षांत येईल. कोणतेंही अध्ययन, अभ्यास न करतांसुद्धां ही गोष्ट त्याचें ध्यानांत सहज येईल. यानंतर तो जर थोडासा विचार करील तर ह्या सर्व दृश्याची माझे ठिकाणीं प्रतीती आहे म्हणून यास किंमत आहे हेंही त्याचें ध्यानीं सहज येईल. जगांत सुगंध आहे पण

त्याची प्रतीती माझ्या नाकाचे ठिकाणीं आहे. नाक नसेल तर चमेली, जाई, मोगरा, गुलाब इत्यादि शेंकडों सुवासिक पुष्पांचा काय उपयोग? जगांत नाना तऱ्हेचे रस असतील पण त्या सर्वांची प्रतीती जिव्हेंत आहे. जिव्हा नसेल तर नाना प्रकारच्या स्वादु रसांचा काय उपयोग? जगांत नाना तऱ्हेचीं सुंदर रूपें असतील. पण माझ्या डोळ्यांमुळें त्याना किंमत. पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश हीं पंचमहाभूतें खरीं पण त्या सर्वांची प्रतीती माझे ठिकाणीं. ह्या सर्वांची प्रतीती घेणारा मानवी प्राणी नसता तर यांचें काय महत्व? अर्थात् त्या वरिष्ठ सत्तेनें हीं सर्व मानवासाठींच निर्माण केलीं आहेत हेंही त्या पूर्वसंस्काररहित मनुष्याचें ध्यानांत सहज येईल. आणखी थोडा विचार केला तर ज्याअर्थी मजसाठीं त्या सत्तेनें जग निर्माण केलें त्याअर्थी तिचा माझा निकटचा व प्रियतेचा संबंध असला पाहिजे हेंही त्यास समजेल. त्या परम सत्तेचा आणि आपला जिव्हाळ्याचा व प्रेमाचा संबंध ओळखल्यावर त्याचें त्यास प्रत्येक व्यवहारांत घडोघडी स्मरण होईल. या प्रेमाची ओळख पटणें हीच भक्ति होय. ही ओळख पटण्यास अधिकाराची जरूर नाहीं. तर्क, अनुमानाची जरूर नाहीं; कारण ही प्रत्यक्ष असून सुलभ आणि सर्वांना शक्य आहे.

जगांत जीवनास अत्यंत जरूर अशा थोर वस्तूंचा लाभ आपणास फुकट व सहज असतो हें आपल्या ध्यानीं नसतें. वस्तूची किंमत आपण स्वतःच्या जरूरीवरून न करतां जनरूढीप्रमाणें करतो. या जनरूढीच्या कल्पित मूल्यावरून आपण आपल्या सुखाचेंही माप ठरवितों. उदाहरणार्थ, कष्ट करून पोटापुरतें द्रव्य मिळविणारा मनुष्य एकाद्या श्रीमंतास पाहून आपल्या व त्याच्या परिस्थितीची तुलना करतो व माझ्यापेक्षां तो किती सुखी आहे असें म्हणून स्वतःस कमी लेखतो. वास्तविक त्या श्रीमंत गृहस्थास विचारलें तर त्याची संपत्तिही त्यास कमीच वाटते. मिळून दोघेही स्वतःस कमीच लेखतात. जनरूढीनें समजलें जाणारें सुख या जातीचें असते. द्रव्य म्हणजे क्षुधानिवारणार्थ लागणाऱ्या दाळतांदुळाची व्यवस्था करणारा जिन्नस होय. मनुष्याचें जीविनास अन्नआच्छादनाची आवश्यकता आहे त्यावरून याची किंमत. आतां अन्नाहून जीवनास आवश्यक वस्तु जल होय.

व तें प्रभूनें सहज व फुकट निर्माण केलें आहे. अमृतासारख्या नद्या दुथडया भरून वहातात व त्या मानवांस फुकट. तेव्हां प्रभूच्या साम्राज्यांतील जलौघ हें जीवाचें केवढें थोर सुख व तें कांहीं मूल्य न देतां जीवाकरितां ठेविलें आहे. त्याचप्रमाणें एक वेळ मनुष्य अन्नपाण्यावांचून कांहीं काल राहूं शकेल. परंतु वायूवांचून क्षणभरही राहूं शकायचा नाहीं. चोहींकडे निर्बन्ध खेळणारा वारा जर क्षणभर लुप्त झाला तर आपली काय अवस्था होईल बरें? एवढी जीवनास अत्यंत जरूर गोष्ट प्रभूनें सहज व विनामूल्य दिली आहे. हीं एकाहून एक मोठीं सुखें म्हणजे ईश्वरी सहाय्यच होय. आपण शाळेंत, महाविद्यालयांत जाऊन शिकतों पण तें शिकणें ग्रहण करणें, ज्या ज्ञानानें ती ज्ञानशक्ति फुकट. ती कोठें शिकून कष्ट करून मिळविलेली नसते. या सर्व श्रेष्ठ सुखांचा अनुभव, प्रतीती मानवी शरीरांत यावयाची. हें शरीर आम्हाला पाहिजे म्हणून कोणी मागणी केली नव्हती तर ती प्रभूची विनामूल्य व अमोल देणगीच आहे. या देणगीची किंमत इतर कोणत्या गोष्टीवरून करतां यावयाची नाहीं.

या सर्व लाभांतून जगन्नियंत्री जी परमसत्ता तिची जीवावरील कृपा व्यक्त होते व तिचा व मानवी जीवनाचा जिव्हाळयाचा संबंध दिसून येतो. याही पुढें विचार केला तर हा संबंध दूरचा नसून अत्यंत निकटत्वाचा व जिव्हलगपणाचा आहे असें दृष्टोत्पत्तीस येईल. प्रत्यक्ष जीविताच्या उगमाशींच या परमसत्तेचा जिव्हाळा व परमप्रीती आहे. ही परमप्रीतीच मातापित्यांच्या देहाचा आश्रय करून जीवनाचा उदय करते. मातेच्या उदर कुहरांत जलबिंदूच्या रूपानें असणाऱ्या जीवनाचे अति हळुवारपणें व प्रीतीनें पालन करते. त्याचे ठायीं ज्ञान, आनंद, कर्म व्यक्त करते. पुराणांतरीं आपण प्रभूनें प्रल्हादास अग्नींतून राखल्याचें उदाहरण वाचतों. पण प्रत्येकाचे प्रभूनें गर्भांत असतां या रीतीनें राखण केलें आहे हें आपल्या ध्यानीं नसतें. मातेच्या उदरांतील जठराग्नीचें अमृत बनवून आपणास प्रभूनें राखलें आहे. हें लक्षांत आल्यावर आपला व त्या परमसत्तेचा केवढा निकटचा व प्रियतेचा संबंध आहे हें सहज ध्यानांत येईल. या संबंधाचें स्मरण हीच भक्ति होय. (भक्ति करावयाची नसून ओळखावयाची आहे. कारण वस्तुतः

देवच जीवाची भक्ति करीत आहे.) प्रपंचांत असतांना ही भक्ति सहज घडेल. परमार्थ म्हणून कांहीं खटपटीचा सायासाचा निराळा उपद्व्याप करावयाची मुळींच जरूर नाहीं. सहज आपल्या प्रिय बालकाचें चुंबन घेतांना, एकादा विषय इंद्रियावर असतांना त्या परमसत्तेची प्रियता लक्षांत येईल व वाटेल कीं "या बालकाबद्दल अगर विषयाबद्दल मला इतके गोड वाटतें तसें प्रभु तूं मला एवढ्या प्रियतेनें गर्भांत वाढविलेंस, मी कांहीं न करतां मजला डोकें, नाक, कान दिलेस, तुझी गोडी मला कधीं वाटेल?" या वाटण्यानेंच प्रभु-प्रीती हळूहळू आठवांत येऊन तिचा वेध लागेल. हा वेध अथवा उत्कट आठव हाच त्या प्रभुप्रीतीचा संग होय.

श्रीतुकोबारायांनीं म्हटलें आहे–कृपाळुवे पांडुरंगे । अंगसंगे जिवलगे ।। जिवलग व कृपाळु प्रभू जीवाचा अंगसंगीं आहे. शरीराचें विषयासक्तीच्या दृष्टीनें नाशिवंत म्हणून जरी वर्णन केलें असलें तरी ते प्रभु-प्रियतेच्या दृष्टीनें प्रेम कल्लोळमयच आहे असा संतांचा बोध आहे. म्हणून श्रीतुकोबारायांनीं एका अभंगांत "शरीर दुःखाचें कोठार" म्हणून लागलीच "शरीर सुखाचें घोसुलें" म्हटलें आहे. या शरीराचें द्वाराच प्रभूची परमप्रीती व्यक्त होते हें वर दिलेल्या उदाहरणावरून समजून येईल. त्याचप्रमाणें ईशसत्ता कशी प्रगट आहे व तिचा आणि आपल्या जीवनाचा किती जिव्हाळ्याचा संबंध असून तो आपल्या नित्य आयुष्यक्रमांतच कसा उघड आणि प्रत्यक्ष आहे हें कळून येईल. हें कळणें म्हणजे भक्ति व ती सर्वांना सुलभ आणि प्रत्यक्ष आहे.

## भक्ति आणि व्यवहार

**जाणोनी नेणतें करी माझें मन । तुझी प्रेमखूण देऊनिया ।।**
**मग मी संसारी असेन वर्तत । जेवी जळा आंत पद्मपत्र ।।**

–श्रीतुकाराममहाराज.

भक्ति आणि व्यवहार यांचा संबंध अहिनकुलाप्रमाणें एकमेकांशीं अगदीं विरुद्ध आहे अशी सामान्य समजूत असते. सूर्य आणि अंधार यांचे

जसें नातें, त्याचप्रमाणें भक्ति आणि व्यवहार यांचें नातें होय. भक्ति म्हणजे भोळेपणा व व्यवहार म्हणजे चातुर्य. या दोहींचें जमायचें कसें? भोळेपणांत कर्माविषयीं दक्षता कशी असणार? कर्मयोग आणि भक्तियोग एके ठिकाणीं येणें अशक्य असें यावरून वाटण्याचा फार संभव असतो; परंतु ही समजूत चुकीची आहे. कारण, भक्तीचा भोळेपणा म्हणजे देवाशीं भोळेपणा होय. जगताशी नव्हे. जगाशीं शहाणपणानें वागणेंच बरोबर. देवाशीं भोळेपणा म्हणजे लेकरूं जसें आईशीं भोळेपणानें—तिच्याशिवाय मला कोणी नाही—या आधारानें वागते तसें असणें होय. जगाशी शहाणपणा म्हणजे प्रसंग व व्यक्ति ओळखून त्या त्या प्रकारानें वागणें होय. श्रीतुकाराममहाराजादि संतांचे ग्रंथ पाहिल्यास त्यांत देवाविषयी उत्कट भक्ति त्याचबरोबर व्यवहारसूक्ष्मताही आपणास आढळून येते. सामान्य जीवांच्या व्यवहारांत जितकी सूक्ष्मता आढळणार नाहीं त्याहून कितीतरी पटीनें सूक्ष्मता भक्तांच्या व्यवहारांत असते. सामान्य जनांची व्यवहारदक्षता स्वार्थास्तव असते तर भक्तांची प्रभूप्रीति–जतनास्तव असते हाच मुख्य फरक होय.

संतांनी आपल्या ग्रंथांचे द्वारां शिकविलेल्या व्यवहारांचीं कांहीं उदाहरणें पाहूं. (खालील अवतरणे श्रीतुकोबारायांचे गाथ्यांतून घेतली आहेत.)

१ गृहस्थाश्रमांत कशी वागणूक असावी–

**जोडोनिया धन उत्तम वेव्हारें । उदास विचारें वेच करी ।।**
**उत्तमचि गति तो एक पावेल । उत्तम भोगील जीवखाणी ।।**
**परउपकारी नेणे परनिंदा । परस्त्रिया सदा बहिणी माया ।।**
**भूतदया गाई पशूंचे पालन । तान्हेल्या जीवन वनामाजी ।।**
**शांतीरूप नव्हे कोणाचा वाईट । वाढवी महत्व वडिलांचे ।।**
**तुका म्हणे हेंचि आश्रमाचें फळ । परम पद बळ वैराग्याचें ।।**

प्रामाणिकपणानें द्रव्य मिळवावें. त्याचा विनियोगही चांगल्या रीतीनें करावा. परोपकार करून दुसऱ्याची निंदा करू नये. परस्त्रियावर आपल्या माय बहिणीप्रमाणें दृष्टी ठेवावी–भूतदया मनांत बाळगून गाई पशूंचें योग्य

२०४०९ वि.
१०७३ .... नों: दि:

संगोपन करावें--तान्हेल्यास पाणी पाजावें. स्वतः शांत राहून कोणाचें वाईट इच्छूं नये व वडिलांचा थोरपणा कायम राखावा.

द्रव्य अथवा संपत्ति यांच्या निषेधाचे कांहीं ठिकाणीं संतांचे उद्गार आहेत. (उदा० सोनें रुपें आम्हा मृत्तिकेसमान । इ०) परंतु त्याचा अर्थ संपत्तीचा मद असू नये. त्या उन्मादानें कर्तव्य विसरूं नये. वास्तविक द्रव्य हें चांगलें अगर वाईट नसून त्याच्या विनियोगांत चांगुलपणा अगर वाईटपणा आहे. वास्तविक द्रव्य हें अन्नारतव, अन्न शरीर रक्षणार्थ, शरीररक्षण भगवत्प्रीतीस्तव. म्हणून द्रव्य त्याज्य नसून योग्य विनियोग करण्यास्तव आहे. अशी सारग्राहकतेची बुद्धि असावी.

**दूध दही ताक पशूचें पाळण । त्यामध्यें कारण घृत सार ।।**
**लोहो कफ गारा अग्नीचिया काजें । येऱ्हवी तें ओझें कोण वाहे ? ।।**
**तुका म्हणे खोरी पहारा जतन । जोवरी हे धन हातीं लागे ।।**

गाय पाळणें, तिचें दूध काढणें--त्यास मुरवण घालून दही करणें--त्या दह्यास घुसळून ताक करणें हे सायास कशास्तव ? तर तुपासाठीं. लोखंड, गारेचा तुकडा व कफ (लवकर पेटणारा गोवरीसारखा तुकडा) हीं कशाकरितां जवळ बाळगावयाची ? तर अग्नीकरितां. खोरीं, संरक्षक हे कशाकरितां ? तर भूमिगत द्रव्य हातीं येण्यास्तव. व्यवहारांत वागतांना अशी सारग्राहक बुद्धि पाहिजे. म्हणजे द्रव्याचाही अयोग्य विनियोग होणार नाही.

२ दया म्हणजे भूतांचें पालन त्याचप्रमाणें कंटकाचें निर्दाळणही होय.

**दया तिचें नाव भूतांचें पाळण । आणिक निर्दळण कंटकाचें ।।**

आपल्या अंगीं भूतदया पाहिजे. या भूतदयेमध्यें सज्जनांच्या पालनाचा त्याचप्रमाणें दुर्जनांच्या निर्दाळणाचाही अंतर्भाव होतो. शठाशीं शाठ्यानेंच वागणें हीच दया. ही दयेची व्याख्या यथायोग्य व पूर्ण आहे.

**मऊ मेणाहुनी आम्ही विष्णुदास । कठिण वज्रास भेदू ऐसे ।।**
**मेले जित असो निजोनिया जागे । जो जो जें जें मागे तें तें देऊ ।।**
**भले तरी देऊ गांडीची लंगोटी । नाठाळाचे काठी देऊ माथा ।।**
**मायबापाहूनी बहू मायावंत । करू घातपात शत्रूहूनी ।।**

**अमृत ते काय गोड आम्हापुढें । विष तें बापुडे कडू किती ।।**
**तुका म्हणे आम्ही अवघेचि गोड । जया पुरे कोड त्याचे परी ।।**

श्रीहरीचे भक्त हे मेणाहून मऊ आणि वज्राहून कठीण, भल्या रीतीनें वागणारास ढुंगाचें वस्त्रही देणारे तर नाठाळाचे डोक्यांवर काठीचा प्रहार करणारे, आईबापाहून मायाळू आणि वैऱ्याहून घातक, अमृतापेक्षां गोड आणि विषाहून कडू, याप्रमाणें जशास तसें कोड पुरविणारे असतात.

• दुर्जनास पुरतें ओळखलें पाहिजे–दुसऱ्यांच्या हानीनें ज्यांना संतोष होतो ते दुर्जन होत.

**आणिकांच्या घातें । ज्यांची निवतील चित्तें ।।**

अशांची सलगी न करतां त्यांचा संग वर्ज करावा. साप वर वर शांत दिसला म्हणून तो भला आहे असें समजूं नये. खवळल्यास अंगास कडकडून चावेल.

• **नेदावी सलगी न करावा संग । करी चित्ता भंग वेळोवेळा ।।**
**सर्प शांतीरूप न म्हणावा भला । झोंबे खवळिला तत्काळ तो ।।**
**तुका म्हणे दुरी राखावा दुर्जन । करावें वचन न घडे तें ।।**

आपलीं नखें वाढलीं म्हणजें आपण काढून टाकतों त्याप्रमाणें दुर्जनांचा निःपात करावा व त्यांची मानखंडणा करावी.

**दुर्जनाचा मान । सुखें करावा खंडण ।।**
**लाता हाणोनिया वारी । गुंडा वाट शुद्ध करी ।।**
**तुका म्हणे नखें । काढुनी टाकीजेती सुखें ।।**

३ अधमाशीं अधमच झालें पाहिजे. त्याच्याशी गोडीनें वागून भागायचें नाहीं.

**पाया झाला नारू । तेथें बांधिला कापुरू ।**
**तेथे बिबव्याचें काम । अधमाशी तो अधम ।।**
**रुसला गुलाम । धनी करितो सलाम ।**
**तेथे चाकराचें काम । अधमाशी तो अधम ।।**

रुसली घरची दासी । धनी समजावी तियेसी ।
तेथें बटकीचें काम । अधमाशी तो अधम ।।
देव्हाऱ्यावरी विंचू आला । देवपूजा नावडे त्याला ।
तेथें पैजारेचें काम । अधमाशी तो अधम ।।

पायास नारू झाला तर तेथें कापूर बांधून उपयोग नाहीं बिबाच घातला पाहिजे. गुलाम रुसला तर धन्यानें त्यास नमस्कार न करतां त्याची खोडच काढली पाहिजे. घरांतील मोलकरीण रुसली तर मालकानें विनवणी न करतां तिला तिच्या पायरीनेंच वागविलें पाहिजे. देव्हाऱ्यावर विंचू शिरला—त्याला देवपूजा आवडत नाहीं म्हणून स्वस्थ न बसतां हातांत जोडा घेऊन त्यास स्वर्गाची वाटच दाखविली पाहिजे !

४ आयुष्यांत कसाही प्रसंग आला तरी त्यास न भीता तोंड द्यावे. श्रीहरीवर विश्वास ठेवावा व त्याच्या आधारानें समाधान ढळूं देऊं नये.

कै वहावे जीवन । कै पलंगी शयन ।।
जैशी जैशी वेळ पडे । तैसे तैसे होणे घडे ।।
कै भोज्य नाना परी । कै कोरडचा भाकरी ।।
कै बसावें वाहनी । कै पायीं अनवाणी ।।
कै उत्तम प्रावर्णे । कै वसनें तीं जीर्णे ।।
कै सकळ संपत्ति । कै भोगणें विपत्ति ।।
कै सज्जनाशी संग । कै दुर्जनाशी योग ।।
तुका म्हणे जाण । सुख दुःख तें समान ।।

सुखांत व दुःखांत श्रीहरीच आठवावा. दुसऱ्या कोणासही तोंड वेंगाडूं नये

तैसे नव्हो आम्ही विठ्ठलाचे दास । यावे आणिकास काकुळती ।।
अंकिताचा असे अभिमान देवा । समर्पुनि हेवा असे पायीं ।।

कांहीं झालें तरी भिक्षापात्राचा अवलंब करणें ही निंद्य व लज्जास्पद गोष्ट होय.

भिक्षापात्र अवलंबणें । जळो जिणें लाजिरवाणें । ऐसियासी नारायणें उपेक्षिजे सर्वथा ।। ... जगा घालावे सांकडे । दीन होऊनि बापुडे । हेचि अभाग्य रोकडे । मूळ आणि अविश्वास ।। काय न करी विश्वंभर । सत्य करितां निर्धार । तुका म्हणे सार । दृढ पाय धरावे ।।

५. टाकीचे घाव सोसूनच देवपण येतें. छातीवर गोळ्या आणि शस्त्रप्रहार सहन करणारा वीरच सेनापति होतो.

साहोनिया टाकी घाये । पाषाण देवचि झाला पाहे ।।
तया रीती दृढ मन । करी साधाया साधन ।।
बाण शस्त्र साहे गोळी । शूरा ठाव उंच स्थळी ।।
तुका म्हणे सती । अग्न न देखे ज्या रीती ।।

६. जन हे नाना प्रकारचें आहे. आपण कसेंही वागलों तरी निंदा करणारच. म्हणून जनाच्या नादीं न लागतां आपला स्वहिताचा मार्ग आक्रमण करावा.

ऐसा हा लौकिक कदा राखवेना । पतित पावन देवराया ।।
संसार करितां म्हणती हा दोषी । टाकितां आळसी पोट पोसा ।।
आचार करितां म्हणती हा पसारा । न करिता नरा निंदिताती ।।
संतसंग करितां म्हणती हा उपदेशी । येरा अभाग्यासी ज्ञान नाहीं ।।
धन नाहीं त्यासी ठायीचा करंटा । समर्थासी ताठा लाविताती ।।
बहु बोलो जातां म्हणती हा वाचाळ । न बोलता सकळ म्हणती गर्वी ।।
भेटीसी नव जातां म्हणती हा निष्ठुर । येतां जातां घर बुडविलें ।।
लग्न करू जातां म्हणती हा मातला । न करितां जाला नपुंसक ।।
निपुत्रिका म्हणती पहा हो चांडाळ । पातकाचें मूळ पोरवडा ।।
लोक जैसा ओक धरिता धरवेना । अभक्ता जिरेना संत संग ।।
तुका म्हणे आता ऐकावें वचन । त्यजुनिया जन भक्ति करा ।।

याप्रमाणें जगाच्या निंदास्तुतीस न भाळतां आपल्या ध्येयाचा रस्ता आपण चोखाळावा.

संतांच्या वाङ्मयांतून आणखीही बरेच उतारे देतां येतील; परंतु तूर्त भक्ति आणि व्यवहार हे परस्परविरोधी नसून भक्तीची उज्ज्वल पार्श्वभूमि व्यवहारास स्फूर्ती देणारी संजीवनीच आहे हें समजण्यास एवढे उतारे पुरे आहेत. भक्ताचें कार्यक्षेत्र धार्मिक असलें तरी त्यांत शौर्यधैर्यादि गुण पूर्ण व्यक्त होतच असतात. स्वतःच्या क्षेत्राखेरीज इतर विषयाकडे त्यांचें लक्ष कां नसावें या आक्षेपास कै. लोकमान्य टिळकांनीं दिलेलें उत्तर मोठें मार्मिक आहे. "आपल्या बांधवाकरितां अंतःकरण तळमळणें...त्यांना भक्तीचीं साधनें मिळावींत असें वाटणें हें भक्तीचें लक्षण आहे. तुकाराम-बोवासारख्यांनीं अमुकच कां केलें? असा प्रश्न येईल. पण एका विषयाकडे तंद्री लागल्यावर दुसऱ्या विषयाकडे लक्ष जात नाहीं हें याचें कारण आहे एकाद्या गांवढळानें "तुम्ही नांगर का धरीत नाहीं? इंग्रजी का शिकलात?" असा प्रश्न आपणास करण्यासारखें हें आहे. न्या. मू. रानडे हे जज्ज होते ते दुसरे कांहीं का झाले नाहींत असा प्रश्न करण्यासारखे हें होईल. क्षुल्लक मनानें प्रश्न करावयाचा नाहीं आहे ....." (लो. टिळकांचीं व्याख्यानें पृ. १४०)

भक्ती व कर्मयोग यांचा निकट संबंध आहे.

## भक्ति आणि वैराग्य

**आतां विरक्तीची कवण परी । जे मनातें येउनी वरी ॥**

(ज्ञा. १५-३७)

वैराग्य हें भगवद्भक्तीचें साधन आहे. वैराग्याखेरीज भक्तिप्रेमसुखाचा लाभ व्हावयाचा नाहीं. वैराग्य प्रथम अंगीं बाणलें पाहिजे व नंतर जीवास परमार्थाचा लाभ व्हावयाचा. वैराग्य ही पहिली पायरी आहे. ती चढून गेल्याशिवाय पुढें जातां यावयाचें नाहीं. याकरितां अगोदर वैराग्याकरितांच खटपट करुन तें साध्य करुन घेतलें पाहिजे वगैरे पद्धतीची विचारसरणी नेहमीं आपल्या कानीं येते. वैराग्य प्राप्त होणें हेंच अत्यंत कठीण आहे असें वर्णन ऐकून जीवही दडपला जातो व कित्येकांच्या मुखांतून "आपणा

संसारी माणमास कसचें साधणार?" असे निराशेचे व हताशपणाचे उद्गारही ऐकूं येतात. तेव्हां वैराग्याचें वास्तविक स्वरुप काय आहे, त्याचें आपल्या जीवनांत कोणतें स्थान व मूल्य आहे याचें विवेचन करणें मोठें उद्बोधक होणार आहे. भागवतधर्मानें रूढ असलेल्या पारमार्थिक कल्पनांची आमूलाग्र तपासणी व छाननी केली आहे. पूर्वीच्या रूढ कल्पना विकृत अगर अपूर्ण कशा आहेत हें संतांच्या ग्रंथांतून उत्कृष्ट रीतीनें प्रतिपादन केलें गेलें आहे. इतकेंच नव्हे तर या सर्व कल्पनांचे परिपूर्णत्व कशांत आहे हेंही दाखवून दिलें आहे. इतर कल्पनाप्रमाणें वैराग्याची कल्पनाही त्यांनीं परीक्षण केली व विरक्तीचें खरें रूप उघड केलें.

प्रथमतः आपण शारीरिक वैराग्याचा विचार करूं. वैराग्याच्या कल्पनेनें कोणी दाढी जटा वाढवितात, कोणी फाटकीं तुटकीं वस्त्रें परिधान करितात अगर भगवीं वस्त्रें वापरतात. कोणी धोतर सोडून लंगोटी लावतात तर कित्येकांची अजिबात वस्त्रच टाकून देण्याची प्रवृत्ति असते— या सर्व बाह्य क्रियेवरून हे सर्व विरक्त आहेत अशीही कांहींची समजूत असते. परंतु वेष पालटण्याची मुळींच जरूर नाहीं. श्रीतुकोबारायांनीं एके ठिकाणीं यासंबंधीं उद्गार काढले आहेत कीं--

**भगवें तरी श्वान सहज वेष त्याचा । तेथें अनुभवाचा काय पंथ ।।**
**वाढवुनी जटा फिरे दाही दिशा । तरी जंबुवेषा सहज स्थिती ।।**
**कोरोनिया भूमि करी मध्यें वास । तरी उंदिरास काय वाणी ।।**
**तुका म्हणे ऐसें कासया करावें । देहासी दंडावे वाउगेंची ।।**

वेष पालटण्याच्या पुढची पायरी देहदंडन. उपास, तापास, नाना व्रतें या योगानें सतत आपल्या देहास एकाद्या शत्रूसारखें मानून कष्ट देण्याची कांहींना संवय असते. याचा अर्थ शारीरिक कष्ट नकोत असा नव्हे परंतु निष्कारण देह कष्टविण्यांत वैराग्य आहे अशी जी कित्येकांची समजूत असते ती मात्र चुकीची आहे. उपास, मौन, कच्चें अन्न खाणें, मुद्दाम उन्हातान्हांत हिंडणें, भलत्याच वेळीं थंड पाण्याचीं स्नानें करणें वगैरे नाना प्रकार देहदंडनांत येतात. दिसण्यास या गोष्टी साध्या दिसतात परंतु वैराग्याच्या कल्पनेनें या गोष्टी करणाऱ्यांची शरीरप्रकृती खंगून आयुष्याचें

मातेरें झाल्याचीं उदाहरणें थोडीथोडकीं नाहींत. प्रस्तुत लेखकाचा कॉलेजांत शिकत असतां एक ओळखीचा विद्यार्थी होता. अंतःकरणानें सात्विक व सुशील होता पण त्यास वैराग्यानें पछाडले व साधे शिजविलेलें अन्न खाण्याचें टाकून देऊन त्यानें कच्चे गहू भिजत घालून ते खाण्यास सुरुवात केली! पण पुढें त्याचा परिणाम असा झाला कीं, त्याच्या पोटांत विकार होऊन त्यांतच तो मरण पावला! त्यानें आपल्या हातानें आपल्या जीविताचें नुकसान करून घेतलें.

देहदंडामध्येंच इंद्रियांच्या विषयाच्या त्यागाचा समावेश होतो. शद्ब, स्पर्श, रस, रूप व गंध हे नाक, कान, डोळे इत्यादि पांच कर्मेंद्रियांचें पांच विषय होत. या सर्व विषयांचा त्याग करणें म्हणजे वैराग्य अशी कित्येकांची कल्पना असते. आतां इंद्रियांच्या विषयांचा उपभोग हेंच जीविताचें ध्येय मानणें चुकीचें होईल. परंतु त्यावरून सर्व विषय टाकून दिले पाहिजेत असें म्हणणेंही चुकीचें होईल. सुंदर पुष्पांचा सुगंध दरवळत असता नाक दाबण्यांत अगर सुस्वर गायनाचे वेळीं कानांत बोटें घालून बसण्यांत, पौर्णिमेचा चंद्रमा आपल्या शीतल किरणांनीं स्पर्श करून शरीरास सुखवीत असतां मुद्दाम तेथून उठून अंधेरांत जाऊन बसण्यांत विशेष काय आहे? उलट अरसिकतेचें माप मात्र पदरीं पडेल. त्यागाची कल्पना कोठवर जाईल याचा नेम नाहीं. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं त्यागाची छाननी करून म्हटलें आहे—

**घरदार वोखटें त्यजू म्हणशी तरी शरीराएवढें जाड ।**
**मायबाप वोखटी त्यजू म्हणशी तरी अहंकार अविद्येचें कोड ।**
**बंधू सखे त्यजू म्हणशी तरी काम क्रोध मद मत्सर अवघड ।**
**बहिणी पाठीच्या त्यजू म्हणशी आशा, तृष्णा, मायेचें बंड रया ॥१॥**
**त्यजिलें तें काय कासया म्हणिजे सांग पा मजपाशी ऐसें ।**
**जया भेणें तूं जाशी वनांतरा तें तव तुजचि सरिसे रया ॥२॥**
**स्त्री वोखटी त्यजू म्हणशी तरी कल्पनेएवढी भोक्ती । इ०....**

व याकरतां त्यांनीं दुसऱ्या एका अभंगांत म्हटलें आहे—

**कां सांडीसी गृहाश्रम । कां सांडिसी क्रियाकर्म । कासया सांडिसी कुळीचे धर्म । आहे तें वर्म वेगळेंचि ॥ भस्म उधळण जटाभारू । अथवा उदास**

**दिगंबरू । न धरी लोकांचा आधारू । आहे तो विचारू वेगळाचि ।। इ०....** यावरून ब्रह्मचर्य अगर संन्यास म्हणजे विशेष नव्हे. या बाबतीतही वैराग्याची कल्पना चुकीची असते. लग्न न केलेला मनुष्य लग्न झालेल्या मनुष्यापेक्षां श्रेष्ठ असतो असें नव्हे. आजन्म ब्रह्मचर्य अथवा संन्यास हे दोन्हीही अतिरेकाचे मार्ग असून गृहस्थाश्रम हा सुवर्णमध्य आहे. मुलाबाळांनीं गजबजलेल्या गृहस्थाश्रमांत प्रभुप्रीति सहज भोगता येते व तेथें सहज विराग नांदत असतो. दोघा पतीपत्नीस मूल झाल्याबरोबर कामाचें रूपांतर त्या मुलास पहाताच सप्रेमतेंत सहज होतें. त्यांच्या सर्व क्रिया त्या मुलास्तव होतात व ते सहज निष्काम बनतात. साधुसंतांनीं गृहस्थाश्रम हा प्रभूकडे सहज पोचवितों असें म्हटलें आहे. "**कन्या पुत्र बंधुजन । नारायण स्मरविती ।**" एकनाथ तुकारामादि संत गृहस्थाश्रमीच होते. तेव्हां गृहस्थाश्रमाचा त्याग म्हणजे वैराग्य वा साधूपणा नव्हे.

संन्यास, ब्रह्मचर्य वा देहदंडण याच्या मुळाशीं मानवी तनूविषयीं विकृत दृष्टीचा महादोष असतो. शरीरास एकाद्या वैऱ्याप्रमाणें पहाणें म्हणजे परमार्थ अगर वैराग्य अशी भावना असते. उपासतापासादि देहदंडणाच्या बुडाशी हीच भावना असते. आधुनिक आंग्ल नीतिशास्त्रकार डॉ. राशडॉल यांनीं आपल्या Theory of Good and Evil नामक ग्रंथांत या मुद्याचा उहापोह करतांना म्हटलें आहे कीं—

It is the testimony of countless ascetics in all ages that the more they scourged and tormented themselves, stood up to their chins in swamps or rotted themselves among thorns, the more gross became their sensual imaginings, the more clamorous and insistent their passions. In less extreme cases it is probable that there has been an enormous exaggeration of the spiritual value of solitude, hardship and privation ( Vol. II, pp. 71 ). सारांश देहदंडणानें उलट वासना मात्र प्रबळ होतात. एकान्तवास, शारीरिक कष्ट यांचे फाजील महत्त्व मानल्यामुळें हें प्रकार घडतात हें उघड आहे.

बाह्यकर्मांच्या त्यागाची हीच परिस्थिती असते. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं म्हटलें आहे कीं, "**तया कर्मत्यागू न घडे । जे कर्तव्यता मनीं सापडे । वरी नटती ते फुडे । दरिद्र गा ॥**" ज्या कर्माचा त्याग त्या कर्माचा लक्षांश मनांत असतोच. त्यामुळें वरवर सोंग करणाऱ्या दरिद्र्याप्रमाणें बाह्यकर्मत्यागी होत. तेव्हां देहदंडन वा बाह्यकर्मत्याग म्हणजे वैराग्य नसून मनाच्या रुचींत पालट होणें हें वैराग्य होय. व तीसुद्धां नुसत्या वासनांची दाबादाबी करून होणार नाहीं तर मनाला प्रत्यक्ष श्रेष्ठ सुखाचा अनुभवच मिळाला पाहिजे. उपरोक्त ग्रंथकारानेंच म्हटलें आहे–

The tendency of such self-conscious effort to crush the appetites is simply to concentrate attention upon them. In general man's mind is not raised above the level of the lower desires and animal inclinations by austirity, but by healthy preoccupation with social or intellectual activity.

( Rashdall's Theory of Good and Evil Vol. II pp. 71 )

वासना जुलुमानें दाबणें म्हणजे उलट त्यावरच आपलें मन एकाग्र करणें होय. तपश्चर्येनें वासना दबतील असें नसून सामाजिक अगर बौद्धिक कार्यानें तें कार्य होईल असा अभिप्राय यांत व्यक्त केला आहे. परंतु नुसत्या सामाजिक वा बौद्धिक कार्यानेंसुद्धां भागायचें नाहीं. त्या कांहीं काळ दबतील पण पुन्हां उदय पावतील. तरुणपणीं समाजकार्यार्थ ब्रह्मचर्याचा स्वीकार केला पण वृद्धापकालांत विवाहाची इच्छा प्रबल झालेल्या स्थितीचीं उदाहरणें आहेत.

वैराग्याचें लक्षण श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं वर्णिलें आहे– **आता विरक्तीची कवण परी । जे मनातें येऊनि वरी ॥** (ज्ञा. अ. १५–३७). मनाकडे धावत येईल तें वैराग्य. वैराग्याचे मागें धावण्यानें तें प्राप्त व्हावयाचें नाहीं. श्रेष्ठ रुचि मिळाल्यावर हीन रुचीबद्दल आपेआप विराग वाटतो. **सांगे कुमुद दळाचेनि ताटे । जो जेविला चंद्रकिरणें चोखटे । तो चकोर काई वाळुवंटे । चुंबित असे ॥** (ज्ञा. ४–१०७) कमळाच्या पानाच्या ताटांत

चंद्रकिरणांचें जेवण करणारा चकोर वाळवंटांतील वाळूचे कण भक्षण करील काय? वाळवंटाविषयीं त्यास सहज वैराग्य. पोळी खावयास मिळाल्यावर कदन्नाची रुचि नाहींशी होते. नुसती रुचि टाकू म्हटल्यानें व्हावयाची नाही. त्याप्रमाणें भगवत्प्रेमानें सहज वैराग्य अंगीं बाणेल. वैराग्यानें प्रेम असे नसून प्रेमानें वैराग्य असा क्रम आहे. तेसुद्धां वैराग्य म्हणजे त्यागरूप नसून सर्व कर्तव्यकर्में होत असतां जीव स्वप्रीतीनेंच संतोषित राहील व कर्मेंही यथासांग घडतील. आधी वैराग्य व मग भक्ति असें म्हणणें म्हणजे गाडीच्या मागें घोडा जुंपण्यासारखें होय. "तुका म्हणे देह भरला विठ्ठलें" नंतर "काम क्रोधें केलें घर रितें".

आईच्या मागें लेकरें धावत जातात त्याप्रमाणें भक्तीरूपी माउलीच्या मागें ज्ञान, वैराग्य आपेआप येतात.

**माउलीच्या मागें लेकराची हारी। एकसूत्रें दोरी ओढितसे ॥**

—श्रीतुकाराममहाराज.

त्यास इंद्रियें कोंडण्याची जरूरी नाहीं— **इंद्रियें कोडावी न लगती। सहज राहे विषयासक्ति। एवढें सामर्थ्य हरिभक्ति। जाण निश्चित नृपवर्या ॥** (एकनाथी भागवत अ. २) भगवद्भजनाचें सामर्थ्य एवढें आहे कीं— **भोगीं झाला त्याग। गीतीं गाता पांडुरंग। इंद्रियांचा लाग। आम्हांवरूनी चुकला ॥१॥ करूनी ठेविलो निश्चळ। भय नाहीं तळमळ। घेतला सकळ। अवघा भार विठ्ठले ॥२॥**

श्रीहरीच्या प्रेमानें जीव सहज विरागी बनतो. जगांत वावरून तो हरिप्रेमाचें अमृत जिकडे तिकडे सिंचन करीत असतो. अर्थात् वैराग्याकरितां देहदंडनादि साधनें करण्याची मुळींच जरूरी नाहीं. "**जें जें का निमिख। देखेल माझें सुख। तेतुलें अरोचक। विषयीं घेईल**" म्हणून मनाला श्रीहरीच्या प्रेमाचीच प्रत्यक्ष रुची लावावी. व त्या रुचींतच रमवावें.

## योग आणि भक्ति

म्हणोनि योगाचिया वाटा। जे निगाले गा सुभटा। तया दुःखाचाचि शेल वाटा। भागा आला ॥ ज्ञानेश्वरी अ. १२–६९

(म्हणून, शूर योद्धचा, जे योगाच्या मार्गानें जाण्यास निघाले त्यांच्या नशिबाला दुःखाचा अगदी शेलका भाग ठेविलेला असतो.)

तो मी वैकुंठीं नसे। वेळ एक भानुबिंबीं‌ही न दिसे। वरी योगियांचीही मानसें। उमरडोनी जाय ॥ २०७॥ परी तयापाशीं पांडवा। मी हारपला गिवंसावा। जेथ नामघोषु बरवा। करिती माझा ॥ २०८॥ ज्ञा. अ. ९

(मी वैकुंठांत नाहीं. सूर्यमंडळांतही दृष्टीस पडत नाहीं. इतकेंच नव्हे तर योग्यांची मनेंही डावलून जातो. परंतु, हे पांडवा, जेथें माझे भक्त माझा उत्तम म्ह. सप्रेम नाम घोष करीत आहेत त्यांच्याजवळ, इतर ठिकाणीं हरवल्याप्रमाणें असणारा मी सांपडला जातो.)

परमेश्वराच्या अनुभूतीचे जे निरनिराळे मार्ग आहेत त्यांत संतांनीं प्रेमभक्तीस अधिक महत्व दिलें आहे. हें महत्व म्हणजे अर्थवाद आहे व सर्व मार्ग सारखेच असे कांहीं लोक मानतात. 'मार्ग कोणता कां असेना ध्येय प्राप्त जालें म्हणजे झालें. "साधनानाम् अनेकता" साधनें अनेक असूं शकतात. ज्याला जें रुचेल व पचेल तें त्यानें स्वीकारावें. त्याबद्दल आग्रह कशाला? 'ध्येयाबद्दल आग्रह असावा.' अशा तऱ्हेची विचारसरणी वर वर पाहिल्यास सयुक्तिक भासते. व ही स्वीकारुन संतांची शिकवणूक पाहिल्यास त्यांनी वर्णिलेलें भक्तीमार्गाचें महत्व हा एक गौरवाचा भाग आहे असें सहज वाटतें. परंतु वस्तुस्थिती याहून भिन्न आहे. संतांनीं चौकस बुद्धीनें सर्व मार्ग शोधले. प्रत्येकाच्या बुडाशीं असलेला हेतु, त्याची साधना व शेवटीं प्राप्त होणारें फल याचीही विवेकबुद्धीनें तपासणी केली व मग आपला निश्चित निर्णय प्रगट केलेला आहे. केवळ अमूक गोष्ट आपणास आवडते म्हणून तिला मोठेंपणा द्यावयाचा व इतर गोष्टींना गौण लेखावयाचें असा प्रकार त्यांनीं केलेला नाहीं. ईश्वरविषयक निश्चित ज्ञानावर त्यांनीं भक्तीच्या श्रेष्ठत्वाची भूमिका उभारली आहे.

वर दिलेली ज्ञानेश्वरीचीं अवतरणें बहुतेक ज्ञानेश्वरीच्या वाचकांना मुखोद्गत असतात. तीं साधीं असलीं तरी त्यांत योग आणि भक्ति या दोन्हीबद्दलचे महत्वाचे निर्णय आहेत. या निर्णयाच्या पोटीं असलेला विशाल

गर्भितार्थ ध्यानीं घेतला पाहिजे. नाहींतर तीं तोंडपाठ करुनही शेवटीं अर्थ-वादात्मक म्हणण्याची पाळी येईल. या अवतरणांत योगाची साधना व फळ या दोन्ही विषयीं दोन अखेरचे निर्णय दिलेलें आहेत. १ योग साधना ही अत्यंत दु:खदायक आहे. आणि २ ही साधना करुन जें फळ मिळतें तें गौणस्वरुपाचें आहे. याच्या जोडीसच भक्तीबद्दलचे दोन निर्णय स्पष्ट केले आहेत. १ भक्ति ही सुलभ आहे २ भक्तीचें फळ हें सर्व श्रेष्ठ आहे.

योगमार्गाची साधना ही योगाच्या तत्वज्ञानावर उभारलेली आहे. त्या तत्वज्ञानानुसारच जीवनाचें ध्येयही आखलेलें आहे. तेव्हां योगाचें तत्वज्ञान, साधना व फळ याची रुपरेषा प्रमुख अशा योगाच्या ग्रंथाच्याद्वारें पहाणें अगत्याचें आहे. त्याच बरोबर भक्तीचें तत्वज्ञान, साधना व फल यांची ही रुपरेषा पाहिली पाहिजे. या दोहोंच्या तुलनेनें वर दिलेले ज्ञानेश्वरींतील निष्कर्ष सुलभतेनें समजतील. प्रथम योगाची रुपरेषा पाहूं.

योगावरील प्रमाणभूत ग्रंथ म्हणजे योगसूत्रें होत. तीं पंतजलींनीं रचिलीं आहेत. या सूत्रांत प्रामुख्यानें योगाची साधना व साध्य यांचें वर्णन आहे. योगाचें तत्वज्ञान हें सांख्यतत्वज्ञानाप्रमाणेंच बहुतांशी आहे. मुख्य फरक हा कीं, सांख्यांनीं ईश्वरास मानलें नाहीं तर योगांत त्याला स्थान मिळालें आहे. त्यामुळें सांख्यास निरीश्वर सांख्य व योगास सेश्वरसांख्य असेंही म्हणण्याची प्रथा आहे.

सांख्यांच्या मतें जगांत अंतिम तत्वें दोन आहेत. पुरुष व प्रकृति. पैकीं पुरुष चेतन असून नि:संग आहे. प्रकृति ही त्रिगुणात्मक, जड व पुरुषाच्या संनिधीमुळें विश्व विकसित करते. पुरुष अनेक आहेत. प्रकृति एकच आहे. पुरुष हा शुद्ध चैतन्य आहे. मनबुद्ध्यादिक हे प्रकृतीचे विकार अर्थात् जड आहेत. वास्तविक चैतन्यरुप असलेला पुरुष अहंकारानें मनबुद्ध्यादिकाशीं तादात्म्य स्वीकारुन सुखदु:खें भोगतो. हें तादात्म्य नाहींसें करुन सुखदु:खां-तीत शुद्ध अवस्था प्राप्त करुन घेणें म्हणजे कैवल्य प्राप्ति. ती प्रकृति व पुरुष यांच्या विवेकानें म्ह. ही दोन्हीं भिन्न आहेत या ज्ञानानें होते असें सांख्यांचें मत आहे. योगाचें ध्येय अशा प्रकारचें कैवल्य प्राप्त करुन घेणें हें असून त्याकरतांच तो विशिष्ट मार्गाचें विवरण करतो. त्यासच योगमार्ग ही संज्ञा आहे.

"योग" या शब्दाचा सामान्य अर्थ संयोग, मीलन असा आहे. परंतु योगसूत्रांत तो विशिष्ट अर्थानें वापरला आहे. योग म्हणजे संयोग नसून वियोग होय. "योगश्चित्तवृत्ति निरोध:।" अशी योगाची व्याख्या पतंजलीनीं केली आहे. चित्त म्हणजे नित्य व शुद्ध चैतन्य नसून बुद्धि होय. चित्ताचें क्षिप्त, मूढ, विक्षिप्त, एकाग्र व निरुद्ध असे पांच प्रकार आहेत. शेवटचे तीन प्रकार एकाहून एक अधिक प्रमाणांत समाधीस अनुकूल असतात. समाधीचेही दोन प्रकार आहेत. एक संप्रज्ञात अथवा सबीज, दुसरा असंप्रज्ञात अगर निर्बीज. निर्बीज समाधीत ध्येय, ध्याता व ध्यान हा भेद संपूर्ण मावळतो. व केवळ आनंदमय अवस्था असते. समाधि साधण्यास अष्टांग योगाची साधना सांगितली आहे. ती यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान व समाधि. त्यापैकीं यम म्हणजे अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रम्हचर्य व अपरिग्रह. नियमांत पवित्रता, संतोष, तप, स्वाध्याय व ईश्वरप्रणिधान यांचा अंतर्भाव होतो. ज्याच्या योगानें शरीरास कंप उत्पन्न न होतां सुख प्राप्त होईल अशा प्रकारच्या बसण्यास आसन म्हटलें आहे. बाहेरच्या वायूचा प्रवेश आंत न होऊं देणें व आंतील वायूस बाहेर न जाऊं देणें यास प्राणायाम म्हणतात. नाभिचक्र इत्यादि विशेष स्थलीं चित्त स्थिर करणें यास धारणा म्हणतात. चित्ताची धारणा ज्यावर केली असेल तेथेंच त्याची एकाग्रता होऊन दुसरीकडे जाऊं न देणें यास ध्यान म्हणतात. ध्यान व पदार्थ यांची एकाकारता म्ह. समाधि होय.

वरील त्रोटक वर्णनावरुन योगमार्गांत चित्तवृत्तीशीं केवढा झगडा करावा लागतो तें दिसेल. प्राणायामाचा अभ्यासही अत्यंत अवघड व पावलों पावलीं धोके असणारा आहे. ध्यान, धारणेचा मार्गही वृत्तिशून्यतेकडे नेत असतां अत्यंत बिकट आहे. व शेवटीं फल जें समाधि तीहि कांहीं अल्प काल टिकणारी असते. समाधींतून जागृत झाल्यावर पुन्हा धोके असतात. समाधींत मिळणारा आनंदही नकारात्मकच असतो.

संतांनीं या सर्व गोष्टींचा विचार करुन भक्तिमार्ग हा सर्वांना सुलभ असून त्यानें प्राप्त होणारें प्रेमसुख हें योग्याच्या समाधिसुखाहून थोर आहे असें वारंवार सांगितलें. "समाधीचें सुख सांडा ओवाळूनी। ऐसा या कीर्तनीं

ब्रह्मरस ॥ उघड समाधि हरिकथा सोहळा । नरनारी बाळा लहानथोरा ॥" भजनांतील प्रेमसमाधि सहज व जागृत असून ती सर्वांना अनुभवतां येते.

योगसूत्रांत ईश्वराचें वर्णन—" क्लेशकर्मविपाकाशयैरपरामृष्ट: पुरुषविशेष ईश्वर: ॥ (क्लेश व कर्म यांच्या परिणामरुपवासनांच्या संबंधानें रहित असा विशेष म्हणजे ईश्वर) असें केलें आहे. पुरुष अनेक आहेत. त्यांत सर्वश्रेष्ठ, सर्वज्ञ, तो ईश्वर होय. चित्ताची एकाग्रता करण्याचीं अनेक साधनें सांगितलीं आहेत. त्यापैकीं ईश्वरप्रणिधान हें एक सांगितलें आहे. ध्येय वस्तूस महत्व नसून एकाग्रतेस महत्व आहे. तेव्हां ईश्वराचें ध्यान करावयाचें तें समाधिलाभास्तव. यावरुन योगांत ईश्वरास गौण स्थान दिलेलें आढळून येईल.

भक्तिमार्गांतील तत्वज्ञान, फल व ईश्वरविषयक बोध हीं सर्व वरील योगमार्गांतील समजुतीहून वेगळीं आहेत. अंतिम सत्य प्रेमस्वरुप परमात्मा असून तोच दृश्य व दृष्टारुपानें स्फुरत आहे. मानवीजीवन हें प्रतीती स्वरुप असल्यानें सर्वांत श्रेष्ठ प्रतीती घेणें, हेंच त्याचें ध्येय आहे. ही सर्वश्रेष्ठ प्रतीती म्हणजे प्रेमस्वरुप प्रभूची व तिचें बीजारोपण जीवनांत होणें, तिचाच परिपाक होणें या करितां भक्तीची साधना आहे. परमात्म्याचें आवडीनें स्मरण, आवडीनें भजन व पूजन, आवडीनें कीर्तन या मार्गानें जीव चालला म्हणजे त्यास कोठें ठेचकळावें लागत नाहीं. सुरवात भक्तीच व शेवटही भक्तीच. जीवन भक्तीमय होणें हाच आयुष्याचा परिपाक. ही स्थिती योगाच्या कैवल्यनामक ध्येयांत नाहीं. तेथें सर्व वृत्तींचा नाश करीत जावयाचें असतें. याचा परिणाम अंत:करणांतील प्रेमवृत्तींचाही नाश होतो. व योगी हा अत्यंत श्रेष्ठ अशा प्रेमानुभूतीस आंचवतो. उलट भक्ति मार्गांत " बीज आणि फळ हरीचें नाम ।" भक्तीच बीज व भक्तीच फळ.

ज्ञानेश्वरमाउलींनीं " सततं कीर्तयन्तो मां ।" या श्लोकावर विवरण करतांना प्रथम " मी होऊनी पांडवा । करिती माझी सेवा ।" अशा भक्तांच्या कीर्तनाच्या नटनाचें वर्णन केलें आहे व नंतर " यतंतश्च दृढव्रता: ।" यावर विवरण करतांना योग्यांचें वर्णन करुन त्यांचें भजन गहन आहे असें म्हटलें आहे. श्रीएकनाथमहाराजांनीं भागवतांत त्याचप्रमाणें योग व भक्ति यांची तुलना केली आहे—

"हा योगाभ्यासें योग गहन। अवचटें कोणा साधे जाण। हा मार्ग गा अतिकठिण। स्वयें श्रीकृष्ण बोलिला॥ हा ऐकतां अति गोड वाटे। परी करितां काळीज फाटे। तरी न साधेचि महाहटें। येथ ठकले लाठे सुरनर॥ ......न करितां योगसाधन। न लगे त्वंपदाचें शोधन। याहोनी सुलभ साधन। तुज मी आन सांगेन॥ जेथ कष्ट करितां तरी थोडे। परी योगाचें सकळ फळ जोडें। त्वंपदशोधन होय बापुडें लाजोनी॥ ते माझी गा निज-भक्ति। माझ्या रामकृष्णादि ज्या मूर्ती। पूजितां त्या अतिप्रीती। मी श्रीपती संतोषे॥ जेथें माझें श्रवण माझें कीर्तन। माझें नाम माझें स्मरण। माझें ध्यान माझें भजन। माझें चिंतन सर्वदा॥ हृदयीं माझें सदा ध्यान। मुखीं माझें नाम माझें स्तवन। श्रवणीं माझी कथा माझें कीर्तन। करी माझें पूजन सर्वदा॥ चरणीं प्रदक्षिणा यात्रा गमन। अष्टांगीं सर्वदा माझें नमन। ऐसें अनन्य माझें भजन। विनटलेपण मद्भक्ति॥ ऐसे विनटले जे माझे भजनीं। त्यासी मी विकलों चक्रपाणी। त्यांवेगळे पढियंते कोणी। आन त्रिभुवनीं मज नाहीं॥ यापरी करितां माझें भजन। नलगे योगादिकांचें स्मरण। मी भक्ति-वेगळा श्रीकृष्ण। नातुडे जाण उद्धवा॥—अ. २० ओ. २६८–९४

योगांतील चांगल्या गोष्टी भक्तींत लाभतातच. नैतिक विकास, दीर्घोद्योग या गोष्टी भक्तींतही आहेतच. ईश्वरीप्रेमाला विमुख असणाऱ्या योगांतील गोष्टींचा भक्तीत त्याग केल्यामुळें जीवन सर्वांग सुंदर बनण्यास भक्तीच सहाय्य करते. सबळाकरितां योग व दुर्बळाकरितां भक्ति अशी कांहींची समजुत आहे ती चुकीची आहे. भक्तीही येरा गबाळाचें काम नसून शूर अशी निष्ठाच आहे. भक्तांसही निरनिराळ्या मोहास तोंड द्यावे लागतें. परमार्थांतील अनेक कर्मधर्माचे संस्कार तोडावे लागतात. एकनिष्ठेनें भक्तीचें निशाण हातीं घेऊन मार्ग आक्रमावा लागतो. "अत्यद्भुत भजनशौर्य" दाखवून "भक्तिप्रतापें प्रतापवंत" पणाची ग्वाही द्यावी लागते. या साऱ्या गोष्टीत प्रभु पाठीराखा असतो व पावलों पावलीं सांभाळतो. संतांनीं सर्व गोष्टींचा अनुभव घेऊन. त्यांतील खांचा खोंचा, लाभहानि लक्षांत घेऊन निश्चित निर्णय दिलेला आहे. त्यांनीं दाखविलेल्या राजमार्गानें प्रत्येक जीवानें जाण्यांत परमलाभ व परमकल्याण आहे.

## भक्ति आणि मोक्ष

धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चार पुरुषार्थ परंपरेनें मानले गेले आहेत. धर्म हा शब्द इंग्रजींतील रीलिजन या शब्दाशीं समानार्थक नाहीं. त्याचा विशिष्ट अर्थ आहे. श्रुतिस्मृतिप्रणीत सदाचारास धर्म म्हटलें आहे. अर्थ व काम ही ऐहिक जीवनास लागणाऱ्या गरजांची उद्दिष्टें होत. मोक्ष हें पारमार्थिक ध्येय आहे. पहिलीं तीन ध्येयें साधनें असून चोथें साध्य आहे. मोक्षाचा व इतर पुरुषार्थांचा संबंध, साध्य साधनांचा आहे. धर्म, अर्थ, काम या सर्वांचें संपादन मोक्षाकरितांच होय. याप्रमाणें मोक्ष हा सर्वांत श्रेष्ठ पुरुषार्थ मानला आहे. संतांनीं भक्तीस पांचवा पुरुषार्थ मानला आहे. चौथ्याहून पांचवा थोर. तेव्हां मोक्षाहून भक्ति थोर मानिली आहे हें स्पष्ट आहे. पण या मानण्यास जी कारणें असतील तीं समजून घेतलीं पाहिजेत. त्याकरितां मोक्षाची कल्पना समजून घेतली पाहिजे. ती समजली म्हणजे भक्तीचें महत्व आपोआपच ध्यानीं येईल.

नुसती मोक्षाची कल्पना अस्पष्ट आहे. ती ज्या दर्शनकारांची असेल त्या दर्शनकारांच्या मतानुसार तिचें रुप बदललें आहे. सांख्यादि दर्शनकारांच्या कल्पना परस्पराहून भिन्न आहेत. एवढेंच नव्हे तर शंकराचार्य, रामानुज प्रभृति आचार्यांच्या मोक्षविषयक कल्पनाही भिन्न आहेत. त्या एकमेकांशी जुळत नाहींत. मोक्ष शब्दाचा अर्थ सुटका. मनुष्याच्या जीवनांत अपूर्णता आहे, दुःख नाहीसें करणें व त्याठिकाणीं आनंदाचें आवार उघडणें म्हणजे मोक्ष होय.

वैद्यशास्त्राचा हेतु मनुष्याच्या शरीरांतील रोगाची चिकित्सा करुन, त्यावर उपाय योजून, त्यास आरोग्यसंपन्न बनविणें हा असतो. आरोग्य हें ध्येय खरें पण वैद्य शास्त्रविषयक दृष्टीही अनेक व चिकित्सापद्धतीही अनेक त्यामुळें एकाच आरोग्यास्तव निरनिराळ्या वैद्यकीय पद्धतींनी निरनिराळे औषधोपचार सुचविलेले असतात. त्यामुळें मनुष्याचा गोंधळ उडतो. तशीच स्थिती जीविताच्या परम निःश्रेयसाचें बाबतींतही घडते. त्यामुळें परमार्थिक गोंधळ उडतो व कोणत्या तरी वाटेनें मनुष्य धावतो. जे कांहीं आयुष्याचे

दिवस वाटणीस आले त्याची वाताहात होण्याची पाळी येते. या करितांच संतांनीं म्हटलें आहे कीं, " अल्प आयुष्य मानवदेहे। शत गणिले ते अर्धरात्र खाय। मध्यें बालत्व पीडा रोग क्षय। काय भजनासी उरलें तें पाहे गा॥ राम राम स्मरा आधीं॥" –शंभर वर्षांचें आयुष्य म्हटले तरी त्यांतील ५० वर्षं रात्रीच गेल्या. राहिल्या पन्नासांतील बालपणाचा काल, सांसारिक आपत्ति, शरीराची दुखणींभाणीं इत्यादि वर्षें गेल्यावर शिल्लक राहिलेले दिवसही सैरावैरा धावण्यांत न घालवितां " वेग करी हरिभजनीं " असें संतांनीं कळकळीनें सांगितलें आहे. श्रीज्ञानेश्वर माउली म्हणतात, " तरी झडझडोनि वहिला निघ। इया भक्तींचिया वाटे लाग। जिया पावसी अव्यंग। निजधाम माझें॥"

भक्तीच्या राजमार्गांत इतर वाटा या अडथळे आहेत या विषयीं निश्चित खात्री बाळगिली पाहिजे. त्या वाटांची ओळख झाली कीं, तिकडे जाण्याचा मोह होणार नाहीं. प्रापंचिक मोहापेक्षां पारमार्थिक मोहच दुस्तर असतो. जो जे सांगील तें खरें वाटतें व त्याच वाटेस अनुसरावे असा संकल्प उदय पावतो.

जीवनाचें परम निःश्रेयस साधावे असें सर्वांनाच वाटतें. याबद्दल एकमत आहे. परंतु प्रत्यक्ष तें निःश्रेयस काय आहे एथेंच फरक पडतो. चार्वाकादि जडवादी हे देहासच आत्मा मानीत असल्यामुळें " मरण ते मुक्ति व भोजन ते भक्ति " असें मानतात. खाणें, पिणें, चैन करणें हेंच त्यांचें जीवनध्येय होय. काम आणि अर्थ हे दोनच पुरुषार्थ मानणाऱ्या या लोकांचें वर्णन ज्ञानदेवींत केलें आहे–

" एवं कामक्रोधाहूनि अधिक। पुरुषार्थ नाहीं॥....तेवींचि जीवींचिया हावा। विषयवासनांचा मेळावा। केला परि तो भोगावा। अर्थें पैं गा॥ म्हणौनि भोगावया जोगा। पुरता अर्थ पैं गा। आणावया जगा। झोंबती सैरा॥ एकातें साधूनि मारिती। एकाचीं सर्वस्वें हरिती॥......" (अ. १६–३३९–४३) बौद्धमताचे शून्यवादी यांच्या दृष्टीनें शून्य हेंच अखेरचें तत्व असल्यामुळें शून्य भावनेचा प्रकर्ष करणाऱ्या तत्व–ज्ञानानें शून्यभाव प्राप्त करून घेणें हा मोक्ष होय. नैय्यायिकांच्या मताप्रमाणें

प्रमाण, प्रमेय, संशय, प्रयोजन इत्यादि सोळा पदार्थांचें ज्ञान झाल्यानें दुःख, जन्म, प्रवृत्ति दोष व मिथ्याज्ञान यांचा नाश होतो म्हणून तें ज्ञानच मोक्ष होय. वैशेषिकांच्यामतें द्रव्य, गुण, कर्म, सामान्य, विशेष, समवाय या पदार्थांच्या साधर्म्य व वैधर्म्य यांच्या ज्ञानानें मोक्ष मिळतो. सांख्यांच्या मतानें "अथ त्रिविध दुःखात्यंतनिवृत्तिः अत्यंत पुरुषार्थः" त्रिविध म्हणजे आध्यात्मिक, आधिदैविक, व आधिभौतिक दुःखांचा समूळ नाश म्हणजे मोक्ष होय. हा समूळ नाश पुरुष व प्रकृति यांच्या भिन्नपणाच्या ज्ञानानें म्हणजे केवळ विवेक ख्यातीनें होतो. योगमतें यमनियमादि अष्टांग योगाच्या द्वारें चैतन्यरूप पुरुषाचें स्वस्वरूपस्थान म्हणजे मोक्ष होय. मीमांसकमतें स्वर्गादिप्राप्ति हाच मोक्ष. उत्तर मीमांसा अगर वेदान्तमतांतही अनेक भेद आहेत. प्रत्येक आचार्याची मोक्षाबद्दल भिन्न कल्पना आहे. शंकराचार्यांच्या मतानें मूळ अज्ञानाच्या निवृत्तीनें स्वस्वरूपलाभ हाच मोक्ष होय. रामानुजाचार्यांच्या मतें सर्व कर्तृत्वशक्ति शिवाय परमात्म्याच्या सर्वज्ञत्वादि गुणांची प्राप्ति व यथार्थपणें भगवंताच्या स्वरूपाचा अनुभव म्हणजे मोक्ष होय. जगत्कर्तृत्व, लक्ष्मीपतित्व, श्रीवत्सलांछनाची धारणा या गोष्टी सोडून दुःखाचें मिश्रण नसलेलें पूर्ण सुख म्हणजे मोक्ष असें मध्वाचार्यांचें मत आहे. त्याचप्रमाणें वल्लभाचार्य, निंबार्क, रूपगोस्वामी इत्यादिकांचीं तसेंच पाश्चात्य गूढवादी व तत्वज्ञ यांचीं जीवनाच्या परमपुरुषार्थासंबंधीं भिन्न भिन्न मतें आहेत. या सर्वांचा आढावा प्रस्तुत स्थळीं घेण्याचें कारण नाहीं. मतभिन्नता लक्षांत आणून देणें एवढ्या गोष्टीस वर निर्दशिलेलीं मतें पुरेशीं आहेत.

मोक्ष हें जीवनध्येय असावें कीं नसावें? या प्रश्नाचें उत्तर मोक्ष या शब्दाचा अर्थ करण्यावर अवलंबून आहे. अर्थ निश्चित असल्यावर शाब्दिक वादास फारसें महत्व नाहीं. गुलाबास दुसरें एखादें नांव दिलें तरी त्याचा सुगंध बदलतो असें नाहीं. त्याप्रमाणें जीवनध्येयाची स्पष्ट कल्पना असली म्हणजे त्या ध्येयास काय म्हणावयाचें याबद्दल विशेष वाद उरत नाहीं. ज्ञानेशादि भागवतधर्मी संतांची जीवनध्येयाची कल्पना वर उल्लेखिलेल्या सर्व मतांहून भिन्न आहे. गंगा समुद्रास मिळते व पुनः पुनः मिळत रहाते त्याप्रमाणें मानवी जीवनाचें प्रेमस्वरूप परमात्म्याशी मिळणें व पुनः मिळत रहाणें हें त्यांच्या दृष्टीनें जीवनांतील अत्यंत श्रेष्ठ सुख व ध्येय होय. अशा

जीवनाचें वर्णन ज्ञानेश्वरी व संतांच्या इतर ग्रंथांत वरचेवर आलें आहे. उदा. बाराव्या अध्यायांत तत्त्वत: योगयुक्त असणारे भक्तच होत हें सांगतांना पुढील वर्णन आलें आहे– "तरी अस्तगिरीच्या उपकंठीं । रिगालिया रविबिंबापाठीं । रश्मि जैसे किरीटी । संचरती गा ।। ३५ ।। कां वर्षाकाळीं सरिता । जैसी चढो लागे पंडुसुता । तैशी नीच नवी भजतां । श्रद्धा दिसे ।।३६।। परी ठाकिलीयाही सागरु । जैसा मागिलही यावा अनिवारु । तिये गंगेचिये ऐसा पडिभरु । प्रेमभावा ।।३७।। तैसें सर्वेंद्रियासहित । मजमाजीं सूनि चित्त । जे रात्रिदिवस न म्हणत । उपासिती ।।३८।। इयापरी जे भक्त । जे आपणपे मज देत । तेची मी योगयुक्त । परम मानी ।।३९।।

ही अवस्था सर्वांत श्रेष्ठ होय. यास तुम्ही मोक्ष म्हणा वा भक्ति म्हणा. मोक्ष म्हणजे सामान्यपणें श्रेष्ठ जीवनध्येय असा अर्थ केल्यास ज्या जीवनध्येयांत वरील गोष्टीचा समावेश आहे असा मोक्ष संतांना मान्य आहे. परंतु सामान्यपणें मोक्ष याचा अर्थ जीवन हें परमात्म्यांत विलीन होणें एवढाच अर्थ केला जातो. त्या अर्थानें संतांना मोक्ष मान्य नाहीं. त्याकरितां त्यांनीं वारंवार म्हटलें आहे–

**मोक्ष तुमचा देवा । दुर्लभ तो तुम्ही ठेवा ।।**
**मनीं भक्तीचीं आवडी । देवा व्हावी हेचि जोडी ।।**–इत्यादि

याला अनुसरूनच असला मोक्ष, भक्त असतात ते दूर सारतात असें म्हटलें आहे. "जया भक्तीची येतुली प्राप्ती । जे कैवल्यातें परौतें सर म्हणती । जयाचिये लीळेमाजीं नीति । जियाली दिसे ।।" असल्या मोक्षासाठीं याचक बनणाऱ्यांची दृष्टही भक्तास लागूं नये असें त्यांनीं वर्णन केलें आहे "जया सोहंभाव अटकु । मोक्षसुखालागोनि रंकु । तयाचे दीठीचा कळंकु । लागेल तुझिया प्रेमा ।।"

मोक्ष या शद्बाच्या संकुचित अर्थाखेरीज त्या शद्बावरून ध्वनित होणारी नकारात्मक अवस्था यामुळेंही संतांनीं मोक्ष नाकारला आहे. मोक्ष हा शद्ब सुटका दाखवितो. परंतु प्रत्यक्ष प्रेमसुखाचें विशाल जीवन दाखविण्यास तो अपुराच पडतो. हें प्रत्यक्ष दर्शन भक्ति या शद्बानें घडतें. म्हणून संतांनीं अखेर भक्ती हा पंचम पुरुषार्थ व तो मोक्षाहूनही श्रेष्ठ व सुलभ आहे असें म्हटलें आहे. "चहू पुरुषार्थाशिरीं । भक्ति जैसी ।।"

:

# ज्ञानेशांच्या विरहिणीची भूमिका

संतांनीं आपल्या वाङमयाच्या रुपानें मराठी मायबोलीस दिलेली देणगी अमोल आहे. ज्ञानराज हें तर सकलसंतांचे मुकुटमणी. त्यांची वाणी अमृतासही लाजविणारी. एकेक अक्षर म्हणजे एकएक मधुघटच. तो ओठास लावला कीं दुसऱ्या सर्व रुचि हिरावून घेतो व तोच वारंवार प्राशन करावा अशी अवीट गोडी निर्माण करतो. "तृषा लागलीया जीवनातें ओढी । तैशी तुझी गोडी लागो मज ॥" अशी अवस्था निर्माण होते. ज्ञानेश्वरींत हा रस ओतप्रोत आहेच. पण अमृतानुभवासारख्या तत्वज्ञानपर ग्रंथांतसुद्धां तो उचंबळून आलेला आहे. ज्ञानेशांच्या अभंग वाणींत तर तो तुडुंब भरलेला आहे. ज्ञानेशांची ज्ञानेश्वरी वाङमयप्रेमी जनांना सुपरिचित आहे. अमृतानुभवाचा अभ्यास होऊं लागला आहे. परंतु ज्ञानेशांच्या अभंग वाङमयाकडे अद्याप रसिकांचें लक्ष जावें तसे गेलेलें नाहीं. या अभंग वाङमयामध्यें "विरहिणी" नांवाचे अभंग आहेत. अभंगाची जेथें पूसतपास नाहीं तेथें विरहिणीकडे कोण दृष्टीक्षेप करणार? क्वचित् एकादा लेखक (उदा० डॉ. प्र. न. जोशी– "विरही ज्ञानदेव" नव-भारत मे १९५५ पहा) ज्ञानेशांच्या विरहिणीचें वर्म जाणण्याचा यत्न करतो. पण तो अपवादच म्हणता येईल. वास्तविक "विरहिणी" हे अभंग ज्ञानेशांच्या अभंग वाङमयाचा गाभा आहे. तो आत्मसात् केल्याखेरीज ज्ञानेशांच्या व्यक्तिमत्वाचें आकलन व्हावयाचें नाहीं. ज्ञानेशांच्या अभंग वाङमयाचा अभ्यास सर्वांगीण म्हणजे त्यांच्या सर्व वाङमयाच्याद्वारां केला पाहिजे. नुसता एकादाच ग्रंथ घेतला तर आपली दृष्टीही एकांगीच बनते. ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, पासष्टी, हरिपाठ, नमन व अभंग हें सर्व वाङमय म्हणजे एकाच शरीराचे

अवयव आहेत. त्या सर्वांचे एकमेकाशी जिव्हाळ्याचें नातें आहे. तें समजून घेऊन अभंग वाङमयाकडे वळल्यास त्याचें खरें व योग्य मूल्य आपल्या नजरेंत भरतें.

## चिद्विलास, अकृत्रिम भक्ति व नामस्मरण

ज्ञानेशांच्या विचारांची तात्विक बैठक त्यांनीं अमृतानुभवांत स्पष्ट मांडली आहे. अज्ञानवादाचें खंडनाच्या प्रवेशद्वारां त्यांनीं चिद्विलासाचा सिद्धांत मांडला आहे. चांगदेव–पासष्टींत इतर मतांचें खंडनांत न शिरता केवळ स्वसिद्धांतच सांगितला आहे. पासष्टीहून अमृतानुभवांत परमत खंडनापेक्षां आणखी एक विशेष आहे, व तो अत्यंत महत्वाचा आहे. चिद्विलासाच्या सिद्धांताचें नुसतें मंडण करणें एवढेंच ज्ञानेशांचें कार्य नव्हतें. त्या सिद्धांताची पुढची वाटचाल ही त्यांना दाखवावयाची होती. त्या सिद्धांताचा रोख कोणीकडे आहे व उद्दिष्ट काय आहे हेंही त्यांना दाखवावयाचें होतें. तें काम त्यांनीं अमृतानुभवांत साधलें आहे. चिद्विलासाच्या भूमिकेवरुन त्यांनीं "अकृत्रिम भक्ती" वर झेप घातली आहे. अकृत्रिम म्हणजे सहज अंगभूत असणारी. "**कर्माचा हातु न लगे। ज्ञानाचेंही कांहीं न रिगे। ऐसीच होतसे आंगें। उपास्ति हे।। निफजे ना निमे। आंगे आंग घुमे। सुखा सुख उपमे। देववेल यया।। कोण्हि एक अकृत्रिम। भक्तीचें हें वर्म। योगज्ञानादि विश्रामभूमिका हे।।**" अमृ. ९, ५९–६१. भक्ती ही सहज अगर अकृत्रिम आहे याचा अर्थ ती सत्याच्या अंगभूतच आहे. ज्ञानेश्वरींत याच भक्तीचें वर्णन "**माझिये सहजस्थिति। भक्ती नाम।**" (१८–१११३) "**क्रिया कीर न साहे। तऱ्ही अद्वैती भक्ति आहे।।** (१८–११५१) इत्यादि ओव्यांतून आलें आहे. चिद्विलासाच्या तत्वज्ञानाचें हें पुढचें पाऊल म्हणजे अधिक स्पष्टीकरण होय. चैतन्य हेंच अंतिम सत्य होय. तेंच दृश्य व दृष्टा या दोही रुपानें नटलें आहे. तेथें अविद्या, अज्ञान मानण्याचें कारण नाहीं. सर्व चैतन्याचाच खेळ आहे. हे ज्ञानेशांच्या चिद्विलासाच्या सिद्धांताचें सार होय. पण येथें भक्ती कशी येते? त्याचें उत्तर ज्ञानेशांनीं दिलें आहे कीं या दोहीरुपांनी (दृष्टा व दृश्य) चैतन्य कां नटतें याचें कारण शोधलें म्हणजे नेमका

भक्तीचा झरा सांपडतो. चैतन्य हें स्वतःच्या प्रीतीस्तव दृष्टा व दृश्य नटते. **(जो प्रियूचि प्राणेश्वरी । उलथे आवडीचे सरोभरी । चारुस्थळीं एकाहारी । एकांगाची ॥** अमृ. १-३)

चैतन्याच्या अंगभूत असणाऱ्या या सहज प्रीतीचें नांवच सहजभक्ति. अमृतानुभवांत जें युक्तिवादानें मांडले आहे तेंच सुलभ कथेच्या रुपानें ज्ञानेश्वरींत मांडलें आहे. श्रीकृष्णानीं अर्जुनाची दृष्टी या सहजभक्तीवर स्थिर करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु नुसती दृष्टी जाऊन उपयोगी नाहीं तर तिचा अनुभव मानवी जीवनांत घेता आला पाहिजे. आंबा हा नुसता डोळ्यानें दिसून भागत नाहीं. जिव्हेनें आम्ररस सेवन करितां आला पाहिजे, त्याप्रमाणें स्वरुपभूत असणाऱ्या सहजभक्तीचा अनुभव जीवनांत घेता आला पाहिजे. तो कसा घ्यावयाचा हें ज्ञानेशांनी "हरिपाठ" या नांवानें प्रसिद्ध असलेल्या अभंगांतून सांगितलें आहे. श्री. शिशिर घोष यांनीं बंगाल्यांत होऊन गेलेल्या गौरांगप्रभु या थोर भगवद्भक्तांचें चरित्रांत म्हटलें आहे, "Where the Geeta ends, the Bhagavat begins" (गीता जेथें संपते तेथे श्रीमद्भागवत सुरु होते.) याच प्रकारची भाषा वापरुन आपणास असें म्हणतां येईल कीं जेथे अमृतानुभव संपतो तेथें हरिपाठ सुरु होतो. अमृतानुभवाचा शेवट अकृत्रिम भक्तींत म्हणजे अंतिम सत्य जें चैतन्य त्याच्या अंगींच भक्तीचा अथवा प्रेमाचा झरा कसा आहे हें सांगण्यांत होतो. या स्थानीं जणूं देवाचें द्वारच त्यांनी उघडलें आहे. हरिपाठाची सुरवात.

**"देवाचिये द्वारीं उभा क्षणभरी । तेणें मुक्ती चारी साधियेल्या ॥**
**हरि मुखें म्हणा हरि मुखें म्हणा । पुण्याची गणना कोण करी ॥"**

अशी आहे. म्हणजे अमृतानुभवानें ज्या देवाचें द्वार उघडलें आहे त्या देवाचे आवडीनें स्मरण करणें म्हणजेच अकृत्रिम भक्तींचा अनुभव घेणें होय. हेंच मुळच्या भक्तीच्या झऱ्याचें प्राशन होय. यालाच संतांनीं नामस्मरण असें म्हटलें. नाम म्हणजे अंतिम सत्याचें ठिकाणीं असलेला प्रेमाचा जिव्हाळाच होय. "**प्रेमाचा जिव्हाळा नाम मुखासी आलें ।**" असें ज्ञानेशांनींच स्पष्टीकरण केलें आहे. या प्रेम स्मरणाच्या अनुभवाची थोरवी तत्वमसि

२०८०९ वि. ... क्रमांक ७०८३ नों. दि. ९३।...

महावाक्याहून अधिक आहे. असेंहि त्यांनीं स्पष्ट सांगितलें आहे. (**तत्वमस्यादि महावाक्यउपदेशु । नामाचा अर्धांश नाहीं तेथें ।।**" या ठिकाणीं ज्ञानेशादि संतांनीं ज्या नामस्मरणाची महती एकमुखानें वर्णिली आहे तिचें मर्म नीट ध्यानीं घेण्याजोगें आहे. आपणाहून वेगळा पदार्थ असला तर त्याचा आस्वाद निरनिराळ्या इंद्रियाच्या द्वारा घेतां येतो. उदा.—दूध सागरासारख्या धवधव्याचें सौंदर्य आपणास नेत्रावाटें अनुभवितां येतें. परंतु आपणाहून वेगळ्या नसणाऱ्या वस्तूचें सौंदर्य कसें अनुभवावयाचें? मानवी जीवन व अंतिम चैतन्य हें वेगळें करण्याजोगें नाहींत. ज्ञानेशांचे भाषेंत सांगावयाच्या झाल्यास "**बापरखुमादेवीवरु जीवींचा जिव्हाळा । कांहीं केल्या वेगळा नव्हे गे माये** चैतन्य हा वेगळा न करता येण्याजोगा जीवनाचा जिव्हाळा आहे. या जिव्हाळ्याच्या ठिकाणीं असलेल्या शक्ताच्या मुळच्या झऱ्याची अनुभूती घ्यावयाची असल्यास ती फक्त स्मरणानेंच घेतां येईल. स्मरणानें मूळ प्रेमाची समरसता व समरसतेच्या गोडीनें स्मरण. त्या स्मरणानें पुन्हां समरसता व या समरसतेनें पुन्हां स्मरण. असा मानवी जीवनांत भक्ति प्रेमाचा विहार सुरु होतो. या विहारास्तव ज्ञानेशादि संतांनीं मोक्षास म्हणजे ईश्वरी स्वरुपांत केवळ विलीन होण्यास तुच्छ मानलें आहे. ज्ञानेश्वरींत प्रेमळ भक्ताचें वर्णन करतांना म्हटले आहे कीं "**जया भक्तीची येतुली प्राप्ति । जें केवल्यानें परौतें सर म्हणती ।।** (ज्ञा. ९–३९२) गंगा ही जशी सागरास मिळते व पुनः पुनः मिळत असतें तशी या भक्ताची स्थिती असते. "**मिळोनि मिळतची असें । समुद्रीं गंगाजळ जैसें । मी होऊनि मज तैसे । सर्वस्वें भजती ।।** (ज्ञा. १३–६२७) **घडोनि सिंधूचिया अंगा । सिंधूवरी तळपे गंगा । तैसा पाड तया भोगा । अवधारिजो ।।** (ज्ञा. १८–११३८)

## स्मरण आणि वेध

या अवस्थेंत **जे माझेनि कामें सकाम । माझेनि प्रेमें सप्रेम । माझिया भुलीं संभ्रम । नेणती लोक ।।** अशी भक्त–हृदयाची स्थिती असते. स्मरणाची गोडी सारखी वाढत असते. "**वर्षाकाळीं सरिता । चढोचि लागे पंडुसुता । तैशी नीच नवी भजतां । श्रद्धा दिसे ।।** मेघांच्या धारांचा वर्षाव

होऊन पाऊसकाळांत नदीचें पाणी सारखें वाढत असतें त्याप्रमाणें भक्ताच्या हृदयांत प्रेमस्मरणानें नित्य नव्या गोडीचा पूर येत असतो. स्मरणाचें पर्यवसान वेधांत होते. वेधानें प्रेमाचें सौंदर्य आगळेंच दिसूं लागते. ज्ञानेशादि संतांनीं या प्रेमासच विठ्ठल नांव ठेविलें, या प्रेमासच सुंदराचा सुंदर, तेजाचे तेज म्हटलें व त्याच्या दिव्य तेजाचें वर्णन केलें आहे. "**पांडुरंग कांति दिव्य तेज झळकती । रत्नकीळा फांकती प्रभा ।। अगणित लावण्य तेज पुंजाळलें । न वर्णवे तेथिचि शोभा ।।**" असें ज्ञानेश या प्रेमाचेंच वर्णन करितात. या प्रेमाच्या अनुभवाच्या वेधानेंच ते म्हणतात--"**पंढरपुरिचा निळा । लावण्य पुतळा । विठो देखियला डोळा । बाइयेवो ।। वेधले वो मन तयाचिये गुणीं । क्षणु न विसंबे विठ्ठलरुक्मिणी ।। पौर्णिमेचें चांदणें क्षणक्षणा होय उणें । तैसें माझें जिणें विठ्ठलेवीण ।।**" विठ्ठलाकडे पहाण्याची संतांची दृष्टि ध्यानीं घेतली पाहिजे. ती ध्यानांत घेतली तरच तिचें सौंदर्य आपणास प्रतीत होईल. मौलाना रुम या सुफी साधूच्या ग्रंथांत एक गोष्ट दिली आहे. लैला व मजनू एकमेकावर अत्यंत प्रेम करीत होते. एकाचा केस ओढला तर दुसऱ्याचें डोळ्यास पाणी येई. एकदां खलीफानें लैलास विचारलें "मजनू जिच्यावर आसक्त आहे तीच का तू लैला? तुझ्यांत व इतर सुंदर स्त्रियांत काय फरक आहे? मला तर तुझें सौंदर्य कांहींच दिसत नाहीं." तें ऐकून लैला म्हणाली, "तू मजनू नाहींस तेव्हां गप राहा. जर तुझें नेत्र मजनूप्रमाणें असते तर माझ्या समोर दुनियेतील सर्व सुखें व ऐष आराम तुला तुच्छ वाटले असते" या गोष्टीतील लैलाचें सौंदर्य प्रतीतीस यावयास ज्याप्रमाणें मजनूच्या नेत्रांची गरज होती त्याप्रमाणें विठ्ठलाच्या सौंदर्याच्या प्रतीतीसाठीं ज्ञानेशादि संताच्या नेत्रांची गरज आहे.

विठ्ठलाचें दर्शन हें योगदर्शन नसून प्रेमदर्शन आहे. म्हणून ज्ञानेशांनीं विठ्ठलास पहातांच "**योगिया दुर्लभ तो म्यां देखिला साजणी । पहातां पहातां मना न पुरे धणी ।।**" असें उद्गार काढले आहेत. त्या प्रेमाचें सगुणरुप विठ्ठल ही संतांची दृष्टी आहे. त्यामुळें प्रेमाचा वेध या विठ्ठलमूर्तीच्या द्वारा त्यांनीं अनुभविला आहे. तो अनुभविण्यास्तव भक्ति प्रेमाचे अलंकार त्यांनीं परिधान केलें- ज्ञानेश म्हणतात---

**याति कुळ माझें गेलें हारपोनी । श्रीरंगावाचुनी आनु नेणे ॥**
**किती शिकवाल मज वेळोवेळा । मी तया गोवळा रातलीये ॥**
**अष्टभोग भोगणें माते नाही चाड । भक्तिप्रेम गोड ल्याले गे माये ।।**
**बाप रखुमादेवीवरु जीवीचा जिव्हाळा ।। कांहीं केल्या वेगळा**
**नव्हे गे माये ॥**

जो जीवनाचा जिव्हाळा आहे तो प्रेमरुप व अत्यंत गोड आहे. त्याची अनुभूती वारंवार घ्यावीशी वाटते. त्या अनुभूतीनें वेध व वेधाचें पर्यवसान आत्यंतिक वेधांत अगर विरहांत होते. ज्ञानेशाच्या विरहिणीच्या अभंगांत याच विरहाचा पूर्ण आविष्कार आहे. परंतु या विरहाचें रूप सामान्य विरहाप्रमाणें नकारात्मक व दुःखी कष्टी नाहीं. या विरहावस्थेचें विश्लेषण ज्ञानेशांच्या वरील भूमिकेवरुन केलें पाहिजे. नाहींतर त्या विषयीं गैरसमज व शंका येण्याचा संभव असतो. डॉ. रानडे यांच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांत असाच कांहींसा प्रकार दिसतो. ज्ञानेशांच्या विरहावस्थेबद्दल ते म्हणतात--

This attitude of submission is carried to an extreme in the so called विरहावस्था, the pangs of seperation of the lover from the beloved. It is most surprising that both in Kabir and Jnaneshwar. who are stalwart mystics, we should find this inconsistent attitude of विरहावस्था, when their very names fill us with ideas of great spiritual courage and philosophic insight....Would not an attitude of mere submission do? Or must it degnerate into the so-called विरहावस्था?"

—Pathway to God in Hindi Literature P. 178-179.

विरहावस्था म्हणजे शरणागतीची खालची पातळी होय असा ध्वनि वरील अवतरणांतून निघतो. परंतु विरहावस्थेचें हें विश्लेषण योग्य नाहीं. खुद्द ज्ञानेशांच्या अभंगांतच या अवस्थेबद्दल त्यांचे स्वतःचें मत त्यांनीं सांगितलें आहे. " **वाट पाहे मी एकली । मज मदन जाकळी । अवस्था धाकुली म्हणो नये ।।**" विरहावस्था ही लहान सामान्य अवस्था नव्हे. प्रेमाची अनुभूती

व त्या अनुभूतीनें विरह. या अनुभवास त्यांनीं उपमा दिली आहे की 'वाफा शिंपिलिया वाळुनिया जाय" ज्या वाफ्यावर जलसिंचन झालें आहे तोच वाळून पुन्हा तृषार्त होतो. त्याप्रमाणें 'सगुणाचो लावणो' म्हणजे प्रेमानुभूती ज्यांचे ठिकाणीं झाली आहे ते पुन्हां त्या अनुभूतीस्तव तळमळतात प्रेमप्रभु कोठे दूर नसतो. तो तळमळींतच आलिंगन देतो. विरहांतच अगर वियोगांतच संयोगसुखाची अनुभूति मिळते. प्रभू हा प्रेमाचा सागर असल्यामुळें भक्ताची तृषा सदैव नवीनच असते. "**खादलेंचि वाटे खावे। भेटलेंचि भेटावे।।**" अशी स्थिती असते. "**अविट गे माये विटेना। जवळी आहे परी भेटेना**" ही विरहावस्थेची स्थिती आहे. विरहावस्था म्हणजे प्रेमाच्या विहाराचीच अवस्था आहे. श्रेष्ठ सुखाचा तो परमोच्च बिंदूच होय. या अवस्थेंतच ज्ञानेशादि संत रममाण झाले व प्रेमासाठीं पिसे झाले. प्रेमाचें प्राशन कितीही केलें तरी ते त्यांना अपुरेंच वाटलें. ज्ञानेश म्हणतात--

**त्रिभुवनीचें सुख पहावया नयनीं। दिनरात्रीं धणी न पुरे माझी।।**<br>
**विटेवरी सावळा पहातां पै डोळा। मन वेळोवेळा आठवितु।।**<br>
**सागरी भरते दाटे तैसे मन उल्हाटे। वाट पाहो कोठें तुझी रया।।**<br>
**बापरखुमादेवीवरु पूर्ण प्रकाशला। कुमुदिनी विकासला तैसें झालें।।**

ज्ञानेशांच्या विरहिण्या अत्यंत गोड आहेत. त्यांत काव्य आहे पण काव्या बरोबरच परतत्वस्पर्शही आहे. "**जागृती पुसे साजणी। कवण बोलिलें आंगणीं। निरखिता वो नयनीं। वृंदावनीं देखियला।। मनि वेधू तयाचा। पंढरिरायाचा।।** असा वेध उत्पन्न करण्याचें त्यांच्यांत सामर्थ्य आहे. या वेधानें हरि सोयरा होतो अशीं ज्ञानेशांनीं ग्वाही दिली आहे "**मज शृंगारा वो तया जोगी**" माझ्या प्राणप्रियास आवडेल असा मला शृंगार साज चढवा असें विरहिणी म्हणते. प्रभु हा जीवाचा प्राणसखा आहे. त्या सख्यास रुचेल असा भक्तिप्रेमाचा शृंगार साज प्रत्येक जीवानें आपल्या अंगावर घालून प्रभुप्रीतीचें भाजन बनलें पाहिजे. तें कसें बनावें हें ज्ञानेशाची विरहिणी शिकवील. तिच्या संगतीत घडी घालवूं, ती कशी बोलते, कशी चालते, कशीं विमनस्क होते तें पाहूं. पाहतां पाहतां तेंच भाव जीवांतही उमटतील व मानवी जीविताचें सार्थक होईल.

## "बुडतां हे जन न देखवे डोळा—"

तुकोबांनीं आपल्या एका अभंगांत मारुतीची स्तुति केली आहे. कोणा-चांहि स्तुति करतांना त्या व्यक्तीच्या अंगांतील प्रमुख सद्‌गुणांचें वर्णन करण्याचा प्रघात आहे. तुकोबांना मारुतीच्या अंगीं मोठा गुण कोणता दिसला हें पाहिल्यास आश्चर्य वाटतें. ते म्हणतात—

"हनुमंत महाबळी । रावणाची दाढी जाळी ।
जाळियेली लंका । धन्य धन्य म्हणे तुका ॥"

दाढी जाळणारा व लोकांच्या घरांची राखरांगोळी करणारा मारुती तुकोबांच्या मनास पटला व त्याची त्यांनीं तोंड भरून स्तुति केली. समान-धर्मत्वाखेरीज कुणी कुणाची स्तुति करीत नाही. ज्या अर्थी मारुतीनें केलेल्या जाळपोळीची तुकोबांनीं स्तुति केली तेव्हां तोच गुण तुकोबांतही असला पाहिजे. अट्टल दरोडेखोर अट्टल दरोडेखोरांची प्रशंसा करतो. (तुकोबांनीं वैष्णवांचें चोरपण वर्णिलें आहे– "वैष्णवें चोरटीं । आलीं घरासी करंटीं ॥ आजि आपुलें जतन । करा भांडें पांघरूण ॥ ज्याचे घरीं खावें । त्याचें सर्वस्वही न्यावें ॥ तुका म्हणे माग । नाहीं लागो देत लाग ॥") मारुतीच्या गुंडपणाची प्रशंसा करणाऱ्या तुकोबांच्या अंतःकरणांत कांहीं गुंडगिरी असलीच पाहिजे. या गुंडगिरीचा पुरावा तुकोबांनीं काढलेल्या स्वतःबद्दलच्या उद्‌गारांतच आढळतो. एकदां तुकोबांचे व देवाचें भांडण झालें. तुकोबा देवास म्हणाले—

"तूं क्षीरसागरीचा पुंड । मी देवद्वारीचा गुंड ॥
गांठ पडली ठका ठका । त्याचें वर्म जाणे तुका ॥"

खुद्द देवाच्याच गुंडपणाचें वर्म ओळखून आपल्याशीं नीटपणें वागण्याबद्दल त्यांनीं देवासही खडसाविलें आहे.

दुसऱ्या एका प्रसंगीं देवाशीं सलगी करीत असतां तुकोबांनीं देवास आपलें ब्रीद चालविणारा एक उत्तम गुंड शिष्य दे, अशी मागणी केली.

" कृपा करावी भगवंतें । ऐसा शिष्य द्यावा मातें ।।
माझें व्रत जो चालवी । त्यासी घ्यावें त्वां पालवी ।।
व्हावा ब्रम्हज्ञानी गुंडा । तिही लोकीं ज्याचा झेंडा ।।
तुका तुका हाका मारी । माझ्या विठोबाच्या द्वारीं ।।

देवानें तुकोबांची मागणी मान्य केली व निळोबासारखा गुंड शिष्य त्यांना दिला. निळोबांनीं तुकोबांना आपला ' वस्ताद ' म्हटलें आहे.

निळा म्हणे वस्ताद माझा । असतां शिरीं सद्गुरुराजा
निवारीन रोग घेउनि पैजा । धरितां वोजा विश्वास मनीं

असो. अशा तऱ्हेच्या धीट व फटकळ तुकोबांनीं मारुतीच्या जाळपोळीचें गुणगान करणें प्रथमदर्शनीं विचित्र वाटलें तरी तें विसंगत नाहीं. मारुतीनें लंकेत जाळपोळ करुन राक्षसांचीं मोठमोठीं मंदिरें, रंगशाळा यांचा विध्वंस केला. त्याचें वर्णन वाल्मिकींनीं केलें आहे–

ततः प्रदीप्तलांगूलः सविद्युदिव तोयदः ।
भवनाग्रेषु लंकाया विचचार महाकपिः ।।
वर्जयित्वा महातेजा बीभीषणगृहं प्रति ।
क्रममाणः क्रमेणैव ददाह हरिपुंगवः ।।
तेषु तेषु महार्हेषु भवनेषु महायशाः ।
तेषां ऋद्धिमतामृद्धि ददाह कपिकुंजरः ।।
क्वचित्किंशुकसंकाशाः क्वचित् शाल्मलिसंनिभाः ।
क्वचित्कुंकुमसंकाशाः शिखा वन्हेश्चकाशिरे ।।

याप्रमाणें मारुतीनें लंकानगरी जाळली, त्याप्रमाणें तुकोबांनींहि एका नगरीचें दहन केलें. मारुतीनें राक्षसांचीं मंदिरें जाळलीं, पण बीभीषणादिकांच्या सात्विक मंदिरांचें पुनरुज्जीवन केलें. त्याप्रमाणें तुकोबांनीं जी नगरी जाळली ती वेडगळ धार्मिक विचारांची होती व त्यांतील मंदिरें म्हणजे राक्षसी अगर खुळचट समजुतीचीं होतीं. ही विपरीत विचारांची नगरी दहन करुन तुकोबांनीं शुद्ध अशा भक्तिप्रेमाच्या बोधाचीं मंदिरें उभविलीं. त्यांची गुंडगिरी ही साधी गुंडगिरी नसून ती एक अत्यंत प्रभावशाली ध्येयनिष्ठेची शक्ति होती. शिवरायांनीं ज्याप्रमाणें आपली सर्व शक्ति महाराष्ट्रराज्य स्थापण्याकरितां रणक्षेत्रांत वापरली त्याप्रमाणें तुकोबांनीं आपलें सर्व सामर्थ्य धर्मक्षेत्रांत भक्तिधर्माचें साम्राज्य रुढविण्यास्तव खर्च केलें व "तुका झालासे कळस" ही उक्ति सार्थ केली.

तुकोबांची वाणी जितकी कोमल व करुणरसानें ओथंबलेली आहे. तितकीच प्रसंगविशेषीं भाल्याहून तीक्ष्ण आहे.

तुका म्हणे साधु बोले खड्गधर । खोचतें अंतर दुर्जनांचे ।।

अशी तिची तऱ्हा आहे. परंतु या तीक्ष्णतेच्या मुळाशीं जनहिताचा कळवळा आहे. तुकोबांच्या वर्मास झोंबणाऱ्या वाणींत वैरत्व नसून सख्यत्व सांठविलें आहे. ते म्हणतात–

जग तरी आम्हां देव । परी हे निंदितों स्वभाव ।।
येतो हिताचा कळवळा । पडती हातीं म्हूण काळा ।।
नाहीं कोणी सखा । आम्हां निरपराधसारिखा ।।
उपक्रमें वदे । तुका वर्मासी तें भेदे ।।

म्हणून रामेश्वर भटजींनीं तुकोबांना 'विश्वसखा' म्हटलें आहे.

(ब्रम्हानंद तुके तुळी आला तुका । तो हा विश्वसखा क्रीडे जगीं) या विश्वसख्यानें जनतेंतील वेडगळ समजुतींचीं खोपटें जाळून त्यांच्या जागीं भक्तिप्रेमाचीं धवळारें कशीं बांधलीं त्याचें ओझरतें दर्शन घेऊं.

**भविष्यः–** भविष्यांवर विश्वास ठेवणारीं माणसें फार असतात. अडाणी नव्हे तर शहाणींसुर्तीं माणसेंही भविष्याच्या नादीं लागतात. आपला उत्कर्ष व अपकर्ष ग्रहांच्या बलाबलावर अवलंबून आहे या समजुतीनें लोक भविष्य समजून घेण्यास्तव पैशांचा चुराडा करतात. यामुळें पोटभरू भविष्य सांगणारांचें धंदेही जोरांत चालतात. भविष्याबद्दल तुकोबांची शिकवणूक अशी आहे कीं–

"भूत भविष्य कळो यावें वर्तमान ।
हे तो भाग्यहीन यांची जोडी ।।
आम्ही विष्णुदासी देव ध्यावा चित्तें ।
होणार तें होतें प्रारब्धानें ।।"

भूत–भविष्य समजून घेण्याच्या नादीं लागणारा अभागी होय. प्रत्येकांस आपापल्या कर्माप्रमाणें फळ मिळत असतें. तेव्हां भविष्याच्या नादीं न लागतां देवाच्या नादीं लागावें. देवाच्या भक्तीनें प्रारब्धाचा सुद्धां नाश होतो.

"प्रारब्ध क्रियमाण । भक्ता संचित नाहीं जाण ।।

**आत्महत्याः–** कांहीं मर्जीविरुद्ध घडलें कीं आत्महत्या करण्याची प्रवृत्ति कांहीं आततायी लोकांत असते. तें कारण वैयक्तिक असो कीं सामाजिक असो, आत्महत्या करणें हा भ्याडपणा आहे. एखाद्याचा प्रेमभंग झाला, एखाद्यास कांहीं सामाजिक अन्याय दूर करतां न आला, एखादा आर्थिक परिस्थितीस कंटाळला कीं आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतो. पण हा दुबळेपणा आहे. तुकोबा म्हणतातः–

नलगे द्यावा जीव सहजचि जाणार ।
आहे तो विचार जाणा कांहीं ।।
मरण जो मागे गाढवाचा बाळ ।
बोलिजे चांडाळ शुद्ध त्यासी ।।
तुका म्हणें कई होइल स्वहित ।
निधान जो थीत टाकूं पाहे ।।

नरदेह हें निधान आहे. ("नरदेह निधान लागलें हातीं। उत्तम सार उत्तम गति। देव होऊ म्हणती ते देवचि होती।) या निधानाचा त्याग करण्यांत पुरुषार्थ नसून त्याचा योग्य उपयोग करण्यांतच पुरुषार्थ आहे. आततायीपणानें कोणीं जीव दिल्यास देवास त्याची दया येत नाहीं.

अतित्याई देतां जीव। नये कीव देवासी॥
थोडयासाठीं राग आला। जीव दिला गंगेंत।
त्यासी परलोकी नाहीं मुक्ति। अधोगती चुकेना॥
तुका म्हणे कृष्णराम। स्मरतां श्रम वांचती॥

संकटकाळीं प्रसंगास भिऊन आत्महत्या न करतां देव आठवावा म्हणजे मनास समाधान लाभेल.

**जातिश्रेष्ठतां:**–मनुष्यास जातीवरुन श्रेष्ठता नसून त्याच्या ईश्वरनिष्ठेवरुन तो श्रेष्ठ समजावा. "चारी वर्ण झाले एकाचिये अंगीं।" सर्व वर्ण देवाच्याच अंगांतून निघालेले आहेत. "आंबे, बोरी, वड, बाभुळ, चंदन। गुणा गुणी भिन्न अग्नि एक॥" लाकडें निरनिराळया वृक्षाचीं असलीं तरी अग्नीमध्यें टाकलीं म्हणजे त्यांत भेद उरत नाहीं, त्याप्रमाणें "तुका म्हणे मन उन्मन जो होय। तोंवरी हे सोय विधी पाळा॥" मन उन्मन होणें म्हणजे अंतरांत हरिप्रीतीचा अग्नि प्रदीप्त होणें होय. तो झाल्यावर भेदाभेद उरत नाहीं.

यातीनें अंत्यज असला पण तो नामनिष्ठ असल्यास ब्राह्मणच मानला पाहिजे.

ब्राम्हण तो याति अंत्यज असता।
मानावा तत्त्वता निश्चयेसी॥
रामकृष्णनामें उच्चारी सरळे।
आठवी सांवळे रूप मनीं॥
शांति क्षमा दया अलंकार अंगीं।
अभंग प्रसंगीं धैर्यवंत॥
तुका म्हणे गेल्या षड्उर्मी अंगें।
सांडुनिया मग ब्रम्हचि तो॥

**क्षुद्रदेवतापूजनः**—क्षुद्रदेवतांच्या पूजनानें पूजकही क्षुद्रच बनतो. अशा देवतांची पूजा न करतां सर्वांत श्रेष्ठ अशा प्रेममूर्ति पांडुरंगाचीच कास धरली पाहिजे—

नव्हे जाखाई जोखाई । मायराणी मेसाबाई ।।
बळिया माझा पंढरिराव । जो या देवांचाही देव ।।
चंडी रंडी शक्ति । मद्य मांस जे भक्षिती ।।
भैरव खंडेराव । रोटी सुटी साटी देव ।।
गणोबा विक्राळ । लाडू मोदकांचा काळ ।।
मुंजा म्हैसासुरे । हे तो कोण लेखी पोरे ।।
वेताळे फेताळे । जळो त्यांचें तोंड काळें ।।
तुका म्हणे चित्तीं । धरा रखुमाईचा पति ।।

दुसऱ्या एका अभंगांत तुकोबा सांगतातः—

सेंदरीं हेंदरीं देवी दैवतें । कोण ती पूजी भूतेंखेतें ।।
आपुल्या पोटा जीं रडतें । मागती शितें अवदान ।।
आपुले इच्छी आणिका पिंडी । काय ते देईल बराडी ।।
कळो ही आली तयाची जोडी । अल्प रोकडी बुद्धि अधरा ।।
दासीचा पाहुणेर उखिते । धणी देईल आपुल्या हातें ।
करुणा भाषण उचिते । हे तो रितें सतत शक्तिहीन ।।
काय तें थिल्लरीचें पाणी । ओठ न भिजे न फिटे धणी ।
सीण तरी आदी अवसानी । क्षोभे पुरश्चरणीं दिलें फळ ।।
विलेपनें बुजविती तोंड । भार खोल वाहती दंड ।
करविती आपणया दंड । ऐसियास भांड म्हणें देव तो ।।
तैसा नव्हे नारायण । जगव्यापक जनार्दन ।
तुका म्हणे त्याचें करा चिंतन । वंदू चरण येतीं सकळे ।।

( सारांशः– आपल्या पोटाकरितां रडून अन्नाचीं शितें मागणारीं भूतें-खेतें, सेंदूर लावलेल्या वावळट व वेड्यावांकड्या अशा देवींचें व दैवतांचें कोण पूजन करील? आपल्या वासनेसाठीं दुसऱ्यास पीडा देणारे आशाळभूत दुसऱ्यास काय देणार? ज्यांची बुद्धि थोडी असून निश्चयरहित आहे त्यांची प्राप्ति कसली आहे तें आम्हांस समजलें. मोलकरणीचा पाहुणचार पाहिल्यास तिनें आपल्या धन्याची कींव भाकून जेवढें मिळालें तेवढ्या द्रव्याचा असतो. त्याप्रमाणें या पोकळ व शक्तिहीन दैवतांची स्थिति आहे. डबक्यातल्या पाण्यानें ओठहि भिजत नाहीं व तहानहि जात नाहीं अगर पुरश्चरणांत ते करतांना शीण व थोडी चूक झाल्यास उलट क्षोभच पदरांत पडतो. सुरुवातीस त्रास, मध्यें त्रास व शेवटींहि त्रास. त्याप्रमाणें या दैवतांच्या भजनानें स्थिति होते ही दैवतें शेंदराच्या लेपानें आपली तोंडें बुजवितात. त्या लेपाचें ओझें अंगावर वागवितात व स्वतःच्या भगतास देहदंडन करावयास लावतात. सर्व जग व्यापून राहिलेला जनार्दन तसा नाहीं. त्या नारायणाचें चिंतन केल्यास सर्व जण तुमच्या चरणांस वंदन करतील. )

**देहदंडणः–** देहाच्या दंडणाखेरीज खरा परमार्थ घडत नाहीं अशी कांहीं लोकांची समजूत आहे. परंतु तुकोबांनीं या समजुतीचेंही उच्चाटन केलें आहे. " कर्वती कर्मरी देहासी दंडण। करितां समान नये नामा ।।" कितीहि देहदंडण केलें तरी त्यास नामस्मरणाची बरोबरी येत नाहीं. " न लगे दंडण मुंडण तें कांहीं। साधनाची नाहीं आटाआटी " अशी नामस्मरणाच्या राजमार्गाची महती आहे. देहास दंडण करणें म्हणजे रोग रेड्याला व डाग पखालीला, असा प्रकार होतो. शरीर ही परमात्म्यानें मानवास विनामूल्य दिलेली मोलाची देणगी आहे. " दिला करुणाकरें। मनुष्यदेह सत्संग ।।" " देवें दिला देह भजना गोमटा " " नरदेह वाटा हरी जाणावया ।।" या देणगीचो हेळसांड न करतां योग्य उपयोग करुन घेतला पाहिजे. ' शरीर सुखाचें घोसुलें ' आहे त्याप्रमाणें ' रोगाचें भांडारहि ' आहे. म्हणून त्याचे विषयसुखास्तव चोचलेहि पुरवूं नयेत व त्याचा तुच्छ म्हणून त्यागही करुं नये.

" शरीरा दुःख नेदावा भोग। न द्यावें सुख न करी त्याग।
शरीर वोखटें ना चांग। तुका म्हणे वेग करी हरीभजनीं।

अशी तुकोबांची शिकवण आहे. शरीरास वैरी न मानतां त्याच्याच द्वारां हरिप्रीतीचें अमृतपान करतां येतें.

कासया उदास होऊं देहावरी । अमृतसागरीं बुडोनिया ।

या बोधानें तुकोबा देवास मागतात कीं—

" डोळें भरोनिया पाहीन तुझें मुख । तेंचि मज सुख देई देवा ॥
कान भरोनिया ऐकेन तुझी कीर्ति । ते मज विश्रांति देई देवा ॥
वाहे रंगीं, टाळी नाचेन उल्हास । हे देई हातास पाया बळ ।
तुका म्हणे माझा सकळ देहभाव । आणिक नको ठाव चित्तू यासी ॥

संपूर्ण देह विठ्ठलानें भरला कीं कुवासना तेथें रहात नाहींत.

तुका म्हणे देह भरला विठ्ठलें । कामक्रोधें केलें घर रितें ॥

म्हणून देहदंडण न करतां देह देवाचें कारणी लावून मुखांतून अमृतवाणी पाझरवावी. (तुका म्हणे ऐसे कासया करावें । देहासी दंडावें वाउगेंचि ॥)

**ब्रम्हचर्यः**—परमार्थास ब्रम्हचर्याची आवश्यकता आहे, अशी समजूत आहे. लग्न केल्यानें मनुष्याची पारमार्थिक किंमत कमी होते असेंही बरेच लोक समजतात. तुकोबांच्या दृष्टीनें हें चुकीचें आहे. खरें ब्रम्हचर्य म्हणजे लग्न न करणें नसून ब्रम्हाच्या म्हणजे परमात्म्याच्या ठिकाणीं निष्ठा व प्रेम ठेवून जीविताचरण करणें होय. " नव्हे ब्रम्हचर्य बाइलेच्या त्यागें " बायको केली नाहीं म्हणजे ब्रम्हचारी होत नाहीं, असें तुकोबा म्हणतात. एका ब्रम्हचाऱ्याची तुकोबांनी एकदां थट्टा केली. " एक ब्रम्हचारी गाढवासी झोंबतां । हाणोनिया लाथा पळालें तें ।। गाढवही गेलें ब्रम्हचर्य गेलें । काळें तोंड झालें जगामाजी ।। "

भागवतधर्मी संत मंडळी, नामदेव, एकनाथ, तुकोबा, निळोबा, चोखोबा, गोरोबा इ. सर्व गृहस्थाश्रमीच होते. ज्ञानेश्वर महाराजांचे बाबतींत चमत्कारिक परिस्थिति होती. समाजकंटकांनीं त्यांचा अत्यंत छळ

केला. कोणी विचारतात कीं, ज्ञानेशांनीं कां लग्न केलें नाहीं. त्याचें उत्तर त्यांच्या चरित्राच्या प्रसंगांतच पहावें. पैठणच्या ब्रम्हवृंदाकडून शुद्धिपत्र मिळविण्यास कोण यातायात पडली. तें मिळूनही शेवटीं त्यांची मुंज सुद्धां कोणी लावल्याचें वृत्त नाहीं. मुंज नाहीं तेथें लग्नाची कोण कथा? ज्ञानेशांचें मत तुकोबाप्रमाणेंच होतें व गृहस्थाश्रमाचीं गोड वर्णनें ज्ञानेश्वरींत वाचून आचरणांत आणण्याजोगीं आहेत. उदा. "गांवा गेलिया वल्लभु। पतिव्रतेचा विरहक्षोभु। भलनेसणीं हानि लाभू। न मनीं जेवि॥" याप्रमाणें पतिपत्नींतील गाढ प्रेम त्यांनीं वर्णिलें आहे.

**संन्यास व संसारत्यागः–** ज्याप्रमाणें ब्रम्हचर्यास महत्व नाहीं, त्याप्रमाणें तुकोबांनीं संन्यासासही महत्व दिलें नाहीं. गृहस्थाश्रमानंतर संन्यास घेतल्यानेंच परम पुरुषार्थ प्राप्त होतो, अशी पूर्वीची समजूत होती; पण या समजूतीवर तुकोबानीं प्रहार केला आहे. देवाच्या प्राप्तीस गृहस्थाश्रम सोडून रानावनांत जाण्याची वा संन्यासाश्रम घेण्याची मुळींच गरज नाहीं. "होउनि संन्यासी भगवीं लुगडीं।" अथवा 'भगवें तरी श्वान सहज वेष त्याचा। तेथें अनुभवाचा काय पंथ॥' असें स्पष्ट शद्बांत सांगून तुकोबांनीं संन्यासाचा निषेध केला आहे. परमार्थाकरितां संसारत्याग नको. संसारांत राहूनच हरिप्रेम अनुभवितां येतें. "नको सांडूं अन्न नको सेवूं वन। चिंती नारायण सर्वभोगी॥ मातेचिया खांदीं बाळ नेणे सोण। भावना त्या भिन्न मुंडाविया॥ नको गुंतो भोगीं नको पडो त्यागीं। लावूनी सरे अंगीं देवाचिया॥ तुका म्हणे नको पुसो वेळोवेळां। उपदेश वेगळा उरला नाहीं॥" तुकोबांच्या उपदेशाचें सारच या अभंगांत त्यांनीं सांगितलें आहे.

**संसारासक्तिः–** केवळ संसारांतच गुरफटून देवास व संतास विन्मुख होणाऱ्या लोकांवरही तुकोबांनीं निर्भीड टीका केली आहे.

देवाचें चरित्र नाठवे सर्वथा।
विनोदार्थ कथा गोड वाटे॥
हातावरी हात हांसोनी आफळी।
वाजवितां टाळी लाज वाटे॥

तुका म्हणे थुंका त्याच्या तोंडावरी ।
जातो यमपुरी भोगावया ॥
साधूच्या दर्शना लाजसी गव्हारा ।
वेश्येचिया घरां पुष्पें नेसी ॥
वेश्या दासी मुरळी जगाचो वोंवळी ।
ते तुज सोंवळी वाटे कैशी ॥
तुका म्हणे आतां लाज धरी बुच्या ।
टाचरांच्या कुच्या मारा वेगीं ॥
उरा लावी ऊर आलिंगितां कांता ।
संतासीं भेटतां अंग चोरी ॥
अतीत देखोनी होय पाठमोरा ।
व्याह्यासी सामोरा जाय वेगीं ॥
संत मागें पाणी नेदी एक चूळ ।
दासीसी आंघोळी ठेवी पाणी ॥
संतांसी देखोनी होय पाठमोरा ।
दासीचिना पोरा चुंबन देतो ॥

**सोवळें ओवळें**:–देवाविषयीं प्रेमभाव ज्यांच्या ठिकाणीं आहे तींच सोवळीं होत, बाकीचीं ओवळीं–

पवित्र सोवळीं । तीच एक भूमंडळीं
ज्यांचा आवडता देव । अखंडित प्रेमभाव
पवित्र तो देह वाणी पुण्यवंत । जो वदे अच्युत सर्वकाळ

**जपतप, तीर्थाटण, योग व यज्ञयाग**:–भक्तिभाव हाच श्रेष्ठ असून सर्व साधनें व्यर्थ होत.

तुकोबा योगाबद्दल म्हणतात–

लक्षुनिया योगी पहाती आभास । ते दिसे आम्हांस दृष्टीपुढें ।।
कर दोन्ही कटीं राहिलासे उभा । सांवळी हे प्रभा अंगकांती ।।
अचेत चेतलें भक्तीचिया सुखें । आपुल्या कौतुकें तुका म्हणे ।।

योगाच्या ध्यानांतील दर्शनाहून विटेवरील प्रेममूर्तीचें दर्शन अधिक श्रेष्ठ होय.

जपतपादिकांचे धोके तुकोबा वर्णितात–

चहू आश्रमाचे धर्म । न राखतां जोडे कर्म
तैसी नव्हे भोळी सेवा । येक भावचि कारण देवा
तपें इंद्रिया आघात । क्षणा एका वाताहात
मंत्र चळे थोडा । तरि धडचि होय वेडा

तीर्थाबद्दल ते म्हणतात–

तीर्था जाउनिया काय तुवा केलें । चर्म प्रक्षाळिलें वरच्यावरी ।।
तीर्थी धोंडा पाणी । देव रोकडा सज्जनीं ॥

यज्ञयागाबद्दल–

यज्ञयाग जपतप अनुष्ठान । राहे ध्येय ध्यान अलीकडे
माझ्या विठोबाचें वर्म आहे दुरी ।

अशी स्थिति असल्यामुळें त्यांचे नादीं लागूं नये. खरा यज्ञ म्हणजे नामस्मरणच होय.

नाम घेतां वाट चाली । यज्ञ पाउलापाउलीं

**ब्रम्हज्ञान व मोक्षः–** सर्वांत ब्रम्हज्ञान हें श्रेष्ठ असून मोक्ष हें जीवाचें ध्येय आहे, अशी समजूत असतें. पण ती वेडेपणाची आहे.

तुकोबा म्हणतात–

ब्रम्हज्ञान दारीं येतें काकुळती । अव्हेरिलें संतीं विष्णुदासीं

ब्रम्हज्ञानांत देवभक्तपणाचा सुखाचा सोहळा नाहीं.

नको ब्रम्हज्ञान आत्मस्थिती भाव। मी भक्त तूं देव ऐसें करी

ब्रम्हज्ञान्यानेंसुद्धां लाळ घोटावी असा भक्तिप्रेमरस आहे.

घोटवीन लाळ ब्रम्हज्ञान्या हातीं।
मुक्ता आत्मस्थिति सांडवीन॥

मोक्ष हें जीवनध्येय नसून प्रेमसुखाची अनुभूति हें जीवनध्येय आहे. तुकोबा म्हणतात–

सांडुनि सुखाचा वाटा। मुक्ति मागे तो करंटा
कां रे न घ्यावा जन्म। प्रेम लुटावें नाम॥

तुकोबांची अभंगवाणी अवलोकिल्यास त्यांनीं वेडगळ समजुतींची वरें आपल्या वाणीच्या तेजानें भस्मसात् केल्याचें दृष्टीस पडतें. हें तुकोबांचें लंकादहनच होय. या दहनानें समाजावर अगणित उपकारच झाले आहेत. शुद्ध धर्माचरणाच्या पंथावर जनतेचीं पाउलें कशीं पडतील ही आत्यंतिक तळमळ तुकोबांच्या पोटीं आहे. त्यांच्या तीक्ष्ण उत्तराच्या पोटीं दयेचा सागर आहे. ते मोठ्या कळकळीनें सांगतात–

सत्य आम्हां मनीं। नव्हों गाबाळाचे धनी॥
ऐसे जाणा रे सकळ। भरा शुद्ध टाका मळ॥
देतों तीक्ष्ण उत्तरें। पुढें व्हावयासी वरें॥
उपकारासाठीं बोलों हे उपाय। येणेंवीण काय चाड आम्हां॥
बुडतां हे जन न देखवें डोळां। येतो कळवळा म्हणवुनि॥
तुका म्हणे माझे देखतील डोळे। भोग देते वेळें येईल कळों॥
वाट दावी तया न लगे शिणावें। अतित्याई जीवें नाश पावे॥
तुका म्हणें हित देखण्यासी कळे। पडती आंधळे कूपामाजी॥

# देवाची सांठवण

तुकोबारायांनीं आपल्या एका अभंगांत मोठ्या कळकळीनें म्हटलें आहे.

**देव घ्या कोणी देव घ्या कोणी । आइता आला घर पुसोनी ।।**
**देव नलगे देव नलगे । सांठवणाचे रुधले जागे ।**
**देव मंदला देव मंदला । भाव बुडाला काय करु ।।**
**देव घ्या फुका देव घ्या फुका । नलगे रुका मोल कांहीं ।।**

आपल्या हृदयांत देवाला सांठविण्याबद्दल त्या कारुण्यमूर्ती तुकोबांनीं अट्टाहासानें सांगितलें आहे. परंतु देव ज्या जागीं सांठवावयाचा ती जागाच अन्य वस्तूंनीं व अडगळींनीं भरलेली असल्यामुळें "देव नलगे देव नलगे सांठवणाचें रुधले जागे" असा प्रकार होतो! संतांनीं आपल्या हृदयांत देवास सांठविला व निरतिशय प्रेमाची अनुभूति घेतली. तीच अनुभूती सर्वांना वाटावी म्हणून "सेवितो हा रस वाटितो आणिकां। घ्यारे होऊं नका रानभरी" असें म्हटलें. देवाच्या बोधानें देवाचें प्रेम उत्पन्न होईल. प्रेमानें विश्वव्यापक प्रभू हृदयांत सांठविला जातो. "एवढा प्रभू भावें। तेणें संपुष्टीं रहावें।।" "सांठविला राहे हृदय संपुटीं" ही अनुभवाची संतवाणी आहे. तेव्हां बोध म्हणजे काय, त्यानें भगवत्प्रीतीच्या नटनाचाचा रंग कसा उडतो व व्यापक प्रभू हृदयांत कसा सांठविता येतो तें पाहू.

## बोध आणि जीवित

सायंकाळची वेळ होती. रुग्णालयाजवळून जात असतां सहज आंत जाण्याची इच्छा झाली. आंत पाऊल टाकतांच माझ्या दृष्टीस एक मोहक

दृश्य दिसलें. एका पांढऱ्या शुभ्र बिछान्यावर एक लहान मुलगा निजला होता. जवळच लेडी डॉक्टर उभ्या असून "बाळ, तुला खेळावयास जावेसें वाटतें ना? मग घेऊन टाक तर चटकन हा डोस म्हणजे तुला बरें वाटेल व खेळतां येईल–शिवाय मी आज तो बदलून गोड केला आहे" असें म्हणत त्यांनीं मुलाला तो डोस दिला. मला त्यांच्या प्रेमळ वागणुकीचें फार कौतुक वाटलें; व तें दृश्य अंतःचक्षुपुढें ताजें असतांनाच आणखी एक प्रेमळ दृश्य पहाण्याची संधि आली. एके दिवशीं कांही कारणानें मला त्यांचे बंगल्यावर जाण्याचा योग आला. आंत जातों तों त्यांचा स्वतःचा मुलगा आजारी असून त्याला त्या माउलीनें आपल्या पोटाशीं घेतलेलें मला दिसून आलें. "बाळा, तूं कधीं रे बरा होशील?" असें म्हणतांना तिला हुंदका आवरला नाहीं व नेत्रांतील अश्रु मोठ्या प्रयासानें आवरले. हॉस्पिटलमध्यें आजारी असलेल्या मुलाला धीर देणारी व कर्तव्यबुद्धीनें औषध देणारी स्त्री स्वतःचा मुलगा आजारी पडतांच व्याकूळ आणि विव्हळ झाली. दोनही मुलें आजारी आहेत हें ज्ञान तिला होते. परंतु एक ज्ञान कर्तव्यबुद्धीचें होतें. हा मुलगा आजारी आहे व याला औषध देणें माझें कर्तव्य आहे या भावनेनें ती त्यास जपत होती तर स्वतःच्या मुलाविषयींचें ज्ञान पोटच्या जिव्हाळ्याचें होतें, त्यामुळें ती घायाळ होऊन आपलें सर्वस्व वहावयास सिद्ध झाली होती. स्वतःच्या मुलाविषयींचें ज्ञान बोधरूप होतें. हा मुलगा माझा आहे हा बोध तिचें ठायीं असल्यामुळें तो आजारी पडतांच तिचें हृदय व्याकूळ झालें. बोध म्हणजे जिव्हाळ्याचें ज्ञान होय. त्या ठिकाणीं भावना बुद्धि आणि क्रिया या सर्व एकवटलेल्या असतात. मानवी जीवनांत बोध ही अत्यंत महत्वाची गोष्ट आहे. बोध ही प्रचंड शक्ति असून मानवी जीवनाचा प्रवाह कोणत्या दिशेनें वहायचा तें ती ठरवीत असते.

जगामध्यें दिसायला व्यक्ति सारख्या दिसतात, परंतु त्यांच्या बोधांत विविधता असते. क्रिया सारख्या दिसल्या तरी त्या क्रियेचें सुखदुःख बोधावर अवलंबून असतें. समजा कीं, एका गांवीं एका मुलीचें सासर असून दुसरीचें माहेर आहे. त्या गांवाकडे या दोन मुली जात आहेत. दोघींचीं पाउलें एकाच वाटेवर एकाच दिशेनें पडत आहेत. बाह्य क्रिया एकच

दिसत आहे पण दोघींच्या हृदयांतील सुखदुःखाच्या ऊर्मि मात्र अगदीं भिन्न असलेल्या आढळतील. तीच वाट एकीला आपलें माहेर जवळ करीत असते तर दुसरीला माहेर दूर करीत असते. एकीचीं पावलें उल्हासानें चालतात तर दुसरीची जड पडतात. एकीच्या हृदयांत आपलें आई, बाप, भाऊ भेट-तील म्हणून वरचेवर सुखाच्या लहरी उचंबळत असतात, दुसरीस आपले आईबाप पुन्हा कधीं भेटतील म्हणून कालवाकालव होऊन ती वरचेवर मागें परतुन पहात असते. या भिन्न अनुभवांचें कारण भिन्न बोध होय.

व्यवहारांत जी गोष्ट दिसून येते तीच एकंदर आयुष्यामध्येंही आढळते. आयुष्याच्या स्वरुपाविषयीं जो बोध असेल त्याप्रमाणें आयुष्याचें ध्येय ठरवून जीव वागत असतो. इंद्रियांना गोचर तेवढेंच खरे, त्याच्या पलीकडे कांहीं नाहीं, असा बोध असल्यास आपल्याकडील चार्वाक अगर पाश्चात्य देशीय एपिक्युरिअन्स्प्रमाणें आयुष्य हें खाणें, पिणें मजा मारणें याकरितांच आहे, तेव्हां शक्य तितकें इंद्रियविषयक सुख पदरांत पाडून घेतलें पाहिजे, मग त्याकरितां कांहीं करावें लागलें तरी हरकत नाहीं असें म्हणून तो जीव त्या खटपटीस लागतो. त्याच्या उलट पाश्चिमात्य स्टोइक्स अगर आपल्याइकडील संन्यासमार्गी लोकांचा बोध पाहिला तर मानवी आयुष्य हेंच मुळीं दुःखमूळ आहे, विश्व हा आभास आहे, देहाच्या खोड्यां-तून जीव स्वतंत्र झाला तर त्यास सुख लाभेल अशा प्रकारचा दिसून येतो. त्यामुळें त्यांचे सर्व प्रयत्न इंद्रियदमन, देहाचा निरास, सर्वस्वाचा त्याग वगैरे करून शेवटीं मोक्ष मिळविला पाहिजे याकरितां होत असतात. भाग-वतधर्मी संतांचा बोध या दोहींहून निराळा आहे. मानवी आयुष्य हें त्याग किंवा भोग यांत नाश न करितां भक्तिप्रेमसुखांत घालवा असा त्यांनीं कळकळीचा उपदेश केला आहे. ("तुका म्हणे लागो अखंड समाधि। जावे प्रेमबोधीं बुडोनिया"॥),

मानवी जीवित हें परमात्मस्वरुपाचे ठिकाणीं असणाऱ्या अपरंपार प्रेमाची रुची चाखण्याचें द्वार आहे. तेव्हां इंद्रियभोगानें व त्यागानें त्याचा नाश न करितां तींच इंद्रियें, तेंच शरीर भक्तिप्रेमसुखाचा आस्वाद घेतील असा यत्न करा असा त्यांनीं कळकळीनें उपदेश केला आहे.

**नको सांडू अन्न नको सेवू वन । चिंती नारायण सर्व भोगीं ।।**
**मातेचिया खांदीं बाळ नेणे सीण । भावना त्या भिन्न मुंडाविया ।।**
**नको गुंफूं भोगीं नको पडो त्यागीं । लावुनी सरे अंगीं देवाचिया ।**
**तुका म्हणे नको पुसों वेळोवेळा । उपदेश वेगळा उरला नाहीं ।।**

जीवित हें शरीराचे द्वारा सतत व्यक्त होत असतें.

या शरिराविषयी परस्पर विरोधी बोधाचे श्रीतुकोबारायांनीं एके ठिकाणीं सुंदर वर्णन केलें आहेः–

**शरीर दुःखाचें कोठार । शरीर रोगाचें भांडार ।**
**शरीर दुर्गंधीची थार । नाहीं अपवित्र शरीरा ऐसे ।।१।।**
**शरीर उत्तम चांगलें । शरीर सुखाचें घोसुलें ।**
**शरीरें साध्य होय केलें । शरीरें साधलें परब्रम्ह ।।२।।**
**शरीर विटाळाचें आळें । माया मोहपाश जाळें ।**
**पतन शरीराच्या द्वारें । शरीर काळें व्यापिलें ।।३।।**
**शरीर सकळही शुद्ध । शरीर निधीचाही निध ।**
**शरीरें तुटे भवबंध । वसे मध्यें भोगी देव शरीरा ।।४।।**
**शरीर अविद्येचा बांधा । शरीर अवगुणाचा रांधा ।**
**शरीरीं वसे बहुत बाधा । नाहीं गुण सुधा एक शरीरीं ।।५।।**

अशा रीतीनें ज्या दृष्टीनें शरीराकडे पहावे तसें तें दिसेल. या करितां काय करावें तरः–

**शरीरा सुख नेदावा भोग । न द्यावें दुःख न करी त्याग ।**
**नव्हे वोखटें ना चांग । तुका म्हणे वेग करी हरिभजनीं ।।६।।**

जिवंतपणाचें मूल्य इतर कशावरून ही मापता यावयाचें नाहीं. त्याची किंमत स्वयंभू ( Intrinsic Value ) आहे. निरभ्र आकाशांत उदय पावलेला चंद्रमा सकल सृष्टीवर सारखाच प्रकाशमान होत असतो. राजवाड्यावर पडणारे शीतळ चांदणें गरीबाच्या झोपडीवरही पडून आनंदाची सृष्टि निर्माण करतें; त्याप्रमाणें जीवनकला ही सर्वांचे ठायीं सारखीच प्रकाशित होत असते. बाह्य परिस्थितीवरून न मोजतां जीवनकलेच्या दृष्टीनें पाहिलें

तर प्रत्येक मनुष्यप्राणी हा भाग्यशाली आहे असें आढळून येईल. मात्र त्या भाग्याचा बोध त्याचे ठिकाणीं नसल्यामुळें तें भाग्य त्याला अनुभवितां येत नाहीं. आयुष्यांतील ही बोधाची रसिकता, सौंदर्य आणि ऐश्वर्य भोगण्याचा मार्ग सर्वांना मोकळा आहे. भगवंताचें प्रेमाचें ऐश्वर्य मानवी जीवनकलेच्या द्वारें प्रतीत होत असतें. सुमनाचा सुवास त्यास स्वतःस येत नाहीं तर भ्रमरास येतो. त्याप्रमाणें प्रभूचें प्रेम त्यास स्वतःस चाखतां येत नाहीं. त्याची गोडी चाखणारा जीवच होय.

**कमोदिनी काय जाणे तो परिमळ । भ्रमर सकळ भोगीतसे ।।**
**तैसे तुज ठावें नाहीं तुझें नाम । आम्हींच तें प्रेमसुख जाणों ।।**
**माते तृण बाळा दुग्धाची ते गोडी । ज्याची नये जोडी त्यासी कामा ।।**
(श्रीतुकाराम म.)

या प्रेमसुखाची रुचि चाखणारे भक्त अगर संत होत. त्यांचें ठिकाणीं जीविताच्या स्वरूपाविषयीं बोध पूर्णपणें उमटलेला असतो.

जीवनाचें यथार्थ ज्ञान होऊन भागणार नाहीं, तर तें बोधरूप बनलें पाहिजे. नुसती समजूत असून उपयोगी नाहीं, तर समजूत आणि हृदय एकजीव झालें पाहिजे. बोध हाच सुखाचा झरा होय. भगवंताच्या प्रेमस्वरूपाच्या बोधानें आपल्या जीवितांत प्रेमाचे अनिवार लोट वाहूं लागतील. सर्व इंद्रियांमधून, सर्व नसानसांतून प्रीतीचे कल्लोळ उचंबळतील व पावलें त्या तालावर नाचूं लागतील.

**परम अमृतें रसना वोलावली । मनाची राहिली वृत्ति पायीं ।।**
**सकळ इंद्रियें झालीं ब्रम्हरूप । वोतिलें स्वरूप तयामाजीं ।।**

असें या अवस्थेचें संतांनीं वर्णन केलें आहे.

यथार्थ बोध ही जीवनाची कधी न सरणारी संपत्ति आहे. ती जितकी लुटावी तितकी वाढणारी आहे. कांहीं झरे असे असतात कीं, त्यांतून जितकें पाणी उपसावें तितकें जोरानें आंतून पाणी उसळून येत असतें. कोण्याही वेळेस तहान लागो तेथें पाणी हजर असतेंच. त्याप्रमाणें मानवी जीवित हा एक झराच आहे. जितका जितका प्रेमानंद लुटावा तितका तितका जास्त

तो झरा उचंवळून येईल. केवळ आपल्या ठिकाणच्या विपरीत बोधानें आपणास हें सुख मनमुराद अनुभवितां येत नाहीं. सुख बाहेर नसून आपल्यांतच त्याचा विशुद्ध झरा आहे, याची ओळख पटली कीं, अनुभव त्याक्षणींच हजर आहे, " आठवची पुरे । सुख आघवे मोहरे " ( श्रीतु. म. )

योग्य बोधानें मनाची धांवपळ थांबेल. ज्याची गोडी वाटेल तिकडे जाणें हा मनाचा स्वभाव आहे. बोध म्हणजे रुचियुक्त ज्ञान होय. बोधानें मनाची रुची पालटेल व शत्रूसारखे वाटणारें मनच आपला जिवलग सखा होईल. " मन करारे प्रसन्न । सर्व सिद्धीचें कारण । मोक्ष अथवा बंधन । सुख समाधान इच्छा ते ।।....मन माउली सकळांची ।।" (तु. म.) " साधु बोध झाला तुरोनिया ठेला. । ठायींच मुराला अनुभव " ( श्रीज्ञा. म. ) या संतवचनाप्रमाणें मन हे त्या प्रियबोधांत मुरून प्रत्येक कल्पना, वासना अगर संकल्प त्या आवडींतूनच उमटेल. काम, क्रोध, लोभादि, षड्रिपु न होतां सहा सोबती होतील, आणि–

**जे अहंकार वाहत आंगीं । आम्ही हरीचे भूषावया लागी ।**
**जे लोभिये एकचि जगीं । माझेनि लोभें ।।ज्ञा. ९–३६२।।**
**जे माझेनि कामें सकाम । जे माझेनि प्रेमें सप्रेम**
**जे माझिया भूली संभ्रम । नेणती लोक ।।६३।।**

अशा स्थितीचा प्रत्यय येईल.

तेव्हां मानवी जीवनांत बोधाचें अत्यंत महत्व आहे, किंबहुना बोधावरुन व्यक्तीचें मूल्य ठरवितां येतें. याकरितां आपला बोध प्रत्येकानें तपासून पाहिला पाहिजे. व योग्य बोधाचा उमट होईल असा उपाय योजिला पाहिजे. तरच मनुष्य जन्मासारखी सुवर्णसंधि आपणांस प्राप्त झाली आहे तिचा पुरेपूर लाभ घेतां येईल; आणि जीवित सुखमय करितां येईल.

## भगवत्प्रीतीचा नटनाच

**तरी कीर्तनाचेंनि नटनाचें । नाशिले व्यवसाय प्रायश्चित्ताचे ।।**

—श्रीज्ञानदेव

**मातले वैष्णव नटती नाना छंदें ।।**

—श्रीतुकोबाराय.

२०८०९ वि. निबंध
क्रमांक १०२३ नों. दि.



गांवाबाहेर रस्त्यालगत एक सुंदर बंगला होता. त्या बंगल्याचा मालक श्रीमंत त्याचप्रमाणें हौशी होता. त्यानें बंगल्याच्या चारी बाजूंस सुंदर बगीचा करून त्यांत निशिगंध, रातराणी, चमेली यांसारख्या सुगंधी पुष्प-लतांची लावणी केली होती. वाऱ्याच्या झुळका वाहूं लागल्याबरोबर त्या पुष्पांचा परिमल आसमंतात् पसरून दाही दिशा दरवळून टाकीत असत. असें सांगतात कीं, एकदा त्या मार्गानें एक कोळयाची बाई गांवांत मासे विकून आपली रिकामी टोपली डोईवर घेऊन चालली होती. रात्र पडल्या-मुळें आणि दिवसभर श्रमल्यामुळें ती कोठेंतरी विसांव्याचें ठिकाण पहात होती. तिला बंगला दिसतांच बाहेरील भींतीलगतच्या निवाऱ्याच्या जागेचा तिनें आसरा केला व जमिनीवर अंग टाकलें. तिच्या डोळयांवर झापड येऊन आतां आपण केव्हां झोपूं असें तिला झालें होतें. पण चमत्कार असा कीं, जमिनीवर अंग टाकताच तिची झोंप पार उडून गेली व कांहीं केल्या तिला चैन पडेना. अखेर 'कसला चमत्कारिक वास !' म्हणून तिनें आपली माशाची टोपली तोंडावर झाकून घेतली. आणि क्षणार्धांत ती निद्रावश झाली. सुगंधी फुलांच्या सुवासापेक्षां कुजलेल्या माशाचा वास तिला प्रिय वाटला. याचें कारण तिच्या ठिकाणीं सुगंधाच्या रुचीचा अथवा बोधाचा अभाव हें होय.

ही गोष्ट ऐकल्यावर आपण त्या बाईस नांवें ठेवूं. परंतु याच स्थितीचें प्रत्यंतर आपणांस प्रत्यक्ष पहावयास मिळतें; तिकडे मात्र आपलें लक्ष वेधलें जात नाहीं. प्रभूच्या बगीच्यामधील अनंत पुष्पांचा सुगंध घेण्याची रुचि आपणांस नसते त्यामुळे त्या सुवासाचें सुख अनुभविण्याचें सोडून आपण आपल्या आवडीच्या निरनिराळया टोपल्या नाकाशीं धरुन त्यांतच रमत असतों. आपल्या आवडीचा विषय निघाला कीं त्यावर तासचे तास जातील. उदा. आपणांस सर्पाविषयीं कौतुक वाटलें कीं त्याविषयीं माहिती सांगणारा भेटला म्हणजे सहज वेळ निघून जातो. एकदां प्रवासांत असतां मजजवळ दोघे गृहस्थ बसले होते. एकजण दुसऱ्यास सर्पाचें विष उतरविणाऱ्या मांत्रि-काच्या गोष्टी व अनुभव सांगत होता. बाकीचे लोकही त्याचें बोलणें लक्ष लावून ऐकत होते. त्याचें बोलणें संपल्यावर दुसऱ्यानें त्याहीपेक्षां अद्भूत

गोष्टी सांगण्यास सुरवात केली व जिकडे तिकडे आगगाडीच्या त्या धांवत्या घरकुलांत तोच विषय सुरु झाला. असले विषय चटकन् अंतःकरण आकर्षण करतील पण भगवत्प्रीतीनें भरलेली प्रेमळांची वचनें मात्र आपणांस आवडत नाहींत. याचें कारण प्रेम–बोधाचा अभाव होय. ज्याक्षणीं भगवत्प्रेमाचा उदय आपल्या हृदयांत होईल. त्याक्षणीं आपणांस प्रेमळांचीं वचनें आपल्या जीवास तहानेलेल्यास ज्याप्रमाणें पाणी गोड वाटतें त्याप्रमाणें आवडूं लागतील आणि आपलीं हृदयें त्या तालावर नाचूं लागतील.

हा भगवत्प्रेमाचा नटनाच ज्याचे हृदयांत चाललेला असतो तो सहज कीर्तनरूपानें बाहेर पडतो. म्हणून श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं मोठ्या कौतुकानें कीर्तनास "नटनाच" अशी संज्ञा दिली आहे.

**तरी कीर्तनाचेंनि नटनाचें । नाशिले व्यवसाय प्रायश्चित्तांचे ॥**
**जें नामचि नाहीं पापाचें । ऐसें केलें ॥ज्ञा. ९–११७॥**

"तुका म्हणे बाळ मातेपुढें नाचे ॥" या वचनाप्रमाणें भगद्भक्त देवापुढें नटून थटून नाचतात. तो नाचच वाणींतून शब्दरूपानें बाहेर पडतो. तो अमृतमय शब्दाचा ओघ म्हणजेच कीर्तन होय. (तुका म्हणे वाणी । प्रेम अमृताची खाणी ॥) कीर्तन ऐकण्यानें श्रोत्यांच्या हृदयांत प्रेमाचे दीप प्रकाशित होऊन "जे ज्ञानासी न चोजवे । ध्यानासीही जे नागवे । ते अगोचर फावे । गोठीमाजीं ॥" (ज्ञा. १५–१६) या उक्तीप्रमाणें ज्ञानानें अगर ध्यानानेंही साध्य न होणारें भक्तिप्रेमसुख अनायासें लाभतें. म्हणून कीर्तनानें होणाऱ्या परिणामाचें श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं वर्णन केलें आहे:–

**यमदमा अवकळा आणिली । तीर्थें ठायावरूनि उठविली ।**
**यमलोकीची खुंटली । राहाटी आघवी ॥**
**यम म्हणे काय यमावें । दम म्हणे कवणातें दमावें ।**
**तीर्थें म्हणती काय खावें । दोष औषधासी नाही ॥**
**ऐसे माझेनि नामघोषें । नाहींची करिती विश्वाचीं दुःखें ।**
**अवघें जगचि महासुखें । दुमदुमित भरलें ॥**

ते पाहांटेवीण पाहावीत । अमृतेंवीण जीववित ।
योगेविण दावीत । कैवल्य डोळां ।।
परी राया रंका पाड धरूं । नेणती सानेया थोरा कडसणी करूं ।
एकसरें आनंदाचें आवारू । होत जगा ।।

(पाड = परवा. कडसणी = विचार. आवारू = स्थान.)

कीर्तन हें घडीभर मौज व मनरंजन करून कालक्षेपाकरितां नसून प्रभूच्या प्रेममय सगुण दर्शनास्तव आहे. निर्गुण निराकार ज्ञान, कीर्तनानें प्रेमाच्या जिव्हाळ्याचे सगुणत्व पावून शब्दरूपानें प्रगट होतें म्हणून हरिकथेस देव, भक्त आणि नाम यांचा संगम म्हटलें आहे. "कथा त्रिवेणी संगम । देव भक्त आणि नाम ।।" सगुण प्रेममूर्ती प्रभू, त्या प्रेमाची प्रतीती घेणारा भक्त आणि त्या दोघांच्या भेटीचा जिव्हाळा तें नाम होय. कीर्तनानें आपलेंच ज्ञान आपणास नाना कल्पना, विकार, कामक्रोधादिकांच्या रूपानें न भेटतां प्रेमरूपानें भेटतें. हें प्रभूचें सगुण दर्शन होय. प्रभू आपलें विविध विलासाचें विश्वरूप टाकून केवळ प्रेमरूपांतच भेटतो; व तसा तो भेटला तरच जीवाचें समाधान होतें. लेंकरास आईचे नाक, कान, डोळे, अलंकार दिसून भागावयाचें नाहीं. आपली आई जरीचें पातळ ल्याली आहे का फाटकें वस्त्र नेसली आहे, तिचा रंग गोरा आहे का सांवळा आहे, तिचें नाक राघूच्या चोंचीसारखें आहे कां नकटें आहे, ती स्थूल आहे का कृश आहे, ती अडखळत बोलते का स्पष्ट बोलते या गोष्टी-कडे त्या लेंकराची दृष्टी नसते. तें फक्त एका दुधाच्या गोडीच्या नजरेनें आईकडे पहात असतें. आईच्या स्तनास बिलगुन प्रेमपान्हा पिण्यानेंच त्याला समाधान वाटतें. उलट आईची दृष्टीही आपल्या लेंकराच्या गुणावगुणाकडे नसून त्याच्या अजाण प्रीतीवर असते. त्याप्रमाणें प्रभूस भक्ताकडे पहातांना वात्सल्य दाटून येतें आणि तें वात्सल्य प्याल्यानेंच जीवाची मुखतृष्णा शांत होते.

**कीर्तन म्हणजे प्रभू-वात्सल्याचें पानच होय.**
**" अवीट हें क्षीर हरिकथा माउली । सेवितां सेविली वैष्णवजनीं ।।"**
श्रीतुकाराममहाराज.

हें अमृतपान करण्यास सर्वांस मोकळीक आहे. त्यास कोणत्याही देश-कालाची आडकाठी नाहीं. सर्वांनीं कीर्तनें करावींत. कोणी म्हणेल आम्हांस बोलतां येत नाहीं. पण अंतःकरणांत जिव्हाळा असल्यावर बोल आपेआप येतील. बोबडे बोल आईला अधिक प्रिय वाटतात. देवाला आपले चुकलेले बोलच अधिक गोड वाटतील. म्हणून कीर्तनास कोणी लाजूं नये. माहेरीं असतांना मुलींना लाजण्याचें काय कारण? (माहेरीं सलज्ज ते जाणा शिंदळी ।।) प्रत्येकानें नटून नाचून कीर्तन करावें असें संतांचें मनोगत आहे. कीर्तनानें ज्ञानाचें रुक्षत्व जाऊन हृदयांत प्रेमाचें मार्दव येईल. हे मार्दव

**मऊ मेणाहूनि आम्ही विष्णुदास ।**
**कठीण वज्रास भेदूं ऐसे ।।**

या जातीचें असतें. कीर्तन ही उघड समाधि असून ती सर्वांना सुलभ आहे.

**उघड समाधि हरीकथा सोहळा ।**
**नरनारीबाळां लहान थोरां ।।**

कीर्तनाची मर्यादा श्रीनाथबाबांनीं घालून दिली आहे–

**सगुण चरित्रें परम पवित्रें सादर वर्णावीं ।**
**निराभिमानें सज्जनवृंदें आदीं वंदावीं ।।**
**संतसंगें अंतरंगें नाम बोलावे ।**
**कीर्तनरंगीं देवासंगें सुखें डोलावे ।।**
**जेणें सत्वर मूर्ती ठसावे अंतरिं श्रीहरिची ।**
**ऐसी कीर्तनमर्यादा हे संतांचे घरची ।।**

श्रीतुकोबाराय म्हणतात:–

**कथा काळींची मर्यादा । सांगतो तें भावें वंदा ।**
**प्रीतीनें गोविंदा । हेंचि एक आवडे ।।**
**टाळ वाद्य नृत्य गीत । अंतःकरणें प्रेमभरित ।।**
**वाणिता तो कीर्त । तद्भावनें लेखावा ।।**

या मर्यादेला अनुसरून कीर्तनांत संतांचीं चरित्रें गावींत. टाळ, वीणा, मृदंग यांचा झणत्कार म्हणजे अंतरींच्या प्रेमाचाच सगुण झणत्कार होय. त्या झणत्काराचे नादावर श्रीविठ्ठलाचे व श्रीज्ञानोबाराय तुकोबारायादि संतांचीं नामें गात गात, संतवचनाच्या आधारें पावलें टाकीत टाकीत कीर्तनाचा मार्ग आक्रमण करावा. प्रेमळांचीं कीर्तनें ऐकण्याची संधि वाया जाऊं देऊं नये. त्यांत आपणांस न कळतां आपला कार्यभाग सहज होत असतो. ऐकेल तसे बनणें हा जीवाचा सहजस्वभाव आहे. म्हणून सत्संगति आणि सत्कथाश्रवण जीवाच्या हृदयांत प्रेमबोधाचा उदय करणाऱ्या आहेत. कीर्तन करणें आणि ऐकणें या दोन्ही गोष्टींनीं आपल्या हृदयास प्रभूचा आधार वाटेल आणि संतांच्या जीवनाशीं आपलें जीवन समरस होईल.

## श्रीहरीची सांठवण

**सांठविला हरी । जिहीं हृदयमंदिरीं ॥**
**त्यांची सरली येरझार । झाला सफळ व्यापार ॥**
**हरी आला हातां । मग कैंची भय चिंता ॥**
**तुका म्हणे हरी । कांहीं उरों नेदी उरी ॥**

—श्रीतुकाराममहाराज.

श्रीहरीचें स्वरूप अनंत आणि अपार आहे. तें जाणणें हें मानवी आटोक्याबाहेर आहे. जों जों जाणावें तों तों अज्ञेयाची मर्यादा विस्तार पावते. भगवंताची प्रार्थना केल्यावरून अर्जुनाला विश्वरूपाचें दर्शन झालें. तेव्हां सृष्टी ही प्रचंड वृक्षापुढें इवलेसें तृणांकुर त्याप्रमाणें अगर खिडकींतून पडलेल्या उन्हाच्या कवडशांत जसे परमाणु त्याप्रमाणें त्याला दिसली.

**इया मूर्तीचिया किरीटीं । रोम मूळीं देखें पां सृष्टी ।**
**सुरतरु तळवटीं । तृणांकुर तैसे ॥ज्ञा. ११–१४८॥**
**वातायनाचेनि प्रभासे । उडत परमाणु दिसती जैसे ।**
**भ्रमत ब्रम्हकटाह तैसे । अवयव संधी ॥**

विश्वरूपाच्या अनंतत्वाबरोबरच प्रभूचीं कितीतरी निरनिराळीं विचित्र रूपेंही त्याला दिसलीं. कुठें स्नेहाळ तर कुठें भयानक, कुठें स्थूल

तर कुठें सूक्ष्म, कुठें रुद्र तर कुठें सौम्य अशा कितीतरी प्रकारच्या रूपांनीं प्रभु नटला.

**एके कृशे एके स्थूळे । एके ऱ्हस्वे एके विशाळे ।**
**पृथुतरे सरळे । अप्रांते एके ॥ज्ञा. ११–१२४॥**
**एके अनावरे प्रांजळे । सव्यापारे एके निश्चळे ।**
**उदासीने स्नेहाळे । तींव्रे एके ॥१२५॥**
**एके जननलीलाविलासे । एके पालनशीले लालसे ।**
**एके संहारके सावेशे । साक्षीभूत एके ॥१३०॥**
**एके अतिलावण्य साकारे । एके स्निग्धवपु मनोहरे ।**
**शृंगार श्रियेचीं भांडारें । उघडली जैसी ॥१३८॥**
**एके पीनावयव मांसाळे । एके शुष्के अतिविक्राळे ।**
**एके दीर्घकंठे विसाळे । विकटे एके ॥१३९॥**

एवढा व्यापक प्रभु पण त्याला भक्तांनीं मात्र हृदयांत सांठविलें. बुद्धीच्या जाणण्यापलीकडे असणाऱ्यास अंतःकरणाची गवसणी घातली (जयांचें चित्त गवसणी । व्यापका मज ॥ज्ञा.)

**एवढा प्रभू व्हावें । तेणें संपुष्टी रहावें ॥**
**सांठविला राहे हृदयसंपुटी ।**
**बाहेर धाकुटी मूर्ती उभा ॥**

(श्री. तु. म.)

"खालता सप्तही पाताळा । वरता स्वर्गाहुनी ढिसाळा ॥" अशा व्यापक प्रभूस भक्तांनीं आपल्या हृदयमंदिरांत सांठवून जन्माचें सार्थक केलें. तो कसा सांठविला? केवळ प्रेमानें.

भ्रमराच्या अंगांत वाटेल तशी कठीण लाकडें कोरण्याची शक्ति असते; परंतु तो जर कमलकोशांत सांपडला तर आपला प्राण देईल पण त्या कमळाच्या पाकळ्या छेदून बाहेर पडण्याची इच्छा करणार नाहीं. पाकळ्यांचा उच्छेद म्हणजे स्नेहाचा उच्छेद होय. तो त्याच्या हातून कदापि घडणार नाहीं. प्रेमापुढें त्याची शक्ति पांगुळते. पाकळ्याच्या म्हणजे प्रेमाच्याच गवसणींत तो सुखानें रहातो.

जैसे भ्रमर भेदी कोडें । भलतैसें काष्ट कोरडें ।
परी कळिकेमांजी सांपडे । कोवळिये ।।ज्ञा. १–२०१।।
तेथ उत्तीर्ण होईल प्राणें । परि ते कमळदळ चिरूं नेणे ।
तैसे कठिण कोवळेपणे । स्नेह देखा ।।२०२।।

त्याप्रमाणेंच सर्वसत्ताधीश प्रभु असला तरी त्यास प्रेमानें हांक मारतांच आपली सत्ता विसरतो आणि भक्ताचा अंकित होतो. लहान मूल बापाचा ओचा धरून त्यास थांबवितें. याचा अर्थ बाप दुबळा असतो असा नव्हे. अगर मुलाच्या अंगांत त्याच्याहून अधिक शक्ति असते असें नव्हे तर पुत्रस्नेहच त्याला थांबवितो. मुलाचे ठिकाणीं हा माझा पिता आहे अशी जो खात्री असते त्या खात्रीनेंच त्याला गवसणी घातलेली असते. त्याप्रमाणें भक्तानें हा प्रभु माझा आहे असा जो बोधाचा निश्चय त्या योगानें प्रभु हृदयांत सांठविला जातो.

म्हणून इतर सर्व साधनें प्रभूला हृदयमंदिरांत सांठविण्याचे कामीं निरुपयोगीं आहेत.

मज वश करावयालागी । सामर्थ्य नाहीं अष्टांगयोगीं । नित्यानित्य विवेक जगीं । आंगोवांगी मज न पवे ।।२४।। प्रकृति–पुरुष विवंचना । अखंड आलोडितां मना । पावावया माझिया स्थाना । सामर्थ्य जाणा त्या नाहीं ।।२५।। धर्म अहिंसादिसहित सत्य । त्याचेनि मी नव्हें प्राप्त । मुख्य वेदाध्ययनेंही मी अप्राप्त । साङ्ग समस्त जरी पढिले ।।२६।। देह गेह सांडूनि उदास । विरजा होमी हवी सर्वस्व । साधनीं अति श्रेष्ठ संन्यास । त्यासी मी परेश नातुडे ।।२८।। गोदान भूदान तिलदान । दान देतां धन धान्य । त्यांसी मी नाटोपे जाण । दानाभिमान न वचतां ।।३०।। संकटचतुर्थी ऋषिपंचमी । विष्णुपंचक बुधाष्टमी । अनेक व्रतें करितां नेमी । ते मी कर्मी नातुडे ।।३१।। हो कां वापी कूप आराम । वृक्ष रोपणें मनविश्राम । आचरतां स्मार्तकर्म । मी आत्माराम न भेटे ।।३३।। नाना छंद रहस्य मंत्र । विधिविधानें अति विचित्र । सामर्थ्य अतिविशेष पवित्र । नव्हती स्वतंत्र मत्प्राप्ति ।।३५।।

(एकनाथी भागवत अ. १२)

श्रीहरी हातास येण्यास वरील कोणतींही साधनें सहाय्य करीत नाहींत; कारण जो जो साधनें करावीत तो तो जीवाचें ठिकाणीं अहंकार वाढून तो प्रभूपासून दूर दूर जातो. जो जो उपाय करावा तो तो अपायच होऊन मायबाळाची भेट होण्याऐवजीं ताटातूट होते.

**कैसेनी दैवत प्रसन्न त्वरित ।**
**उगा राहे निवांत शिणसी वाया ।।**

(श्रीज्ञानदेव)

प्रभू प्रेमानेंच हातीं येतो आणि प्रेमानेंच हृदयांत सांठविला जातो. ही गोष्ट खरी, पण हें प्रेम आणावयाचें कुठून? असा प्रश्न सहज पुढें उभा रहातो. ज्याप्रमाणें एकाद्या बाजारांत जाऊन आपणांस जिन्नस चट्दिशी आणतां येतो त्याप्रमाणें जेथून प्रेम आणतां येईल असें स्थान एकादें आहे कीं काय? तसेंच जवळचा पैसा दिला म्हणजे वाणी आपणांस त्या पैशाचा मोबदला म्हणून गूळ देतो त्याप्रमाणें आम्हीं प्रेम द्यावयाचें व प्रभूनें प्रसन्न व्हावयाचे अशी वणिज्यवृत्ति प्रभूच्या ठिकाणीं आहे काय?

वास्तविक प्रभूच प्रेमस्वरुप आहे. प्रभूवर प्रेम करावें ही भाषाच चुकीची असून प्रभूचें प्रेम ओळखावें ही भाषा योग्य होय. ही ओळख म्हणजेच भक्ति. आई ही मुलाचें सर्व करीत असते, त्याला नवमास उदरांत वहाते, जन्मल्यावर वेळच्या वेळेस पाजते, त्याचे मलमूत्र धुते, सतत त्याच्या आरोग्याची चिंता करते, त्याचें कल्याण व्हावें आणि तो सुखी व्हावा म्हणून आपला जीव जाळते; किंबहुना तिचें जगणें त्याच्यास्तवच असतें. हें त्या मुलानें ओळखणें हीच त्याची भक्ति. एरवीं कर्मरूपानें तो उपकार फेडूं म्हणेल तर शक्य नाहीं. आईच्या प्रत्येक कर्मांत पुत्रप्रेमाच्या खुणा दिसणें हीच मुलांची भक्ति. त्याचप्रमाणें प्रभूच्या ठिकाणचा जिव्हाळा ओळखणें ही भक्ति होय.

कर्मरूपानें व्यक्त होणें हा प्रेमाचा स्वभावच होय. मुलास वेळच्या वेळेस खाऊं-पिऊं घालणें; कपडे अलंकार लेवविणें इत्यादि क्रिया आईचें प्रेम दाखवितात त्याप्रमाणें जीवाचें ठिकाणीं होत असलेल्या सर्व क्रिया,–कर्मेंद्रियाचें व ज्ञानेंद्रियाचें, बोलणें, चालणें, ऐकणें, किंबहुना जगणें,–या सर्व प्रभूचें प्रेम व्यक्त करतात.

**चालें हें शरीर कोणाचिये सत्तें । कवण बोलवितें हरीविण ॥**
**देखवी ऐकवी एक नारायण । तयाचें भजन चुकों नका ॥**

शरीरांतील प्रत्येक नाडयानाडयांतून आणि श्वासोश्वासांतून त्या प्रेममयाचा प्रीतिकल्लोळच वहात आहे. एका सुफीसाधूनें म्हटलें आहे कीं, माझ्या अंगांत रक्त वहात आहे म्हणजे प्रियतम प्रभू मला सतत आपल्या प्रेमजलानें न्हाऊं घालीत आहे.

वास्तविक या प्रेमाचें वर्णन करण्यास जगांतील सर्व स्नेहाळ नातीं अपुरीं पडतात. आईची उपमा दिली तरी आईचें दूध लेकरू जसजसें जाणते होईल तसतसें आटावयास लागेल परंतु प्रभूचें प्रेमरूपी दुग्ध कधींही न आटणारे आहे. आई जाग्रतावस्थेंत सांभाळील परंतु प्रभु सर्व अवस्थेंत संभाळतो. आपण झोंपीं गेलों असतां आपली विद्या, आपलें शहाणपण, आपल्या जिवलगाची आवड कोण संभाळतो? समजा, आपण सकाळीं जागें होण्याच्या अगोदर सर्व विसरलों तर केवढा अनर्थ होईल. आपणांस आपले पिता, माता, बंधु, मुलें बायको, स्नेही कोणी ओळखतां यावयाचें नाहींत आणि वेडयासारखी अवस्था होईल.

शरीरांतील प्रत्येक क्रियेंत त्या प्रभूच्या प्रेमखुणाच व्यक्त होत आहेत.

**जिव्हा जाणे फिके मधुर कीं क्षार । येर मांस पर हाता न कळे ॥**
**देखावें नेत्री बोलावें मुखें । चित्तां सुखदुःखें कळों येतों ॥**
**परिमळासी घ्राण ऐकती श्रवण । एकाचें कारण एका नये ॥**
**एका देहीं भिन्न दावियल्या कळा । नाचवी पुतळा सूत्रधारी ॥**
**तुका म्हणे ऐशी जयाची सत्ता । कां तया अनंता विसरलेती ॥**

(–श्रीतुकाराम म.)

प्रभूच्या या प्रेमकळा ओळखणें हीच भक्ती. या ओळखण्यासच स्मरण म्हटलें आहे. या स्मरणाचा सहज उद्‌गार, स्फोट म्हणजे नाम होय (प्रेमाचा जिव्हाळा नाम मुखाशी आलें । ज्ञा. म.) या ओळखीनें आपल्या हृदयांत प्रेमाचा जीवंत झरा वाहूं लागेल, सर्व चिंता आणि भय नाहींशी होतील आणि जीवनाची सांगता होईल. हीच श्रीहरीची सांठवण होय. या सांठवणीनें

**तूं बोलसी माझ्या मुखें । मी तों तुजमाजीं सुखें ।।**

या वचनाप्रमाणें जीव सुखाचें शेजारीं पहुडेल.

या बोधानें तुकोबा म्हणतात–" तुझें वर्म हातीं । दिले सांगोनीया-संतीं ।। नाम धरीन कंठीं । अवघा सांठवीन पोटीं ।।"

**अनाथा जीवन । आम्हा तुमचे चरण ।**
**करुनि सांठवण । धरियेलें हृदयीं ।।**
**पुष्ट झाली अंगकांती । आनंद न समाये चित्तीं ।**
**कवतुके प्रीति । गाऊ नाचो उल्हासें ।।**
**करुणा उत्तरीं । करू आळवण हरी ।**
**जाऊं नेदू दुरी । प्रेमप्रीतिपडिभरे ।।**

# साहित्य व जीवन

माझा मऱ्हाटाचि बोल कौतुकें । परी अमृतातेंही पैजा जिंके ।
ऐशीं अक्षरें रसिकें । मेळवीन ॥–ज्ञानदेवी अ. ६।१४
जिये कोवळिकेचेनि पाडें । दिसती नादीचे रंग थोडे ।
वेधें परिमळाचें बीक मोडे । जयाचेनि ॥१५
ऐका रसाळपणाचिया लोभा । कीं श्रवणींचि होती जिभा ।
बोले इंद्रिया लागे कळंभा । एकमेका ॥१६
नवल बोलतिये रेखेची वाहणी । देखतां डोळां पुरी लागे धणी ।
ते म्हणती उघडली खाणी । रूपाची हे ॥१८
बोलीं अरूपाचें रूप दावीन । अतींद्रिय परी भोगवीन,
इंद्रियाकरवी ॥३६

नव्हती हीं माझी जायाचीं भूषणें । असें नारायणें उचित केलें ।
शब्दाच्या ओवणी रत्नांचिया माळा । मुळीचा जिव्हाळा झरवणी ॥
श्रीतुकाराम म. गा. अ. ३६५१

साहित्याच्या व्याख्या निरनिराळ्या लेखकांनीं निरनिराळ्या केलेल्या आहेत. परंतु वरील अवतरणांत वर्णिल्याइतकी गोड आणि यथार्थ व्याख्या आपणास आढळणार नाहीं. रसिक अक्षरें या बोलत्या रेघाच होत. तें बोलणें इतकें गोड असते कीं सुस्वर गायन आणि मधुर सुगंधाहूनही तें कोमल वाटतें. त्यांतील रस चाखण्यास कान उतावीळ होऊन त्यांना जणूं काय जिव्हा फुटतात. डोळ्यांना सुंदर दृश्य पाहूनही तृप्ति होत नाहीं ती या अक्षरांच्या नुसत्या पहाण्यानें होते. इंद्रियें जणूं काय एकमेकांचा मत्सर करतात. कारण इंद्रियांना अतींद्रियाचा भोग होतो. अरूपाचें रूप दिसतें

असें श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं वर्णन केलें आहे. श्रीतुकाराममहाराज यांनीं म्हटलें आहे कीं शब्द या रत्नांच्या माळाच असून हीं परमात्म्यानें घातलेलीं, कधींही न लोपणारीं भूषणें होत. नुसतीं भूषणेंच नव्हत तर मुळांतील जिव्हाळयाचा पाझरच होत. वरील दोघांही लेखकांचे लिखाण जगतीतला-वर जें आजवर उत्कृष्ट वाङमय निर्माण झालें आहे, त्यांत वरिष्ठ योग्यतेचें असल्यामुळें त्यांनीं वर्णिलेलें स्वरूप अत्यंत महत्वाचें आहे. ज्या हृदयांतून त्यांचे गोड सारस्वत बाहेर पडलें त्याच हृदयाचें त्यांनीं स्वमुखांनीं वर्णन केलें आहे. यांतच या महत्वाचें बीज आहे. वरील वर्णनावरून आपणास कितीतरी गोष्टींचा उकल होण्याजोगा आहे. प्रचलित चालू असणाऱ्या साहित्यांतील वादांचीं कोडीं उलगडणारीं आहेत. त्यायोगें करून आपणास उत्कृष्ट साहित्याचा रस सेवन करितां येईल. आपल्या जीवनास अधिक रमणीयता आणि सौंदर्य आणतां येईल. साहित्यांतील अक्षरांच्या रूपानें प्रेमळ जिवलगांची भेट होईल आणि आपल्या जीवनसरितेस सौंदर्याबरोबर सत्याचा आणि मांगल्याचा लाभ होईल.

उत्कृष्ट साहित्य हें देशकालातीत असते. देश पालटला, काल पाल-टला तरी आईचें प्रेम पालटत नाहीं. इंग्रजी माता असो वा हिंदी माता असो तिच्या हृदयांतील वत्सलता एकच असते. दोघीही आपल्या मुलाकडे पाहून पाझरतील. या पाझरास जन्मभूमी अगर शतकें आड यावयाचीं नाहींत. मानवी हृदयाचे स्पंद हें जेथें जेथें मानवी जीवन आहे तेथें एकच असावयाचे. यामुळें यामा कादंबरीसारख्या रशियन लेखकानें लिहिलेल्या कलाकृतींतील करुण प्रसंग वाचून आपणास हुंदके आवरत नाहींत. उलट रवींद्र, प्रेमचंदांच्या लघुकथा पाश्चात्यांनाही हृदयस्पर्शी वाटतात. वरवर दिसणाऱ्या रंगरूपाच्या आंत एकच जीवनौघ लपलेला असतो. त्यावर ज्यांची दृष्टि जाते, त्याचें रमणीय स्वरूप ज्यांना दिसते, त्यांची कृतीच अजरामर आणि सर्वांना सर्वकाळीं सर्व स्थितींत आवडूं शकते. हाच इंद्रियांना अतींद्रिय भोग आणि मुळांतील जिव्हाळयाची झरवणी होय.

अतींद्रिय म्हणजे इंद्रियाआड लपलेल्या मानवी जिव्हाळयाचें सौंदर्य व्यक्त करण्यासाठीं ललितकलांचा जन्म झाला. चित्रकार आपल्या

कलमाच्या रेषाकृतींनीं व वर्ण छटांनीं सौंदर्य व्यक्त करूं पहातो. गायक तेंच सौंदर्य मधुर मधुर स्वरालापांनीं रागरागिण्या आळवून व्यक्त करूं पहातो. लेखक आपल्या शब्दांनीं तेंच प्रगट करूं इच्छितो. आरशामध्यें ज्याप्रमाणें आगल्या मुखाचें दर्शन आपणास होतें त्याप्रमाणें उत्कृष्ट कलावतांच्या कृतींत आपल्याच हृदयाचें सौंदर्य आपणास भेटतें. त्यायोगें निरतिशय आनंदाची निर्मिति होते. मानवी हृदयाचे सूक्ष्म धागेदोरे उकलतात. उच्च कलाकृतीचे ठिकाणीं उच्च बोध हा सहज असूं शकतो. या दृष्टीनें उत्कृष्ट कलावान् हे मानवजातीचे खरे शिक्षक होत. शाळेंतील शिक्षकानें दिलेले बोधपाठ विसरतां येतील पण कलावंतांचा बोध विसरतां यावयाचा नाहीं. याचें कारण त्यांच्या कृतींत सहजता, जिव्हाळा आणि चटका असतो हें होय. हा जिव्हाळा आणि चटका ज्या मानानें असेल त्या मानानें त्याचीं कृति पारखतां येईल. उदाहरणार्थ आपण अर्वाचीन चित्रकार ठाकुरसिंग याचें उदाहरण घेऊं. या चित्रकाराचे 'ओलेती' चित्र सुप्रसिद्ध आहे. एके काळीं नियतकालिकांतून त्यावर मतभिन्नतेचा वर्षाव झाल्याची स्मृति बहुतेकांना असेलच. त्या वादविवादांत आपणास शिरावयाचें नाहीं. हें चित्र सुंदर आहे याबद्दल कोणीही निःपक्षपाती रसिक कबूल करील. या चित्रांत पाठमोरी युवती दाखविली असून तिच्या ओल्या वस्त्रांतून प्रगट होणारें शरीरसौंदर्य व उभी राहण्याची सहजरम्यता पाहून तिच्या पाठमोऱ्या असणाऱ्या वदनावरील सलीलतेची कल्पना करण्यांत मनाला आनंद वाटतो. याच चित्रकाराचें "प्रीतम स्मृति" म्हणून एक गोड चित्र आहे. या चित्रात प्रियकराच्या स्मृतीनें विव्हळ झालेली प्रिया दाखविली आहे. डोळ्यासमोर विश्व असूनसुद्धां तिच्या डोळ्यांस तें दिसत नाहीं. कारण तिचा प्रियकरच डोळ्याची बाहुली झाला आहे. "ओलेती" आनंद देईल पण "प्रीतम स्मृति" चटका लावणारी आहे. पहिलीनें स्त्रीजातीचें शरीरसौंदर्य दिसेल तर दुसरींत स्त्रीहृदयाच्या वेदनेची मधुरता अनुभवितां येईल. पहिल्यापेक्षां दुसरें चित्र स्त्रीहृदयाचा बोध देईल व आनंदही द्विगुणित करील. यानंतर आणखी एक चित्र तुलनेस घेऊं. तेंही एका स्त्रीचेंच आहे. राफेल या नामांकित इटालियन चित्रकारांचे मॅडोना व बालख्रिस्त हें तें चित्र होय. यांत स्त्रीहृदयाचें सौंदर्य संपूर्णतेनें व्यक्त झालें आहे. प्रियतमावरील प्रेमाची

परिणति शिशुवात्सल्यांत होते. स्त्रीहृदयांतील मातृ-वात्सल्याचा सागर पाहून पहाणाराचें हृदय हेलकावतें. मॅडोनाच्या नेत्रांतून आपल्या बाळाकडे पाहून पाझरणाऱ्या प्रेमधारांच्या दर्शनानें आपला जीवनझरा सहज उचंबळून वर येतो व आईच्या हृदयाचें लावण्य आपलें हृदय वेधून टाकतें. हें चित्र कोणाही पाषाणहृदयी व्यक्तीस पाझर फोडील व न कळत त्यास मातृ-प्रेमाचा बोध देईल. या चित्रकारांच्या कृतीचें उदाहरण साहित्यास लावतां येईल. मानवी हृदयाची खोली जितकी दाखवितां येईल तितकें तें साहित्य उच्च दर्जाचें होय. तेंच आपल्या हृदयास चटका लावील. यादृष्टीनें कालिदासाचें शांकुतल घेऊं. त्याच्या प्रथम अंकांतील दुष्यंतशकुंतला यांतील संवाद व प्रणय–केली रमणीय खरी पण कण्वाचें हृदय शकुंतलेस निरोप देतांना पितृ–वात्सल्यानें भरून येतें तो प्रसंग चटका लावणारा आहे. म्हणून त्यांतील चौथा अंक महत्वाचा गणला गेला आहे. मानवी हृदयांत लेखक प्रवेश करीत करीत पितृहृदयाच्या गाढ खोलीपर्यंत गेला तेव्हां त्याच्या सर्व कृतीला एक प्रकारची धीरोदात्तता आली आहे. कै. हरि भाऊ आपटे यांच्या लेखनांत आपणास असाच उदात्तपणाचा अनुभव येतो. अशा साहित्यकृती वाचतांना वाचकाचें हृदय उन्मत्त न होतां उदात्त होऊन हृदयांतील उच्च व श्रेष्ठ भाव सहज जागृत होतात. व कलावंतानें अनुभविलेल्या सुखाचा तो अनायासें भागीदार होतो. त्याचें हृदय विशाल बनतें. जगताकडे तो अधिक सहानुभूतीनें पाहूं शकतो. बोध म्हणजे अशी श्रेष्ठ दृष्टि होणें व ती सद्ग्रंथांच्या वाचनानें आपेआप होऊं शकते. याबाबतींत शेक्सपीअर-विषयीं प्रो. प्रिंगल–पॅटिसनसाहेबांनीं काढलेले उद्गार मननीय आहेत. ते म्हणतात–

Shakespeare gives us the heart-rending tragedies of Lear and Othello, full of baseness and wickedness and folly and the cruelty of things but he gives us Cordelia and Desdemonia as their centre. And, as in the old story of three men who were cast into the fiery furnace 'the fire had no power upon their bodies and the smell of fire had not passed on them.'—So in the case of Cordelia

and Desdemonia we feel - the poet makes us feel that evil and death had no power over their radiant and triumphant goodness. The last word is with Truth and Love.

—Pro. Pringle-Pattison's " The Idea of God " PP. 224

मानवी जीवनाची नुसतीं दृश्येंच नव्हे तर मानवी हृदय प्रतिकूल परिस्थितीवरही मात करून आपल्या प्रेमाची व सत्याची ऐश्वर्ययुक्त प्रभा जगतावर कशी पसरते हें प्रतिभासंपन्न लेखक दाखवितो.

साहित्य ही नुसती कलाच नसून ती इतर ललितकलापेक्षां श्रेष्ठ दर्जाची कला आहे. चित्रकारांच्या रेषा रंग किंवा गायकांच्या नादमाधुर्या-पेक्षां मानवी हृदयाचा ठाव घेण्याचें सामर्थ्य शद्बांत अधिक असतें. या दृष्टीनें साहित्यांत स्पष्टपणा, पूर्णता आणि गाढपणा इतर कलापेक्षां अधिक असतो. शद्ब हे इतर कलापेक्षां अतींद्रिय अनुभव अधिक देऊं शकतात. शद्बद्वारा हृदयाची देवाणघेवाण होऊं शकते. देशकालांच्या मर्यादा ओलांडून शद्ब हा लिहिणारांचीं आणि वाचणारांचीं अंतःकरणें एकजीव करतो. कळकळीचा शद्ब जन्माचें कल्याण करील, असा शद्बाचा महिमा अपार आहे.

साहित्याचा आणि जीवनाचा अगदीं निकटचा संबंध आहे. ग्रंथ सर्व प्रकारचे असतात. त्यांचा तारतम्यभावानें आपणास विचार करितां येईल. कांहीं ग्रंथ आपल्या ज्ञानांत भर घालतील. अन्न जसें पोटाची क्षुधा शांत करिते तसें निरनिराळ्या शास्त्रांवरील ग्रंथ हे बुद्धीची भूक शमवितील. परंतु नुसत्या माहितीवजा जंत्रीचें लिखाण साहित्य होऊं शकणार नाहीं. त्या लेखनांत लिहिणाराचें हृदय दिसेल तर तेंच लिखाण साहित्यांत गणितां येईल. त्यास चित्ताकर्षकता येईल. जीवन आणि विश्व यांचा प्रियसंगम आपणास पहावयास मिळेल. शास्त्र आणि साहित्य यांचा या दृष्टीनें विरोध नाहीं. उदाहरणार्थ आपण कै. दिक्षीतांचा " ज्योतिर्विलास " हा ग्रंथ घेऊं. हा खगोलशास्त्रावर लिहिला आहे. पण तो सहृदयतेनें लिहिला असल्यामुळें तो वाचीत असतां लिहिणाराच्या हृदयाची संगत होते. आकाशस्थ ज्योतींचें

वर्णन वाचतां वाचतां ज्योतींच्या वर्णनामुळें होणाऱ्या आनंदाबरोबरच त्या ज्योतींच्या ठाईं तेज आणि सौंदर्य ज्यानें ठेविलें त्या जगन्नियंत्याच्या प्रीतीचा स्पंद हृदयावर उमटतो. आदर्श साहित्य विश्ववर्णनांतच विश्वनिर्मात्याच्या प्रियस्वरुपाच्या सौंदर्याचा आस्वाद देईल. " वाचे बरवें कवित्व । कवित्वीं बरवें रसिकत्व । रसिकत्वीं परतत्व-। स्पर्शु जैसा ।। ( श्रीज्ञानदेवी अ. १७-४७ ) हा परतत्वस्पर्श ज्यांत होईल तें साहित्य अतिशय श्रेष्ठतेचें होय. परतत्व हा शब्द कदाचित् जाडा वाटेल पण तसें वाटण्याचें कारण नाहीं. मानवी जीवन हा ज्या सागरावरील कल्लोळ आहे त्या सागरास परतत्व म्हटलें आहे. या परमात्म-प्रेमसागराची शोभा आपल्या जीवनाच्या रूपानें व्यक्त होत असते. मातृप्रेम, पितृप्रेम, बंधुप्रेम हीं सर्व या एका प्रेमाचींच सगुण रूपें होत. मानवी जीवनाच्या नसानसांतून तें प्रभूचें प्रेमच व्यक्त होत आहे. या दृष्टीनें मानवी जीवनाचें मूल्य अतिशय आहे. प्रभूला स्वप्रीतीचा अनुभव होण्याचें ते क्रीडास्थान आहे. मानवी जीवनाचें मूल्य ज्यामध्यें संपूर्ण वर्णिलें जाईल ते शब्दही अतिशय मूल्यवान होत. आईच्या वात्सल्याचें वर्णन आपणास वेध लावितें. ती मानवी जीवनाची कला आहे. हीं कला ज्यानें विकसित केली त्या प्रभूच्या हृदयाचा जिव्हाळा ज्यांच्या प्रतीतीस आला त्यांच्या वेधास सीमा नसते. " प्रियाची परमसीमा " असें ज्या आत्म्याचें स्वरूप वर्णिलें आहे त्याचें सप्रेम सौंदर्य आपल्या जीवितांत प्रगट होण्यास ही अक्षरें सहाय्यक होतात. म्हणूनच " आत्मा अवतरविते मंत्र । अक्षरें इयें ।।" असें श्रीज्ञानेदेवीत वर्णिलें आहे.

कमलकलिका आपल्या स्वभावानें सहज उमलते. त्या उमलण्यानें दाही दिशांत मकरंद वाहूं लागतो. आणि सर्वांना त्या सुगंधाचें सेवन आपेआप घडतें. ज्याप्रमाणें हृदयांत मकरंद मावेना म्हणून त्या पुष्पकलिकेचा स्फोट होतो त्याप्रमाणें सज्जनांच्या प्रतिभेची अवस्था असते. जगतामध्यें त्याना जें परमप्रिय वाटलें त्याची गोडी त्यांच्या हृदयांत मावत नाहीं. ती उचंबळून बाहेर येते व अक्षरांचीं कारंजी त्यांच्या लेखणींतून बाहेर पडून स्वच्छंदानें नृत्य करतात. तें नृत्य इतकें मोहक असतें कीं पहाणाराचें हृदयही त्या अक्षराबरोबर त्याच तालावर न कळत नाचूं लागतें. हें नृत्य

कशाप्रकारचें असेल तें लेखकाच्या प्रतिभेंत ज्याची गोडी निर्माण झाली त्यावर अवलंबून राहील. लेखक ज्या रंगांत रंगलेला असेल तो रंग वाचकांत सहज उमटतो—

" स्त्रीप्रेमाविण जन्म नीरस उणा काडीवजा भूवरी "—

असे एकाद्या कवीनें लिहिल्यावर वाचकाचे मनावर तो रंग उमटेल. उलट

**" आई म्हणोनि कोणी । आईस हाक मारी ।**

या ओळी वाचतांना मातृप्रेमानें हृदय भरून येईल. अगर—

**" तू माझी माउली मी वो तुझा तान्हा । पाजी प्रेमपान्हा पांडुरंगे ॥"**

या ओळीनें प्रभूच्या प्रेममय हृदयाची अनुभूति येऊन जीवितास आधार वाटेल. त्या आधारानें जीवन रसाळ आणि मधुर होईल.

साहित्यामध्यें आपण चिरंजीव आणि तात्कालिक असें भेद करतों. त्याचें तात्पर्य हेंच कीं तात्कालिक वाङमय कांहीं एका विशिष्ट कारणापुरतें असतें. तें कार्य संपलें कीं त्या वाङमयाचा अवतार संपला. त्याचा उपयोग इतिहासकारास होईल हा भाग निराळा; परंतु ज्या काळांत तें प्रसिद्धीस आलें असेल, त्या परिस्थितींत, त्या विशिष्ट समाजास त्याचें महत्व वाटेल; परंतु चिरजीवि वाङमय आपण केव्हांही उघडलें तरी त्याची गोडी, त्याचा उदात्तपणा व सौंदर्य अविट असते. उदाहरणार्थ प्लेटोचे संवाद, महाभारतांतील शांतिपर्वासारखे उदात्त प्रसंग वाचतांना आजही आपणास ते ताजे वाटतात. कारण त्यांतील मानवी जीविताची उच्च आकांक्षा, अविनाशी सुखाची तळमळ, आणि पूर्णत्व प्रगट होण्याची लालसा, यांच्या वर्णनांचीं अक्षरें आपल्या हृदयास नित्यनवी जागृती देणारीं आहेत. मनुष्याचें जीवितांत अमृतसुखाची इच्छा सदैव असते. व तप्रीत्यर्थ तो सर्व व्यवहार उल्हासानें व आनंदानें करीत असतो. सुखसंशोधनार्थ तो अविरत परिश्रम करतो. पण परिश्रमाचा मोबदला निराळाच मिळतो. एका प्राचीन कथेंत वर्णिल्याप्रमाणें सोनेरी व रसभरित दिसणारीं फळें मोठ्या आशेनें तो मुखांत घालतो, पण मुखांत पडतांक्षणींच त्याची राख बनून खिन्नता शतपटीनें

वाढते. कर्मांतून सुख मिळविण्याची विफलता होते. अर्थात नुसत्या दिसणाऱ्या व अन्ती वितळणाऱ्या सुखानें जीव समाधान पावणार नाहीं. वाङ्मयाचें वर्णन कित्येकांनीं थकल्याभागल्या जीवास रंजविणारें असें केलें आहे. उदा. गोल्डस्मिथ या आंग्ल लेखकाबद्दल थॅकरे उद्गारतो–" You come hot and tired from the day's battle and this sweet minitrel sings to you."—दिवसभर जीवनकलहानें त्रस्त होऊन आणि शिणून तुम्ही घरी येतां तोंच हा गोड कवी तुम्हांस गीतें गाऊन दाखवितो– पण ही रंजकता केवळ काल्पनिक असतां उपयोगाची नाहीं. खडतर परिस्थितीचा क्षणभर विसर पाडणाऱ्या मादक पदार्थाप्रमाणें ती नसावी. उन्माद कांहीं काल टिकेल पण पुढें त्याचा चिरस्थायी परिणाम राहणार नाहीं; इतकेंच नव्हे तर उलट त्याचा विपरीत परिणाम होऊन आयुष्य ओहोटीस लागेल व मन, बुद्धि, इंद्रियें वलशाली न होतां निर्बल होतील. जोपर्यंत काल्पनिक मनोराज्यांत गुंग असूं तोपर्यंत आपणास वरें वाटेल पण पुन्हा डोळे उघडल्यावर भोंवतालची परिस्थिति अधिक भयाण आणि उदास वाटेल. कलेमध्येंमुद्धां आपणास जो उथळपणा दिसतो तो यामुळेंच. आपण सुखांत असूं त्यावेळेस एखादें सुंदर चित्र आपणास रंजवील. उलट दुःखांत असूं त्यावेळेस त्यावर दृष्टीसुद्धां टाकूं नयेसें वाटेल. याचें कारण ती सुंदरता मर्यादित असते. पण जेथें अमर्याद सौंदर्य प्रगट होईल ती कलाकृती जीव सुखांत असो वा दुःखांत असो त्याच्या सुखासच कारणीभूत होईल व तें सुख उन्मादावस्थेसारखें नसून उन्मनीचें असतें. उन्मनीअवस्थेचें याचा अर्थ मनास मनपणां विसरावयास, विरावयास, लावणारी अवस्था होय. दुःखी मनास चिरंतन आधार देणारी स्थिति होय. तेव्हां जिव्हाळ्याचा आधार देणारीं अक्षरें असतील तरच तीं सतत सुखदायी होतील. अशीं अक्षरें ज्या साहित्यांत नसतील तें साहित्यच अमोल आणि आदर्शभूत असतें.

श्रीज्ञानदेव–तुकाराम–आदिकरून संतांचीं अक्षरें अशींच अमोल आणि आदर्शभूत आहेत. " ऐश्वर्याचीं वचनाक्षरें। वदती मधुरें तत्वदातीं " असें निळोबारायांनीं यथार्थ वर्णन केलें आहे. अशा अक्षरांची संगति आपल्या जीवितांत घडणें याहून जीवास सुखदायी व श्रेयस्कर काय आहे?

# संतवचनांचे एक आंग्ल रूपांतरकार

१ परकीय भाषेंतील उत्कृष्ट ग्रंथ असतील त्यांचीं रूपांतरें आपल्या भाषेंत असावीं अशीं आंग्ल लेखकांना उत्कट इच्छा असते. त्या इच्छेनुरूप जगांतील उत्तम वाङ्मयरत्नांचीं भाषांतरें इंग्रजींत होऊन तें वाङ्मय समृद्ध होत आहे. तीं भाषांतरें सर्वच पहिल्या प्रतीचीं असतात असें नाहीं; तथापि प्रयत्न या दृष्टीनें स्तुत्य असतात. महाराष्ट्रीय संतांच्या सारस्वताचे इंग्रजी रूपांतराचेंही कांहीं प्रयत्न झाले आहेत. श्रीतुकाराममहाराजांच्या गाथ्याचें भाषांतर फ्रेझरसाहेबांनीं तीन भागांत प्रसिद्ध केलें आहे. ते पुढें दुर्मिळ झाल्यामुळें डॉ. डेमिंग यांनीं कांहीं वेच्यांचें भाषांतर प्रसिद्ध केलें. डॉ. निकल मॅकनिकल यांनीं Psalms of Maratha saints ( महाराष्ट्रीय संतांचीं गीतें ) या पुस्तकांत श्रीज्ञानेश्वरमहाराज, मुक्ताबाई, नामदेवराय, जनाबाई, एकनाथमहाराज व तुकोबाराय यांच्या कांहीं अभंगांचें रूपांतर केलें आहे. डॉ. अॅबट यानीं महिपतींच्या श्रीतुकाराम–चरित्राचें भाषांतर केलें आहे. कांहीं हिंदी लेखकांनींही प्रयत्न केले आहेत. श्री. मनु सुभेदार यांचें ज्ञानेश्वरीचें त्रोटक रूपांतर, श्री. खासनीस यांचें Elixir of life नामक अमृतानुभवाचें भाषांतरही प्रसिद्ध झालीं आहेत. प्रो. रानडे यांच्या Mysticism in Maharashtra या पुस्तकांत त्यांनीं जे संतवचनामृताचें मराठी भाग प्रसिद्ध केले आहेत त्यांतील व आणखी कांहीं वेच्यांचीं भाषांतरें दिलीं आहेत. हे सर्व प्रयत्न झाले असले तरी ज्ञानेश्वरी आदिकरून संतांच्या ग्रंथांचें संपूर्ण व व्यवस्थित अशी इंग्रजी रूपांतरें व्हावयास पाहिजेत. (अलिकडे श्री. भागवत यांचे संपूर्ण ज्ञानेश्वरीच्या इंग्रजी भाषांतराचें पुस्तक प्रसिद्ध झालें आहे. त्याचप्रमाणे ज्ञानेश्वरांच्या अमृतानुभवाच्या संपूर्ण

ओव्यांचें रुपांतर प्रस्तुत लेखकाच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या "The Philosophy of Jnanadeva" या ग्रंथांत समाविष्ट करण्यांत आलें आहे) मराठी भाषा न समजणारे पण संतवचनांचे भोक्ते असे जे परप्रांतीय आहेत त्यांना असे ग्रंथ बहुमोलाचे होतील. संतवचनामध्यें रंगलेल्या व दोन्ही भाषा वर प्रभुत्व असणाऱ्या लेखकांनींच या दिशेनें प्रयत्न करून ग्रंथ प्रसिद्ध केले पाहिजेत.

२ वरील विचार सुचण्याचें कारण डॉ. निकल मॅकनिकल यांचें वर उल्लेखिलेलें पुस्तक होय. हें रूपांतर पद्यात्मक असून एकंदर १०८ पद्यें दिलीं आहेत. लेखक हा संतवचनास लोभलेला दिसून येतो. त्यामुळें रूपांतरेंही रसाळ उतरली आहेत व मराठी न समजणाऱ्यांस तर अत्यंत वाचनीय आहेत. पुस्तकास विस्तृत प्रस्तावना जोडली असून त्यांत संतांनीं सांगितलेल्या भक्तिपंथाचें थोडक्यांत विवेचन केलें आहे. या विवेचनांत भक्तीविषयीं विकृतदृष्टीचा दोष आहे तो दाखविण्याचा प्रस्तुत लेखाचा हेतु आहे. प्रथम रूपांतराचे कांहीं नमुने देऊन नंतर तिकडे वळूं.

**मूळ– तरी कीर्तनाचेनि नट नाचे । नाशिले व्यवसाय प्रायश्चित्तांचे ।**
**जे नामचि नाहीं पापाचें । ऐसे केलें ॥ ज्ञानेश्वरी ९–१९७॥**
**यम म्हणे काय यमावे । दमु म्हणे कवणातें दमावे ।**
**तीर्थे म्हणती काय खावे । दोष औषधासी नाहीं ॥ ९९॥**
**ऐसे माझेनि नाम घोषें । नाहींचि करिती विश्वाचीं दुःखें ।**
**अवघें जगचि महासुखें । दुमदुमित भरलें ॥ २००॥**
**परी राया रंका पाड धरू । नेणती सानेया थोरा कडसणी करू ।**
**एकसरें आनंदाचे आवारु । होत जगा ॥ २०२॥**

रूपांतर– Dancing they sing my praises; surely not
For them rites of atonement–nay I wot,
Sin's very name's forgot
The mind and heart, " What shall we restrain "
The sacred stream cries " All my cleansing's vain, Since here there is no stain "

Thus by the praises of my name they slay
The world's distress; hark how it echoes gay
With happy holiday.
The same to them the monarch or his thrall
The high or low-themselves alike to all
A place of festival.

मूळः—तुज म्हणतील कृपेचा सागर । तरि का केला धीर पांडुरंगा ॥
(श्रीतुकाराममहाराज.)

Ah, Pandurang, if as men say,
A sea of love thou art,
Then wherefore dost thou so delay?
O, take me to thy heart
I cry for thee as for the hind
The faun makes sore lament
Nowhere its mother it can find
With thirst and hunger spent.
With milk of love, ah, suckle me
At thy abounding breast,
O Mother haste-in thee in thee
My sad heart findeth rest.

एकंदर रूपांतराची कल्पना येण्यास हे दोन उतारे पुरेसे आहेत.

३ संतानी भक्तिमार्ग प्रस्थापित केला त्यावेळीं महाराष्ट्रांत नवचैतन्य निर्माण झालें. समाजांतील सर्व जाती व आबालवृद्ध यामध्यें नवीन भावना निर्माण झाली. हें डॉ. मक्निकल यांनीं कबूल केलें आहे परंतु अद्वैत आणि भक्ति या दोन्हीचे प्रतिपादन जें संतवाङ्मयांत आढळतें त्यांत विरोध आहे व दोन्हीचा मेळ बसत नाहीं, तर्कशुद्धता रहात नाहीं असें त्यांचें म्हणणें आहे. विवेकबुद्धीच्या पायावर मेळ बसत नाहींसें वाटून त्यांनीं

आपल्या समजुतीप्रमाणें भावनेच्या पायावर मेळ बसविण्याचा प्रयत्न केला आहे.

Advaita ( non-duality ) and Bhakti are not so much, we may say, contradictory theories of the universe as varying moods of the Hindu Mind. Certainly Bhakti in large measure was a mood. It was the other half of advait; a reaction of the soul, a feast of that heart which advait had starved. It is the deliberate choice, after long lonliness, of the companionship of God and the saints; after silence, of song;after bareness and intellectual austirity, of the rich colours of affection. And yet because it is a reaction and not result of a reasoned development, it is apt to lapse back to what it has rebelled against. It is not intellectually convinced ( Preface page 21 )

याचा सारांश असा कीं अद्वैत आणि भक्ति हे विश्वाविषयीं परस्पर विरोधी सिद्धांत नसून हिंदु मनाच्या बदलत्या भावना होत. भक्ति ही बहुतांशी प्रत्याघातरूपी भावनाच होती. अद्वैतानें ज्या मानवी हृदयाची उपासमार केली त्या हृदयास ती एकप्रकारची मेजवानीच होती. फार दिवसांच्या एकांतवासानंतर देव आणि संत यांच्या सहवासाची–मौनानंतर संगीताची, बौद्धिक रुक्षतेनंतर रसपूर्ण भावनेची–ती बुद्धयाच केलेली निवड होती. परंतु ती हळूहळू विवेकबुद्धीच्या पायावर न वाढता, आघातास प्रत्याघात या तऱ्हेची असल्यामुळें पुन्हा आपल्या मूळ पदावर (ज्या अद्वैताशीं विरोध केला तिकडेच) झुकण्याचा संभव आहे. ती बौद्धिक निश्चयावर उभारलेली नाहीं.

ज्ञानमार्गाचें काठिण्य व भक्तिमार्गाची सहृदयता ही डॉ. मजकुरानीं योग्य वर्णन केली आहे परंतु तात्त्विक दृष्टीनें भक्तीस पुरेसा आधार नाहीं हें म्हणणें मात्र चूक आहे. भागवतधर्माचे जे आधारभूत ग्रंथ अमृतानुभव ज्ञानेश्वरी, नाथभागवत हे पाहिल्यास भक्तिमार्ग हा पूर्ण तात्त्विक पायावर

अनुक्रमांक २०४५७ वि. मिळ.धि...
क्रमांक ...१०.४३..... नों: दि: ७३६७४

उभारला गेला आहे हें दिसून येईल. अद्वैत व भक्ति यांचा तात्विक दृष्टया मुळींच विरोध नसून अद्वैताचा अनुभवच द्वैतानें यात्रयाचा-तीच भक्ति असें अमृतानुभवांत स्पष्ट म्हटलें आहे.

**"द्वैतदशेचें आंगण । अद्वैत वोळगे आपण । भेदू तंव तंव दूण । अभेदासी ।।"** (अमृ. ९-२८) अद्वैत तत्वच द्वैतरूपानें नटलें आहे व जो जो भेद वाढत आहे तो तो अभेदाचा अनुभव वाढत आहे. पूर्वीच्या अद्वैततत्वज्ञांनीं द्वैतास मिथ्या भासमान म्हटलें पण श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं द्वैतास-भेदास--अद्वैताचा, अभेदाचा उपभोग आहे असें सिद्ध करून दाखविलें व या सिद्धतेवर भक्तिमार्ग उभारला.

**देव देऊळ परिवारु । कीजे कोरून डोंगरु ।**
**तैसा भक्तीचा वेव्हारु । का न व्हावा ।।(९-४१)**

डोंगर एकच पण त्यांत जसें देऊळ, देव असे निरनिराळे कोरले जातात त्याप्रमाणें एकच तत्व पण त्यास देव भक्तपणाचा भक्ति--विहार होण्यास मुळींच हरकत नाहीं. ज्ञानेश्वरींत अशा भक्ताची स्थिती वर्णिली आहे-

**कीं भक्तिसुखालागीं । आपणपेंचि दोन्ही भागी । वाटूनिया आंगीं सेवकं । बाणे ।। येरा नाम मी ठेवी । मग भजती वोज बरवी । न भजतिया दावी । योगिया जो ।।**

देव आणि भक्त हे तत्वदृष्टया अभिन्नच पण प्रेमभोगास्तव भिन्नपणा स्वीकारलेला असतो. नाथभागवतांत वर्णिलें आहे-

**नांदता सहज भक्ती आंत । मी देवो तो माझा भक्त । येरवी मी सगळा त्या आंत । तो समस्त मजमाजी ।। १९-२९६।। निजभक्त मजभीतरी । मी तया आंत बाहेरी । ऐसे सामरस्ये नांदो भारी । वेगळे बाहेरी नाममात्रे ।।९७।। माझिया सायुज्या जे आले । ते मीचि होऊनिया ठेले । परी मी होऊनि मज भजले । तें भक्त मानिले म्या ऐसे ।। ९८ ।।**

देव भक्त दोन दिसले तरी अभिन्नता मोडत नाहीं याबद्दल याच्या पुढील ओव्यांतच उद्धव व भगवान् यांचे आलिंगन झाल्यावरची स्थिती नाथांनीं वर्णिली आहे.-

सूर्यापासुनि फाकती किरण । तैसे सुटले आलिंगन ।
कृष्ण उद्धव झाले भिन्न । परी अभिन्नपण मोडेना ।।

ए. भा. अ. १९–३१४

श्रीतुकोबारायांनीं भक्तिसुखाचें स्वरूप उघड केलें आहे–

क्षरला सागर गंगा ओघी मिळे । आपणचि खेळे आपणाशी ।।

सागराचे जलापासून ढग उत्पन्न होऊन त्याचे पाण्यानें गंगा झाली व पुन्हा सागरास मिळाली तेव्हां गंगासागर संगम म्हणजे सागर आपआपणाशीं खेळतो त्याप्रमाणें देवच भक्त होऊन आपआपलें प्रेम भोगतो. भक्तींत श्रीहरीचें ऐक्य कधींच बिघडत नाहीं. उलट ऐक्याचा रसाळ अनुभव येत असतो व या अनुभवाची कबुली डॉ. मॅक्‌निकलनींही याच प्रस्तावनेंत दिली आहे–

Not in the monism of Shankaracharya, nor in the dualism that is quite satisfied to remain two, but in a spiritual experience that transcends and includes both is peace to be found ( pp. 24 ) —

शंकराचार्यांचें अद्वैत अगर द्वैत या दोन्हीच्याही पलीकडील–परंतु ज्यांत दोहींचाही समावेश होईल अशा अनुभवांतच समाधान लाभूं शकेल– अर्थात् हा अनुभव म्हणजे भक्तीच होय. कारण तींत द्वैत व अद्वैत या दोन्हींचाही संगम असून दोहोंच्या पलीकडील प्रेमसुखाचा अनुभव असतो.

४ यापुढें या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत हिब्रू व ख्रिस्ती उपासक आणि महाराष्ट्रीय संत यांच्या गीतांची तुलना करतांना ग्रंथकर्त्यानें संतांच्या श्रेष्ठत्वाबद्दल एक ठिकाणीं मार्मिकपणानें लिहिलें आहे–

" If, it is the case that the sense of sin is a morbid growth in man's experience, if there is no ground in the truth of things to justify the feeling of seperation on the part of a sinful man from a holy God and the demand for a mediator, then these Indian Saints have found a

nearer and directer way than the Hebrew and Christian penitents " ( pp. 28 )

(जर पातकाची जाणीव हा मानवी अनुभवांतील विकृत प्रकार असेल व पातकी मनुष्य हा पवित्र अशा ईश्वरापासून दूर असतो व त्यास मध्यस्थाची जरूर असते या म्हणण्यास प्रत्यक्ष वस्तुस्थितींत आधार नसेल तर या संतांचा मार्ग ख्रिस्ती व हिब्रू उपासकापेक्षां अधिक जवळचा व सरळ आहे.)

ख्रिस्ती धर्मांत मानवाच्या जन्मजात पातकाची कल्पना आहे त्यास उद्देशून वरील वाक्य आहे. पातकांतून मुक्त करण्यास्तव केलेल्या प्रभूच्या प्रार्थनेंत जास्त गाढपणा व आर्तता आहे अशी तरफदारी करण्याचा ग्रंथकर्त्यानें प्रयत्न करून पाहिला आहे पण त्यांत तथ्य नाहीं. प्रभूच्या प्रेमस्वरुपास लोभून निकटवासी प्रभूस आळविणारी संतांची वचनें कोणीकडे व पातक दूर करण्यास्तव केलेल्या प्रार्थना कोणीकडे ! त्यांची तुलनाच करतां येत नाहीं. महाराष्ट्रीय संतांचीं गीतें म्हणजे प्रेमसुखाचे अखंड झरेच होत– नैसर्गिक ऊमाळेच होत. त्यांत मानवी जीवनास कमी लेखणाऱ्या जन्मजात पातकाचा लक्षांश नाहीं. उलट मानवी जीवनाची थोरवीच संतांनीं या प्रेमसुखानुभवाचें स्थान म्हणून गाइली आहे.

श्रीतुकोबारायांनीं एके ठिकाणीं देवास म्हटले आहे–**पतित पतित । जरि मी त्रिवाचा पतित ।। परि तूं आपुलिया सत्ता । मज करावे सरता ।। नाहीं चित्तशुद्धि । स्थिर पायापाशीं बुद्धि ।। अपराधाचा केलो । तुका म्हणे काय बोलो ।।१।।**....हे व अशाच तऱ्हेचे संतांचे अनेक अभंगही आहेत. पण या अभंगाचा अर्थ पतितत्वाची जाणीव नसून प्रभूच्या प्रेमाचा भोग जीवांस पुरत नाहीं. कितीही प्रेम भोगलें तरी उलट कमी वाटतें व " तृप्ति भुकेली काय करूं माये " असा प्रेमाचा विरह सारखा वाढत असतां त्या विरहाचे, तळमळीचे उद्गार आहेत व त्यांत प्रभुच्या अपरंपार प्रेमाचा लक्षांश आहे. प्रेम भोगून प्रेमास्तव तळमळीचें मधुर वेदनात्मक सुख चाखणें हें संतांचे वैशिष्ठ्यच आहे हें मात्र विसरतां कामा नये.

५ हिब्रू गीतामध्यें देवास जगाचा शास्ता व न्यायाधीश म्हणून प्रार्थना केली आहे व महाराष्ट्रीय संतांनीं देवास आपला प्रिय सखा अथवा माउली म्हणून आळविलें आहे. यावरून डॉ. मॅकनिकल यांनीं अनुमान काढलें आहे कीं हिब्रूच्या प्रार्थना सर्वांकरितां होत्या व महाराष्ट्रीय संतांच्या वैयक्तिक आहेत. परंतु अत्यंत वैयक्तिक जिव्हाळ्याचीं वचनें अत्यंत जागतिक असतात–जगांतील कोणाही व्यक्तीस पाझर फोडणारीं असतात. ती एक व्यक्ती सर्वांना आपल्या उद्गारांच्या द्वारें अनुभवाचा रस पाजीत असते.
**" तुजलागी माझा जीव झाला पिसा । अवलोकितो दिशा पांडुरंगा ॥"**
**" ओस झाल्या दिशा मज भिंगुळवाणें । जिवलग ते नेणे मज कोणी ॥"**
**" देसी कां न देसी पायांचे दर्शन । म्हणवुनी मन स्थिर नाहीं ॥"**
**" किती विवंचना करीतसे जीवी । मन धावडवी दाही दिशा ॥ कोणा एका भावे तुम्ही अंगीकार । करावा विचार याजसाठीं ॥"** इत्यादि श्रीतुकोबारायांची वचनें अत्यंत वैयक्तिक जिव्हाळ्याचीं व म्हणूनच ती कोणाही जीवास अत्यंत चटका लावणारी आहेत. संतांनीं देवास " माझी माउली " म्हणून कळवळ्यानें हांक मारतांच ती हांक ज्या जीवाचें कानीं पडते त्या जीवांतही देव " माझी माउली " आहे असा अनुभव जागा होतो. तेव्हां हा दृष्टीचा संकुचितपणा नसून यांत अत्यंत विशालता भरलेली आहे हें दिसून येईल.

देवास शासनकर्ता असें म्हणण्यांत भीतीचा लक्षांश रहातो व म्हणून देवास भिनात ते देवास आवडतात अशीं वचनें हिब्रू गीतात आढळतात. उदा. ज्या गीताची स्तुती ग्रंथकारानें केली आहे त्या १०३ न्या गीतांतच म्हटलें आहे–

" For as the heaven is high above the earth, so great is his mercy towards them that fear him " " Like as a father pitieth his children, so the Lord pitieth him that fear him." ( Old Testament Psalms 103–11, 15, )

देवाविषयीं भीती वाटल्यास जिवलगपणा वाटणार नाहीं परंतु देव सखा अगर माउली आहे असें वाटल्यास तो आपला जिवलग आहे असें

वाटेल व त्याच्याशीं लडिवाळपणें हट्ट करून प्रेमसुख भोगतां येईल. अशी प्रेमसुख भोगविणारी संतवचनें आहेत.

तुज जाणे तान्हे नाहीं पांडुरंगा । का जी मज सांगा उपेक्षिलें ॥
तुज ठावे होते मीं पातकी थोर । आधीच का थार दिधला पायीं ॥
अंकी तो पडिला हरिचा मी दास । भेद पंगतीस करूं नये ॥
तुका म्हणे आम्ही जिंतिलें ते खरे । आता उणे पुरे तुम्हा अंगीं ॥

जेथें अत्यंत जिवलगपणा असेल तेथेंच असा प्रेमकलह करितां येईल. जेथें भीति आहे तेथें करिता यावयाचा नाहीं.

५ वरील त्रोटक विवेचनावरून संतांच्या भक्तीमार्गाचें वर्म न जाणल्यामुळें कसा विपर्यास होऊ शकतो हें समजून येईल. उलट वर्म जाणल्यास संतवचनें किती विशाल, अखिल जीवमात्रांना सुखदायी आहेत हें दिसून येईल.

# श्रीगौरांग प्रभु

मुक्तिपांग नाहीं विष्णूचिया दासा । संसार तो कैसा न देखती ।।
बैसला गोविंद जडोनियां चित्तीं । आदि तेची अंतीं अवसानीं ।।
भोग नारायणा देउनी निराळी । ओंविया मंगळी तोचि गाती ।।
बळबुद्धि त्यांची उपकारासाठी । अमृत हें पोटीं सांठविले ।।
दयावंत तरी देवाच सारिखी । आपुली पारखी नोळखती ।।
तुका म्हणे त्यांचा जीव तोचि देव । वैकुंठ तो ठाव वसती ते ।।

—श्रीतुकाराम महाराज.

बंगाल्यांतील भागीरथी नदीच्या दोन्ही कांठांस वसलेल्या नवद्वीपांत या श्रेष्ठ भगवद्‌भक्ताचा जन्म फाल्गुन पौर्णिमा शके १४०६ या तिथीस झाला. सायंकाळचा समय होता. पश्चिम दिशेस सूर्य अस्त पावला होता. व पूर्वेस आरक्त असें पूर्ण चंद्रबिंब शोभायमान दिसत होतें. तीच वेळ ग्रहणाची होती म्हणून गांवांतील लोकसमुदाय "हरी बोल" म्हणून भगवन्नामाचा गजर करीत होता. याच समयास निंबवृक्षाशेजारील एका कुटीमध्यें प्रभूचा जन्म झाला. गौरांग प्रभूंच्या वडिलाचें नांव जगन्नाथ व आईचें नांव शचीदेवी होतें. पंडित जगन्नाथ मिश्र हे एक गरीब वैदिक ब्राम्हण होते आणि शचीदेवी या श्रेष्ठ आणि सुशील साध्वी होत्या. शचीदेवींचे वडील नीलांबर चक्रवर्ती हे प्रख्यात ज्योतिषी होते. त्यांनीं आपल्या नातवाच्या अंगावरील शुभचिन्हें पाहून हा कोणीतरी श्रेष्ठ पुरुष होणार असें भाकित केलें. या भाकितावरुन जगन्नाथ मिश्रांनीं प्रभूचें नांव "विश्वंभर" असें ठेविलें. त्यांच्या गौरवर्णामुळें त्यांना आसपासचे शेजारी लोक "गौर हरी" असें म्हणत. "निमाई" हे त्यांच्या आईनें ठेविलेलें लाडकें नांव

होतें. निंबवृक्षासन्निध जन्म झाला म्हणून शचीदेवी त्यांना "निमाई" म्हणूं लागल्या.

निमाईचा वर्ण चंपकाप्रमाण गौर असून अंगकांति सुंदर आणि मोहक होती. या बाळसेदार मुलाच्या ठिकाणीं चपळता व पूर्ण आरोग्य नांदत होतें. त्यामुळें घरांतील स्त्रियांना त्यास हातावर खेळविणें जड जाई. असें सांगतात कीं कधीं निमाई रडूं लागल्यास "हरि" शब्द उच्चारताच त्याचें रडें थांबत असे. निमाईच्या मातापित्यास आठ मुली होऊन त्या सर्व वारल्या. त्यानंतर त्यांना एक मुलगा झाला. त्याचें नांव विश्वरूप. विश्वरूप दहा वर्षांचा असता निमाईचा जन्म झाला. सर्वांत लहान म्हणून निमाई घरांतील सर्वांचा लाडका बनला. यामुळें त्याचे अंगीं हूडपणा शिरून चालावयास येऊं लागल्यामुळें बाहेर कोठें गर्दीत जाईल म्हणून मातापित्यास अत्यंत दक्षता घ्यावी लागे. एकदा असाच प्रसंग घडला. मेखमाली नांवाचा एक चोर होता. त्यानें लहानग्या निमाईस एकटेच खेळतांना पाहिलें. निमाईच्या अंगावर दागिने होते. ते चोरण्याच्या इच्छेनें तो निमाईस उचलून दूर नेऊं लागला. परंतु निमाईच्या अंगाचा त्याच्या खांद्यास स्पर्श होताच त्याच्या दुष्ट भावना विरून जाऊन त्यास पश्चाताप झाला. त्यानें निमाईस घरीं पोहचतें केलें. हा चोर पुढें भगवद्भक्त म्हणून ओळखला जाऊं लागला.

बालपणापासून निमाईस नाचण्याची हौस होती. आधींच निमाई रूपानें सुंदर, कमळासारखे नेत्र, हातापायांचे तळवे आरक्तवर्णाचे, चेहरा तर जणूं एखाद्या उत्कृष्ट शिल्पकारानेंच मोठ्या कौशल्यानें प्रमाणबद्ध घडलेला व त्यांत तें मोहक बालनृत्य. तें पहाण्याच्या आशेनें गांवांतील स्त्रीपुरुषांनीं निमाईस खाऊचें आमिष दाखवावें. निमाई नाचूं लागला कीं आसपास त्याचे बालसंवगडी जमत तेही "हरी बोल" म्हणून नाचूं लागत. एकदा असेंच नृत्य चाललें असता एक वृद्ध गृहस्थ रस्त्यानें जात होता त्यानें तें दृश्य पाहिलें. आपलें कामधाम विसरून तोही हातवारे करून नाचूं लागला. "हरी बोल" शब्द ऐकून शचीदेवीनीं निमाईचा ठिकाणा ओळखला. ती धावत येऊन निमाईस उचलून घेऊन गेली. नृत्य एकदम थांबलें तेव्हां म्हातारा लाजल्यासारखा होऊन निघून गेला.

निमाईचा गळा गोड होता. तो नुसते बोलूं लागला तरी त्यांत माधुर्य भरलेले असे. केवळ त्यास बोलवावे या हेतूनें शचीदेवी त्यास नाना प्रश्न विचारी. ते ओळखून निमाई आपले ओठ घट्ट मिटी. "निमाई, काय रे झालें तुला? बोलत कां नाहींस?" म्हणून तिनें विचारलें तरी तो कांहींच न बोलता मिस्किलपणें हसे. शचीदेवीनें रागावून म्हणावे "निमाई, तूं एवढ्या वयांतच माझ्याशीं बोलत नाहींस मग मी म्हातारी झाल्यावर मला कसा रे सांभाळशील?" एकादे वेळीं निमाईनें खोड्या केल्या म्हणजे हातांत काठी घेऊन शचीदेवी त्यास मारण्यास धावे. निमाई पळून जाई व बाहेर कोठें फुटकीं खापरें असतील त्यावर उभा राही. फुटक्या खापरास शिवलें म्हणजे विटाळ होतो अशी शचीदेवीची समजूत होती. त्यामुळें निमाईस धरणे अशक्य होई. कधीं कधीं निमाई आईनें 'नको नको' म्हणत असता अस्पृश्यास शिवत असे व मग निमाई घरांत येऊन विटाळ कालवील म्हणून शचीदेवी घराचें दार लावून आंत बसे! जणू सोवळ्या ओवळ्याच्या कल्पना फोल आहेत हें दाखविण्याचाच निमाईचा आशय होता.

निमाई पांच वर्षाचा झाला होता. बरोबरीची सर्व मुलें शाळेंत जाऊन शिकू लागली होतीं. पण निमाई मात्र आपल्या खेळांत व खोड्यांतच रंगून असे. ते पाहून जगन्नाथ मिश्राना राग येऊन ते एके दिवशीं नदीतटाकीं मनसोक्त खेळत असलेल्या निमाईस मारण्यास धावले. शचीदेवीनीं ते पहातांच पतीच्या हातांतील छडी काढून घेऊन त्या मध्यें आल्या "अशानेंच तूं मुलांना लाडानें बिघडविशील" जगन्नाथ मिश्र म्हणाले पण निमाईच्या डोळ्यांतील आसवे पहातांच त्यांचें हृदय विरघळलें. राग पार कोठल्या कोठें नाहींसा झाला व अतःपर याला आपण कोणत्याही प्रकारें दुखविणार नाहीं म्हणून त्यांनीं निश्चय केला. एके दिवशीं निमाई डोळे चोळून रडू लागला. रडण्याचें कारण शेजारी रहाणारे जगदीश व हिरण्य नामक गृहस्थ श्रीकृष्णासाठीं नैवेद्य तयार करीत होते तो निमाईस पाहिजे होता. देवाकरितां तयार केलेलें अन्न मुलास कसें द्यावयाचे म्हणून वडिलांनीं दुसरें काय पाहिजे तें माग म्हणून समजूत काढण्याचा प्रयत्न केला. पण निमाई जास्तच रडू लागला. अखेर ती गोष्ट जगदीश व हिरण्यांना समजली. त्यांनीं निमाईस

पहाताच नैवेद्य आणून दिला व बालगोपालानेंच आपला नैवेद्य स्वीकारला म्हणून ते आनंदित झाले. हे दोघेजण पुढें गौरांग प्रभूचे एकनिष्ठ अनुयायी झाले. श्रीहट्ट गांवचा मुरारी गुप्त नांवाचा वैद्य नवद्वीपास आला होता. तो वैय्याकरणी असून योगवासिष्ठाचा त्यानें अभ्यास केला होता. एके दिवशीं तो रस्त्यानें जात असता आपल्या स्नेह्यांना योगवासिष्ठांतील तत्वज्ञान मोठ्या जोरानें मस्तक व हात हालवून सांगत होता. तो असें करीत असता त्याला हास्यकल्लोळ ऐकू आला म्हणून मागें वळून पहातो तो त्यास निमाई आपली नक्कल करीत आहे व बाकीची मुलें खोखो हसत आहेत असें आढळून आलें. मुरारी गुप्तास राग येऊन तो म्हणाला " जगन्नाथ मिश्रांचा मुलगा असून किती खोड्या करतोस " त्यावर " जेवणाचे वेळेस मी तुला धडा शिकवीन " म्हणून निमाई निघून गेला. मुरारीनें तिकडे विशेष लक्ष दिलें नाहीं. पुढें मुरारी घरीं येऊन जेवण करीत असता अकस्मात बाल निमाई त्याजपुढें येऊन उभा राहिला. मुरारीनें त्यास पाहून जेवण चालू केलें. निमाई तेथें हेतुपूर्वक उभा राहिला. मुरारीचें जेवण होत आलें असता निमाईनें त्याचे ताटांत मूत्रोत्सर्ग केला! मुरारी क्रोधाविष्ट झाला. निमाई म्हणाला " मुरारी, तुझें खोटें तत्वज्ञान सोडून दे. अंतःकरणापासून श्रीहरीची भक्ती कर. सर्व शक्तिमान प्रभू व मी एकच आहे अशा भ्रमानें जो अहंकारी होतो त्याचें अन्न मी या किमतीचेंच समजतो " असें म्हणून निमाई तेथून चटकन निघून गेला. मुरारीचा क्रोध नाहींसा होऊन आपणास शिकविणारा हा कोणी श्रेष्ठ पुरुष असला पाहिजे म्हणून त्यानें जगन्नाथ मिश्रांच्या घरीं जाऊन निमाईच्या पुढें साष्टांग प्रणिपात केला. जगन्नाथ मिश्रांनीं त्यास लहान मुलापुढें मोठ्यानें प्रणाम करणें शास्त्रविरुद्ध आहे असें सांगितलें पण " तुम्हास याचें कारण पुढें कळेल " असें त्यानें उत्तर दिलें.

निमाईचा थोरला भाऊ विश्वरूप हा विद्वान व हुशार होता पण त्याच्या मनांत वैराग्याचे विचार घोळू लागले. वयाच्या सोळाव्या वर्षी आईबाप त्याचे लग्नाचा विचार करीत असता तो एके दिवशीं घरांतून निघून गेला. त्यामुळें घरांतील सर्वांनाच अत्यंत दुःख झालें पण निमाईकडे

बघून त्यांनीं तें सहन केले. निमाईचे आपल्या बंधूवर अत्यंत प्रेम होतें. त्यास ही वार्ता समजताच तो मूर्च्छित झाला व मोठ्या प्रयासानें त्यास शुद्धीवर आणावें लागलें. आपल्या मातापित्यास अत्यंत दुःख झालें आहे हें जाणून निमाईनें आपला हूडपणा सोडून कांहीं काल तो अभ्यास करू लागला. परंतु थोरला मुलगा शिक्षणामुळेंच घरांतून निघून गेला तसा हा शिकला तर हाही निघून जाईल म्हणून निमाईच्या वडिलानीं त्याच्या हातची पुस्तकें काढून घेतली. निमाई पूर्वीप्रमाणें हूडपणा करू लागला. नदीत यथेच्छ पोहावे, कोणी स्नान करीत असल्यास त्याचे पाय ओढावे, पूजेस फुलें नेत असल्यास ती घेऊन आपल्या मस्तकीं ठेवावीत, नैवेद्य दिसला कीं पकडून आपण सेवन करावा इत्यादि प्रकारच्या खोड्या सुरू झाल्या. पण निमाईच्या खोड्यांनीं कोणाची अंतःकरणें न दुखता उलट आनंदच द्विगुणीत होई. निमाई अकरा वर्षांचा असतांना वडिल इहलोक सोडून गेले, मातुश्री शचीदेवीनें मुलाकडे पाहून दुःख आवरलें व त्यास पंडित गंगादास याच्या पाठशाळेंत घातले. पंडित गंगादास हा चारित्र्यानें निर्मल व संस्कृतावरील त्याचें नैपुण्य प्रसिद्ध होतें. त्याच्या हाताखालील विद्यार्थ्यांत निमाई हा सर्वांत लहान होता. साहित्यविशारद कमलाकांत, तंत्रसार कर्ता कृष्णानंद व मागें उल्लेखिलेला मुरारी गुप्ता हे निमाईचे सहाध्यायी होते. ते निमाईस लहान समजून त्याच्याशी वादविवाद करणें कमीपणाचें समजत. पण निमाई त्यांच्याशी मुद्दामच वाद करून त्यांना निरुत्तर करी. व्याकरणाचें अध्ययन संपल्यावर वासुदेव सार्वभौम म्हणून विख्यात नैयायिक होते त्यांचेकडे निमाईनें न्यायशास्त्र शिकण्यास सुरवात केली व त्यांत नैपुण्य मिळविलें. रघुनाथ म्हणून निमाईचा सहाध्यायी होता. त्यानें न्यायग्रंथावर टीका लिहिण्यास सुरवात केली होती. निमाईनें त्याच ग्रंथावर लिहिलेली टीका त्यास वाचून दाखविल्यावर तो निराश झाला तेव्हां निमाईनें "न्यायशास्त्र हें निष्फळ आहे. त्याचा काय उपयोग" असें म्हणत आपलें लिखाण नदींत फेकून दिलें. !

तेथील अध्ययन संपल्यावर निमाईनें स्वतःची पाठशाळा काढली. अनेक विद्यार्थी त्याजकडे शिक्षण घेऊं लागले. निमाई केवळ सोळा वर्षांचा

होता पण विद्वत्ता थोराला लाजवील अशी होती. याच सुमारास वल्लभाचार्यांची कन्या लक्ष्मी इच्याशीं निमाईचा विवाह झाला. निमाईची गणना श्रेष्ठ पंडितांत होती पण त्याच्या मुळच्या खेळकर स्वभावांत कांहींच फरक पडला नाहीं. तो साध्या मनुष्याप्रमाणें नदींत पोहतांना, कधीं रस्त्यांतून धांवतांना, कधीं विद्यार्थ्यांबरोबर खेळतांना दिसे. कांहीं विद्यार्थी तर त्याच्याहून वयानें वडील होते. निमाई रूपानें देखणा होता. तसाच विद्यार्थी व स्नेही यांच्या समवेत, स्वतः उंची रेशमी प्रावणें नेसून घराबाहेर पडला म्हणजे जणूं काय राजपुत्र चालला आहे असा भास होई. निमाईचें हें उपजत ऐश्वर्य पाहून कोणी त्याचा आदर करीत तर कोणी मत्सरानें जळून निंदा करीत. पण निमाईस तोंडावर बोलण्याची मात्र कोणाची छाती होत नसे. कांहीं दिवसांनीं निमाई पूर्व बंगालांत प्रभानदीच्या कांठीं गेला असता तेथील गांवच्या लोकांकडून बरीच द्रव्यप्राप्ती झाली. त्यास पुष्कळ विद्यार्थीही मिळाले. याच वेळीं मधून मधून तो वैष्णवधर्मासंबंधीं शिक्षण देऊं लागला. याच वेळीं त्याची बायको लक्ष्मीदेवी सर्प चाऊन मरण पावली.

निमाईची आई शचीदेवी या नित्य गंगास्नानास जात. त्यावेळीं एक सुंदर व सात्विक स्वभावाची मुलगी त्यांना अदबीनें लवून नमस्कार करी. कांहीं दिवसांनीं त्यांनीं चौकशी करतां तिचें नांव विष्णुप्रिया असून ती सनातन मिश्र नामक श्रीमंत पंडिताची कन्या आहे असें समजलें. पंडिताची इच्छा विष्णुप्रिया निमाईस द्यावी अशी होती व शचीदेवीसही ती मुलगी आवडल्यावर निमाईचा द्वितीय विवाह विष्णुप्रियेशीं झाला. व घरांत पुनरपि आनंदाचें वातावरण निर्माण झालें.

केशवमिश्र म्हणून काश्मिरांत मोठा पंडित असून त्यानें निरनिराळ्या पंडितांना जिंकून अजिंक्यपत्र मिळविलें होतें. तो एकदां नवद्वीपास आला. तेथें त्याजबरोबर वाद करणेंस कोणी धजलें नाहीं. केशव पंडित एके प्रसंगीं आपल्या शिष्यगणासह फिरत असतां निमाई गंगाकिनाऱ्यावर चांदण्यांत आपल्या विद्यार्थ्यांशीं बोलत बसला होता. पंडितानें तेथें येऊन निमाईशीं बोलणें सुरू केलें. स्वरचित कांहीं श्लोक म्हटले त्यांतील चुका निमाईनें दाखविल्यावर तो थक्क झाला व निमाईस शरण आला. निमाईची कीर्ति

आतां पंडित म्हणून चहूंकडे पसरली होती. त्याच्या मुखावर झळकणारे मंद स्मित, त्याचा आनंदी स्वभाव, अंत:करणाची सरलता आणि औदार्य, अलौकिक बुद्धिमत्ता आणि एकप्रकारची रम्य आकर्षकता यामुळें तो सर्वांचा आवडता झाला होता एवढेंच नव्हे तर त्याचे निंदक आणि शत्रु-सुद्धां सर्व वैरभाव विसरून त्याची वाखाणणी करूं लागले. पुढें असा एक प्रसंग निमाईच्या आयुष्यांत आला कीं निमाईचें सर्व पांडित्य हरलें, निमाई-पंडिताचा निमाईवैष्णव झाला, भगवान् गोपाळकृष्णाचें नांव ऐकतांच त्याच्या नेत्रांतून अविरल अश्रूधारा वाहूं लागल्या, हृदयास इतके दिवस घातलेला बंधारा फुटून जणू काय त्यांत कोंडलेला भगवत्प्रीतीचा पूर दाही दिशांत वाहूं लागला. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे निमाईपंडिताचा वेडा निमाई झाला—जगाच्या दृष्टीनें वेडा पण प्रभूच्या वक्षस्थलावरील तो प्रीतीचा मोडच बनला ! अहाहा ! भगत्प्रीतीची ती प्रथम कलिका उमल-ण्याची किती मंगल आणि मधुर वेला ! तिचें वर्णन कोणती लेखणी कोणत्या शद्बांत करुं शकणार आहे. ? सुवर्णाची अक्षरें लिहून त्यावर कितीही हिरेमाणकें उधळलीं तरी ती अपुरींच पडणार.

गौरांग प्रभूचें वय चोवीस वर्षाचें होतें. शके १४३० च्या भाद्रपदांत आईचे परवानगीनें त्यांनी गयाक्षेत्रीं जाण्याचें ठरविलें व बरोबर शिष्य-मंडळी व स्नेही घेऊन ते मुक्काम करीत करीत गयेस पोहोंचले. तें पवित्र क्षेत्र पाहून त्यांनीं आदरानें वंदन केलें व आंत प्रवेश केला. तेथें सर्व विधिकृत्यें यथासांग केल्यावर गदाधराच्या मंदिरांत श्रीगोपालकृष्णाच्या पाउलाच्या खुणा आहेत त्यांचें दर्शन घेण्याकरितां सर्व मिळून गेले. भगवं-ताच्या त्या पदचिन्हावर जनसमुदाय फुलांच्या ओंजळी वहात होता, कोणी भगवंताच्या गुणगानांत रंगले होते. प्रभूंची दृष्टी पावलावर पडल्याबरोबर ती तेथेंच खिळली. ते एखाद्या निश्चल पुतळ्याप्रमाणें उभे राहिले. या खुणावर जीं पाउलें आणि भगवंताची जी मनमोहक मूर्ती उभी होती तिच्या आठवणीनें त्यांचे हृदय भरुन आलें व डोळ्यांतून मोत्याच्या सरा प्रमाणें अश्रुबिंदु टपकूं लागले. सभोवतालच्या जगाची नव्हे स्वत:चीसुद्धां जाणीव हरपून गेली. त्यांचे ओठ थरथर कापू लागलें. त्यांचा देह धरणीवर

पडणार इतक्यांत तेथील एका साधूनें त्यांना सावरलें. गौरांग प्रभूंनी नेत्र उघडून पाहिलें तो त्यांच्या ओळखीचे ईश्वरपुरी नांवाचे साधू असल्याचे आढळतांच त्यांनी त्यांस घट्ट मिठी मारली व ओक्साबोक्सी स्फुंदूं लागले. "आपली गांठ पडली हें माझें केवढें भाग्य. आपण श्रीहरीचे प्यारे आहांत मजवर कृपा करा आणि माझ्या हृदयांत आपल्या सारखा प्रेमा उत्पन्न होईल अशी मजवर दया करा." ईश्वरपुरीचें हृदयही भरुन आलें. त्यांनीं प्रभूस भगवंताचें नामस्मरण करण्याबद्दल सांगितले. कांहीं दिवस गयेंत राहून प्रभु सर्वांसह नवद्वीपास परत आले. त्यांच्या आयुष्यांत क्रांती झाली होती. पूर्वीचा बालस्वभाव व खेळकरपणा जाऊन त्यांच्या मुखावर एक प्रकारची घन गंभीरता आली होती. कृष्णविरहाची ज्वाला अंतरांत वरचेवर उफाळत होती. शचीदेवींना आपल्या लाडक्या मुलामध्यें झालेला बदल समजला. शरीर पूर्वीच्याच निमाईचें आहे परंतु त्यांत प्रवेश करणारा मात्र दुसराच कोणी आहे की काय अशी शंका त्यांना आली.

आपली हृदयव्यथा सांगावी म्हणून प्रभूनीं आपल्या जिवलगांना—मुरारी, सदाशीव व श्रीमान्—यांना बोलाविलें परंतु पद चिन्हाबद्दल बोलतांना त्यांचें हृदय आवरलें नाहीं व ते निश्चेष्ट पडले! असाच प्रकार दोन-तीनदां झाला. "माझ्या कृष्णास मी पकडलें होतें पण तो मला चुकवून निघून गेला. माझ्या हृदयांतील शून्यता कोण भरून काढील? माझा कृष्ण कोठें आहे? कोणी तरी त्याला भेटवा हो" म्हणून त्यांनीं हंबरडा फोडावा, देह धरणीवर टाकून गडगडा लोळावें व निचेष्ठ पडावें. तें दृश्य पाहून पहाणारांचीं अंतःकरणेंही सद्‌गदित व्हावींत. त्यांना मोठ्या कष्टानें शुद्धीवर आणावें लागे. जिव्हारी बाण लागून घायाळ झालेल्या हरिण शावकाप्रमाणें त्यांच्या हृदयाची अवस्था होती. त्यांनीं ते आवरण्याचा आटोकाट प्रयत्न करावा पण केव्हां हृदयाचा बांध फुटेल याचा नेम नसावयाचा.

रात्रीचा समय होता. विष्णुप्रियेस आपल्या पतीच्या आगमनानें अत्यंत आनंद झाला व पुष्पें व सुगंधी द्रव्यें घेऊन ती शय्यागृहाकडे आली. प्रभूनीं आपलें हृदय प्रयासानें थांबवून ठेविलें होतें. पण आपल्या प्रिय पत्नीस पहातांच त्यांच्या नेत्रांतून आंसवें टपकूं लागलीं. त्या बिचाऱ्या गरीब

मुलीला प्रभूच्या अंतरीची अवस्था काय माहीत. ? तिनें घाबरून शचीदेवीस हांक मारली. शचीदेवींनीं येऊन "बाळा! असा का करतोस? तुला काय रे झालें?" म्हणून तोंडावरून हात फिरवून विचारतांच तो प्रेमाचा कल्लोळ अधिक उचंबळला. शेवटी प्रभु म्हणाले, "आई! श्यामसुंदराचें तें किती मोहक रूप! मला निमिषमात्र आपलें मुख दाखवून तो कुठें ग गेला?" असें म्हणून त्यांनीं त्या रूपाचें वर्णन करावयास सुरवात केली. शचीदेवी आणि विष्णूप्रिया यांना ते शद्ब ऐकतांना एक प्रकारचा अननुभूत आनंद होऊन त्यांचीं हृदयेंही भरुन आलीं.

पाठशाळेंतील विद्यार्थी प्रभूची वाट मोठचा उत्कंठेनें पहात होते. प्रभु त्यांना सोडून गेल्यापासून त्यांचे दिवस युगाप्रमाणें जात होते. प्रभु आल्यावर त्यांना अत्यंत आनंद झाला. नित्याप्रमाणें प्रभु पाठशाळेंत आले. विद्यार्थीगण जमला होता. त्यांनीं आपलीं पुस्तकें उघडलीं व नित्याप्रमाणें सुरवातीस हरिः ॐ म्हणून सुरवात केली. "हरी" शद्ब ऐकतांच प्रभु निश्चल झाले. भोंवतालच्या सर्व परिस्थितीची विस्मृति झाली व शून्य दृष्टीनें पाहूं लागले. "हरीचें नाम किती मधुर आहे" म्हणून त्यांनी बोलावयास सुरवात केली. भगवंताच्या कृपेचें व चरणकमलाच्या सौंदर्याचें वर्णन ऐकण्यांत विद्यार्थीही रंगून गेले. अशा अवस्थेंत २–३ तास केव्हां निघून गेले तें कळलें नाहीं. शेवटीं प्रभूंना आठवण झाली व "आज पहिला दिवस आहे. सुरवातीस भगवंताचें स्मरण झालें हें ठीकच. उद्यांपासून अभ्यास सुरू करूं" म्हणून सांगून ते घरीं परतले. पुढें दुसरे दिवशींही असाच प्रकार घडला. लागोपाठ २–३ दिवस विद्यार्थी "हरी" शद्ब उच्चारतांच प्रभु सद्गदित होऊन हरीच्या मधुर रूपाचेंच वर्णन करीत व अध्यापन बाजूस राही. शेवटीं त्यांनीं सर्वांना एकत्र जमवून सांगितलें कीं– "हें पहा, माझ्या हातून आतां तुमचें शिक्षण होईल असें मला वाटत नाहीं. तेव्हां तुम्ही दुसरीकडे शिक्षण घेण्यास गेल्यास तुमचा फायदा होईल" परंतु विद्यार्थ्यांचीं अंतःकरणें प्रभूच्या संगतीत जडल्या कारणानें त्यांना ती कल्पनाच सहन झाली नाहीं. एक जण उठून म्हणाला, "प्रभु, आम्हांस दूर लोटूं नका. आम्हास शिक्षणास काय करावयाचें आहे? आपला आशिर्वाद

द्या आणि आमच्या अंतःकरणांत भगवत्प्रीतीचा उदय करा." प्रभूंना तें ऐकून कौतुक वाटलें. त्यांनीं त्या मुलास जवळ बोलावून त्यास पोटाशीं घट्ट धरून चुंबन घेतलें. याप्रमाणें प्रत्येकास जवळ बोलावून त्यांनीं पोटाशीं धरून प्रत्येकाचीं चुंबनें घेतलीं. प्रभूच्या स्पर्शानें व चुंबनानें सर्वांचीं हृदयें प्रेमानें भरून आलीं. प्रभु म्हणाले—"आतां आपण निरोप घेण्यापूर्वीं हरिनाम संकीर्तन करूं या." सर्वांना आपल्या भोंवतीं बसून प्रभु मध्यें बसले व त्यांनीं "कृष्ण कृष्ण जय कृष्ण" म्हणून नाम गाण्यास सुरवात केली. सर्व विद्यार्थीही टाळी वाजवून नाम गाऊं लागले. नाम गातां गातां प्रभूच्या नेत्रांतून अश्रूधारा वाहूं लागल्याबरोबर सर्वांच्या नेत्रांतून प्रेमाश्रू वाहूं लागले. कोणी धरणीवर लोळूं लागले, कोणी भगवन्नाम घेतां घेतां नृत्य करूं लागले. हा नामघोष ऐकून आसपासची मंडळी जमा झाली होती त्यांच्या अंतःकरणावर त्या दृश्याचा परिणाम होऊन त्यांनीं प्रभूला साष्टांग प्रणिपात घातले!

## २

सर्वांगी सुवास परी तो उगला न राहे ।
सभोवते तरुवर चंदन करीतची जाये ।।
धणी धाय परी त्याची भुक्ती न धाये ।
सागर भरिता परि त्या सरिता समाये ।।
वैरागरमणी पूर्ण तेजाचा होय ।
भेटता हरळ हिरे करीतची जाय ।।
एका जनार्दनी पूर्ण झालासे निज ।
आपणासारिखे परी ते करीतसे दुजे ।।

—श्रीएकनाथमहाराज.

श्री गौरांगप्रभूचे प्रकृतीबद्दल शचीदेवींना वरचेवर काळजी वाटूं लागली. कृष्णप्रीतीच्या तंद्रीत त्यांना जेवणाचें व स्नानाचें भान रहात नसे. शचीदेवीनीं त्यांना स्नानाचे वेळेस बळेंच उठवून स्नान घालावें लागे.

जेवणाची वेळ झाली म्हणजे पाटावर बसवून भरवावें लागे. नेत्रांतील अश्रूंना तर खंड नव्हता. कृष्णाशिवाय प्रभूच्या बोलण्याचा विषयहि दुसरा नव्हता. आपल्या जिवलगाशिवाय ते इतरांची भेट घेण्यास राजी नव्हते. हृदयांतील प्रेमोद्रेक मोठ्या प्रयासानें आवरण्याचा प्रयत्न करीत पण मधून मधून तो अनावर होई. अशा अवस्थेंत ते केव्हां निश्चेष्ट पडतील याचा नियम नसे. म्हणून गदाधर आदिकरून त्यांचे जिवलग सदैव त्यांच्या सन्निध राहून त्यांच्या प्रकृतीची अत्यंत दक्षता घेऊं लागले. गांवांत प्रभूचा मत्सर करणारे पंडित होते. त्यांनीं प्रभूला वेड लागलें आहे अशी वार्ता प्रसृत केली व शचीदेवींनाहि भय घातलें. त्यामुळें एके दिवशीं शचीदेवींनीं आपल्या पतीचें स्नेही श्रीवास नामक वैष्णव होतें त्यांना बोलावणें धाडलें.

श्रीवास दुरून येतांना पहातांच प्रभु उठून उभे राहिले. पूर्वी याच श्रीवासाची प्रभूनीं कित्येक वेळां थट्टा केली होती. परंतु आतां कोणीही भक्त पाहिला कीं ते आदरानें उठून वंदन करीत. श्रीवासला वंदन करीत असतांच तें निश्चेष्ट पडलें. सावध झाल्यावर प्रभु म्हणाले–"श्रीवास, आपण आलांत हें बरें झालें. आपण माझ्या वडिलांचे जिवलग असून श्रीकृष्ण भगवंताचे प्रियभक्त आहात. मी वेडा झालों म्हणून लोक माझ्या आईस सांगतात. मला कांहींच कळत नाहीं. माझें हृदय मला आवरत नाहीं त्याला मी काय करूं?" तें ऐकून श्रीवास म्हणाले– "शचीदेवी, लोक मूर्ख आहेत. असलें भक्तिप्रेमाचें भाग्य उदयास यावयास अनंत जन्मींची पुण्याईच पाहिजे." याप्रमाणें श्रीवासांनीं शचीदेवीचें सांत्वन केलें. श्रीवासाच्या अंतःकरणास ती प्रभूची अवस्था पाहून चटका लागला. त्यानें प्रभूस नित्य रात्रीं आपल्या घरीं भजनास येण्यास विनंती केली. प्रभूनीं तें कबूल केलें व त्या दिवसापासून श्रीवासच्या घरीं प्रभू व प्रभूचे जिवलग गदाधर, मुरारी, मुकुंद, श्रीमान् इत्यादि मंडळी नित्य रात्रीं जमूं लागली.

रात्रीचा समय किती शांत व स्तब्ध. इतर जनास ती वेळ कोणास निद्रा देणारी, तर कोणास चिंतेचें काहूर उसळविणारी पण भगवद्भक्तांस तीच वेळ प्रभूच्या प्रिय संगमाची भासली. श्रीवासच्या घरांतील त्या रात्री किती मधुर आणि सुखदायी होत्या याची कल्पना करितां यावयाची नाहीं.

प्रभूच्या संगतींत प्रेमळांनीं नित्य अमृतपान करावें. त्यांच्या मुखांतून कृष्ण-कथा ऐकतां ऐकतां सर्वांचें देहभान हरून जावे. कथा सांगतां सांगतां प्रभू कधीं आनंदानें नृत्य करीत. आधींच तें मोहक रूप तशांत तो मोहक आणि दिव्य नाच सुरू झाला कीं प्रभूचे सवंगडी उठून नृत्य करात. कोणी मृदंग घेई, कोणी झांज घेई, कोणी टाळया वाजवी, कोणी भगवंताच्या मधुर गीतांचें गायन करी—अशा या दिव्य नृत्यांत निशा केव्हां ओसरून जाई हें कळत नसे. निशा संपली आणि दिनमणी उदयास आल्यावर सर्वजणांनीं भानावर यावें आणि आपल्या प्रिय रसाचा भंग केल्याबद्दल त्यांनीं दिन-करास दोष द्यावा! अशा गोड भक्तिरसांत रात्रीमागून रात्री जाऊं लागल्या. प्रभूविषयीं श्रीवासादि मंडळींचा आदर व भक्ति एवढी वाढली कीं कधीं त्यांनीं प्रभूची भगवंताप्रमाणें षोडशोपचारें पूजा करावी व प्रभूनींही ती मोठ्या कौतुकानें स्वीकारावी. श्रीवासच्या घरच्या या प्रसंगांनीं प्रभूच्या हृदयांतील प्रेमाचा ओघ व कृष्णतन्मयता वाढतच गेली. त्या तन्मयतेंत त्यांनीं कधीं "माझा कृष्ण पाहिला का? तो मला सोडून कोठें गेला?" म्हणून आर्तस्वरानें पुसावें. कधीं "आज माझ्याकडे कृष्ण येणार" म्हणून शय्येची तयारी करावी, सुगंधी पुष्पें आणावीं आणि उंची वस्त्रांचा पोषाख करून, तासचे तास वाट पहात बसावें. तर कधीं "माझा कृष्ण मजजवळच आहे. त्यास मी घट्ट पकडून ठेविलें आहे कीं त्याला आतां जातांच यावयाचें नाहीं" असें म्हणून त्यानीं हर्षभरानें हास्य करावें! सारांश निरनिराळया अवस्थेंत प्रभूनीं कृष्णसुख भोगावें व आपल्या जिवलगासही त्या सुखाचा वेध लावावा असें घडूं लागलें. श्रीवासाचें घरीं प्रेमळ भक्ताखेरीज इतरास येण्यास मज्जाव असे. प्रभु आंत आले कीं बाहेरील दारें बंद होत. प्रेमरसास लुब्धलेले भृंग तेवढे रसपानांत गुंग व्हावयाचे.

गौरांगप्रभू भजनांत नाचूं लागले म्हणजे त्यांचें देहभान हरपून नेत्रांतून अविरत अश्रुधारा सुरु होत व साऱ्या मंडळींचीही तीच अवस्था होई. त्यांच्या भजनास इतर मंडळीमध्यें एक गृहस्थ येत असे परंतु त्याच्या नेत्रांतून कधीं एकही प्रेमाश्रु श्रवला नाहीं. इतर सारी मंडळी प्रेमांत रंगून सद्गदित होतात पण आपणास प्रेम नाहीं म्हणून त्यास वाईट वाटले

त्यानें एके दिवशी आपल्याबरोबर एका पुडींत मिरपुड आणली व कमरेस ठेवली. सारी मंडळी प्रेमांत रंगण्याच्या वेळीं त्यानें ती मिरपूड बाहेर काढली व आपल्या डोळ्यांत घालावी असा विचार करतो तोंच गौरांग प्रभूंची दृष्टी त्याजवर जाऊन त्यांनीं चटकन् त्याचा हात धरला. हात धरल्याबरोबर तो गृहस्थ अतिशय गांगरला "महाराज ! मला क्षमा करा" म्हणूं लागला. त्यावर गौरांगप्रभूंनीं त्यास घट्ट मिठी मारली व तोंडावरुन प्रेमानें हात फिरवून म्हटलें "बाप्पा ! तूं किती धन्य आहेस. आपल्या ठायीं प्रेम असावें ही तुझी केवढी आस आहे." असें बोलतांना प्रभूंचा कंठ सद्‌गदित झाला. ते पाहून त्या गृहस्थासही प्रेमाचा उमाळा आला. त्याच्या हृदयांतील प्रेम जागें होऊन तोही नित्य भजनांत रंगूं लागला.

गौरांगप्रभूंचें भजन, नामसंकीर्तन त्यांचे शिष्य श्रीवास यांचें घरीं चाले. त्या वेळीं इतरांचा निष्कारण उपद्रव होऊन प्रेमरसांत व्यत्यय येऊं नये म्हणून दरवाजा बंद करण्यांत येत असे. हे वर सांगितलेंच आहे. एके दिवशीं गांवांतील एक उपोषणादि नियम करणारें इसम संधि साधून तेथें येऊन बसलें. नेहमीप्रमाणें भजन वगैरे सुरु झालें पण त्यादिवशीं नेहमी-प्रमाणें भजनास रंग येईना. तेव्हां प्रभूंनीं चौकशी केल्यावर या नवीन इसमाची हकीकत समजली. त्याबरोबर आपल्या एका शिष्यास "यांस बाहेर घालेव" म्हणून आज्ञा केली- त्याप्रमाणें त्या शिष्यानें त्या उपोष-णादि करणाऱ्या इसमास हात धरुन बाहेर जाण्यास सांगितलें. तो इसम मनानें चांगला होता, दुसरा एखादा असतां तर त्याचें मनांत विकल्प येऊन तो तेव्हांच विकारवश झाला असता; परंतु तो अंतःकरणानें चांगला होता त्यामुळें मंदिराबाहेर आल्यावर त्यास वाईट वाटलें व तो स्वतःशी म्हणाला "प्रभूंनीं, मला बाहेर काढलें हें योग्यच झालें. माझ्याकडेच चूक असली पाहिजे. मी हरिभजनांत रंगण्याऐवजीं व्यर्थ उपोषणादि मार्गास लागलो. उपोषणादि व्रतावरच माझें प्रेम आहे. श्रीहरिवर मुळिच नाहीं. प्रभू मी आजपासून सारें सोडीन. उपोषण करुन देहदंडन करणार नाहीं. मजवर कृपा करा." असें म्हणून तो अनुतापयुक्त अंतःकरणानें स्तब्ध राहिला. इकडे गौरांगप्रभूंनीं आपल्या शिष्यास म्हटलें 'जा त्यास अनुताप झाला

आहे– तो भाग्यवंत आहे– त्यास चटकन् बोलावून आण." त्याबरोबर पळत जाऊन त्यानें त्या इसमास बोलावून आणलें. गौरांगप्रभूस पहातांच त्यानें साष्टांग नमस्कार घालून म्हटलें. "प्रभू ! ईश्वरानें दिलेल्या देहाचें दंडण करण्यांत मजकडून अपराध झाला. हा देह मी नित्य भजनांत नाचवीन. मी इतर कांहीं व्रतें करणार नाहीं" गौरांगप्रभूनीं त्यास प्रेमभरानें कवटाळलें व म्हटलें "बाबा ! भक्तीशिवाय इतर साधनें फोल आहेत. अन्य अन्य साधनांनीं आपलें प्रेम घनत्व पावतें हृदय कठीण बनतें व प्रभूप्रीतीचा झरा सुकुन जातो. अहंकर्तृत्वानें प्रेमसुखास मनुष्य आंचवतो. एक हरिनामच पुरें. इतर सर्व वाया दंभधर्म आहेत." नंतर त्या इसमानें सर्व साधनें सोडून प्रत्यहीं तो गौरांगप्रभूच्या संगतीत भक्तिप्रेमसुखाचा आस्वाद घेऊं लागला. प्रेमाची आस नित्य भजनानें भोगणें हेंच जीवनाचें अमृत होय हे त्यास पटलें.

प्रभूच्या संगतींत तत्कालीन अद्वैताचार्य, माधवाचार्य इत्यादि पंडितही भक्त बनले. इतर शेकडों जनांच्या हृदयांत त्यांच्या शद्बानें, स्पर्शानें वा कृपाकटाक्षानें भगवत्प्रीतीचा उदय होऊं लागून श्रीवासच्या घराप्रमाणें इतर घरांतूनही नामसंकीर्तनांचा जयघोष होऊं लागला.

शुक्लांबर नांवाचा एक तपस्वी प्रभूच्या घराशेजारीं रहात असे. प्रभूस तो आपल्या मुलाप्रमाणें मानी व प्रभूची परिचर्या करीत असतां भक्तीची थोरवी त्याच्या ध्यानीं आली. आपल्या तपश्चर्येनें आपणास भगवत्प्रेम लाभलें नाहीं हेंही त्यास कळून चुकलें. शेवटीं एके दिवशीं त्यानें प्रभूची प्रार्थना केली कीं प्रभु मी द्वारावती व मधुपुरीमधील सर्व तीर्थयात्रा करून आलों. मला कृष्णभक्ति द्या ! त्यावर "मधुपुरी व द्वारावतींत कोल्ही व कुत्री काय थोडी आहेत" असें प्रभु म्हणतांच त्यास आपल्या यात्रांचा फोलपणा वाटून अत्यंत अनुताप झाला, तेव्हां प्रभूनीं आपल्या हस्तस्पर्शानें त्याच्या हृदयांतील प्रेम जागृत केलें.

त्यावेळीं श्रेष्ठ भक्त म्हणून नांवाजलेली मंडळी प्रभूकडे आकर्षित होऊन येऊं लागली. चितगांगचे पुंडरीक म्हणून भगवद्भक्त होते. ते

संपत्तिमान् असून त्यांचे अनुयायीही बरेच होते. ते श्रीमंतीच्या ऐश्वर्यांत वागत होते पण हृदयीं कृष्णभक्तीची ज्योत तेवत होती. संपत्ति व हरिभक्ति ही एकत्र नांदू शकतात हें त्यांनीं आपल्या स्वतःचे उदाहरणावरून दाखवून दिलें होतें. त्यांनीं नवद्वीपास येऊन प्रभूच्या चरणीं आपलें अंतःकरण समर्पण केलें.

हरीदास नामक दुसरा एक भक्त होता. तो बुरणचा रहाणार असून मुसलमान होता. तो कृष्णभक्त असून अत्यंत सत्वशील असल्याबद्दल त्याची प्रसिद्धि होती. रात्रंदिवस त्याच्या मुखांतून हरिनाम उच्चाराचा ओघ वहात असे. त्याची नामावर अढळ निष्ठा होती. रात्रंदिवस त्याच्या मुखांतून हरिनाम उच्चाराचा ओघ वहात असे. त्याची नामावर अढळ निष्ठा होती. त्या प्रांतांतील मुसलमान काझीस हें खपलें नाहीं व त्यानें वरील मुसलमान अधिकाऱ्यास हा मुसलमान असून धर्माविरुद्ध वर्तन करतो म्हणून कळविलें. अधिकाऱ्यानें आपलीं माणसें पाठवून हरिदासास पकडून आणलें व त्यास फटके मारण्याची शिक्षा सुनावली. प्रथम धमक्या देऊन पाहिलें परंतु "माझ्या शरिराचे तुकडे तुकडे केलें तरी मी हरिनाम सोडणार नाहीं" अशी निर्धाराची वाणी हरिदासानें उच्चारतांच शिपायांनीं त्यास भर बाजारांत नेऊन फटके देण्यास सुरुवात केली. हरिदासाचा निश्चय ढळला नाहीं. शेवटी हरिदास निश्चेष्ट पडल्याचे पाहून त्यास गंगेंत टाकण्यांत आले. शिपाई निघून गेले. इकडे हरिदास हळू हळू शुद्धीवर आला व सरकत सरकत किनाऱ्यावर आला. हा प्रकार पाहून काझीच्या मनावर परिणाम होऊन त्यानें हरिदासाची क्षमा मागितली. असा हा निष्ठावंत भक्त अद्वैताचार्यांचे संगतींत रहात होता. व हे दोघे मिळून प्रभूकडे येऊन त्यांचे अनुयायी बनले.

एकेदिवशीं प्रभूंनीं आपले शिष्य नित्यानंद व हरिदास यांना हाक मारुन घरोघरीं जाऊन हरिनामाचा उपदेश करण्याबद्दल आज्ञा केली. त्याप्रमाणें ते दोघेही निघाले. प्रत्येकाचे दाराजवळ जाऊन "हरि–कृष्ण" शद्ब उच्चारतांच घरच्या मालकास कोणी भिकारी आहे असें वाटून तो मुठभर तांदूळ घेऊन बाहेर येई. त्यास "आम्हास तांदूळ नकोत. आपण कृपाकरुन हरिनाम उच्चार करा. हीच आमची भिक्षा" असें ते दोघे विनय

पूर्वक विनंती करीत. कांहीं सुस्वभावी इसमावर याचा तात्काल परिणाम होई पण पुष्कळ ठिकाणीं त्यांचा तिरस्कार, उपहास केला जाई. शेवटीं त्या दोघांनी गांवांतील कोतवाल जगन्नाथ व माधव नामक दोन ब्राह्मण बंधू होते त्यांच्याकडे जाण्याचें ठरविलें. हे दोघे अत्यंत दुष्ट, दुराचारी व जुलमी होते. त्यानांच वळविलें म्हणजे मोठा कार्यभाग होईल अशी कल्पना होती. त्याप्रमाणें नित्यानंद व हरिदास मिळून जगन्नाथ व माधव यांचेकडे गेले. कोतवाल हे शाक्तपंथी असून त्यांना वैष्णव पहाताच चीड येई. या दोघांस पहातांच संताप येऊन त्यांनीं दोघांसही हाकून लावले. नित्यानंदास वाईट वाटलें ते हाकून लावले म्हणून नव्हे तर कोतवालाच्या दुष्ट अंतःकरणांत प्रभुप्रीती कशी जागृत होईल याबद्दल. परत आल्यावर गौरांगप्रभू जवळ त्यांनी दोघा कोतवालावर कृपा करण्याबद्दल विनवणी केली. प्रभूंना त्यांचें सहृदयतेचें कौतुक वाटून संकीर्तनाचा मेळा घेऊन कोतवालाचें घरीं जावयाचें ठरलें. एके दिवशी भक्तगणांच्या समवेत नाम गात गात प्रभूची स्वारी जगन्नाथ व माधव यांच्या वसतिस्थानाकडे निघाली. नित्यानंद सर्वांच्यापुढे मोठ्या आनंदानें नृत्य करीत चालले होते व प्रभूची स्वारी मध्यभागीं होती. रात्रभर ख्यालीखुशाली व सुरापान करून दुपारी कोतवालाच्या स्वाऱ्या झोप घेत पडल्या होत्या. झांज मृदंगाच्या व नाम स्मरणाच्या जयघोषानें त्यांचे झोपेंत व्यत्यय आला. त्यांना डोळे उघडून पाहिले तो वैष्णवांचा मेळा आपणाकडे येत आहे असें दिसलें व सर्वांत पुढे नित्यानंदास पाहिल्यावर त्यांचा संताप वाढला. या वैष्णवांची चांगली खोडच मोडली पाहिजे म्हणून ते दोघे त्वेषानें धावत आले. माधवनें तर खाली पडलेला रांजणाचा काठ उचलून नित्यानंदाचे कपाळीं मारला. त्यासरशी नित्यानंदांचे कपाळांतून रक्त वाहू लागले. प्रभू समुदायाच्या मध्यभागीं होते. त्यांना ही बातमी कळवितांच ते त्या जागीं आले. “या निःशस्त्र व निरपराधी साधूवर हल्ला करुन तुला काय मिळणार ? ते तुझी सेवा करण्यास्तव आले आणि तूं त्यांना दुखापत करतोस ?” प्रभूची ही वाणी ऐकून व दिव्यमूर्ती पाहून जगन्नाथ व माधव दोघेही वरमले. त्यांना कृतकर्माचा पश्चात्ताप झाला व त्या क्षणापासून ते वैष्णव बनले. नित्यानंदाचा आनंद तर गगनांत मावेना.

नवद्वीपांत नामसंकीर्तनाचा अधिकच प्रसार झाला. सर्व जातीच्या व सर्व वर्णाच्या लोकांना ती एक पर्वणीच होती. ते आनंदानें मनमुराद नाचू गाऊ लागले. जुन्या समजुतीच्या ब्राम्हण पंडितांना हें रुचलें नाही. त्यांना आपलें महत्व कमी झालें असें वाटून त्यांनीं प्रभूचा मत्सर अधिकच करण्यास सुरुवांत केली. प्रभूच्या संगतींत अद्वैताचार्यासारखी साठीं उलटलेली माणसे सुद्धां बालाप्रमाणें वागत. प्रभू तर आपल्या भक्त मंडळींत अत्यंत मोकळेपणानें व मुलाप्रमाणें खेळीमेळीनें वागत. स्नानास गेले म्हणजे प्रभूनीं सर्वांच्या अंगावर पाणी उडवावें उलट भक्तानींही प्रभूच्या अंगावर पाणी उडवून यथेच्छ जलक्रीडा करावी. नाचणें, धावणें याला तर सीमाच नव्हती. परंतु कोणत्याही वेळीं ते प्रभूचा अनादर करीत नव्हते. त्यांचा आदर भाव वृद्धींगतच होत होता. कर्मठ पंडितांचा मात्र जळफळाट होऊ लागला. त्यांनी कोतवालच्याही वरचा अधिकारी चांद काझी नांवाचा मुसलमान होता, त्याजकडे जाऊन त्याची कानभरणी केली. चांद काझीनें आपली माणसे पाठवून संकीर्तनें बंद करण्याचा प्रयत्न केला. परंतु एका ठिकाणीं बंद झाली की दुसऱ्या ठिकाणी सुरु होत व संकीर्तनें बंद करणें जवळ जवळ अशक्य झालें. तेव्हां काझी स्वत: शेकडो पठाण घेऊन आला व पठाणाकडून लोकांना अत्यंत उपद्रव होऊ लागला. प्रभूकडे भक्त मंडळी येवून गाऱ्हाणीं सांगू लागली तेव्हां त्यांनीं "नामसंकीर्तन बंद करु नका. श्रीकृष्ण पाठिराखा आहे भिऊ नका." म्हणून आश्वासन दिलें व "आज रात्रीं आपण गांवांत सर्व ठिकाणीं संकीर्तन करुं" असें म्हटलें. ही बातमी सर्व वैष्णवांना तावडतोब समजल्याबरोबर दुपारपासून जनसमुदाय प्रभूकडे लोटू लागला. प्रत्येकानें हातात दीप व प्रभूकरिता पुष्पहार आणला होता. आपली मुलेंबाळें व सेवकवर्ग यासह सर्व मंडळी जमू लागली.

गांवांतील स्त्रीपुरुषांना प्रभूच्या संकीर्तनाचें प्रिय दर्शन होणार म्हणून अत्यानंद झाला. घरोघरीं सर्वांनी मंगल पल्लव लावले. मंगल चिन्हें म्हणून दारांत गंगाजलाचे कुंभ भरुन ठेवले. रस्त्यांत सडे व रांगोळ्या घातल्या. स्त्रियांनीं प्रभुदर्शनास्तव उत्तम अलंकार व उंची वस्त्रें परिधान केली. दारोदारीं दीप लावल्यामुळें जणु दीपावलीच आहे की काय असा भास होऊ लागला.

२०४०७ दि. ... ९०७३ नों: दि: ९.३.१९५६

सायंकाळपर्यंत प्रभूच्या निवासस्थानीं जनसमुदायाची अलोट गर्दी झाली. प्रभू आपल्या विश्रांतीगृहांत बसले होते. गदाधर, नरहरी आदि करून प्रभूला वस्त्रें लेववीत होते. नववधू आपल्या सख्यांनीं परिवेष्टित असावी त्याप्रमाणें प्रभू शोभू लागले. होय, ते कृष्णभगवंताची प्रियाच होते. प्रभूना आपल्या मनाजोगतीं वस्त्रें व भूषणें घातल्याखेरीज बाहेर न्यावयाचें नाहीं असे त्यांच्या जिवलगांनीं ठरविलें. त्याप्रमाणें प्रभूला त्यांनी मौल्यवान रेशमी पीतांबर नेसविला व रेशमी वस्त्र पांघरविलें. प्रभूचा लांब व सडक केशकलाप विंचरुन त्यास सुगंधी तेलें लाविली. त्या केशकलापास गाठ मारून त्यावर पुष्पांचा छोटासा हार घातला. बकुलपुष्पांचा सुंदर हार तयार करुन प्रभूच्या गळयांत घातला व तो प्रभूच्या पायापर्यंत रुळू लागला. प्रभूच्या ललाटीं केशरकस्तुरीचा तिलक लाविला. आधीच प्रभूचें सौंदर्य, त्यांत सुंदर वेषभूषा—त्यामुळें प्रभूचें लावण्य मदनासही लाजविणारें भासू लागलें.

प्रभू उठून अंगणांत आले. त्यांचें सौंदर्य पाहून भक्तजनांच्या नेत्रांतून आनंदाश्रु वाहू लागले. प्रभूनीं सभोवार पाहिलें तो सारेजण सुंदर पोषाख व वैष्णवी मुद्रा धारण करुन मोठया आनंदानें व औत्सुक्यानें उभे होते. कोणी हातांत मृदंग, कोणी करताल घेतले होते. कोणी आपल्या पायांत नादमधुर असे सुकुमार चाळ बांधले होते. तो सर्व देखावा पाहून प्रभूंनीं मंदस्मित केलें. त्याबरोबर सर्वांनीं "हरिबोल" चा जयजयकार केला. नंतर प्रभूनीं भजनी मंडळींचे निरनिराळे मेळे केले. शेवटच्या मेळयांत प्रभू स्वत: उभे राहिले व मिरवणूक चालू झाली. झांज मृदंगाचा ध्वनी, कृष्णाची मधूर गीतें यांच्या नादांत प्रभूचें दिव्य नृत्य पहावयास मार्गावर हजारो लोक जमले. प्रभूवर सारखा पुष्पांचा वर्षाव होऊ लागला. कोणी प्रभूप्रमाणेंच नाचू लागले तर कोणी भूमीवर गडबडा लोळू लागले. परकी लोक एकमेकास जीवलगाप्रमाणें दृढ आलिंगन देऊ लागले. तर कोणी हा भूवैकुंठीचा सोहळा पाहून वीरश्रीनें दंड थोपटून यमराजास आव्हान देऊ लागले ! ज्या काजीनें संकीर्तनास विरोध केला त्याची या आनंदाचे भरांत कोणासच स्मृती राहिली नाहीं.

चांद काझी गांवाबाहेर रहात होता. हळुहळू त्या दिशेनें मिरवणूक निघाली. काझीनें दुरुन लखलखाट पाहिला. त्यास वाटलें कीं ही एखाद्या लग्न समारंभाचीच मिरवणूक असावी. परंतु मिरवणूक जसजशी जवळ येऊ लागली व झांज मृदंगाचा ध्वनी कानावर येऊ लागला तसतशी त्यास हा भजनी समूह आहे अशी खात्री पटली. त्याबरोबर त्यानें क्रोधाविष्ट होऊन आपणाजवळचे शिपाई पाठवून दिले. ते अफाट जनसमूहांत गडप होऊन परतले नाहींत तेव्हां त्यानें आणखी मंडळी पाठविली. त्यांचीही तीच अवस्था झाली. तेव्हां त्याच्या मनास भय वाटून तो आपल्या घरांत जाऊन दडून बसला. इतक्यांत सर्व जनसमूहानें काजीचें घरास गराडा घातला. पण प्रभूंनीं तेथें येऊन काजीस आश्वासन देऊन बाहेर बोलाविले. काजोची भीती कमी होऊन तो बाहेर आला. प्रभूच्या प्रेमळ दर्शनानें त्यांचें अंत:करण द्रवलें व भलत्याचें ऐकून आपण त्रास दिला म्हणून त्यानें अत:पर आनंदानें कोणीही संकीर्तन करावें, म्हणून परवानगी दिली, इतकेंच नव्हे तर त्यानें स्वत: संकीर्तनाचे मेळाव्यांत भाग घेतला.

अद्वैताचार्य हे वयोवृद्ध जाडे पंडित होते. त्यांचा उल्लेख मागें आलेलाच आहे. प्रभूच्या संगतीचा परिणाम होऊन ते नामसंकीर्तनांत नृत्यही करूं लागले. परंतु पूर्वीचे पांडित्याचे संस्कार त्यांना वरचेवर ओढीत व त्यांना वाटे कीं–आपण असें वेडयासारखें गातों, नाचतों हें बरें नाहीं. शिवाय त्यांत त्यांची पढलेली विद्याही नाहींशी होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. तेव्हां त्यांची द्विधावृत्ती होऊन त्यांनीं गांवांतून पाय काढला व ते शांतीपूरला जाऊन राहिले. हें प्रभूना समजल्यावर प्रभूची स्वारी नित्यानंदासह एके दिवशीं अकस्मात् शांतीपुरांतील अद्वैताचार्यांच्या घरीं जाऊन त्यांचेसमोर उभी राहिली. "आचार्य भक्ति श्रेष्ठ कीं ज्ञान श्रेष्ठ ?" म्हणून प्रभूंनी एकदम प्रश्न विचारतांच "ज्ञान श्रेष्ठ" असे शब्द अद्वैताचार्यांचें मुखांतून बाहेर पडलें. त्यासरशीं प्रभूनीं एकदम अद्वैतांना पकडून बुक्या मारण्यास सुरुवात केली. या प्रकारानें भोंवतालची मंडळी थक्क झाली व मध्यें पडण्याचें कोणास धारिष्ट झालें नाहीं. अद्वैताचार्यांची वृद्ध पत्नी सीताबाई गलबला ऐकून तेथें आली. तिलाही आश्चर्य वाटलें.

१०८८

अद्वैताचार्यांच्यावर बुक्यांचा वर्षाव होत होता. पण कण्हण्याचा अगर दुःखाचा एकही सुस्कारा ऐकूं न येतां उलट त्यांच्या मुखांतून "प्रभू तुम्हीं किती कृपाळू आहांत" म्हणून प्रेमादराचे उद्गारच ऐकूं येत होते व त्यांचें मुखावरील चर्येवरुन ते अननुभूत आनंदाचा आस्वाद घेत असावेत असें दिसलें ! लोकदृष्टीस बुक्या पण वास्तवीकरीत्या तो संशयाचो विच्छिन्नता करणारा प्रेमामृताचा वर्षावच होता. कांहीं काळानें प्रभु थांबले तेव्हां अद्वैताचार्यांनीं प्रभूला प्रणिपात करून "प्रभु, मी तुम्हाला सोडलें पण तुम्हीं मला सोडलें नाहीं. माझी आठवण ठेऊन मजवर कृपा केली याबद्दल मी तुमचा उतराई कसा होऊं" म्हणून नेत्रीं आंसवें आणिलीं. प्रभूंनीं त्यांना अधिक बोलूं न देतां जेवणाची तयारी करावयास सांगितली. सर्व जण आनंदानें एका पंक्तीस जेवले व नंतर प्रभूनीं अद्वैताचार्यास परत नवद्वीपीं आणलें.

## ३

**अभक्ताचे गांवीं साधु म्हणजे काय । व्याघ्रवाडा गाय सांपडली ।।**
**मोतियाची गोणी माळे आळी नेली । पुसती केवढया केली**
**पासरी हे ।। तुका म्हणे खीर केली कान्हेळचाची ।**
**शुद्ध गोडी कैंची वसे तेथें ।। —श्रीतुकोबाराय**

कृष्णानंद म्हणून प्रभूंचा एक सहाध्यायी होता. शिक्षणक्रम संपल्यावर तो तांत्रिकांचा पुढारी बनला होता व आगमवागीश अशी पदवीही त्यास मिळाली होती. अलीकडे बऱ्याच वर्षांत त्यानें प्रभूस पाहिलें नव्हते मात्र त्यांचा नावलौकिक ऐकिला होता. तंत्रमार्ग हा वाममार्ग असून तो भक्तिमार्गाच्या अगदी विरुद्ध असल्यामुळें कृष्णानंद हा प्रभूस व त्यांच्या अनुयायास तुच्छ लेखीत असे. एके दिवशीं त्याच्या मनानें आपण प्रभूकडे समक्ष जाऊन वादविवाद करावा असें घेतलें व त्याप्रमाणें तो प्रभूकडे आला. प्रभू भक्तमंडळींनीं परिवेष्टित होते. या सर्वांच्या देखत प्रभूंना जिंकून त्यांचा कमीपणा करता येईल म्हणून त्यास हर्ष झाला. परंतु प्रभू त्या समयी निराळ्याच अवस्थेंत होते. त्यांची वृत्ति राधामय झाली होती. कृष्ण भगवान् मथुरेस गेल्यामुळें हृदय विरहाग्नीनें व्याकूळ झालेलें होतें. प्रभूंचें

मुखमंडल पहातांच कृष्णानंदाची वादविवादाची इच्छाच माहींशीं झाली परंतु प्रभूंना उपदेश करावा असें त्यास वाटलें व त्याप्रमाणें त्यानें बोलण्यास सुरुवात केली. इकडे प्रभूंना वाटलें कीं हा कोणी भगवंताचा दूतच मथुरा नगरींहून आला आहे व आपणास मथुरेस चलण्याबद्दल आग्रह करीत आहे. गोकुळवासी राधेस टाकून ज्या मथुरेस कृष्ण भगवान गेले त्या मथुरेचें नांवही राधेस नको होते. मथुरेच्या प्रत्येक व्यक्तीबद्दल तिला द्वेष वाटूं लागला होता. तेव्हां राधामय बनलेल्या प्रभूनीं कृष्ण भगवंताच्या दूताची निर्भत्सना केली इतकेंच नव्हे तर आपणांस विरहांत सोडून गेल्याबद्दल पाषाणहृदयी व कठोर कृष्णासहि दोष दिला. कृष्णानंदास यांतलें कांहींच समजलें नाहीं. प्रभू कृष्णास दोष देत आहेत असें वाटून त्यानें असें न करण्याबद्दल उपदेश करण्यास सुरवात केली. तेव्हां प्रभू त्यास "चालता हो. मला त्या कृष्णाचें तोंड पहावयाचें नाहीं." म्हणून त्याचें अंगावर धावले तेव्हां कृष्णानंद घाबरून पलायन करता झाला!

कृष्णानंद व त्याचे अनुयायी यांना प्रभूविषयीं मुळचा अनादर होताच परंतु तो व्यक्त करण्यास आजवर संधि मिळाली नव्हती. ती वरील प्रसंगानें आयतीच मिळाली. ते म्हणू लागले "पहा, कांहीं दिवसापूर्वी ज्याला पोट-भर अन्नसुद्धां मिळावयाची पंचाईत होती त्यालाच लोक आतां देव समजूं लागले आहेत. त्याचा थाटमाट करून देव्हारे माजवू लागले आहेत. काय हा लोकांचा खुळसटपणा." कांहींजण तर नुसत्या निंदेवरच गप्प न राहातां प्रभूस संधि साधल्यास दुखापत करण्याचा बेत करूं लागले!

सज्जनांच्या मूर्ति डोळ्यांपुढें प्रत्यक्ष वावरतात त्या वेळेला जनतेला त्यांची किंमत कळत नाहीं. कोणाही सत्पुरुषांचें जीवन चरित्र पाहिलें तर आपणास त्यांचा थोरपणा न सहन झाल्यामुळें त्यांचा छळ झाल्याचें उदा-हरण सांपडतें. मग त्या छळानें व मत्सराचें स्वरूप निराळें असूं शकेल, प्रभूचें चरित्र या नियमास अपवाद कसा असूं शकेल? प्रभूंना भक्तजन देवासमान मानीत होते. आपल्या आवडत्या अशा उच्च वस्तु प्रभूंना समर्पण करण्यांत येत होत्या, त्यामुळें प्रभूचें घरचें ऐश्वर्य सामान्य मनुष्याचे डोळे दिपविणारे होते. मूल्यवान् वस्त्रें परिधान करून प्रभूची स्वारी बाहेर

पडली म्हणजे एखाद्या राजपुत्राहून ऐश्वर्यशाली दिसत असे. अंतःकरणांत भक्तीचें ऐश्वर्य व त्याला साजेलसें बाह्य ऐश्वर्य पाहून प्रेमळांचीं अंतःकरणें गहिंवरून येत, परंतु विकारी अंतःकरण असलेल्या लोकांचा जळफळाट होई. अशा स्थितींत वर सांगितलेला प्रसंग घडला त्या वेळेस कृष्णानंद भिऊन न पळता जर उलट प्रभूच्या अंगावर धावला असता तर द्वेषी लोकांना आनंदच वाटला असता!

प्रभूच्या अंतःकरणाची स्थिती मात्र अगदीं उलट होती. प्रभू कृष्ण विरहाकुलतेनें प्रत्यक्ष राधाच बनले होते. त्यांना भानावर आणण्यास प्रिय-जनांनीं केलेले सर्व उपचार व्यर्थ गेले परंतु कृष्णानंद जेव्हां ओरडून पळूं लागला तेव्हां त्या ओरडण्यानें प्रभू भानावर आले. बावरल्यासारखे होऊन त्यांनीं हातांतील काठी फेकून दिली व "काय हा माझा वेडेपणा" म्हणून दुःखाकूल होऊन खालीं बसले. त्यांनीं कोणाशीं संभाषण केलें नाहीं व दृष्टीहि वर केली नाहीं. अशा शोकाकुल अवस्थेंत कांहीं काल गेल्यावर प्रभू उठून चालू लागले. प्रभूंचे जिवलग त्यांच्या मागून जाऊं लागले. प्रभू गंगातटाकीं येऊन बसल्यावर सारेजण त्यांच्याभोंवती बसले. प्रभू विचारमग्न होते. इतक्यांत ते मोठ्यानें हंसूं लागले. परंतु त्या हंसण्यानें आनंद वाटण्या-ऐवजी प्रभूंच्या भक्तजनांना आश्चर्य व भीतीच वाटली. कारण असलें हास्य त्यांनीं प्रभूच्या मुखावर कधींच पाहिलें नव्हते. प्रभूचें नेहमींचे सभोंवार आनंदाच्या उर्मी उसळविणारे मंदस्मित कोणीकडे आणि आजचें हे हृदयव्यथा लपविण्याचा प्रयत्न करणारें विकट हास्य कोणीकडे? थोड्याच अवधींत हंसणें थांबलें. "रोगापेक्षां औषधच अधिक अपायकारक ठरलें" असे शब्द प्रभूच्या मुखांतून बाहेर पडले. जणू प्रभू स्वतःशींच बोलले. कांहीं वेळानें तेथून उठून ते हळूहळू घरीं परतले. अशा अवस्थेंतच कांहीं काळ लोटला.

प्रभूनीं उच्चारलेल्या शब्दाचा अर्थ कोणास उमगला नाहीं. भक्त-जनांत या विषयीं तर्क सुरू झाले. मुकुंद म्हणाला "मला असें वाटतें कीं प्रभू आपणास सोडून जाणार" त्यावर सर्वजण म्हणाले "छे, प्रभूशिवाय आमचें जीवन रहाणें अशक्य आहे. प्रभूचें आपणावर जर अलोट प्रेम आहे

तर तें असें कधीं करावयाचें नाहींत." त्यावर "प्रभूंचें अंतःकरण प्रभूंनाच माहीत" असें मुकुंदनें उत्तर दिलें.

एके दिवशीं एकान्तांत असता प्रभू नित्यानंदास म्हणाले– "निताई, गांवांतील लोकांचा काय प्रयत्न चालला आहे तुला माहीत आहे? संधी साधून मला मारण्याचा त्यांचा विचार आहे. तूं ऐकलें नाहींस का?" निताईनें दुःखानें मान खालीं घातली. त्यानें तें ऐकलें होते पण तो कांहीं बोलला नाहीं. तेव्हां प्रभू म्हणाले– "अशा परिस्थितींत मी काय करूं तें मला सांग." निताईस कांहीं उत्तर देतां आलें नाहीं तेव्हां प्रभू म्हणाले– "याला उपाय म्हणून मी एक योजना ठरविली आहे. संन्यास स्वीकारून मी मजविरुद्ध कट करणारांच्या दाराशीं भिक्षा मागणार आहे. त्यायोगानें ते माझा द्वेष करणार नाहींत इतकेंच नव्हे तर हरिनामाचा स्वीकार करतील." या शब्दांनीं निताईचें सर्वांग थरारलें. तो कंपित स्वरानें म्हणाला, "प्रभु, आमचा त्याग करूं नका. तुमच्या विरुद्ध कारस्थान करणारे लोक पशु आहेत." प्रभूंच्या निश्चयानें निताईस अत्यंत दुःख झालें. प्रभूंनीं संन्याशाचा वनवास भोगावयाचा या कल्पनेनें त्याचें हृदय फुटून गेलें. शचीदेवी व विष्णुप्रिया यांची काय अवस्था होईल या विचारानें तर त्याच्या अंतःकरणानें ठाव सोडला. त्यानें कोणाजवळ ब्रही काढला नाहीं परंतु त्या क्षणापासून त्याच्या डोळ्याचें पाणी खळलें नाहीं.

शचीदेवीना अगोदरपासूनच भीति वाटत होती. आपला थोरला मुलगा विश्वरूप गेल्यापासून त्यांना धाकटचा मुलाबद्दल तीच शंका येत होती. विश्वरूपानें घर सोडण्यापूर्वी घरीं एक पोथी ठेवून ती पुढें प्रभूंना देण्याबद्दल कळविलें होते. ती पोथीसुद्धां शचीदेवीनीं अग्नीच्या मुखांत अर्पण केली. न जाणो ती पोथी वाचून आपल्या धाकटचा मुलास गृहत्यागाची इच्छा होईल. अलीकडे भक्तजनांची चिंतातुर वदनें व प्रभुंच्या मनोवृत्तींत झालेला पालट यामुळें शचीदेवींची चिंता अधिकच बळावली. एकदां त्यांनीं प्रभूस एकांतीं गांठून म्हटलें–" निमाई, माझा सर्व जीवभाव तुझ्यावर आहे. तुझ्याकडे पाहून मी पति आणि पुत्र वियोगाचें दुःख सहन केलें, तूं क्षणभर दृष्टीआड झालास तर माझा जीव घावरा होतो. मला सोडून कोठें जाऊं नकोस वरें"

आईचें शब्द ऐकून प्रभु गहिंवरले. ते म्हणाले "आई, माझ्या मनांत कृष्ण-भगवंताचे भेटीस वृंदावनास जावें असें आहे. पण मी तुझ्या परवानगीशिवाय कोठें जाणार नाहीं." या उत्तरानें शचीदेवींना कांहीं काल समाधान वाटलें. तिला माहीत होतें कीं प्रभु कधीं खोटें बोलणार नाहींत.

परंतु शचीदेवींचें हें समाधान फार दिवस टिकलें नाहीं. कांहीं दिवसांनी प्रभूंनीं आपला हेतु त्यांच्याजवळ उघड केला. प्रभूंनीं त्यांना सर्व परिस्थिती समजाऊन सांगितली. व इतक्या आर्जवीपणानें विनवणी केली की शचीदेवीनीं अखेर त्यांना परवानगी दिली. शेवटीं त्या म्हणाल्या; "बाळ विष्णुप्रियेचें कसें होणार?"

प्रभु म्हणाले "आई मी तिच्या परवानगीवाचून कांहीं करणार नाहीं"

त्या क्षणापासून प्रभू सर्वांशी अत्यंत प्रेमानें व नियमितपणें वागू लागले. वेळच्या वेळी खाणें, पिणें, निद्रादि व्यवहार सुरू झाले. प्रत्येक जिवलगाच्या घरीं जाऊन त्यास प्रभूनीं पोटाशी धरावे, प्रेमभरानें गळयांत गळा घालून त्याजकडून परवानगी मिळवावी असा क्रम सुरू झाला. विष्णुप्रिया त्या समयास माहेरी गेली होती. तिच्या कानीं प्रभूंच्या हेतूची वार्ता कळतांच ती तातडीनें सासरी येण्यास निघाली. घरी पोहोंचण्यास दिवस मावळून गेला होता. प्रभू लवकरच जेवण आटोपून झोपल्याचें तिला आढळून आलें. तिनें चटकन आपलें जेवण उरकलें व हातांत, तांबुलाचें साहित्य, चंदनाची उटी व पुष्पमाला घेऊन शय्यागृहांत प्रवेश केला. प्रभू मंचकावर गाढ झोपले होते. तें पाहून तिची किंचित निराशा झाली परंतु आपल्या स्वामीस नित्य जाग्रण घडतें व आज तरी सुखनिद्रा आली म्हणून तिला एक प्रकारचा आनंदही वाटला. पूर्ण चंद्रासही लाजविणाऱ्या प्रभूंच्या त्या शांत मुखमंडलाकडे तिची दृष्टी खिळून राहिली. सर्वांगावर हर्षभरानें रोमांच उभे राहिले. कांहीं वेळानें ती मंचकावर प्रभूच्या पदयुगला समीप बसली. प्रभूंचीं पदकमलें तिनें आपल्या अंकावर घेतली. व हळू हळू आपल्या सुकुमार करांनी प्रभूंची निद्रा न मोडेल अशा बेतानें चुरू लागली. प्रभूंची ती पाउलें म्हणजे पूर्णपणें उमललेलीं दोन कमलपुष्पेंच होत असें विष्णुप्रियेस

वाटलें. त्या पाउलांचें तिनें अनिमिष नेत्रानें कांहीं काळ प्राशन केलें. मग अवधाण करून आपलें मस्तक हळुवारपणें त्यावर ठेवून अत्यंत भक्ति-भावानें वंदन केलें. "आपलें केवढें भाग्य" असें मनांत येऊन तिचें हृदय भरून आलें व अखेर नेत्रावाटें अश्रूंचा पूर वाहू लागला!

अश्रुबिंदूंच्या स्पर्शानें प्रभू जागे झाले. आपल्या पाउलाजवळ विष्णु-प्रिया बसून रुदन करीत आहे असें पाहून त्यांनीं चटकन् उठून तिला पोटाशी धरिले व "प्रिये, कां बरे रडतेस" म्हणून विचारलें. त्या प्रेमळ शब्दांनीं विष्णु-प्रियेस अधिकच गहिवरून आलें. व तिच्या मुखांतून शब्द निघेना. शोकावेग ओसरल्यावर ती म्हणाली "मी ऐकतें तें खरें का?" प्रभूंनीं तिचा आशय चटकन ओळखला. परंतु सुखसमयीं दुःखवार्ता नको म्हणून ते म्हणाले "लोक काय म्हणतात त्याला तुला काय करायचे?" प्रभूंच्या आश्वासनानें विष्णुप्रियेस धीर वाटला. प्रभूंची आनंदी मुद्रा पाहून तिला अत्यंत समा-धान वाटलें. तिच्या हृदयांतील सर्व कल्पना नाहीशा होऊन प्रभूच्या प्रिय संगमाच्या सुखांत ती पोहूं लागली. परंतु हा निर्विकल्प आनंद दीर्घकाल चाखण्याचें तिच्या ललाटीं नव्हतें. कांहीं तासच या आनंदांत गेले. प्रभू बाह्यांगानें स्मित करीत होते. आपणास सर्वस्वी जीवनाधार मानणाऱ्या प्रियकरणीस सोडून जावें लागणार या कल्पनेनें त्यांचें हृदय व्यथित झालें होते. ही व्यथा विष्णुप्रियेच्या कोमल हृदयापासून लपून राहू शकली नाहीं. "प्रिया, आपण कां रडतां?" तिनें एकदम विचारले. "छे, मी तर हसत आहे" प्रभू म्हणाले, पण तिचा विश्वास बसेना व ती हट्टच घेऊन बसली. शेवटीं प्रभूंनीं आपल्या हृदयाचा निश्चय तिला उघड केला. विष्णुप्रियेस वाटलें की आपल्या मस्तकावर वीजच कडाडून पडत आहे. परंतु प्रभूंनीं आपल्या प्रियशक्तीनेंच सावरलें म्हणून ती निश्चेष्ट पडली नाहीं." शेवटीं "जगतास हरिनामाची गोडी लावण्याच्या कामास तू मला यावेळीं सहाय्य कर व मला परवानगी दे" म्हणून प्रभूनीं म्हटल्यावर विष्णुप्रियेचें अंतःक-रण पालटलें व प्रभूंना आपल्या प्रियपत्नीची परवानगी मिळाली!

याप्रमाणें सर्वांशी प्रभू गोडीनें व आनंदानें वागू लागले. त्यांच्या वागणुकीमुळें साऱ्या मंडळींना प्रभू आपला त्याग करणार आहेत याचा

सुद्धा विसर पडला. कित्येक असें सुद्धा म्हणू लागले कीं प्रभूचा निश्चय आचरणांत येण्यास अद्याप पुष्कळ वर्षे अवधि आहे. शचीदेवींनीं नित्य नित्य प्रभूंला आवडते पदार्थ स्वहस्तें करून घालावेत व स्वत: जेवतांना जवळ बसून आग्रहानें पोटभर खाववावेत. विष्णुप्रियाही प्रभूंच्या प्रेमळ संगतींत विरहाची कल्पना विसरून गेली व प्रभूच्या सेवेंत काल घालवू लागली. याप्रमाणें कांहीं काल गेला.

परंतु प्रभूंनीं आपला दिवस ठरवून ठेविला होता. एके दिवशीं ते नित्याप्रमाणें उठले. नित्याप्रमाणें स्नानादि आटोपून आहार केला. आपल्या जिवलगाबरोबर आपल्या प्रियकर गोपाळकृष्णाच्या गोड गोड गोष्टी केल्या. दुपारी ऊन उतरल्यावर सुंदर पोषाख करून गांवांतून एक फेरी टाकली आपण बालपणीं ज्या ठिकाणी खेळलों, ज्या ठिकाणीं आवडत्या विद्यार्थ्यांना शिकविलें तीं स्थानें त्यांनीं डोळे भरून पाहिलीं. प्रभूंच्या अंगावर सुंदर रेशमी वस्त्रें होती. भक्तजनांनीं त्यांना पुष्पांचे हार घातले. प्रभूस पहावयास नागरिक स्त्रीपुरुषांची गर्दी होऊन प्रभूस भक्तिभावानें वंदन करून लोक आपापल्या कार्यास लागत. प्रभूची स्वारी फिरत फिरत गंगातटाकीं आली. याच तटाकीं प्रभू नित्य स्नान करीत. या जागेवर प्रभूच्या आयुष्यांतील अत्यंत सुखाचे क्षण गेले होते. बालपणीं व विद्यार्थीदशेंत याच जागेवर प्रभूंनीं खेळ आणि खोडया केल्या होत्या. पुढे याच जागेवर केशव मिश्रासारख्या जाडया पंडिताचा गर्व हरण केला. याच जागेवर आपल्या जिवलगाबरोबर प्रियकृष्णप्रभूच्या मधुर कथा संलापात दिवसच्या दिवस घालविले होते. त्याच जागेवर प्रभू आपल्या सवंगडयासह कांहीं वेळ बसले. प्रभूच्या मनांतील निश्चय मात्र कोणास माहीत नव्हता. प्रभू आपणास उद्याच सोडून जाणार ही कल्पना कोणासही शिवली नाहीं. प्रभूंनीं गंगानदीच्या प्रशांत प्रवाहाकडे व तीरावरील वृक्षराजी, फळें, फुलें, पक्षी यांच्याकडे नजर टाकून जड अंत:करणानें सर्वांचा निरोप घेतला.

सायंकाळ झाली तेव्हां प्रभू घरीं परतले. ज्या गच्चीवर ते नेहमी बसत त्या ठिकाणीं आपल्या जिवलगाबरोबर कांहीं काळ बोलत बसले. प्रभूंनी शचीदेवीस आपले आवडते जिन्नस करावयास सांगितलें होतें. ते तयार

करण्यांत ती गुंतली. इकडे लोकांच्या झुंडी प्रभूंच्या दर्शनास येऊं लागल्या. कोणी पुष्पहार, कोणी फळें, कोणी लोणी, दूध अगर मेवामिठाई प्रभूपुढें ठेवून वंदन करीत. प्रभू सर्वांना " गोपाल कृष्णास विसरूं नका. सतत त्याचें नामगायन करा " म्हणून सांगत. व त्या शद्बांनीं प्रत्येकाचें हृदय द्रवत असे. मध्यरात्रीचा समय झाला. मंडळीची येजा बंद झाली तेव्हां प्रभूंनीं आपल्या जिवलगांना दृढ आलिंगन देऊन घरोघर पाठविलें. शचीदेवी वाट पहात होत्या. प्रभू भोजनास बसले तेव्हां त्यांनीं प्रभूंची आवडती पक्वान्नें वाढली व स्वत: जवळ बसून प्रभूंना पोटभर खाण्याचा आग्रह केला. प्रभूंनीही आपल्या प्रिय मातेबरोबर मधुर गोष्टी बोलतां बोलतां सर्व पदार्थ मोठ्या आवडीनें सेवन केलें. भोजन झाल्यावर प्रभूंनीं शचीदेवीचा निरोप घेतला. व शय्यागृहांत प्रवेश केला. प्रभूंच्या प्रेमळ व आनंदी वृत्तीमुळें प्रभू आपणास सोडून जाणार आहेत ही कल्पनाही विष्णुप्रिया विसरली होती. प्रभूंना सुखविण्यास्तव ती नित्य सुंदर वस्त्रें परिधान करी. त्याप्रमाणें आजही तिनें सुंदर पोषाख केला होता. विष्णुप्रियेस अवलोकन करून प्रभू म्हणाले " आज आपण एकमेकास भूषवू या " विष्णुप्रियेस अत्यंत आनंद झाला. व तिनें प्रभूंच्या मुखमंडलास आलोकाचें विलेपन केलें. प्रभूंचा केशकलाप विंचरून त्यास सुगंधि द्रव्यें लाविलीं. पुष्पांच्या हारांनीं प्रभूंची सुकुमार तनु मंडित केली. त्यानंतर प्रभूंनींही विष्णुप्रियेस सुंदर वेषभूषा चढविली प्रभूंच्या कौशल्याचें विष्णुप्रियेस अत्यंत कौतुक वाटलें. प्रभूंच्या मधुर संगतींत कांहीं काळ क्रमल्यावर ती प्रभूंच्या वक्षस्थलावर गाढ निद्रावश झाली.

उत्तर रात्रीच्या समयास प्रभु हलकेच उठले. शचीदेवी, विष्णुप्रिया व आपले जिवलग या सर्वांना शुभ चिंतून त्यांनीं घराच्या दाराबाहेर पाऊल टाकला व ते त्वरित गंगातटाकीं आले. सर्वत्र घन अंधकार पसरला होता. गंगाजलांत शिरून पोहत पोहत प्रभू पैलतीरीं पोहोचले व पुढें दिसेल तो मार्ग झपाट्यानें आक्रमण करण्यास त्यांनीं सुरवात केली. दिवस उगवावयाच्या समयापर्यंत ते आपल्या ओळखीच्या प्रदेशापासून बरेच दूर येऊन पोहोचले.

४

नित्य वदनीं हरीचें नाम । अंतरीं प्रेम विसावलें ॥
त्यांच्या भाग्या नाहीं सीमा । पुरुषोत्तमा प्रिय झाले ॥
आवडती ते सर्वदा हरी । न वचे दुरी पासुनी त्या ॥
निळा म्हणे मेघश्याम । पुरवी काम सर्व त्यांचे ॥

—श्रीनिळोबाराय.

प्रभूंनीं गृहत्याग केल्यावर कटवा गांवीं जाऊन केशव भारती स्वामींची गांठ घेतली. त्यांचेकडूनच काषायवस्त्रें परिधान केली. प्रभूंचा संन्यास हा संन्याशाश्रमाचें श्रेष्ठत्व दाखविणारा नसून जनतेच्या विकृतदृष्टीचा निदर्शक होता ही गोष्ट विसरतां कामा नये. प्रभू कृष्ण-प्रेमाचें पूर्ण गाभाच होते. परंतु ते ओळखण्याची शक्ति जनदृष्टीस नव्हती त्यामुळें त्यांचा द्वेष सुरु झाला ही गोष्ट मागें सांगितलीच आहे. प्रभूंच्या अंतःकरणांत तर प्रत्येक जीवाच्या हृदयांत भगवत्प्रीति उदय पावावी ही कळकळ होती. जनतेच्या दृष्टीनें प्रभू गृहस्थाश्रमांत–ऐश्वर्यांत रहात होते. त्यांचें साधुत्व त्यांच्या पूर्वग्रहदूषित हृदयास कसें पटणार? पूर्वापार चालत आलेले वर्णाश्रमधर्माचे संस्कारे थोडेच धुवून निघणार आहेत? प्राचीन धर्मग्रंथांतून मोक्ष हें मानवी जीवनाचें ध्येय करून त्यास ब्रम्हचर्य, गृहस्थाश्रम, वानप्रस्थ, व संन्यास अशा चार पायऱ्या कल्पिल्या व एकाहून एक श्रेष्ठ अशी परंपरा लावली. यामुळें संन्याशाश्रमास नसतेंच महत्व प्राप्त झालें. वास्तविक बंध मोक्ष या नुसत्या कल्पनाच असून भक्ति हेंच मानवी जीवनाचें ध्येय होय. व भक्तिप्रेमधर्मास संन्यासाची मुळीच जरूर नसून गृहस्थाश्रमांत भगवद्भक्ति पूर्णतया प्रगट होते. ऐश्वर्यानें भक्तीची शोभा कमी होत नसून ती पूर्ण चंद्राप्रमाणें वृद्धिंगत होते. परंतु पिढ्यान् पिढ्या चालत आलेल्या आनुवंशिक संस्कार झालेल्या जनतेस हा बोध पटणें शक्य नव्हतें. या परिस्थितीमुळें प्रभूंना आश्रम पालट करून बाह्यवेष बदलावा लागला. बाह्यरंगास भुलणारी जनता निदान वेषावरून द्वेष सोडील, आदर बाळगील व हरिनामाचा स्वीकार करील याकरितां प्रभूंनीं वेषही पालटला.

प्रभू घरांतून गेल्याचें कळतांच शचीदेवी व विष्णुप्रिया यांची अंतःकरणें अत्यंत शोकाकुल झाली. दोघींनींही अन्नपाणी वर्ज्य केलें. नितांई आदिकरून चारपांच जण प्रभूंच्या शोधार्थ निघाले. शोध करतां करतां केशवभारतीच्या निवासस्थानीं प्रभूंचा शोध लागला. वेष बदलल्यावर प्रभूंना कृष्णप्रेमाची ऊर्मि दाटून "मला वृंदावनास कृष्णाच्या भेटीस जावयाचें आहे" म्हणून प्रभू धावत सुटले. वृंदावन कोणत्या दिशेस आहे याचा विचार न करता दिसेल त्या मार्गानें रानेंवनें तुडवीत प्रभू धावूं लागले. नितांई आदिकरून मंडळी त्यांच्या पाठोपाठ जाऊं लागली. प्रभू ज्या दिशेनें धावत होते ती दिशा वृंदावनाची नसून नवद्वीपाची होती कारण शचीदेवीचें हृदय आपल्या प्रेमबलानें प्रभूंच्या पाउलांना आपणाकडे ओढीत होते. हें पाहून नितांई व इतर भक्तजनांना आनंद झाला. प्रभु अखेरीस शांतीपुरानजीक पोहोंचले. गांवाबाहेरील गुराखी पाहून वृंदावन समीप आलें असें त्यांना वाटलें. परंतु लौकरच तें भानावर येऊन त्यांना वस्तुस्थिति समजली व नितांई आदिकरून भक्तजनांचीही ओळख पटली. त्यांनीं शचीदेवींची अवस्था निवेदन केल्यावर शांतीपुरांतच त्यांची गांठ घेऊन सांत्वन केलें. सर्वांना प्रभुदर्शनानें हर्ष झाला. प्रभुदर्शनार्थ नवद्वीपांतील सकल जन शांतीपुरांत धावत आले. वेषानुरूप प्रभूंना तेथें रहाणें शक्य नसल्यामुळें मातेचे आज्ञेनुसार दूर वृंदावनीं न जातां जगन्नाथपुरी समीप होती तेथें जाऊन निवास करण्याचें त्यांनीं ठरविलें. सर्वांचा निरोप घेऊन प्रभू पुरीस निघालें. नितांई आदिकरून ४–५ जण त्यांच्या मागोमाग गेले.

वाटेंत एक मौजेचा प्रसंग घडला. प्रभु मार्गानें जात असतां एका ओढ्याकांठीं एक परीट कपडे धूत होता. त्यास पाहून प्रभु त्याजजवळ जाऊन म्हणाले "हरि बोल." परीटास कोणी याचक आहे असें वाटून तो म्हणाला "मजजवळ कपर्दिकही नाहीं." त्यावर प्रभु म्हणाले "मला तुझें कांहीं नको फक्त तूं हरिनामाचा मुखानें उच्चार कर" परीट म्हणाला "मला कपडे धुवावयाचे आहेत." तेव्हां प्रभूनीं स्वतः कपडे धुण्याचें कबूल केलें. परीटानें कपडे न देतां नामोच्चार करण्याचें कबूल केलें व तो "हरिबोल" म्हणूं लागला. त्याक्षणीं कृष्ण भगवंतांचें मधुर नाम प्रभूंच्या कृपेनें त्याच्या

जिव्हेस चिकटलें तें कांहीं केल्या सुटेना. शेवटीं तो परीट धुण्याचा पिळा हातांत घेऊन तेथें "हरिबोल" म्हणून नाचूं लागला. प्रभु, निताई वगैरे मंडळी झाडाआड झाली व मौज पाहूं लागली. इतक्यांत त्या परीटाची बायको तेथें आली व तें दृश्य पाहून हसूं लागली. "तुम्हाला नाचायाला सुद्धां येतें. हे मला माहित नव्हते" ती विनोदानें म्हणाली. पण ते शब्द ऐकण्याच्या अगर समोर कोण आहे हें ओळखण्याच्या स्थितींत तो नव्हता. हें पाहून ती घाबरली व गांवांत पळत जाऊन नवऱ्याला भूत लागलें आहे असें सांगूं लागली. तेव्हां सर्वजण धावत आले. परीटाजवळ जाण्यास कोणी धजेना. शेवटीं एकानें धीर करून परीटाचे हात आवळून धरले त्यासरशीं त्याच्या अंगीं प्रेमा संचरून तोही नाचूं लागला. त्याचें अंगास दुसऱ्या एक जणानें स्पर्श करतांच तोही नाचूं लागला. स्पर्श वाढतां वाढतां सर्व गावकरी "हरिबोल" म्हणून नाचूं लागले! तें मोहक दृश्य पाहून प्रभूंचें लोचन ओलावले.

मार्ग आक्रमीत प्रभु जगन्नाथाचें मंदिरासमीप पोहोंचलें. दुरून कळस दिसतांच जणूं गोपाळकृष्णच स्मित मुखानें आपणांस पालवीत आहे असे त्यांना वाटलें. व ते नाचतच निघाले. त्यावेळीं जगन्नाथाचें देवळास कडेकोट पहारा असे व आंत जाण्यास सायास पडत. परंतु प्रभु विद्युद्वेगानें आंत गेलेले पाहून पहारेकरी स्तंभित झाले. जगन्नाथाच्या मूर्तीस पाहून ते सिंहासनावर चढून तिला कवटाळणार इतक्यांत प्रेमावेशानें तें खाली मूर्छित पडले. बळजबरीनें आंत घुसणाऱ्या व्यक्तींचा तेथील पुजाऱ्यांना राग येऊन तें प्रभूच्या अंगावर धावले. इतक्यांत एका ब्राम्हणानें पुढें येऊन प्रभूच्या अंगास आपल्या अंगाची ढाल केली. त्यास पहातांच सर्वजण स्तब्ध झाले. हा ब्राम्हण म्हणजे तत्कालिन प्रसिद्ध नैय्यायिक वासुदेव सार्वभौम होय. त्या प्रांतांतील सत्ताधारी राजा प्रतापरुद्र याच्या खालोखाल त्यांचा मान होता. वासुदेव सार्वभौम दर्शनास आला असतां त्यास प्रभूची तेजस्वी मूर्ती दिसली व तो झटकन् मध्यें पडला. आपल्या समवेत आलेल्या शिष्यांना आज्ञा करून त्यानें प्रभूंना उचलून आपल्या घरीं नेलें.

प्रभूंच्या संगतींत आपली सारी विद्वत्ता कृष्णप्रेमाच्या एका थेंबाबरोबरही नाहीं याची वासुदेव सार्वभौमास खात्री पटली. प्रेमाची वर्णनें त्यानें

ग्रंथांतरीं वाचली होतीं पण त्याचा विश्वास त्यावर काडीमात्र नव्हता. परंतु आज त्याला भगवत्प्रीतीची जिवंत मूर्ति पहावयास मिळाली व त्याच्या आयुष्यांत एक अननुभूत अशी क्रांति होण्याची वेळ आली. तथापि पूर्वसंस्कार दृढ असल्यामुळें त्याचें मन एकदम तयार होईना. इतकेंच नव्हे तर त्यानें प्रभूला वेदशास्त्रांचें ज्ञान नाहीं व तें करून द्यावें म्हणून जगन्नाथाचें मंदिरांत प्रवचनाची तयारी केली. प्रभूनीं नम्रतेनें श्रोता होण्याचें कबूल केलें. पंडितानें वेद सांगण्यास सुरवात केली व प्रभु श्रवण करूं लागले. ५–६ दिवस लोटले तरी प्रभूंनी कोणत्याच प्रकारचा वाद केला नाहीं अथवा शंकाही विचारली नाहीं. तेव्हां एकदा पंडितानें आपण होऊनच खोदून विचारलें. अखेरीस प्रभू म्हणाले—"आपण सांगतां त्यांतलें एक अक्षरही मला कळत नाहीं" पंडित आश्चर्यचकित होऊन म्हणाला—"मग तुम्ही मला शंका का विचारली नाहीं? माझी समजूत होती की तुमची बुद्धि कुशाग्र असेल पण ती चुकीची समजुत होती असें वाटतें" प्रभु म्हणाले "मूळ ग्रंथ अगदी सरळ आहे. पण आपण सांगता तें भाष्य मात्र अर्थशून्य आहे." तें ऐकून पंडितास राग आला पण तो गिळून म्हणाला "मग आपला अर्थ सांगावा." त्यावर प्रभूनीं स्वतः सांगण्यास सुरवात करून मूळ ग्रंथाचें सार ब्रम्हज्ञान नसून भगवद्भक्तीच आहे हें सिद्ध करून दाखविलें. प्रभूंची रसाळवाणी व आपणापेक्षांही वरचढ तर्ककुशलता पाहून वासुदेव सार्वभौमाचा गर्वहरण झाला एवढेच नव्हें तर त्याचें हृदय ऐकतां ऐकतां कृष्णप्रेमानें भरून आलें. सर्व शंका नाहीशा होऊन अंतरांत प्रेमदीप प्रकाशित झाला व हळूहळू तो प्रभुबरोबर नाम गात नाचू लागला! पंडित भगवद्प्रीतीनें नृत्य करतांना पाहून सर्वांना आश्चर्य वाटलें व "खडकालाही प्रभूनीं पाझर फोडला" असें म्हणू लागले. वासुदेव सार्वभौमानें प्रभूंच्या स्तुतीपर अशा १०० श्लोकांची सुंदर माला गुंफिली.

जगन्नाथपुरींत कांहीं काल काढल्यावर प्रभूनीं दक्षिणेंत आपला बंधु विश्वरूप याचे शोधार्थ जावयाचें ठरविलें. नितार्ईनें मनांत प्रभूबरोबर जावयाचे होतें परंतु गोविंद नामक भक्तास तेवढी परवानगी मिळाली व तो एकटाच प्रभूबरोबर प्रवासास निघाला. या पर्यटणाचें मिषानें प्रभूनीं आपल्या

चरणस्पर्शानें दक्षिणदेश पावन केला. प्रभू ज्या ज्या गांवांत जात तेथील मंडळी आपले दुर्गुण टाकून नामस्मरणांत रंगून जाऊं लागली. व अशा रीतीनें लहानसहान खेड्यापाड्यांतून सुद्धा "हरिबोल" चा मधुर ध्वनि निनादू लागला! गोविंदानें या पर्यटणाची रसाळ वर्णनें लिहून ठेविली आहेत.

प्रभू फिरतफिरत विद्यानगरला पोहोंचले. ओरीसाच्या राज्यांतील हा दक्षिण प्रांत असून तेथील प्रांताधिकारी राजा रामानंदराय होता. तो स्वतः अत्यंत विद्वान असून पूर्वी त्याचे व वासुदेव सार्वभौमाचे वादविवाद होत असत. रामानंद परम कृष्णभक्त होता व सार्वभौम हा तर्कशास्त्र-पारंगत व सगुणोपासनेचा विरोधी होता. परंतु प्रभूंच्या संगतींत त्याचा हृदयपालट झाल्यावर त्यास रामानंदाची आठवण होउन त्यानें प्रभूला मुद्दाम त्याची भेट घेण्यास विनविलें. विद्यानगराजवळील गोदावरी घाटानजीक प्रभू बसले होते. त्याचवेळीं रामानंदराय आपल्या अनुयायी जनासह स्नानासाठीं तेथें आला. स्नान करून बाहेर येतांच त्याला प्रभूंची दिव्य मूर्ती पाहून विस्मय वाटला व त्यानें चटकन् जाऊन चरणीं लोटांगण घातलें. प्रभूनीं विचारलें "रामानंदच ना?" रामानंदरायनें "होय" म्हणतांच प्रभूंनी उठून आपल्या बाहुपाशांनीं त्यास दृढ आलिंगन दिलें. जणो फार दिवसांनीं जिवलगच परस्परास भेटावेत त्याप्रमाणें प्रभू रामानंदास कडकडून भेटले. भेटींत दोघांच्या नेत्रांतून प्रेमाश्रू वाहू लागले. अखेरीस त्या अवस्थेंतच दोघेही प्रेमातिशयानें मूर्च्छित झाले. भगद्भक्तांच्या भेटीचा सोहळा पहावयास मिळणारे नेत्र भाग्यवान होत. त्या प्रीतिसंगमाचें वर्णन कोणती लेखणी करूं शकणार आहे!

घाटावर असणाऱ्या जनसमुदायांच्या दृष्टीस हें दृश्य पडतांच त्यांचीं हृदयें पाझरून नेत्र सजल झाले. कांहीं वेळानें दोघेही शुद्धीवर आले. दोघांनीं नेत्र उघडून एकमेकाकडे पूर्ण सप्रेम दृष्टीनें पाहिले. प्रभू म्हणाले. "आज एका श्रेष्ठ भक्ताची भेट झाली हें माझें केवढें भाग्य" त्यावर रामानंदानें प्रभूचे चरण वंदून म्हटलें "प्रभू, मज अनाथावर आपण कृपा केलीत याबद्दल मी आपला कसा उतराई होऊ तें समजत नाहीं."

सार्वभौम तार्किक असल्याकारणानें तर्कानें प्रभूला त्याचा गर्व हरण करावा लागला. परंतु प्रेमळाची गाठ पडल्यावर प्रभूंना त्याजबरोबर प्रेमळ संवाद करण्यांतच अपरंपार सुख वाटलें. सायंकाळी रामानंदराय आपला दरबारी पोषाख टाकून साध्या वेषांत प्रभूला भेटावयास आला. प्रभूंनीं त्यास आपल्या जवळ आदरानें बसवून घेतलें व इतर कांहीं न बोलता म्हटलें " रामानंद, मानवी जीवनाची सार्थकता कशांत आहे?" प्रभूच्या मुखांतून बोधामृत ऐकावयास रामानंद आला परंतु त्यासच प्रभूंनीं विचारल्यावर तो क्षणभर गांगरून गेला. परंतु प्रभूनीं आग्रह केल्यावर त्यास धीर येऊन तो म्हणाला--" पूर्वपरंपरागत आचारधर्मानें वागून ईश्वर-प्राप्ती करून घेण्यांतच आयुष्याचें सार्थक आहे "

प्रभू म्हणाले--" मला याहीपेक्षा सखोल उत्तर पाहिजे."

रामानंद--" मनुष्यानें प्रभूवरच सर्वस्वी भार टाकून वागल्यानें परम कल्याण प्राप्त होईल! इतर धर्मांचा त्यानें त्याग करायला पाहिजे "

प्रभू--" हा नुसता सामान्य सिद्धांत झाला."

रामानंद--" ज्ञान आणि भक्ति यांचे द्वारा प्रभूची प्राप्ती करून घ्यावी " त्यावर प्रभू म्हणाले. " माझ्या जीवनाची तृषा शांत होईल असें तुझ्या तोंडून परमश्रेष्ठ वचन मला ऐकावयाचें आहे. तर याहीपेक्षां खोल जाऊन तूं मला सांग " त्यावर रामानंदानें पुन्हा विचार करून म्हटलें "ज्ञान व भक्ति यांचा उल्लेख एकत्र केला जातो तथापि वास्तविक रीतीनें ज्ञानाचा विकास होऊन शुद्ध भक्तीचा उदय हृदयांत झाला पाहिजे. भक्तीनें ज्ञान नाहींसें झालें पाहिजे. भगवंताचें स्वरूप जाणून काय उपयोग? त्यास भक्तिबळावर आपलासा केला पाहिजे." प्रभूना हें ऐकून आनंद झाला--ते म्हणाले-" रामानंद, या भक्तीचेंच श्रेष्ठ रूप कोणतें?"

रामानंद म्हणाला-- भक्तीचा उत्कर्ष म्हणजे प्रेम होय. भगवान जीवाचा जीव आणि जगांत कोणाही व्यक्तीहून प्रियतम आणि निकट असल्यानें प्रेमानेंच अनुभविला पाहिजे.

प्रभू-- या प्रेमाची जात कोणती?

रामानंद--स्वामीविषयीं विश्वासु सेवकास वांटतें त्याप्रमाणें भगवंताविषयी आपणांस वाटलें पाहिजे.

प्रभू--याहून श्रेष्ठ प्रेम नाहीं का?

रामानंद--होय, बंधुप्रेम हें याहून श्रेष्ठ आहे. उदा. बलरामास कृष्णाविषयीं वाटणारें प्रेम.

प्रभू--यापेक्षां श्रेष्ठ कोणतें?

रामानंद--वात्सल्यभाव. नंद यशोदेस गोपालकृष्णाविषयीं वाटत होता तद्वत्.

प्रभू--याहून श्रेष्ठ?

रामानंद--पतिप्रेम, श्रीरुक्मिणी मातुश्रीस भगवंताविषयीं वाटणारा भाव.

प्रभू--याहीपेक्षां श्रेष्ठ प्रेम कोणतें?

प्रभू रामानंदास जणों प्रेमाच्या सागरांत अधिक खोल खोल नेत होते. तो म्हणाला--होय! प्रभू याहीपेक्षां आत्यंतिक प्रेमाची जात आहे ती म्हणजे जार भावाची होय. जारिणी आपल्या प्रियकरास्तव सर्वस्वाचा त्याग करते. आप्त, गोत, धन, अब्रू, लौकिक या सर्वांवर ती आपल्या प्राणप्रियाकरितां पाणी सोडते. कृष्णप्रभूविषयीं असें प्रेम असणें म्हणजेच भक्तीची परम सीमा होय.

प्रभूंना रामानंदाचे शब्द अमृताहून गोड वाटले. त्यांचें अंतःकरण सद्गदित झालें व म्हणाले--" पण हीच अखेरची सीमा?"

रामानंदाच्या हृदयांतही प्रेमाच्या ऊर्मि उसळू लागल्या. जणू प्रभू आपल्या प्रश्नरूपानें रामानंदरायावर कृपेचा वर्षावच करीत होते. क्षणभर थांबून तो म्हणाला " प्रभू! प्रेमाचा महिमा अगाध आहे. आपणच बोलविता म्हणून मी सांगतो. हीही सीमा राधेनें ओलांडली. राधेचें प्रेम या सर्वांपलीकडील आहे."

प्रभूंनीं मंदस्मित केलें. त्यांच्या मुखावर दिव्यतेज झळकू लागलें व तें म्हणाले "तें कसें हें सांग?"

रामानंद बोलूं लागला "जारिणी स्वसुखास्तव प्रियावर प्रेम करिते. पण राधेचें प्रेम त्या पलीकडचें होतें. कृष्णाचें सुख तेंच तिचें सुख. त्याला सोडून ती जिवंत राहू शकत नाहीं. तथापि ती त्याच्यापासून कशाचीही अपेक्षा करीत नाहीं. प्राण सोडून जात असतां कृष्णनामानें ती जिवंत राहते. प्रभू गोकूळ सोडून मथुरेस गेले. तेव्हां मथुरेहून परत आणणाऱ्या सखींना ती म्हणते—सखीनों! प्रभू सुखांत असावा हीच माझी आस आहे. त्याला राज्यपद आहे, स्नेही आहे, नोकरचाकर आहेत पण त्या सर्वांत प्रभूंचें अंतःकरण जाणणारे कोणीच नाहीं त्यामुळें त्यास चुकल्याप्रमाणें होत आहे. तें मला पाहवत नाहीं. मला माहीत आहे कीं प्रभूला माझ्याशिवाय चैन पडत नाहीं. म्हणून सखीनों! तुम्ही प्रभूला गोकुळांत घेऊन या."

प्रभूंना हे शब्द ऐकून अधिकाधिक प्रेमोर्मी उसळू लागल्या. रामानंदानें बोलता बोलता राधाकृष्ण प्रेमाचें स्वरचित सुंदर गीत गाण्यास सुरवात केली. तें ऐकून प्रभू डोलूं लागले. दोघांचेही नेत्र सजल होऊन प्रेमाश्रू वाहु लागले. प्रभूंना रामानंदाची संगत अतिप्रिय वाटली व तेथें कांहीं दिवस त्यांनीं वास केला. शेवटीं परत येतांना "मजबरोबर पुरीस आले पाहिजे" असें बजावून प्रभूंनी पुढील मार्ग आक्रमण्यास सुरवात केली. रामानंदाच्या हृदयास राधाकृष्णप्रेमाची जणो जिवंतच चालती बोलती मूर्ती अशा प्रभूंचा निजध्यास लागला व त्यानें मोठ्या कष्टानें प्रभूंना निरोप दिला व त्यांची परत येण्याची वाट तो चातकाप्रमाणें पहात राहिला.

## ५

**हींच त्यांची पंचभूतें । जीवनभातें प्रेमाचें ।।**
**कळवळा धरिला संतीं । ते निगुती कैवाड ।।**
**हाच काळ वर्तमान । साधन ही संपत्ति ।।**
**तुका म्हणे दिवसरातीं । हेंचि खाती अन्न ते ।।**

—श्रीतुकाराम

रामानंदरायाचा निरोप घेतल्यावर प्रभूंची स्वारी पुढें जावयास निघाली. वाटेंत त्यांना वृद्धभिक्षू, अद्वैतवादी व नानापंथाचे लोक भेटले. त्या सर्वांवर प्रभूंच्या दर्शनाचा वा वाणीचा परिणाम होऊन ते प्रेमांत तल्लीन होऊन नाचू लागत. विद्यानगराहून प्रभू त्रिमंदला आले. तेथें एका विद्वान वृद्ध भिक्षू व भिकूराम गिरी यांच्या ठिकाणीं भक्तीचा उदय केला. नंतर तुंगभद्रेस धुंडिराम नामक गर्विष्ठ साधूच्या अंतःकरणाचा पालट करुन त्याचें नांव हरिदास असें ठेविलें. अक्षयवटास तीर्थराम नांवाचा श्रीमंत व्यापारी भेटला. त्यानें प्रभूची परीक्षा पहाण्यासाठीं वाममार्गी दोन स्त्रिया पाठविल्या. लोखंड जरी परीसावर घाव घालू लागलें तरी परीसाचा गुण त्याजवर उमटून त्याचें सुवर्णच होणार त्याप्रमाणें कृष्णप्रेमानें ओथंबलेली प्रभूंची दृष्टी पाहून त्यांची दुष्टवृत्ति जागच्यांजागी नाहीशी होऊन त्या प्रभूंच्या चरणकमलाशी भृंगाप्रमाणें लिगटल्या. तीर्थराम व त्यांची पत्नी यांची तीच अवस्था झाली.

गिरीश्वर, पाणनरसिंह, विष्णुकांची, तंजावर वगैरे स्थानावरून फिरत फिरत प्रभू पुदुकोटास आले. तेथील देवालयांत लहानमुलें व मुली जमल्या होत्या. त्याबरोबर प्रभू नृत्य करूं लागले. तो रमणीय देखावा पाहून सभोवतालच्या मंडळींनीं सर्वांवर फुलें उधळली व आनंद व्यक्त केला. नंतर प्रभू केपकामोरीनपर्यंत जाऊन माघारी वळले. त्रावणकोर एथील राजास प्रभूंच्या दर्शनानें जीवनाचें सार्थक झालें असें वाटलें. त्यानें आपल्या राजवटीत रहाण्याचा प्रभूंना आग्रह केला परंतु प्रभूंनी कबूल केलें नाहीं.

प्रवासांत एकदा प्रभू तलावाच्या काठीं बसले होते. कृष्णविरहानें व्याकूळ होऊन ते म्हणाले "कृष्णा! तूं कुठें रे गेलास? माझें हृदय कसें शून्य झालें आहे. तुझ्यावाचून मला जगणेंसुद्धां असह्य झालें आहे. तुझ्यावाचून मला दाही दिशा ओस दिसत आहेत" बोलता बोलता प्रभूंचा कंठ दाटून आला. व ते ओक्साबोक्सी रडूं लागलें. तलावाच्या कांठीं जमलेल्या मंडळींना तें दृश्य पाहून गहिंवर दाटला. त्यांतच एक दुर्जन होता तो अविचारानें हळूच म्हणाला, "तुम्ही ज्याला शोधता तो या जलांत आहे" प्रभू

तें ऐकून ताडकन् उठले. त्यांनीं निमिषार्धांत त्या जलसंचयांत उडी टाकली! तें पाहून लोकांनीं पटापट उड्या टाकल्या व प्रभूंना उचलून वर आणलें!

महाराष्ट्रांतून प्रवास करीत असतां प्रभूंची स्वारी पंढरीस आली होती. (या प्रसंगास अनुसरून कांहीं चरित्र लेखकांनीं श्रीतुकाराममहाराजांची परंपरा चैतन्य प्रभूशी लावण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु तो विफल आहे. श्रीतुकाराममहाराजांना स्वप्नांत बाबाजी ऊर्फ केशव चैतन्य हे गौरांग प्रभूचे अनुयायी असल्याचा पुरावा उपलब्ध नाहीं. बहिणाबाईनीं तर केशव चैतन्यांची परंपरा–श्रीज्ञानदेव–सच्चिदानंद बाबा–विश्वंभर–राघवचैतन्य–केशव चैतन्य अशी दिली आहे. तेव्हां केवळ कांहीं गोष्टीच्या साम्यावरुन अनुमान काढतां येत नाहीं. बंगालमधील चैतन्य संप्रदाय व महाराष्ट्रांतील वारकरी संप्रदाय यांतील साम्य व भेद यासंबंधीं स्वतंत्र ग्रंथांत विचार करूं) प्रभूंचे बंधु यांनी आपला देह पंढरींतच ठेविला होता असें सांगतात. पंढरीहून प्रभू पुण्याकडे गेले. तेथून पुढें जात असतां वाटेंत एका निबिड अरण्यांत नौरोजी नांवाचा चोरांचा नायक रहात असल्याची बातमी प्रभूंना कळली. तेव्हां प्रभूनीं त्या दरोडेखोरांच्या अधिपतीच्या वसतिस्थानाची वाट धरली. तें पाहून लोकांनीं त्यांना परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. "नौरोजी फार दुष्ट व क्रूर आहे. तो आपले प्राण हरण करील. आपण तिकडे जाऊं नका" अशी विनवणी लोक करूं लागले, परंतु प्रभूंनीं तें न ऐकतां निर्भय आणि करुणार्द्र हृदयानें त्या वनांत प्रवेश केला. नौरोजी एका मोठ्या वृक्षाच्या बुंध्यास टेकून निवांत बसला होता. त्याला प्रभूंची चाहूल लागतांच त्यानें आपली माणसें पाठवून पकडून आणण्यास सांगितलें. परंतु प्रभूच्या दिव्य आकारानें दिपून ते प्रभूस स्पर्श करूं शकले नाहींत व तसेंच परतलें. तें पाहून नौरोजी क्रोधाविष्ट होऊन स्वतः उठून प्रभू समीप आला. कमरेची तलवार काढून त्यानें वर उचलली. परंतु प्रभूची अथांग प्रेमानें ओथंबलेली दृष्टि पहातांच त्याचे हातांतील तलवार गळून पडली! नौरोजीनें आपल्या जन्मांत अशी निर्भय आणि प्रेमळ दृष्टि पाहिली नव्हती. ती पहाताच त्याच्या हृदयांत एक अननुभूत ऊर्मि उसळली.

तें पाहून प्रभू म्हणाले---" नौरोजी, तूं स्वतःस दरवडेखोरांचा नायक म्हणवतोस परंतु मला तर तुझ्या ठिकाणीं भगवंताची प्रीति दृग्गोचर होत आहे." नौरोजीनें हेच शद्ब दुसऱ्या कोणाच्या मुखांतून ऐकिले असते तर त्याला ती कुचेष्टाच वाटली असती परंतु प्रभूनी ते शद्ब इतक्या सरळ भावानें व अव्याज अंतःकरणानें उच्चारले होते कीं नौरोजीच्या क्रूर वृत्तीचा अवशेष कोठल्या कोठे नाहींसा झाला, तथापि प्रभूंच्या शद्बांचा अर्थ मात्र त्याला समजेना. " प्रभू ! आपण म्हणतां तें खरेंच का?" नौरोजीनें विचारलें. त्यावर प्रभूंनीं होकार दर्शविला. " मग मी जर दुष्ट कर्में सोडून आपणाजवळ आलो तर माझा अंगिकार कराल का ?" नौरोजीनें सद्गद्गीत वाणीनें विचारलें. प्रभूंनीं गहिंवरून त्यास आपल्या पोटाशी धरलें व आपल्या अश्रूंनी न्हाऊं घातलें. नौरोजीचा जणूं पुनर्जन्मच झाला. निमिषमात्र सत्संगतीनें दुष्ट दरोडेखोराचा तो श्रेष्ठ भक्त बनला. आपल्या सोबत्यांना सोडून त्यानें प्रभूच्या मागे जाण्याचें ठरविलें. तेथून प्रभूची स्वारी नासिक, दमन, सुरत वगैरे स्थानांवरून बडोद्यास आली. नौरोजी हा वृद्ध असून थकलेला होता. व या स्थानींच त्यानें प्रभूंच्या मांडीवर आपली मान ठेवून त्यांच्या गोड दृष्टीशीं आपली दृष्टि मिळवीत देह ठेवला ! नौरोजीच्या वांटचास आलेल्या भाग्याचा कोण हेवा करणार नाहीं ?

बडोद्याहून अहमदाबादेस व तेथून प्रभु घोग्यास आले. या गांवीं वरमुखी नांवाची कलावंतीण होती. ती रूपानें सुदर असून नृत्यकलेंत अत्यंत प्रवीण होती. ती आपल्या वाड्याच्या खिडकींतून पाहत असतां एक अत्यंत मोहक दृश्य तिला दिसलें. प्रभूंची मनमोहन मूर्ति भगवत्प्रेमाच्या रंगांत नृत्य करीत होती व सभोंवतालच्या जनांचीं हृदयें हळू हळू पाझरून तेही त्या प्रीतीच्या रंगानें रंगू लागले होते. वरमुखी स्वतः नृत्यकला--कुशल होती परंतु त्या नृत्यांत ती विरून जाऊं शकत नव्हती. विषयविलासांत दंग होणाऱ्यानीं तिची स्तुति करावी व तिच्या अंतरांत मात्र अग्नीची ज्वाला भडकावी असा प्रकार होता. प्रभूंचें तें नृत्य किती हृत्तापहारी होते ! वरमुखी जणूं आपल्या अनिमिष नेत्रांनीं त्या मोहक दृश्याचें प्राशन करूं लागली. ती आपलें पहिलें नृत्य विसरून प्रभू सांगाती नृत्य करूं लागली ! प्रभूंचें

चरणकमल आपल्या हृदयीं स्थापून तिनें आपला उर्वरित आयुष्यकाल भगत्प्रीतीच्या नर्तनांत घालविला !

प्रभूंना लहान मुलांची अत्यंत आवड होती. त्यांचीं सरल अंतःकरणें आणि मातापित्यांच्या आधारावर घडणारा त्यांचा स्वच्छंदी हूडपणा पाहून त्यांना अत्यानंद होई. प्रभूंच्या संगतींत येणारी बालकेंही निर्भयतेनें त्यांच्याशी मनमोकळेपणानें वागत. गांवांत प्रभूंच्या आगमनाची वार्ता कळताच मुलांचा घोळका त्यांच्या भोंवतीं जमत असे. दक्षिणेंत असतां एकदां प्रभूंचा मुक्काम एका खेडेगांवीं पडला. तेथील एका मुलानें प्रभूंना पाहिलें व धांवत आपल्या सोबत्यांकडे जाऊन तो म्हणाला—"गडे हो, मी तुम्हांला एक गंमत दाखवतों, चला. गांवांत एक वेडा आला आहे व "हरी" म्हटल्याबरोबर तो वाटेल ते करतो" तें ऐकून सारीं मुलें धांवत प्रभूंच्या निवासस्थानाकडे आली व "हरीबोल" म्हणून टाळ्या वाजवूं लागलीं. प्रभूंना मोठी मौज वाटली. बालकांच्या मुखांतून होणाऱ्या अव्याजमनोहर नामोच्चारास प्रोत्साहन द्यावें म्हणून प्रभूंनीं जमिनीवरील रक्षा आपले अंगास लावण्यास सुरवात केली. तें ऐकून मुलांना प्रोत्साहन मिळून ते अधिक उच्च स्वरानें "हरिबोल" म्हणून टाळ्या पिटून हासूं–नाचूं लागले. त्यांचा पुढारी "तुम्हांस कशी गंमत दाखविली" म्हणून फुशारकी मारून नामोच्चार करीत उड्या मारूं लागला !

प्रभु सोमनाथ, द्वारका इत्यादि स्थानांवरून विद्यानगरीं आले. रामानंदरायास ही मंगलवार्ता कळतांच तो आपल्या लवाजम्यासह सामोरा आला. प्रभूंना पहातांच त्यानें प्रथम दृढ आलिंगन देऊन नंतर त्यांच्या चरणकमलांना अनन्यभावानें वंदन केलें. प्रभूंना त्यानें लवकरच येतो असें आश्वासन दिल्यावर प्रभु परत जगन्नाथपुरीस आले. प्रभूंनीं आपल्या निताई आदिकरून भक्तजनास आपल्याबरोबर येण्यास मनाई केली होती. ते प्रभूंची उत्कंठेनें वाट पहात होते. त्यांना प्रभु बऱ्याच कालानंतर परत आलेले पहातांच अत्यानंद झाला व सर्व भक्तजन प्रभूंना कडकडून भेटले. पुरीस जगन्नाथाच्या मंदीरासमीपच प्रभूंनीं निवास केला. हजारो भाविक लोक प्रभूंच्या

दर्शनास येऊं लागले. विद्यानगरचा रामानंदरायही लौकर तेथें येऊन प्रभूंच्या मधुर संगतीचें सुख सेवन करूं लागला. ओरिसाचा राजा प्रतापरुद्रही आपल्या अधिकारोन्मादाचा त्याग करून प्रभूंची विनम्रतेनें भक्ति करूं लागला.

प्रभू परत जगन्नाथपुरीस आल्याची वार्ता नवद्वीपांत समजतांच शचीदेवीच्या घरीं जनसमूहांची गर्दी लोटली व त्यांची परवानगी घेऊन सर्व जण प्रभूंना भेटण्यास्तव पायीं निघाले. पुरीस पोहोंचल्यावर जो भेटीचा सोहळा झाला तो अवर्णनीय होता. चार महिने सर्व भक्तमंडळी तेथेंच राहिली. नंतर सर्वांना आपापल्या घरीं परत पाठविलें.

निताई आदिकरून मंडळींना प्रभूंनीं बंगालप्रांतीं कृष्णभक्तीच्या प्रचारार्थ पाठविलें. त्यांनीं आपल्या नामसंकीर्तनांनीं वंगवासीयांच्या हृदयांत कृष्णभक्तीची ज्योत पेटविली ती अद्याप तेवत आहे.

पुरीस कांहीं दिवस राहिल्यावर प्रभु बलभद्र भट्टाचार्यास बरोबर घेऊन वृंदावनास गेले. तेथून परत येतांना प्रयागास कित्येक मुसलमान लोकांस वैष्णवधर्म शिकविला. त्यांचे वंशज हल्ली पठाण वैष्णव या नांवानें ओळखले जातात. प्रयागासच रूप गोस्वामींची गांठ पडली. त्यांना भक्तितत्वाचा उपदेश करून प्रभूंनीं वृंदावनास पाठविलें. रूप गोस्वामीनी भक्ति तत्वावर अनेक ग्रंथ लिहिले आहेत. प्रयागाहून प्रभु काशीस आले.

वासुदेव सार्वभौमाप्रमाणेंच काशीक्षेत्रीं त्यावेळीं प्रकाशानंद सरस्वती म्हणून विद्वान स्वामी होते. स्वतःच्या विद्वत्तेच्या घमेंडीत ते भक्तिमार्ग अनुसरणारांचा द्वेष करीत व प्रभूविषयीं ते अवाच्य बोलत. परंतु प्रभूंच्या समक्ष भेटीचा समय आल्याबरोबर त्यांची अवस्था वासुदेव सार्वभौमाप्रमाणेंच होऊन त्यांना पश्चाताप झाला व ते प्रभूंचे अनन्य सेवक बनले. त्यांनी चैतन्य–चंद्रामृत ग्रंथांत प्रभूंचें वर्णन केलें आहे.

**प्रवाहैरश्रूणां नवजलदकोटी इव दृशौ**
**दधानं प्रेमर्द्धा परमपदकोटीः प्रहसनम् ।**
**वमन्तं माधुर्यैरमृतनिधिकोटीरिव तनु–**
**च्छटाभिस्तं वंदे हरिमहह संन्यासकपटम् ॥**

त्याचा सारांश असा कीं, – ज्यांचे नेत्रद्वय प्रेमाश्रूमुळें वर्षाव करणाऱ्या नूतन मेघाप्रमाणें भासतात, ज्याच्या प्रेमामुळें स्वर्गसुद्धा तुच्छ भासतो, माधुर्यामुळें जो अमृत सागराचे लोटच्या लोट जगतीतलावर आपल्या रूप सौंदर्यानें वाढवीत आहे अशा त्या प्रभूस नमन असो.

दृष्टः स्पृष्टः कीर्तितः संस्मृतो वा
दूरस्थैरप्यानतो वादृतो वा ।
प्रेम्नः सारं दातुमीशो य एकः
श्रीचैतन्यं नौमि देवं दयालुम् ॥

(जो आपल्या स्पर्शानें, दृष्टीनें, स्मरणानें दूरस्थांना व समीप असणाऱ्यांना प्रेमाचें सारसर्वस्व देण्यास समर्थ आहे अशा दयाळु चैतन्य देवास मी नमन करतों)

असो, प्रभूंनीं प्रकाशानंदास बोध करून त्याचें नांव प्रबोधानंद ठेविलें व वृंदावनाकडे भक्ति प्रसारार्थ पाठविलें.

नंतर प्रभूंनीं नवद्वीपास जाण्याचें ठरविलें. प्रभूचें मातृप्रेम अवर्णनीय होतें. शचीदेवीनीं दारांत प्रभूंना पाहतांच निंबलोण उतरलें. प्रभूनीं साष्टांग प्रणिपात घातला. दोघांच्या नेत्रीं अश्रु आले. विष्णुप्रिया ओढणी घेऊन मागें उभी होती. तिनें प्रभूला वंदन केलें. व गद्गद स्वरांत म्हणाली 'प्रभू, आपण जगदुद्धार करतां व मला का दूर ठेवतां' प्रभूंनी आपल्या पादुका तिला दिल्या. त्या तिनें आपल्या पोटाशीं धरल्या व त्यांवर अश्रूंचा अभिषेक केला. त्या पादुकांचें पूजन अद्याप केलें जातें. प्रभूंची व तिची हीच अखेरची भेट होती!

प्रभु पुरीस परतले. नामसंकीर्तनामुळें पावन झालेल्या त्या प्रदेशांतून भगवत्प्रीतीचे निश्वास भूतलावर वाहू लागले. कांहीं वर्षें या अत्यानंदांत लोटल्यावर एक दिवस असा उगवला कीं तोता गोपीनाथाचे मंदिरांत नामसंकीर्तन चाललें असतां प्रभूंची स्वारी आपल्या प्रियतमाच्या स्वरूपाशीं समरस झाली!

# प्रगति

प्रगति, उन्नति, विकास हे शद्ब आपण नेहमीं वापरतों. हे शद्ब नेहमीं आपल्या कानास आकर्षक आणि गोड वाटतात. कोणत्याहि क्षेत्रांत–धार्मिक, सामाजिक, आर्थिक कार्य करणाऱ्यांची तर हीं ब्रीदवाक्येंच बनलेलीं असतात; परंतु थोडेंसे थांबून विचार करूं लागलों कीं, "प्रगति म्हणजे काय? प्रगति झाली असें समजावयाचें कशावरून? मनुष्याची प्रगति झाली म्हणावयास मानवी जीवनाचें ध्येय काय हें प्रथम समजलें पाहिजे. त्याखेरीज नुसता बदल हा प्रगतिकारक आहे का अधोगतीस नेतो हें कसें कळणार? तेव्हां सर्वांना मान्य होणारें असें मानवी जीविताचें ध्येय काय?"–अशा नाना तऱ्हेच्या विचारांची गर्दी होऊन आपली मति गुंग होते. आपले विचारच कुंठित होतात असें नव्हे तर प्रत्यक्ष निरनिराळीं कार्ये अंगावर घेऊन निरनिराळ्या संस्था काढणाऱ्या पुढारी वर्गास विचारलें तरीसुद्धां या प्रश्नांचीं उत्तरें समाधानकारक रीतीनें ते सोडवूं शकतील कीं नाहीं याची शंकाच आहे. ज्याला आपण प्रगति, विकास, उत्क्रांति म्हणतों त्याचा अखेर शेवट कोठें व्हावयाचा याचा निकाल लावणें कठीण आहे. कारण मानवी स्वभाव व मानसिक रचना इतकी विविध आणि वैचित्र्यपूर्ण आहे कीं, त्या सर्वांना रुचेल असें ध्येय शोधणें दुरापास्त वाटतें. नवमतवादी, पुराणमतवादी, समाजसत्तावादी वगैरे सर्व प्रकारच्या लोकांना मान्य होणारी अशी सुधारणेची कसोटी कशीं ठरवावयाची? निरनिराळ्या संस्था, समाज अगर राष्ट्रें यांची दृष्टि आपआपल्यापुरती संकुचित असते. स्वत:करितां दुसऱ्याचें बलिदान करावयास त्यांची तयारी असते. यामुळें जागतिक शांततेची नुसती भाषा बोलली जाते. भौतिकशास्त्रांच्या अजब

सुधारणा, विमानें, रेडिओसारखीं दळणवळणाचीं साधनें यांकडे पाहिलें म्हणजे वाटतें कीं, जग पूर्वीसारखें भिन्न भिन्न, आणि एकमेकांशीं संबंध नसणाऱ्या प्रदेशांचें बनलेलें नसून परस्परांशीं अत्यंत निकट संबंध जडल्यामुळें एकरूपच बनलें आहे. परंतु ही वरवर दिसणारी एकी खरी नसून जो जो भौतिक सुधारणा वाढून प्रत्येक राष्ट्राचा परस्पर निकट संबंध जसजसा येत आहे तसतसे धार्मिक आणि नैतिकदृष्टया मात्र परस्पर दूर दूर जाण्याच्या व कलह माजण्याच्या परिस्थितींत आहे.

महायुद्ध होण्यापूर्वी अशी कल्पना होती कीं, उत्क्रांतिवाद हा मनुष्यजातीचें पूर्णत्व दाखवितो. इतिहास म्हणजे आपोआप होणारी उत्क्रांतीच होय. जग हें आपोआप सुधारणेच्या मार्गावर पावलें टाकीत आहे; परंतु आतां या सर्व कल्पना नाहींशा झाल्या आहेत. पूर्वीच्या प्रगतीच्या कल्पना आतां स्फूर्ती देणाऱ्या राहिल्या नाहींत. महायुद्धानें स्पष्ट दाखवून दिलें आहे कीं, मनुष्य आपल्या करणीनें उद्धार करील किंवा अधोगतीसही जाईल. इतिहास म्हणजे क्रमशः होणारा विकास नसून मनुष्याच्या कर्माप्रमाणें होणाऱ्या उन्नतीचा वा विनाशाचा चित्रपटच होय. त्याचप्रमाणें तो यदृच्छया घडणाऱ्या गोष्टींनीं भरलेला नसून मनुष्यानें बुद्धिपुरस्सर केलेल्या कृत्यांचा चांगला अगर वाईट परिणामच होय.

मनुष्य करील तसा होईल असें जर आहे तर प्रगतीकरितां त्यानें काय करावें? काय केलें असतां तो पूर्णत्वास पोहोंचेल? असा प्रश्न पुढें उभा रहातो.

परंतु जग क्षणभंगूर, विनाशी आहे तर मानवी प्रयत्नांचा तरी काय उपयोग? जगाच्या विनाशित्वाबद्दल पूर्वीच्या पुराणांतच कल्पना होत्या असें नाहीं, तर हल्लींसुद्धां कांहीं भौतिक शास्त्रवेत्ते अशीं भविष्यें वर्तवूं लागले आहेत कीं, जगाची अखेर म्हणजे महाप्रलयच होय. पृथ्वीला जीवनतत्त्व पुरविणारा जो सूर्य त्याची उष्णता क्रमाक्रमानें सूक्ष्म प्रमाणांत कमी होत आहे व एक काळ असा येईल कीं ती उष्णता नाहींशी होईल आणि मनुष्यजातीचा संपूर्ण विनाश होईल. भौतिकशास्त्रांनीं वर्णन केलेलें हें

विश्वविनाशाचें भयानक चित्र पाहिलें म्हणजे मानवी आकांक्षा अगदींच मर्यादित, क्षणजीवि आणि क्षुल्लक भासूं लागतात.

कांहीं शास्त्रज्ञ हें कबूल न करतां म्हणतात कीं, विनाशाबरोबर उत्पत्तीची क्रिया चालूं असते. त्यामुळें विश्व एकीकडे संहार पावतें पण दुसरीकडे निर्माण होत असतें व त्यामुळें ते अंतवंत नसून अनंत कालपर्यंत सतत चालूच रहाणार. ही कल्पना गृहीत धरून मानवी प्रयत्नांचा विचार केला तर असें दिसून येईल कीं, मानवी प्रयत्न हा दिक्कालांनीं मर्यादित असणार. दिक्काल हे अनंत आहेत. कालाचा ओघ सतत वहात असणार. अमूक एक ठिकाणीं तो थांबून पूर्ण होईल असें नाहीं. म्हणून या कालाच्या प्रवाहांतील कर्माचा प्रवाहही कधींकाळीं पूर्णता पावेल ही आशा नको. मनुष्यानें सतत प्रगतीकरितां प्रयत्नच करीत असावें. त्याचें ध्येय पूर्णता हे मात्र कधींकाळीं साध्य होईल असें नाहीं. प्रगतीची आणि पूर्णतेची गांठ पडणें अशक्य होय.

ही जी अडचण उत्पन्न होते ती प्रगती आणि पूर्णत्व या दोन्ही शब्दांच्या अर्थाच्या घोटाळ्यामुळें उत्पन्न होते. वास्तविक दोन्ही शब्दांच्या भूमिकाच भिन्न आहेत. प्रगती, उन्नती या शब्दांनी मानवी इति–हासांत भविष्यकाळीं घडणारी विशिष्ट गोष्ट सूचित केली जाते तर पूर्णत्व या शब्दानें मानवी जीवनाच्या मुळाशी अखंड असणारें अमरत्व सूचित केलें जातें. प्रगती काल–प्रवाहांतून होते तर पूर्णत्व हे कालातीत असतें. प्रगती प्रयत्नसाध्य तर पूर्णत्व हा मानवाचा जन्मसिद्ध हक्कच होय. पूर्णत्व हें अमुक काळांत अमुक पदार्थानें मिळवावयाचें नसून तें सतत, सर्वदा, स्वयंभू आहे. (देशे काले पदार्थे । साधुंनी घेइजे माते । तैसे नव्हे मी आइतें । सर्वांचें सर्वही ।। ज्ञानेश्वरी) या पूर्णत्वाचा अनुभव कोणीही मनुष्य घेऊं शकतो. तो विशिष्ट पिढींतील अगर कालांतीलच पाहिजे असें नाहीं.

हें पूर्णत्व मानवी जीवनांत व्यक्त होण्यास अनुकूल परिस्थिति निर्माण करणें हे संस्कृतीचें कार्य होय. अध्यात्मिक जीवनास पोषक परिस्थिती उत्पन्न करण्याच्या सामर्थ्यावरुन प्रगतीची कसोटी ठरवितां येईल.

प्रचलित युगांत अध्यात्मिक जीवनास विघातक अशा दोन विचार-सरणी दिसून येतात. त्यांचा जगडा सर्वत्र असून प्रचलित वाङमयाचा ओघ सुद्धां त्याच दिशेनें वहात आहे. हे दोन विचारप्रवाह म्हणजे एक भौतिक शास्त्रानें मनुष्याची आर्थिक परिस्थिती सुधारणें हीच मनुष्याची प्रगती असें मानणारा व दुसरा मनुष्याच्या नैसर्गिक भावना अनियंत्रितपणें प्रगट होण्यांतच जीविताचें रमणीयत्व समजणारा.

आतां भौतिकशास्त्राची झालेली कल्पनातीत वाढ पाहिली म्हणजे मानवजातीच्या सुखांत तिनें केवढी भर घातली आहे ही गोष्ट कोणासही नाकबूल करता येणार नाहीं. भौतिकशास्त्रानें पृथ्वीचा पृष्ठभाग जवळ जवळ बदलूनच टाकला आहे. मनुष्याचे खडतर श्रम कमी करुन मानवी जीवितास आणि आरोग्यास विघातक असे काहीं धंदे तर अजिबात नाहीसे केले आहेत. यांत्रिक सुधारणा म्हणजे मानवी मनाचा निसर्गावर विजय होय. मानसिक आकांक्षा साध्य होण्यास साधनीभूत यंत्र होय म्हणून वास्त-वीक यांत्रिक शोधाकडे दोष नाही. दोष असला तर आपण जें ध्येय ठेऊ त्याकडे आहे. आमचें ध्येयच जर योग्य असेल तर सर्व यांत्रिक शोधांचा उपयोग मानवजातीवरील अन्याय दूर करून त्यांचें जीवित अध्यात्मदृष्टचा उन्नत कसें होईल याला अनुकूल परिस्थिति निर्माण करण्यांत होईल. प्रत्यक्ष यंत्राकडे काय दोष आहे? फाजील वेग वाढवून निरपराधी माण-सांचा बलि घ्यावा, असें मोटार कांहीं सांगत नाहीं. आकाशांतून बॉंब फेकून गांवेच्या गांवें उद्ध्वस्त करावीत असें विमान बोलत नाहीं. या गोष्टी घडतात त्याचा दोष त्यांचा उपयोग करणाऱ्या मनुष्याकडे आहे. भौतिक सुधारणा मनुष्याची बाह्य परिस्थिती सुधारतील; पण अंतःकरणा तील भूमिका बदलावयाची असल्यास त्यांचें ठिकाणीं सामर्थ्य नाहीं. चांगल्या तऱ्हेच्या आयुष्यक्रमास त्यायोगें मदत होईल पण प्रत्यक्ष चांगुल-पणा कशांत आहे हें त्यांना सांगता यावयाचें नाहीं. मानवी रोग नाहीसे करितील पण आरोग्याचा विनियोग कसा करावयाचा हें शिकवितां यावयाचें नाहीं. बेकारी व दारिद्र्य कमी करतील पण मिळविलेला पैसा व वेळ सत्कारणीं कसा लावावा हें सांगू शकणार नाहींत.

ऑस्कर वाइल्डची एक लघुकथा अशी आहे कीं, येशू ख्रिस्त एकदां शहरांतून चालला असतां एके ठिकाणीं आरडाओरड चाललेली त्यास दिसली. तेथें एकजण दारू पिऊन लोळत पडला होता. ' तूं दारू पिऊन आपल्या आयुष्याचा नाश कां करतोस? ' असें ख्रिस्तानें त्यास विचारतांच तो म्हणाला – ' प्रभु, मी महारोगी होतों. तुम्ही मला बरें केलेंत. मी आतां दुसरें काय करूं? ' थोडया अंतरावर जातो तो त्यास एक तरूण वारयोषितेच्या मागें लागलेला दिसला. " तूं दुराचारानें आपला जीवित–नाश कां करून घेतोस ? " असें ख्रिस्तानें विचारतांच तो म्हणाला, " प्रभू, मी आंधळा होतों. तुम्ही मला डोळे दिले. आतां मी दुसरें काय करूं ?" शेवटीं आणखी थोडया अंतरावर शहराच्या मध्यभागीं रस्त्यांत एक म्हातारा मोठमोठयानें आक्रोश करीत असलेला ख्रिस्तास दिसला. त्यास रडण्याचें कारण विचारतांच तो म्हणाला – " प्रभो, मी मरण पावलों होतों तुम्ही मला जिवंत केलेत. आतां मी काय करूं ?"

या गोष्टीचा मतितार्थ एवढाच कीं, आयुष्याची संधि आणि विनि–योग यामध्यें अंतर असू शकतें. ख्रिस्तानें दिलेल्या वराचा उपयोग वाईट केल्यास तो दोष ख्रिस्ताचा नसून मनुष्याचा आहे. त्याप्रमाणें भौतिक–शास्त्रांनीं दिलेल्या वरांचा उपयोग हानिकारक झाल्यास तो दोष मनु–ष्याचा होय. भौतिकशास्त्र दोष उत्पन्न करीत नाहीं वा घालवूं शकत नाहीं. याकरितां मनुष्यास उच्च ध्येय पाहिजे असल्यास भौतिकशास्त्रें ओलांडून दुसऱ्या गोष्टीकडें पाहिलें पाहिजे.

भौतिकशास्त्रानें मनुष्य सुखी व्हावयाचा नाहीं तर त्याच्या नैसर्गिक प्रवृत्तीनेंच तो चालला पाहिजे असें म्हणणारा एक पक्ष आहे. " विचार करणारा मनुष्य पशु होय " असें रूसोनें म्हटलें आहे. " विवेकबुद्धीपेक्षां इंद्रियेंच शहाणीं असतात " असें डी. एच्. लॉरेन्स म्हणतो. सदसद्विवेक बुद्धीस सिंहासनावरुन खालीं ओढून तिचें ठिकाणीं सहजप्रवृत्तीची स्थापना करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. वास्तविक बेलगामी वृत्ती आणि स्वातंत्र्य एक नव्हे. स्वातंत्र्यांत योग्य नियमन असतें. जेथें कोणतेंच बंधन नाहीं

असलें स्वातंत्र्य समाधान देणार नाहीं. असलें स्वातंत्र्य सैतानी स्वातंत्र्य होय आणि तें जीवनास वरवर पोषक दिसलें तरी परिणामीं हानिकारकच होईल. नैसर्गिक प्रवृत्तींना सदसद्विवेकबुद्धीचें योग्य नियमन पाहिजेच.

हे दोन्ही पक्ष अध्यात्मिक जीवनांचें मूल्य सांगण्यास असमर्थ आहेत. वास्तवीक हें काम धर्म आणि तत्वज्ञ यांचे आहे. त्यांनीच मानवी जीवनांतील अविनाशी तत्व काय आहे व त्याचा अनुभव घ्यावयास सामाजिक परिस्थिती कशी असावयास पाहिजे याची लक्षणें सांगावयास पाहिजेत. या लक्षणांना अनुरुप अशी जेव्हां संस्थांची, समाजांची अगर राष्ट्रांची वर्तणूक होईल तेव्हांच कलह आणि रक्तपात थांबून खरी प्रगती होईल.

(प्रस्तुत लेख डॉ. राधाकृष्णन् यांच्या एका भाषणाच्या आधारें लिहीला आहे.)

ठाणे. स्थळप्रत
२०४०१ दि.
१०७३ नों. दि.

# धर्म आणि समाजव्यवस्था

प्रस्तुतच्या काळांत धर्मावर टीका करणें हें नवमानवतावादीपणाचें लक्षण समजलें जातें. सामाजिक जीवनास संवर्धक अशा गोष्टींचीच योग्य तऱ्हेनें जोपासना झाली पाहिजे. त्या विरुद्ध गोष्टी नाहीशा झाल्या पाहिजेत हें म्हणणें कोणीही कबूल करील, परंतु धर्म हा समाजव्यवस्थेंस विघातक आहे ही गोष्ट गृहीत धरली जाते तीच मुळांत चुकीची असते. त्यामुळें अशा लोकांची विचारसरणी वरवर पहाणारास तर्कशुद्ध दिसली तरी ती धर्माविषयींच्या भ्रामक कल्पनेवर रचली असल्यामुळें त्याज्यच असते. अशा विचारसरणीचा एक लेख 'किर्लोस्कर' मासिकाच्या मे महिन्याचे(१९४२) अंकांत श्री. वि. य. देशपांडे एम्. ए. यांनीं दिलेला पाहण्यांत आल्यावरून अशा महत्वाच्या प्रश्नावर विद्वान लोक कशी भ्रामक विधानें करतात हें दिसून त्याविषयीं लिहावेसें वाटतें.

'समाजव्यवस्था समाजशास्त्रावरच आधारली पाहिजे' असें या लेखाचें नांव असून त्यांतील प्रतिपादनाचा सारांश असा आहे कीं– विज्ञान तत्वज्ञान व समाजशास्त्र यांचा एकेकाळी धर्मांत अंतर्भाव होत होता. पैकीं विज्ञान व तत्वज्ञान ही धर्माच्या घरट्यांतून निघून स्वतंत्र झाली व समाज व्यवस्थेचें काम मात्र धर्माकडेंच राहिलें. विज्ञान व धर्म यांचा विरोध आहे. कारण धर्म हा श्रद्धेवर उभारलेला असतो, उलट विज्ञान हें अवलोकन प्रयोग व प्रत्यक्षानुसारी सिद्धांत यावर अधिष्ठित असतें. धर्माचें सृष्टीज्ञान हें सृष्टीचा उत्पन्नकर्ता परमेश्वर कल्पिण्यापासून सुरु होतें आणि कल्पनेवरच सारी भिस्त असल्यामुळें एक काल्पनिक जग निर्माण केलें जातें. उदा. अतल वितलादि चौदा भुवनें, तारे, हे मृतांचे आत्मे होत, भुतेखेतें, पापपुण्याचा

हिशेब ठेवणारा चित्रगुप्त, यज्ञानें पाऊस पडतो इत्यादि काल्पनिक गोष्टी धर्मांत आढळतात. असल्या कल्पनांच्या परिणामाचें उदाहरण म्हणून पायथॅगोरसचें देता येईल. त्यानें भूमीतीच्या सिद्धांताचा शोध लावला एवढा तो बुद्धिमान, पण पावटे खाणें पाप आहे असे तो समजत असे.

समाजव्यवस्था ही धर्मावर न उभारतां समाजशास्त्रावरच उभारली पाहिजे. त्यांत धर्माचा हात नको उदा. कांदा खाणें हे धर्म–निषिद्ध म्हणून त्याज्य न समजतां आहारशास्त्राच्या दृष्टीनें त्याचा विचार केला पाहिजे. मनुष्यास श्रेयस्कर काय आहे याचें उत्तर नीतिशास्त्र देतें. नीतिशास्त्र हें विज्ञान आहे तेव्हां हें कार्य धर्म करु शकत नाहीं. समाजशास्त्रावरोबर नीतिशास्त्रांतूनही धर्माची हकालपट्टी केली पाहिजे. सारांश समाजव्यवस्था ही समाजशास्त्र व नीतिशास्त्र अगर श्रेयशास्त्र (Ethics) या दोन शास्त्रावर उभारली पाहिजे. धर्मावर ती आधारल्यास अंधेनेव नीयमानैव यथांधः अशी परिस्थिती होईल.

वरील विधानापैकीं प्रथम धर्म आणि विज्ञान यांच्या विरोधाचा विचार करू. नंतर नीतिशास्त्र व धर्म यांच्या संबंधाबद्दल पाहू म्हणजें समाजव्यवस्थेंत धर्माचें कोणतें स्थान आहे हें ठरविता येईल.

पाश्चात्य लेखक ज्या ज्या वेळीं धर्माविषयीं व त्याच्या विज्ञानाशी असलेल्या विरोधाविषयीं लिहीतात त्या त्या वेळीं त्यांचे डोळ्यासमोर प्रामुख्यानें ख्रिश्चन धर्म असतो. ख्रिस्ती धर्माच्या इतिहासांत नवीन शास्त्रीय संशोधकांच्या छळाचीं उदाहरणें सापडतांत. बायबलांतील विश्व–रचनेंविरुद्ध मतें प्रतिपादल्याबद्दल ब्रूनो नांवाच्या शास्त्रज्ञास सातवर्षें तुरुंगवास भोगून शेवटीं जिवंत जाळण्यांत आलें. (इ. स. १६०९) त्याच प्रमाणें गॅलिलियो या प्रख्यात जोतिष शास्त्रज्ञानें सूर्याभोवती पृथ्वी फिरतें या कोपर्निकसच्या सिद्धांताचें समर्थन केल्यामुळें तत्कालीन धर्मगुरूंनी त्यास आपल्या न्यायासनासमोर उभे करून आपलीं मतें परत घेण्याची आज्ञा केली. व ती त्यानें मान्य केली म्हणून त्याचा तुरुंगवास चुकला तथापी आयुष्याचीं शेवटची वर्षे त्यास एकांतवासांतच काढावी लागली.

आपल्या आप्तेष्टांना सुद्धां भेटण्याची त्यास परवानगी नव्हती व जवळ जवळ तो नजर कैदेत असतांना मृत्यू पावला. या व अशाच स्वरुपाच्या इतर गोष्टीवरुन धर्म व विज्ञान यांचा विरोध आहे असें वाटणें साहजिक आहे. परंतु बारकाईनें पाहिल्यास हा विरोध धर्माच्या नांवाखालीं चालत आलेल्या भ्रामक कल्पना (Superstitions) व विज्ञान यामधील आहे, असें दिसून येईल. हा विरोध नेहमी राहणारच व तसा राहणें इष्टहीं आहे. असल्या कल्पना नाहीशा करून सृष्टींतील नवीन नियम शोधून काढणें हे विज्ञानाचें कर्तव्यच आहे. वर दिलेली छळाची उदाहरणें ती धर्मगुरुंच्या ईश्वर–निष्ठतेचा व धार्मिकतेचा परिणाम नसून त्यांनीं धर्माच्या नांवाखाली ज्या वेडगळ समजुती स्वीकारल्या होत्या त्याचा परिणाम होय. मुतलादि भुवनें, चित्रगुप्त, यज्ञ इत्यादिकांच्या कल्पना या धर्माचा विज्ञानाशी विरोध म्हणून दिल्या जात आहेत त्या अशाच प्रकारच्या चुकीच्या कल्पना असून त्यांना धर्म असें नांवच देतां यावयाचें नाहीं. धर्म आणि धर्माच्या नांवाखाली वावरणाऱ्या वेडगळ समजुती यांतील फरक स्पष्टपणें लक्षांत ठेवला पाहिजे. या दोहोंची भेसळ करणें चूक आहे असें म्हणणें निराळें व धर्मच नको म्हणणें निराळें.

विज्ञान, तत्वज्ञान व धर्म यांचीं क्षेत्रें पाहिलीं म्हणजे त्यांतील अविरोधाची अधिक स्पष्टता होते. विज्ञानामध्यें अनेक शास्त्रांचा समावेश होतो. सृष्टीच्या निरनिराळ्या कक्षेंत प्रयोग करुन सामान्य नियम व वस्तूंची रूपें शोधण्याचें कामांत निरनिराळी शास्त्रें दक्ष असतात. वस्तु–स्थितीचें वर्णन हा विज्ञानाचा विषय होय. मात्र अंतीम सत्याविषयीं ती विचार करीत नाहींत. तें काम तत्वज्ञानाचें असतें व त्या सत्याचा आपल्या जीवनांत अनुभव घेण्याचा मार्ग सांगणें हें काम धर्माकडे असते. त्याचप्रमाणें शास्त्रें ही वर्णनात्मक असतात. मूल्यमापन करणें, अमुक गोष्ट चांगली अगर वाईट ठरविणें हें त्याचें काम नव्हे, हें मूल्यमापनाचें काम धर्म, नीतिशास्त्र व तत्वज्ञान यांचें होय. तेव्हां विज्ञानानें आपल्या मर्यादा ओळखून वागल्यास त्याचा धर्माशी अगर तत्वज्ञानाशी विरोध असावयाचें कारण नाहीं.

विज्ञान हें जेव्हां आपली मर्यादा सोडते व स्वतःच्या अपुऱ्या पायावर तत्वज्ञान प्रतिपादूं लागते तेव्हां मात्र धर्माशी त्याचा विरोध येतो. जडवाद हा विज्ञानप्रणीत तत्वज्ञानाचें उदाहरण होय. विज्ञान म्हणजे जडवाद असें मात्र नाहीं याबद्दल जे. ए. थॉमसन् या शास्त्रज्ञांनींच म्हटलें आहे--

Science often goes beyond its own sphere and becomes associated with philosophical doctrines which are unessential to it and which may conflict with religious convictions. Thus to take a familiar instance, materialism is not a scientific conclusion but a philosophical doctrine which many students of science have embraced and materialism is inconsistent with most forms of religious belief and experience ( Introduction to Science PP. 213-214 )

सारांश जडवादासारख्या तत्वज्ञानाचा धर्माशी विरोध आहे. खुद्द विज्ञानाचा नाहीं. जडवादाचें परीक्षण करण्याचें हें स्थळ नव्हें. त्याचा विचार या पुढील लेखांत केला आहे. तूर्त एवढेंच सांगितलें म्हणजे पुरे की खुद्द शास्त्रीय ज्ञानाच्या प्रगतीनेंच जडवाद हा एकांगी आहे हें सिद्ध केलें जात आहे.

विज्ञानाचा धर्माशी विरोध नाहीं एवढेंच नव्हें तर जो जो विज्ञानाची म्हणजे शास्त्रीय ज्ञानाची प्रगती होत आहे तो तो ज्ञातापेक्षां अज्ञाताचा प्रांत अधिक अधिक विस्तीर्ण होत आहे व त्यामुळें नास्तिकपणा वाढण्यापेक्षां मनुष्याचे मनांत सृष्टीच्या पाठीशी असणाऱ्या शक्तीविषयीं आदर व आश्चर्याची वाढीच होत आहे. यादृष्टीनें विज्ञानाची प्रगती ही धर्माच्या खऱ्या स्वरूपास पोषकच होत आहे याबद्दल वरील पुस्तकांतीलच उतारा मननीय आहे—

Nor can it be said that science engenders an irrelevent spirit, the biographies of all the greatest scientiftc

investigators show the reverse. The irreverent and the unwondering are to be found among those who know least, not among those who know most. It is true that minor mysteries disappear ... but it has been the experience of many a student of science that when the half gods go the gods arrive. ( pp. 215–16 )

गॅलिलिओ, न्यूटन सारख्या शास्त्रीय संशोधकांचीं चरित्रें वाचल्यास शास्त्रीय ज्ञानानें नास्तिकपणाचे ऐवजी उलट आस्तिक्यबुद्धी त्यांचें ठिकाणीं कशी अधिकच जागृत झाली होती हें दिसून येतें.

आतां नीतिशास्त्र व धर्म या विषयीं पाहूं. समाजव्यवस्था नीतिशास्त्रावर उभारली पाहिजे असें ह्मटलें जातें, व तें योग्य आहे. परंतु नीतिशास्त्राशी धर्माचा संबंध नको ह्मणणें मात्र आगगाडींतून जावयाचें पण वाफ नको असें ह्मणण्यासारखें आहे. नीति ही धर्माची जागा भरून काढू शकत नाहीं. धर्म हा सद्वर्तनास स्फूर्ती देणारा आहे परंतु तो नीतिहून अधिक आहे. Religion is a powerful motive to righteouness but it is more than righteouness – Patrick. ) नीतिशास्त्र हें नुसत्या सद्वर्तन व असद्वर्तनाचा विचार करतें परंतु धर्म हा जगच्चालकाशी मानवी जीवनाचा जिव्हाळयाचा संबंध आहे. त्याच्या अनुभवाची नीति सांगतो व या दृष्टीनें विज्ञान व नीतिशास्त्र याहून धर्माचें मानवी जीवनांतील स्थान अधिक महत्वाचें आहे. जीवनांतील उच्चतम गोष्टीचा साक्षात्कार डावलल्यास बाकी राहिलेल्या गोष्टीवर उभारलेला समाजव्यवस्थेचा डोलारा कितपत टिकणार आहे याचें प्रत्यंतर पहावयास दूर जावयास नको. नुकताच झालेला भीषण रणसंग्राम त्याची साक्ष देत आहे. जगांत सुखाचें व समाधानाचें साम्राज्य नांदावयाचें असल्यास समाजव्यवस्था ही धर्माशी विन्मुख न होता धर्मावरच आधारली पाहिजे.

मात्र एक गोष्ट ध्यानीं धरली पाहिजे कीं धर्म ह्मणजे धर्माच्या नांवाखालीं वावरणाऱ्या चमत्कृतीजनक वेडगळ समजुती नव्हेत. अथवा

जपतप अनुष्ठानादि अथवा योगयाग विधीनिषेधादि पारमार्थिक खोट्या समजुतीही नव्हेत. भागवत धर्मी संतांची या बाबतींत कामगिरी फार थोर आहे. शुद्ध धर्माचें–प्रेमधर्माचें–स्वरूप त्यांनीं जगापुढें मांडलें आहे व तें किती साधें सोपें, सहज आचरणीय आहे. या शुद्ध स्वरूपांतच धर्म राखून त्यावरच समाज धारणा झाली पाहिजे. धर्माचा दोष नसून त्याज्य कल्पनांचा आहे. संसारांत राहून भगवत्प्रीती भोगणें हा सहज मानव धर्म होय व तो विज्ञानानें उलट पुष्टच होईल व नीतीला स्फूर्ती देईल आणि सकल समाजांस सुखी करील.

# जडवाद

## विषयाचें महत्व

जडवादाविषयीं कांहीं अंधुक कल्पना प्रत्येकाच्या मनांत असतात. त्याची सांगोपांग माहिती नसल्यामुळें कांहीं आधुनिक मासिकांतून वरचेवर येणाऱ्या नवमतवादी लेखांनीं वाचकांचीं मनें शंकाकुल होतात. धर्म, नीति यांचें वास्तविक स्वरूप उघड न करतां त्या नांवाखालीं वावणाऱ्या विकृत समजुती तेवढ्या घेऊन 'हा पहा तुमचा धर्म आणि नीतीचा आदर्श' असें म्हणून जेव्हां असले लेखक अट्टाहासानें सांगतात तेव्हां त्यांचें हसूं आल्या-खेरीज रहात नाहीं. पाश्चात्य शास्त्रांतील जुन्या कल्पना घ्यावयाच्या व जणूं काय आपण नवीन शोध लावला अशी बतावणी करीत धर्म व नीति यांची निंदा करावयाची, त्यांना कांहीं व्यंगचित्रांची सजावट देण्याचा प्रयत्न करा-वयाचा, आणि खरे समाजसुधारक काय ते आम्हीच असा डंका वाजवाव-याचा. हा सर्व प्रकार पाहिला म्हणजे या सर्व अजाण प्रदर्शनाचें हसूं आल्या-खेरीज रहात नाहीं. याला योग्य उपाय म्हणजे समंजस लेखकांनी पाश्चात्य शास्त्रीय शोधांचा व त्यावरून काढलेल्या प्रमेयांचा आमूलाग्र अभ्यास करून समतोल बुद्धीनें जीवनांतील धार्मिक व नैतिक मूल्यांचें योग्य परीक्षण व त्यांतील श्रेष्ठ भागांचें आकलन करून तें वरचेवर आपल्या लेखांचे द्वारा जनतेपुढें मांडणें हा होय. विशेषतः चालू काळांतील तरुणपिढीपुढें तर असे लेख अवश्य मांडावयास पाहिजेत. कारण पूर्वग्रहदूषित जरठांची मनें विकृत संस्कारापासून सोडविणें जवळ जवळ अशक्य असते; परंतु तरुणांचीं मनें अजून नवीन नवीन संस्कार ग्रहण करण्यांस उत्सुक असतात. त्यांच्या बुद्धी-वर कायम ठशांच्या समजूतींनीं आपलें ठाणें दिलेलें नसतें व त्यांच्या

ठिकाणीं उच्च व नवीन भावना निर्माण होण्याचें सामर्थ्यही असते. त्यांच्या अंतःकरणाचा धर्म प्रवाही असतो व त्यामुळें जी दिशा त्यांना पटेल त्या दिशेनें ते लीलेनें सर्व अडचणी दूर सारून मार्ग चालूं शकतात.

## जडवाद व मायावाद

या दृष्टीनें जडवादाचें परीक्षण हें अत्यंत महत्वाचें आहे. जीवितांतील अनेक गोष्टींचा व समाजव्यवस्थेचा जडवादशीं अत्यंत निकटचा संबंध आहे. जडवादांतील चांगल्या गोष्टींचा समाजानें व व्यक्तीनें स्वीकार केला तर ती व्यक्ति व तो समाज बलवान् व आशावादी बनल्याशिवाय रहाणार नाहीं; उलट चांगला भाग वगळून दोषात्मक भागच स्वीकारल्यास व्यक्तीच्या व समाजाच्या मुळाशींच जबरदस्त आघात झाल्याखेरीज रहाणार नाहीं. जडवादाचें अगदीं दुसरें टोंक म्हणजे मायावाद होय. सत्य पाहिजे असेल तर जग सोडून पलीकडे जावयास पाहिजे, जग म्हणजे केवळ भ्रम आहे. असें मायावाद सांगतो. आपल्याकडील जुने शास्त्री लोक अजून या भ्रमाचीच चर्चा करण्यांत गुंतले आहेत. भ्रम म्हणजे काय, तो कसा होतो, त्याचे प्रकार काय, त्या भ्रमाच्या किती जाती आहेत, याची चर्चा करण्यांत पूर्वीच्या शास्त्रीय लेखकांची हजारो पानें खर्ची पडलीं आहेत व शेवटीं त्यांतून शब्दांचा कीस पाडण्याखेरीज कांहींही निष्पन्न झालेलें नाहीं. मायावादास ताळ्यावर आणण्यास जडवादाचा पुष्कळ उपयोग आहे. एकादे वेळेस असेंही वाटतें कीं जग मिथ्या म्हणून समोरील सुग्रास अन्नही आंबट तोंड करून खाण्याचा प्रसंग आणविणाऱ्या मायावाद्यापेक्षां जगांतील सुखें मौजेनें चाखणारा जडवादी पुष्कळ बरा. कारण त्याची दृष्टि कोती असली तरी प्राप्त सुखांत तो माती तरी कालवीत नाहीं व प्रपंचांत सुखावर दृष्टि ठेवून तो आनंदांत दिवस काढतो. वास्तविक मायावाद व जडवाद हे दोन्हीही एकांगी व अपुरे आहेत. मायावाद हा जगास अगदींच तुच्छ लेखतो तर जडवाद हा जगच काय तें मूल्यवान् असें म्हणतो. मायावादी हा सत्य हुडकण्याचा प्रयत्न जगास सारून करावयास जातो तर जडवादी जगच तेवढें सत्य व दुसरें कांहीं नाही असें म्हणतो. वास्तविक या दोन्ही उत्तर ध्रुव व दक्षिण

ध्रुवाप्रमाणें अंतर असणाऱ्या टोकांतील सुवर्णमध्य साधावयास पाहिजे व तोच जीवनास व समाजास हितकारक होईल.

## जडवादाचें स्वरूप

जडवादास इंग्रजीमध्यें Naturalism व Materialism असे दोन शब्द आहेत. कांहीं वेळा हे समानार्थी वापरले जातात तर कधीं Naturalism (निसर्गवाद) हा व्यापक अर्थानें वापरतात व त्याची शाखा म्हणून Materialism (जडवाद) वापरला जातो. तूर्त आपण जडवाद व निसर्गवाद एका अर्थीच धरून चालूं.

'निसर्ग' हा शब्द तत्वज्ञानांत वापरतात तेव्हां तो व्यापक अर्थी वापरला जाऊन त्यांत अनेक गोष्टींचा समावेश होतो. पर्वत, अरण्यें व त्यांतील वन्यपपशू म्हणजेच निसर्ग नसून त्यांत अंतराळांत पसरलेल्या अनंत सूर्यमालांचा खगोलशास्त्रानें दाखविलेला विस्तार व पदार्थविज्ञानशास्त्र व रसायनशास्त्र यांनीं उघड केलेलें अत्यंत सूक्ष्म अशा परमाणूंचें पृथक्करण यांचाही समावेश होतो. निसर्गाचा हा सर्व अवाढव्य विस्तार पाहिला म्हणजे चिमुकला मानवी प्राणी हा त्यांतील इतर गोष्टीप्रमाणें एक, इतकेंच नव्हें तर आगंतुकही आहे असें वाटेल; परंतु आपण 'निसर्ग' शब्द वापरला आहे तो मनुष्य, त्याचें कार्य व संस्कृति याच्या विरोधी अशा अर्थानें वापरला नसून या सर्वांचा समावेश अखंड व नियमबद्ध अशा दृश्यसृष्टींत होतो. जडसृष्टि व मानवसृष्टि असे आपण दोन भाग करतो. ते व्यावहारिक दृष्टीनें उपयुक्त असले तरी वर वर्णिलेल्या नियमबद्ध व अविभाज्य निसर्गसृष्टीच्या कल्पनेच्या विरुद्ध आहेत. सृष्टीमध्यें घडणाऱ्या सर्व गोष्टीमध्यें असणारें सातत्य, त्यांचा एकमेकांवर अवलंबून असण्याचा धर्म, त्यांची एकमेकांतून निर्मिति व एकमेकांत होणारा लय यामुळें दिसणारी नियमबद्ध घटना, या सर्व गोष्टी निसर्गाच्या कल्पनेनें ध्वनित होतात. या अर्थानें निसर्ग म्हणजे आपण ज्याला विश्व म्हणतो तेंच होय. मात्र त्यास एक विशिष्ट अर्थ असतो. विश्वांतील सर्व व्यापार विशिष्ट नियमांनीं चाललेले आहेत, अशा दृष्टीनें जेव्हां आपण विश्वाकडे पाहूं त्यावेळीं त्यास आपण 'निसर्ग' असें नांव

देतो. सृष्टीचा अमुक तऱ्हेनें वागण्याचा स्वभावच आहे असें आपण म्हणतों व या निसर्गाच्या नियमांवर हळू हळू आपण विश्वास ठेवण्याचें व ते समजून घेण्याचें शिक्षण आपण घेत असतो.

या निसर्गाच्या नियमांचें रहस्य कांहींही असो, परंतु निर्माण करणें हा निसर्गाचा स्वभावच दिसतो. निसर्गांतील विविध घडामोडींचें अंतरंग आपणास समजो वा न समजो, या घडामोडींचें पर्यवसान सचेतन प्राणी व आपण निर्माण होण्यांत झालेलें आहे ही गोष्ट सत्य आहे. निसर्गाचें स्वरूप अमर्याद, आश्चर्यकारक व दिङ्मूढ करणारें, मनुष्याच्या सुख व दुःखाविषयीं उदासीन, जीवितांस अनुल्लंघनीय अडथळे उत्पन्न करणारें, प्रसंगीं वाजवीपेक्षां अधिक गोष्टींची मुक्तहस्तानें खैरात करणारें असें दिसतें. परंतु कसेंही असलें तरी निसर्गानें मानवी जीवित निर्माण केलें आहे व विविध मानवी कलाकुशलतेची वृद्धि त्यामुळेंच होणें शक्य झालें आहे वस्तुस्थितीवर आधारलेल्या अगदी सत्य अर्थानें निसर्गाचें स्वरूप मातृत्वाचें आहे. थोडक्यांत सांगावयाचें तर निसर्ग हें निरंतरचें कोडें, अगणित गोष्टींचें भांडार आहे, त्याचप्रमाणें ती आपली जन्मभूमि आहे.

परंतु हें सर्व आपल्या–मानवी प्राण्याच्या–उपयुक्ततेच्या दृष्टीनें झालें. निसर्गाचें स्वतःचें काय रूप आहे? 'अपरिमित दिक्प्रदेशांत विस्तारलेला, बदलत रहाणारा असा असंख्य वस्तुसमुदाय ' असें त्याचें वर्णन करितां येईल. निसर्गाच्या विस्ताराचा कितीही शोध केला, तरी दिक् आणि काल एकच असतो. एकाच दिक्‌कालामधील, एकाच कार्यकारणनियमानें बद्ध अशा वस्तूंचा व घटनांचा समूह म्हणजे निसर्ग असें म्हणता येईल.

निसर्गाचा हा अर्थ धरून निसर्ग हेंच संपूर्ण सत्य आहे असें प्रतिपादणारें निसर्गवादाचें अथवा व्यापक अर्थानें जडवादाचें तत्वज्ञान आहे. निसर्गाच्या पलिकडे, मागें अथवा पुढें दुसरें काहीं नाहीं. निसर्गाच्या नियमांच्या कक्षा ओलांडणारे असें कांहीं जरी दिसलें ( उदाहरणार्थ, मनुष्याचें इच्छास्वातंत्र्य, व त्यामुळें त्यानें केलेल्या एकाद्या गोष्टीचा निर्णय, त्याच्या कल्पनास्फूर्तीची निर्मिति, काव्य, गीत, इतकेंच नव्हे तर विवेचकबुद्धि –)

तरी तो सर्व नैसर्गिक योजनेचाच भाग आहे. कलानिर्मिति हा मानवाचा निसर्गच आहे. पण या निसर्गास काय कारण असें विचारलें तर कार्यकारण भावाची घटना ह्मणजेच निसर्ग होय. निसर्गाच्या एका स्वरूपांतून दुसरें स्वरूप (Phase) निर्माण होतें व त्याचा उलगडाही होतो. त्याकरितां निसर्गाच्या पलीकडील एकादें आदिकरण शोधावयास नको.

निसर्गवादाचे प्रकार भिन्न भिन्न आहेत. दिक्कालांतील वस्तूंचें पृथक्करण करून अखेरचें तत्व काय आहे याविषयींच्या समजुतीवरून हे प्रकार होतात. गतिमान् जडद्रव्याचे परमाणु हेच अंतिम आहेत असें मानलें तर त्यास जडवाद म्हणतात. जडद्रव्य याचें वास्तविक रूप शक्ति आहे असें मानलें तर तो शक्तिवाद (Energism or Dynamism) होतो. अगर मूलतत्त्वाविषयीं विचार न करतां सर्व वस्तू एकमेकांशी कार्यकारणानें निगडित आहेत व त्या सर्व प्रत्यक्ष अशा भौतिक शास्त्राचे विषय आहेत असें मानलें तर त्यास भौतिकशास्त्रवाद (Positivism) म्हणतात.

जडवाद अथवा निसर्गवाद याचें प्राबल्य तो ज्या गोष्टी कबूल करीत नाहीं त्यांत दिसून येतें. इंद्रियगोचर सृष्टीच्या पलीकडे एकादें अतींद्रिय सृष्टीचें वलय आहे असें प्रतिपादन करणाऱ्या धर्मास अगर तत्त्वज्ञानास जडवाद हा मान्यता देत नाहीं. त्यामुळें एकंदर सत्यसृष्टीचें स्वरूप जडवादाच्या दृष्टीनें सुटसुटीत व मर्यादित असें दिसतें.

ही अतींद्रिय सृष्टि गेल्यामुळें निसर्गाचें दृश्य स्वरूपाहून निराळा ईश्वर अगर सत्ता जडवाद मानीत नाहीं. अखिल मानवजात व निसर्ग यास पूज्य मानल्यास तो ती गोष्ट नाकारीत नाहीं. त्याबरोबरच आत्म्याचें अमरत्वही त्यास मान्य नाहीं. अर्थात मोठ्या व्यक्तींच्या कृत्यांचें शाश्वत परिणाम अथवा पुढील पिढीनें त्यांची स्मृति कायम राखणें या गोष्टींची गणना अमरत्वांत केली तर तें मान्य करावयास हरकत नाहीं. सृष्टि कार्यकारणभावानें निगडित असल्यामुळें व्यक्तीचें इच्छास्वातंत्र्यही तो मानीत नाहीं. आकाशांतील तारका वा पृथ्वीवरील सूक्ष्म परमाणू यांना जो निसर्गाचा नियम लागू आहे तोच मनुष्याच्या वागणुकीसही लागू आहे. मनुष्यास वाटतें

कीं–" भविष्यकालाकडे नजर टाकून काय गोष्टी कराव्यात हें ठरविण्याचें मला स्वातंत्र्य आहे " तो म्हणतो " मी काय करावयाचें तें अजून ठरविलें नाहीं." परंतु वास्तविक त्याच्यासकट संबंध विश्वांतील परमाणूंनींच तें अगोदर ठरविलेलें आहे. मनुष्यानें अशा रीतीनें जें केलेंच पाहिजे तेंच तो करील. स्पेन्सरनें म्हटलें आहे कीं " तुम्हांस वाटेल कीं आपणास आवडेल तें आपण करूं, परंतु आपणांस काय आवडावयानें तें ठरविणें तुमच्या हातीं नसून निसर्गाच्या हातीं आहे." (You can do as you please, but you cannot please as you please)

जडवादाच्या दृष्टीनें मनुष्याचें ठिकाणच्या बुद्धीच्या जाणीवेस महत्व नाहीं. सृष्टीच्या विकसनचक्रांतून उद्भवलेली ती एक अशाश्वत गोष्ट असून त्यांतच ती लय पावणारी आहे. एकंदर सृष्टीमध्यें निसर्गनियमाखेरीज कांहीं विशिष्ट हेतु अथवा उद्दिष्ट यास जागा नाहीं.

## जडवाद आणि अनुभव

आपल्या ठिकाणच्या गैरसमजुती अथवा चुकीच्या कल्पना दूर कर–णाऱ्या गोष्टीस आपण सत्य असें मानतों. निसर्गातील प्रत्यक्ष वस्तुस्थिति ही आपल्या काल्पनिक स्वैरसंचारास व वैयक्तिक आकांक्षाचे मनोरे बांध–ण्याच्या कामास आळा घालते. त्यामुळें निसर्गवाद अथवा जडवाद सत्य मानण्याकडे साहजिक प्रवृत्ति होते. मनुष्याच्या चुका दुरुस्त करण्याचें व त्यास अधिक विचारी बनविण्याचें काम, विशेषत: तो ज्यावेळीं कर्मप्रवृत्त असेल त्यावेळीं, अधिक प्रत्ययास येतें. अरण्यांत एकाकी, स्वस्थ बसलेला मनुष्य समोर दिसणाऱ्या मृगजळास सत्य मानतो; परंतु पाणी पिण्यास प्रवृत्त होऊन तो ज्यावेळीं हालचाल करतो, त्यावेळेस त्यास वस्तुस्थिति समजते. कोणत्याही कामधंद्यांतील मनुष्य असो, ज्या गोष्टीमुळें इच्छिलेला व्यवहार फलद्रूप होतो, तिला तो सत्य मानतो. एकादा व्यापारी असल्यास त्याच्या हिशेबांच्या पुस्तकांतील आकडे हे त्याला सत्यत्व निदर्शक असतात चित्रकारास त्याच्या जवळील विविध रंग व त्यांच्या सहाय्यानें तो निर्माण करूं शकेल अशीं विविध सौंदर्य हीच सत्य असतात. त्या कलावंतास

त्या व्यापाऱ्याच्या वह्यावरील रकमाप्रमाणेंच त्या व्यापाऱ्यांस त्या कलावंताच्या कलाकृती असत्यही असू शकतील. या रीतीनें भिन्नभिन्न व्यवसायाच्या व्यक्तींना भिन्नभिन्न गोष्टीच सत्य वाटतात, तथापि नैसर्गिक गोष्टी मात्र सर्वांना सारख्याच अनुभवास येतात. भौतिक वस्तुजात, स्थल आणि गति, अन्न आणि विश्रांति, शारिरीक श्रम यांच्याशी सर्वांचा संबंध असून यांना अनुलक्षून मनुष्य आपल्या सवयी बनवितो. यांची सत्यता कांहीं विशिष्ट वर्गापुरतीच मर्यादित नसून ती सर्वांनाच पटलेली असतें.

त्याचप्रमाणें जगांत वागतांना प्रत्येकास मनाच्या अस्थिरतेचा व भौतिक परिस्थितीवर अवलंबून असणाऱ्या त्याच्या स्वभावाचाही प्रत्यय येतो. निसर्गाचा प्रतिकार करून कोणी एखादा तीन वेळांचें जेवण एका वेळेवर आणून ठेवील, परंतु तें अजिबात बंद करता येणें अशक्य असतें. नेहमीची झोप तीन तासच घेईल, पण मुळीच घेणार नाहीं असें घडू शकणार नाहीं. आयुर्मर्यादा वाढवू शकेल, पण आयुष्याचा शेवटच होऊ देणार नाहीं असें घडावयाचें नाहीं. आहारनिद्रादि या गोष्टीपुढें राजास व रंकास सारखीच मान वाकवावी लागते. त्याचप्रमाणें हवापाणी, आणि शारिरीक श्रम, प्रकृति वगैरेमध्यें बदल झाला ह्मणजे त्याचे परिणाम मनावरही होतात. मनाचा विकास शरिरावरोबर होतो व शरीर थकलें कीं मनही थकूं लागतें.

बाह्यसृष्टीकडे पाहिल्यास ती ज्या सत्तेनें चालते, ती सत्ता मानव जातीच्या लाभदायक गोष्टी व आकांक्षा याविषयीं उदासीन दिसते. निसर्गाच्या निघृण नियमानें प्राप्त होणारी लाभहानी कांहीं वेळा बदललेली दिसली, तरी कोणातरी मानवी व्यक्तीचे प्रयत्नच त्याच्या बुडाशी दिसतात. गूढ सत्ता मध्यें हात घालते असें नाहीं.

या सर्व परिस्थितीमुळें व्यक्तिविषयक आशा व कल्पना सोडून असलेला भौतिक निसर्गाचा कायदा, हेंच जगाचें विवेचक बुद्धीस पटणारें स्वरूप होय. या सर्व गोष्टीवरून जडवाद अथवा निसर्गवाद ह्मणजे भ्रमनिरासाचें तत्वज्ञान ( Philosophy of disillusion ) असून तें मनुष्याच्या परिपक्व बुद्धीचें लक्षण आहे असा ग्रह होतो.

## जडवाद व विज्ञान

जडवाद हा आपल्या तत्वज्ञानाची इमारत, पदार्थज्ञान, रसायनशास्त्र प्राणिशास्त्र इत्यादि विज्ञानांच्या शास्त्रशुद्ध पायावर उभारली आहे, असें सांगतो. परंतु विज्ञानानें उघडकीस आणलेल्या गोष्टीशी तत्वज्ञानांतील कोणताही पक्ष विरोध करीत नाहीं. त्यामुळें हें जडवादाचें वैशिष्टच आहे असें नाहीं. वास्तविक खुद्द शास्त्रें ही आपापल्या प्रांतातल्या मर्यादेंतच कार्य करीत असतात. संपूर्ण विश्वाबद्दलची वाटाघाट तीं करीतच नाहींत. इतकेंच नव्हे तर आपल्या कक्षेबाहेरील प्रांतांत ढवळाढवळही करीत नाहींत. उदा–हरणार्थ, पदार्थविज्ञानशास्त्र हें मानसशास्त्रांत हात घालून त्याचे सिद्धांत सांगत नाहीं. त्याचप्रमाणें आपल्या प्रांताबाहेरील वस्तूंचें अस्तित्व अथवा अभावही सांगत नाहीं. सर्व शास्त्रें मिळून आमच्या प्रांतांतील निरनिराळ्या प्रमेयांची बेरीज म्हणजेच तत्वज्ञान असेंही सांगत नाहींत, म्हणून विज्ञानानें जडवादाचें तत्वज्ञान स्वीकारलें नसून जडवाद हाच तत्वज्ञानाचें कामीं विज्ञान सहाय्य करील असें समजतो. परंतु विज्ञानाच्या वर वर्णिलेल्या मर्यादित स्वरूपामुळें संपूर्ण विश्वाचें स्वरूप ठरविण्याचें काम तें करूं शकत नाहीं. अर्थात जडवादाचा प्रत्यक्ष साक्षीदार म्हणून त्याचा उपयोग नाहीं.

विज्ञानाचें संशोधन कार्य सुरू असता त्याच्या बुडाशी मात्र निसर्गाचा नियम जगांत घडणाऱ्या सर्व गोष्टीवर सत्ता चालवितो, त्याला कोणताही अपवाद नाहीं--असा दृढ ग्रह असतो. अनुभवाची निरनिराळीं अज्ञात रूपें ज्ञात करण्याचें कामीं शास्त्रीय पद्धतीनें मिळविलेला विजय, एवढेंच यास कारण नसून या पद्धतीनें ज्याचा उलगडा करता येणार नाहीं, अशी गोष्टच असू शकणार नाहीं अशीही समजूत त्याच्या बुडाशी असते. घडणारी प्रत्येक गोष्ट ही तत्पूर्वीच्या परिस्थितीमुळें घडते, हें विज्ञानाचें गृहीत कृत्यच असतें व त्याखेरीज त्याचें कार्यही चालत नाहीं. विज्ञानाच्या या गृहीत गोष्टीमुळें प्रत्यक्ष नाहीं तरी अप्रत्यक्ष रीतीनें जडवादास अनुकूल असण्याची त्याची प्रवृत्ति असते. मनुष्याचें इच्छास्वातंत्र्य, जीवनशक्ति अथवा दैवी क्रिया यासारख्या गोष्टींना या दृष्टीनें वाव राहूं शकत नाहीं.

इतकेंच नव्हे तर त्या नियमबद्ध सृष्टिक्रमांत व्यत्यय आणणाऱ्या वाटतात. चिरकाल अगम्य रहाणाऱ्या अशा या गोष्टींना विज्ञानसृष्टींत स्थान नाहीं.

विज्ञानामुळें संपूर्ण गोष्टींचा उलगडा होतो या समजुतीस दृढ करणारी आणखी एक गोष्ट ह्मणजे सत्यसंशोधनाच्या कामीं विज्ञानानें उपयोगांत आणलेली व नवीन नवीन उपलब्ध होत असलेली अत्यंत सूक्ष्म यंत्रें होत. सूक्ष्म तत्वांची पहाणी करण्याचें कामीं शास्त्रज्ञांना या यंत्राचें अमोल साहाय्य होत आहे व अंधारांत लपून बसलेले अत्यंत सूक्ष्म परमाणू सुद्धां हळूंहळूं आपलें रूप व्यक्त करीत आहेत. अशी परिस्थिती असतांना दृष्टिपथांतील गोष्टीचें सूक्ष्म साधनांनी संशोधन करण्याचें सोडून, त्या गूढ शक्तीच्या क्रिया असून या क्रियांनींच गूढशक्तीचें अस्तित्व सिद्ध करतां येते असें ह्मणणारावर विश्वास न ठेवण्याची शास्त्रज्ञांची सहज प्रवृत्ति असते. ज्या गोष्टींचा एका कारणानें उलगडा करतां येतो त्या गोष्टींना त्या कारणाहून आणखी कारणें न मानण्याचा जो नियम आहे ( Law of Parsimony )त्याचें उल्लंघन विनाकारण कशाला करावयाचें असें त्यांना वाटतें.

## जडवाद आणि विकासवाद

जगामधील सचेतनता व मन या दोन गोष्टींचा उलगडा करण्यांत शास्त्रीय पद्धतीस अतिशय अडचण भासते. निसर्गाचा नियम कारण व कार्य हीं एकच जातीचीं असतात असें सांगतो. तेव्हा नियमबद्ध जडसृष्टींत सचेतनांची व मनाची उत्पत्ति म्हणजे साऱ्या वस्तूहून निराळ्या अशा अपवादात्मक गोष्टी दिसतात. निरनिराळ्या धर्मांनीं त्यांच्या उत्पत्तीस दैवी कारण सांगितलें आहे. प्रयोगशाळेंतील काचनलिकेंत रासायनिक द्रव्यें घालून सचेतन प्राणी उत्पन्न करण्यांत आले आहेत, तरी आतापर्यंतच्या अनुभवावरून सचेतनांची उत्पत्ति सचेतनांतूनच होते हें अगदीं उघड आहे. जडवाद जर योग्य असेल तर कोणत्या कां रीतीनें होईना, परंतु सचेतनांची उत्पत्ति अचेतनापासूनच व्हावयास पाहिजे. शास्त्रज्ञांना हें मोठें कोडेंच होतें व त्यांपैकीं पुष्कळांची, विश्वाची यांत्रिक नियमांनीं बद्ध अशी कल्पना स्वीकारूनही, सचेतनाच्या उत्पत्तीस दैवी कारण मानण्याची प्रवृत्ति होती.

तात्विक दृष्टचा विचार करणारास सध्याच्या कालांत खरी अडचण आहे ती सचेतन व जड यांतील भेद स्पष्टपणें समजून घेण्याचीच होय. कारण प्राणिशास्त्रांतील नवीन नवीन शोधांमुळें प्राण्यांचें वर्गीकरण करतां करतां व दुवे जोडतां जोडतां जणूं काय सचेतन व जड यांचाही दुवा जोडल्याचाच भास होतो. निदान त्यांतील भासणारा तीव्र फरक कमी कमी होत चालल्यासारखा वाटतो. या करितां सचेतेन व मन यांचें जडाहून काय वैशिष्टच आहे, हें पाहिलें पाहिजे.

सचेतनाचें प्रामुख्यानें नजरेस येणारें वैशिष्टच म्हणजे त्याचें 'स्वत्व' (Selfhood) होय. सचेतन प्राण्यांची रचना, दुरुस्ती, नियमन व उत्पादन ही त्यांच्या स्वयंप्रेरणेनेंच होत असतात. स्वत:ला लागणारीं द्रव्यें आपोआप घेणारीं यंत्रें असतात, पण त्या द्रव्यामुळें त्यांची पुष्टि व वाढ होणारी यंत्रें मात्र नाहींत. आपला तोल व दिशा संभाळणारी यंत्रें अथवा विमानें आहेत, परंतु एकादा भाग मोडला तर आपोआप दुरुस्त करणारी मात्र नाहींत. उत्पादनाच्या बाबतींत ही अशीच स्थिति आहे. एखाद्या यंत्रांतून वा जडद्रव्यांतून सचेतन प्राण्याप्रमाणें स्वत:प्रमाणेंच यंत्र अगर जडद्रव्य जन्मल्याचेंही उदाहरण नाहीं. सचेतनांत मात्र हे सर्व गुण आढळतील. त्याच्या एका बीजामध्यें जणूं काय भविष्यकालाचीं अनंत बीजें सांठविलेलीं असतात. बाह्य परिस्थिति बदलली, तरी सचेतनांत त्या परिस्थितीस जुळतें करून घेऊन स्वत्व कायम राखण्याचा धर्म असतो.

आतां नुसती सचेतनता (Life) व मन यांतील फरक पाहू. दृष्टिगोचर क्रियांवरून आपण सजीवतेचें अनुमान करतो, त्याप्रमाणें दृष्टीस अगोचर अशा भावनेवरून मनाचें अनुमान करावें लागतें. सजीव जंतु हा जणूं स्वत:विषयीं अवधान अथवा आवड आहे, अशा तऱ्हेनें वागतो. मन हें तेथें आहे असें म्हणावयास, आवड दिसतें म्हणण्याऐवजीं आवड प्रत्यक्ष आहेच, याची तें साक्ष देते. लाभ अथवा हानि याची जाणीव म्हणजे सुखदु:खाची भावना, हें मनाचें लक्षण होय. वृक्षादिकांचें ठिकाणीं ही जाणीव असते कीं नाहीं, हें निश्चित नाहीं; पण अगदी खालच्या दर्जाच्या प्राण्यामध्यें ती नसते. वरच्या दर्जाच्या प्राण्यांत अस्पष्ट विचारही असतो व

वागण्याच्या योजना व कल्पनाही असतात. या समजून व सहेतुक चाललेल्या सर्व क्रियांचा समावेश मनांत होतो.

जडवादास कोडें पडतें तें दोन गोष्टींचें. अचेतनांतून स्वसंरक्षण करणाऱ्या चेतन वस्तू कशा उत्पन्न होतात, व या स्वसंरक्षणाच्या क्रियेचें रूपांतर त्या क्रियेच्या जाणिवेंत कसें होतें, म्हणजे त्यांत मनाचा शिरकाव कसा होतो? क्रिया व क्रियेची जाणीव या दोन गोष्टी भिन्न आहेत. या जाणीवेच्या अस्तित्वास अत्यंत महत्व आहे. जगांत ही जाणीव नसेल तर जगांतील सर्व मूल्येंही नाहींशीं होतील. तिच्या अभावीं जगांतील ज्ञान, आनंद, रसिकता वगैरे गोष्टीही अस्तित्वांत असणार नाहींत. म्हणून या जाणिवेच्या अस्तित्वाचा महत्वाचा प्रश्न जडवादापुढें आहे, एवढेंच नव्हें तर या जाणिवेचें प्रयोजन व अर्थ काय हा सर्व तत्वज्ञानांत मुख्य विषय आहे.

या बाबतींत जडवादाच्या मदतीस विकासवाद अथवा उत्क्रांतिवाद येतो. जीवन आणि मन यांचा उगम शोधण्याचा प्रयत्न विकासवाद करतो. डार्विन हा विकासवादाचा जनक असला तरी त्यानें असला प्रयत्न केला नाहीं. सचेतन प्राण्यामध्यें होणाऱ्या निरनिराळ्या फरकांचा त्यानें विचार केला. विकासवादाच्या दृष्टीनें तात्विक बाजू पुढें मांडण्याचा प्रयत्न स्पेन्सरनें केला.

डार्विननें सचेतनाच्या उत्पत्तीचा प्रश्नच उपस्थित केला नाहीं. ती गृहीत धरून त्यानें सचेतनांतील खालच्या व वरच्या वर्गांतील प्राण्याचे दुवे जोडण्याचें काम केलें. परंतु अचेतन, सचेतन आणि मन यांमधील दुवे जोडण्याचें काम विकासवादाच्या सामान्य सिद्धांताचा पुरस्कार करणाऱ्याकडे राहिलें. स्पेन्सरनें आपल्या काळापर्यंत झालेले निरनिराळ्या शास्त्रांतील शोध गोळा करून, शास्त्रांचें वर्गीकरण केलें, व विकासवादाची दृष्टि लावून संपूर्ण विश्वाचें विशाल आणि परिणामकारक स्वरुप पुढें मांडलें. त्यांवरून जगाचें कोडें उलगडण्याची जणूं काय किल्लीच हातास लागली, असें त्यास वाटलें. अचेतनांच्या रासायनिक क्रियांनीं सचेतनत्वाचा धर्म उद्भवत असला

पाहिजे व जसजसा शोध होईल तसतसा तो निर्माणही करतां येईल, अशी स्पेन्सरला आशा होती. परंतु जाणीव व मन यांचा प्रश्न मात्र त्यास कठीण वाटला. पहिल्या प्रथम जडशक्तीची उष्णता, विद्युत्प्रकाश ही जशी निर-निराळी रूपें आहेत, तसें जाणीव Consciousness हेंही त्या शक्तीचेंच एक रूप असावें, असा तर्क त्यानें केला. परंतु मानसिक शक्तीचें मोजमाप करतां येत नाहीं व ती वाढली म्हणजे मेंदूची जडशक्ति कमी होते, यालाही कांहीं पुरावा नाहीं, असें पाहिल्यावर तो तर्क त्यानें सोडून दिला, व मेंदूच्या हालचालीबरोबर सतत असणारी ती जाणीव होय, असें म्हटलें. पण हा कांहीं वस्तुस्थितीचा उलगडा नव्हे. हेकेलनें आपल्या 'विश्वाचें कोडें' The Riddle of the Universe या पुस्तकांत 'कोडें' उलगड-ण्याचा प्रयत्न केला. पण 'कोडे' या शद्बावरून त्याच्या उलगडण्याची अपूर्तताच उघड होतें.

डार्विन व स्पेन्सर यांच्या कालांतून अलीकडे आल्यास विकासवा-दाच्या कल्पनेंत बदल झालेला दिसतो. लॉइड मॉर्गन यानें, विकास हा फक्त पूर्वी बीज रूपानें असलेल्या गोष्टीच व्यक्त होण्यानें होतो असें नसून, अगदी नवीन गोष्टी उदयास येण्यानेंहि होतो असा नवीन स्वरूपांतील विकासवाद (Emergent evolution) पुढें मांडला. निसर्गांत आपणांस परिणामी (resultants) व नवीन उदय पावलेलीं (emergents) अशीं दोन तऱ्हेचीं कार्यें दिसतात. परिणामाचें अनुमान कारणावरून करतां येतें. परंतु नवीन उदय पावलेल्या गोष्टी तशा नसतात. उदाहरणार्थ, सोडीयम व क्लोराईन यांच्या मिश्रणानें क्षार तयार होतो. त्या क्षाराचें वजन ज्या दोन जिनसा मिसळल्या त्यांच्या वेजनाइतकें असतें. हें परिणामाचें उदा-हरण होय. क्षाराची चव मात्र मिश्रण केलेल्या पदार्थांची नसून नवीनच उत्पन्न झालेली असते, हें (emergent) चें उदाहरण होय. लॉइड मॉर्ग-नच्या मतानें सचेतनत्व व मन या अशाच नवोदित गोष्टी होत. परंतु नवीन गोष्टी उदयास येतात, असें मोनण्यांत अनिश्चितपणामुळें जडवादास ही मदत होत नाहीं.

## जडवाद व मानवी स्वभाव

सृष्टीच्या विकासक्रमांत मन कसें विकसित झालें या प्रश्नाशीं या मनाचें आपणांस हल्ली दिसणारें स्वरूप काय आहे हा प्रश्न निगडित आहे. मानवी स्वभावाच्या वास्तविक रूपाची हकीकत जर जडवाद सांगू शकेल, तर मन कसें उदित झालें, हें निश्चित करण्याचें कामीं एक मोठी अडचण दूर झाल्यासारखें होईल. मानवी स्वभावाचें शास्त्रशुद्ध स्वरूप सांगणारें शास्त्र म्हणजे मानसशास्त्र होय. मन आणि जगतांतील त्याचें स्थान याविषयीं आपण केलेल्या प्रत्येक विधानाची परीक्षा मानसशास्त्र करील. त्याचप्रमाणें त्या विधानांवरून मानसशास्त्रावरही परिणाम होईल. म्हणून जडवाद व जगताविषयीं असणारें अन्य दृष्टिकोन यामध्यें होणाऱ्या वादाची मुख्य समरभूमि मानसशास्त्रच होय.

पाश्चात्य देशांत मानसशास्त्राचा स्वतंत्र शास्त्र म्हणून अभ्यास सुरू झाला त्यास सुमारें दोनशें सवादोनशें वर्षें झालीं. एकोणीसाव्या शतकाच्या मध्यकालापासून मानसशास्त्रावरील लिखाण शारीरशास्त्राच्या (Physiology) दृष्टीनें होऊं लागलें. कार्यकारणभावानें बद्ध असलेल्या शारीरिक भागाप्रमाणेंच मन हेंहि मेंदूचा एक व्यापारच आहे, त्यास स्वतंत्र व स्वनियमबद्ध असें अस्तित्व नाहीं असें मानलें जाऊं लागलें. तापलेल्या लोखंडापासून चटकन हात मागें घेणें या सारख्या ज्या नैसर्गिक प्रवृत्ति आहेत त्याचें कारण मेंदूतील प्रवाह एका विशिष्ट दिशेनें वहात असतो हें होय. अशाच तऱ्हेनें इतर प्रवृत्तींचा उलगडा करण्यांत येऊं लागला, परंतु असल्या साध्या गृहीतकृत्यावरून स्मरणशक्ति, भविष्यकालची अपेक्षा, अनुमान व इतर श्रेष्ठ दर्जाचे जे मनोधर्म आहेत ते उलगडणें ही मात्र साधी गोष्ट नाहीं.

अलीकडे शरीर व मन यांचेसंबंधीं रक्ताचें रासायनिक पृथक्करण व शरीरांतील निरनिराळ्या ग्रंथींचें कार्य यावरून उलगडा करण्याचा प्रयत्न होत असतो. या ग्रंथींतून वहाणाऱ्या अंतर्गत रसावरून शरीराची रासायनिक सम अथवा विषम परिस्थिति (Chemical balance) ठरतें

व त्याचेंच प्रतिबिंब मनुष्याच्या स्वभावांत पडतें. या शोधावरून रसेल, ट्रॉट्स्कीसारख्या शास्त्रज्ञांनीं मानवी स्वभाव सुधारण्याविषयीं मोठमोठें मनोरे रचिले आहेत. शरीरास जरूर ती रासायनिक द्रव्यें पुरवून एकंदर मानवी बुद्धिमत्ता इतकी वाढवितां येईल कीं, सर्व मानवी प्राणी हे न्यूटनहून वरिष्ठ दर्जाच्या बुद्धिमत्तेचे निपजतील ! दुर्दैवानें मनुष्याची बुद्धिमत्ता हल्लीच्या परिस्थितीहून जास्त वाढविणाऱ्या रासायनिक औषधाचा शोध अजून तरी लागला नाहीं.

वास्तविक मानसशास्त्राचें काम मानवी स्वभाव बदलण्याचें नसून मानवी स्वभावाचें स्वरूप काय आहे याचें ज्ञान करून देणें, हें होय. शारीर-शास्त्राच्या मदतीनें मनाविषयीं बऱ्याच गोष्टी अधिक चांगल्या समजतात, यांत शंका नाहीं. मानसशास्त्राचे सिद्धांत व्यवहारांत उपयोगांत आणण्याच्या प्रत्यक्ष प्रयोगावरून ही गोष्ट सिद्ध होते. मानसिक रोग बरे करणें तसेंच शिक्षण, उद्योगधंदे, राजकारण या सर्व गोष्टींत त्यांचा उपयोग होतो, व मानवी समाजाच्या वागणुकीचें नियंत्रण करतां येतें. तेव्हां मनुष्याच्या शारीरिक वर्तनावरून त्याच्या मनाविषयीं आपणांस जर माहिती कळते, तर शास्त्रीय दृष्ट्या अत्यंत गुंतागुंतीच्या, मेंदूचें वसतिस्थान अशा, शरीरावांचून मनाचें निराळें अस्तित्व कशाला मानावयाचें ? जडवादी मानसशास्त्राचा शेवट दाखविणारे जे वर्तनवादी ( Behaviourists ) आहेत त्यांचें मत असें आहे. त्यांच्यामतें शरीर प्रत्यक्ष दिसतें, त्याचे नियम समजतात, मग त्यांतील जाणिवेविषयीं एवढा सोपस्कार कशास पाहिजे ?

परंतु मानसशास्त्रानें मानवी स्वभावाच्या स्वरूपावर पुष्कळ प्रकाश पाडला आहे कीं नाहीं, हा आपणापुढें प्रश्न नसून जें मानसशास्त्र मन म्हणजे सृष्टींतील कार्यकारणभावांनीं बद्ध असा पदार्थ, असें समजून त्याचें संशोधन करण्यास प्रवृत्त होतें, तें मनासंबंधीं संपूर्ण सत्य सांगू शकेल काय हा आहे. मन हें दूर कोठे नसून प्रत्येकाजवळच आहे, तेव्हां हें लक्षांत ठेवून आपली मनोभूमि म्हणजेच शरीर व त्यांचीं कर्मे ( Mechanism of behaviour ) असें समीकरण मांडता येईल काय ?

## जडवाद आणि धर्म

मनुष्याची धर्माकडे प्रवृत्ति कशामुळें असते याचें उत्तर जडवादी मानसशास्त्र असें देतें कीं, ही प्रवृत्ति साहजिक, नैसर्गिकच असून ती कांहीं काल उपयुक्त असणारी अशी मानवी चूक होय. मुळांत चुकीच्या गोष्टी सुद्धा कांहीं वेळा उपयोगास येतात. ते उपयोग येणेंप्रमाणें–

१ मानवाच्या आत्यंतिक जरूरीच्या वेळीं धर्मानें त्यास उत्तेजन दिलेलें आहे. प्रारंभींच्या कालांत मनुष्याला निसर्गाशी तीव्र झगडा करून स्वसंरक्षण करणें भाग होतें. त्यावेळीं ईश्वरी साहाय्यानें या संग्रामांतून विजय मिळविण्याची आशा ही धर्मानें जागृत ठेविली. या जागृतीमुळें त्यास निसर्गावर ताबा मिळवितां आला. मानवाची कल्पनाशक्ति वाढली व ध्येयनिष्ठा दृढ झाली.

२ त्याप्रमाणें धर्मानें सामाजिक बंधनें दृढ करण्याचें कामीं मदत केली. रूढीबद्दल समाजांत आदरभाव वाढवून सामाजिक जीवनास स्थैर्य प्राप्त करून दिलें.

३ धर्मातील निरनिराळ्या विधीमुळें प्रारंभकालीन मानवांच्या भावनांना एक प्रकारचें वळण लागलें व निरनिराळ्या ललितकलाही जन्मास आल्या.

ऑगस्ट कॉन्ट हा फ्रेंच तत्त्वज्ञ वरील मतांचा पुरस्कर्ता होता. त्यानें मनुष्याच्या सृष्टिविषयक विचारांच्या विकासाच्या तीन अवस्था वर्णिल्या आहेत. पहिली आधिदैविक ( Theological ), या अवस्थेंत निसर्गातील सर्व घटनांस दैवी कारण मानण्यांत येतें. दुसरी आध्यात्मिक ( Metaphysical ). यावेळीं त्या घटनांचें कार्य निरनिराळ्या शक्तीमुळें होतें असें मानण्यांत येतें. तिसरी आधिभौतिक ( Positive ), ही सर्वांत श्रेष्ठ व सुधारलेली अवस्था होय. मनुष्याच्या ज्ञानाची प्रगति झाल्यामुळें पहिल्या दोन मागें पडून तिसरी स्थिति त्यास प्राप्त होते व निसर्गाच्या नियमाप्रमाणें कार्यकारणभावामुळें या घटनांचा उलगडा करण्याकडे प्रवृत्ति होते.

## जडवादी तत्वज्ञानाचें परीक्षण

कांटनें वर सांगितल्याप्रमाणें आधिदैविक व अध्यात्मिक दृष्टीपेक्षां आधिभौतिक दृष्टी ही अधिक श्रेष्ठ व सुधारलेली आहे, असें जरी म्हटलें आहे, तरी या दृष्टीनें विश्वाचें स्वरुप ठरविण्याचा जो प्रयत्न केला जात आहे तो अगदी अपुरा पडतो. धर्म आणि तत्वज्ञान यांतील भोळचा व पूर्वग्रह दूषित अशा समजुतीस धक्का देऊन वस्तुस्थितीची माहिती करुन देण्याचें श्रेयस्कर कार्य आधुनिक विज्ञानानें बरेंच केलें असलें तरी धर्म व तत्वज्ञान यांची जागा मात्र तें पटकवूं शकत नाहीं, व त्यांचें महत्वही कमी होत नाहीं. उलट विज्ञानावर उभारलेला जडवाद विज्ञानांतीलच नवीन नवीन शोधानें खिळखिळा झाला आहे, हें खालील गोष्टींवरुन दिसून येईल.

पाश्चात्य देशांमध्यें एकोणिसाव्या शतकांत जडवादाचें फार प्राबल्य होतें. परंतु ज्याच्यावर जडवाद अधिष्ठित होता त्या पदार्थविज्ञानशास्त्रांतच एकोणिसाव्या शतकाचे अखेरीस क्रांती झाली. इ. स. १८९५ सालीं रॉन्टेजननें क्ष–किरणांचा शोध लावला; त्यामुळें जगांतील सूक्ष्म अशा परमाणूहून सूक्ष्म गोष्टींच्या शोधास अमूल्य अशी मदत झाली. पदार्थविज्ञानशास्त्रांतील मूलभूत कल्पना बदलल्यामुळें त्या शास्त्राच्या आधारानें जे विश्वाचें स्वरुप पुढे मांडलें जात होतें त्यांतही पुढीलप्रमाणें फरक पडले.

(अ) पूर्वी परमाणू (Atom) हा अविभाज्य व न बदलणारा घटक आहे, असें मानलें जात असें. परंतू नवीन शोधानें परमाणूंचेंही पृथक्करण होऊन त्याच्यापोटीं अत्यंत गुंतागुंतीचे चिमुकलें विश्वच आहे, असें आढळून आलें आहे. एका परमाणूचे पोटीं केंद्रांत घन विद्युत् कण (Proton) असून त्या भोवती अनेक विद्युत्कण (electron) फिरत असल्यामुळें अनंतकालपर्यंत स्थिर भासणारा परमाणु खरोखर तसा नसून त्यांत गती व बदल चाललेले असतात असा शोध लागला.

(आ) जडद्रव्य व शक्ति यामध्यें मानला जात असलेला निश्चित भेदही वरचेवर नाहींसा होत चालला आहे. व जडद्रव्य व शक्ति यांचें एकमेकांत रूपांतर होऊं शकतें असें प्रत्ययास येत आहे.

(इ) विज्ञानांतील अनुस्यूततेचा नियमही (Law of continuity) डळमळीत झाला आहे. उदाहरणार्थ इलेक्ट्रॉन हे एका कक्षेंतून दुसऱ्या कक्षेंत मध्यंतरी कोणत्याही अवकाशांत नसतांना उडी मारून जातात असें सिद्ध झालें आहे.

(ई) आइन्स्टिनच्या सापेक्षता सिद्धांतानें दिक् व काल हे परस्पर भिन्न नसून परस्परसापेक्ष आहेत असें दिसून येतें.

सारांश जडवादी तत्वज्ञान ज्या विज्ञानावर उभारलें जात होतें, तो पायाच बदलूं लागला आहे. त्यामुळें जगताच्या बुडाशी जड व अविभाज्य परमाणू आहेत असें म्हणणारा जडवादी पंथ समूळ लटका पडला आहे. म्हणून असला जडवाद आतां मृत झाला आहे, असें प्रो. एडिंग्टन सारखा शास्त्रज्ञ सुद्धां म्हणत आहे,

"Materialism in its literal sense is long since dead."

–Science and The Unseen World, Page 31

या खेरीज जडवादतत्वज्ञानांतील अधुनिक प्रकार म्हणजे निसर्गवाद (Naturalism). तो सुद्धां संपूर्ण विश्वाचें सम्यक् स्वरुप सांगण्याचें कामीं अगदी अपुरा पडतो. हा अपुरेपणा असण्याची कारणें पुढीलप्रमाणें आहेत.

१) निसर्गवादांत जुन्या जड परमाणूंची कल्पना जाऊन नव्या विद्युत् स्फुरणाची कल्पना आली; परंतु जगांतील विविध रंग, रूप, नाद, इत्यादि अनुभवाला येणाऱ्या गुणधर्मांचा उलगडा निसर्गवाद करूं शकत नाहीं.

२) निसर्गवादानें मानवी मनाचाही उलगडा होत नाहीं. जडवादी मानसशास्त्र मेंदू म्हणजेंच मन असें प्रतिपादन करील, तर तें चुकीचें आहे; कारण मन हें आपणास जाणू शकतें, पण मेंदूस तसें करतां येत नाहीं. मेंदू हा विशिष्ट प्रदेशांत असतो. पण मनाचें अस्तित्व अमूक स्थानीं आहे असें सांगतां येणार नाहीं. मेंदू हा वर्तमान कालांतच असतो, पण मनाची व्याप्ति भूत व भविष्य काळांतही असते. मेंदू हा पदार्थ आहे. परंतु मन हें पदार्थाचें

मूल्यमापन करणारें आहे, तेव्हां मन हें शरीर अथवा मेंदू नसून त्याहून वरिष्ठ दर्जाचें आहे. तेव्हां निसर्गांतून विकासक्रमानें मन निघालें असें म्हणणें म्हणजे हलक्यांतून वरिष्ठ उत्पन्न झालें असें म्हणण्याजोगें आहे. म्हणून एथेंही निसर्गवाद अपुरा पडतो.

३) निसर्गवादाप्रमाणें मनुष्याच्या मनांतील विचारास कारण कांहीं तरी पूर्वकालीन गोष्ट असली पाहिजे. कारण बदललें कीं कार्यही बदलतें तेव्हां मनुष्याचें तत्वज्ञानही त्याचा स्वतःचा आनुवंशिक स्वभाव व अशाच इतर गोष्टींवर अवलंबून रहाणार. शोपेनहारचा नैराश्यवाद हा त्याच्या पोटांतील यकृत व्यथेचा परिणाम असूं शकेल. आतां जडवाद अगर निसर्गवाद याचे बाबतींत असेंच कांहीं कारण असलें पाहिजे असें म्हणता येईल काय? व आहारामध्यें बदल केल्यानें एकाद्या जडवाद्याचें रूपांतर श्रद्धाळु माणसांत होईल काय? व मनुष्याचें तत्वज्ञान हें असल्या एकाद्या कारणावर अवलंबून राहू शकत असलें, तर तें खरें आहे असें म्हणतां येईल काय? व तसें म्हणतां आल्यास खुद्द जडवादी तत्वज्ञानही आपल्या हातानेंच आपलें खंडन करीत आहे असें म्हणता येईल.

४) विश्वांतील कांहीं भागाचा उलगडा जडवाद मुळीच करू शकत नाहीं. साध्या गोष्टींचें कारण निसर्गाचा नियम म्हणून सांगण्यांत येतें व तो नियमही आणखी एकाद्या सामान्य नियमाचें उदाहरण म्हणून सांगितला जातो, परंतु अखेरचा नियम मात्र काय असावा याचा उलगडा होत नाहीं.

एकंदरींत जडवादाचा अथवा निसर्गवादाचा मुख्य दोष म्हणजे विश्वाविषयीं असणारी त्यांची कोती दृष्टि होय. विश्वामध्येंच असणारा मानव त्याचीं ध्येयें, त्याच्या आकांक्षा त्याचप्रमाणें नैतिक व धार्मिक मूल्यें या प्रत्यक्ष आढळणाऱ्या गोष्टी डावलून भागत नाहीं. त्यांचें योग्य मूल्यमापन झालें पाहिजे तें जडवाद करूं शकत नाहीं. भौतिकशास्त्राची वाढ कितीही झाली, तरी मानवी जीवितांतील महत्वाच्या गोष्टी व मूल्यें या त्याच्या कक्षेबाहेरच रहातात.

'Science does not include art or friendship or various other valuable elements in life.....Science has nothing

to say about values.........Science can tell us much about the means of realizing our desires, but it cannot say that one desire is preferable to another '—

Religion & Science by B. Russell Page. 175-176

" निरनिराळ्या कला, मानवी जीवनांतील स्नेहाचीं बंधनें व इतर मूल्यवान गोष्टींचा समावेश भौतिक शास्त्रांत होत नाहीं. आपल्या इच्छा तृप्त करण्याच्या साधनांची माहिती भौतिक शास्त्रें देऊं शकतील, परंतु एका इच्छेपेक्षां दुसरी इच्छा ही उच्च व श्रेष्ठ कां आहे हें सांगावयाचें कार्य तीं करूं शकत नाहींत." यामुळें भौतिक शास्त्रावर उभारलेला निसर्गवाद अगर जडवाद ही अपूर्णच आहे. कांहीं अवास्तव समजुती दूर करण्याचे दृष्टीनें व अतींद्रिय वादास, ( Supernaturalism ) प्रतिक्रिया म्हणून त्याचा उपयोग असला तरी याहून त्याची किंमत अधिक मानतां येत नाहीं.

# महावैष्णव नरसी-मेहता

गुजराथेंत नरसी मेहता हे १५ व्या शतकांत होऊन गेले. ते एकनिष्ठ व प्रेमळ वैष्णव असून वैष्णवधर्माची श्रेष्ठता दाखविणारीं अनेक कवनें त्यांनीं रचिलीं आहेत. या पद्यापैकीं "हार माला" नांवाचें एक प्रकरण आहे. जुनागडास श्रीदामोदरमंदिरांत नरसी हे गोविंदाचे गुणानुवाद संकीर्तन करीत होते. त्यांत अनेक स्त्री पुरुष भाग घेत. नरसी स्वत: उत्तम पोषाख धारण करून, गळ्यांत माल, कपाळी तिलक लावून प्रेमरसांत रंगून भजन करीत. पण गावांतील कुटाल लोकांना तें पहावलें नाहीं. त्यांनीं राजाकडे तक्रार केली. राजानें सभा भरवून कांहीं संन्याशी बोलाविलें व त्यासमक्ष नरसीची परीक्षा करण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें नरसीसही बोलाविलें. त्यांत संन्यासी, राजा व नरसी यांचीं प्रश्नोतरें झालीं. त्यांत नरसीनें मोठ्या मार्मिकपणें वैष्णवधर्माची महती सांगून सर्वांना निरुत्तर केलें. श्रीकृष्णजीची करुणा भाकली. तेव्हां देवांनीं आपल्या कृपेचें चिन्ह म्हणून आपल्या गळ्यांतील हार नरसीचे गळ्यांत घातला. हा कथाभाग "हार मालें"त आला आहे. त्याचा सारांश पुढें देत आहे.

**श्री दामोदर मंदिर, सुंदर, जुनागढ जणो जुग आज**
**धर्मवंत श्रुतिशास्त्र सनातन विना वैष्णव मंडळिकनु राज ।**
**एक समे मेहता मोसाळे आव्या मामा मंदिर सार**
**नित्य प्रत्ये बेसे हरिमंदिर करे कीर्तन हरिनो व्यापार ।**
**सुरसेना सखिओनी साथे गानतान करे रंग अपार**
**मनशुं मन प्रसन्न थई छबीलो मेहेता कंठ आरोपे हार ।**

ते चरचा चाली चाचरमा सुणी मामो मन सोचे तेह
मेहेतानें शिखामण दीधी तु आज पछे न करीश एह ।
त्यारे मेहेते मन विमास्युं ए पापी मुने वारे आज
समजे नहीं कांई सान वोणो हार आपे मने महाराज.
सोरठ सगळे सोहोर थयो छे कळिमां को कारण छे ए ह ।
नरसैयो हरीकीर्तन नव मूके हरिने गमशे थाशे तेह ।

सारांश--जुनागडमध्यें श्रीदामोदराचें सुंदर मंदिर असून तेथें श्रुति-शास्त्र व धर्मवंत परंतु वैष्णव नसलेला मांडलिक राजा राज्य करीत आहे हें सर्व जाणतात. एकदा नरसी मेहेता आपल्या आजोळी ( जुनागडास ) आपल्या मामाकडे आला. नेहमीच्या सवयीप्रमाणें तो हरीच्या मंदिरांत बसूं लागला, हरीचें कीर्तन करून हरीचा व्यापार करूं लागला. सुरेल गाणाऱ्या अशा सख्याच्या सह गायन करून त्यानें कीर्तनांत अपार रंग उधळला. भगवान् श्रीकृष्ण मनांत फार प्रसन्न होऊन त्यांनीं मेहेत्याच्या गळ्यांत आपल्या गळ्यांतील हार घातला. त्याची चर्चा गावच्या चावडीवर सुरूं झाली व ती ऐकून त्याच्या मामानें मेहेतास सांगीतलें कीं, तूं आजपासून हें करू नकोस. त्यामुळें नरसी मेहता मनांत उद्विग्न झाला. " हा पापी मला आज कीर्तनापासून दूर ठेवीत आहे. एवढे सुद्धां त्यास समजत नाहीं कीं देवानें स्वतः मला हार दिला." असा विचार त्याचें मनांत आला. कलि-युगांत असें कसें घडलें? यावद्दल सर्व सौराष्ट्रांत गडबड उडाली. देवाच्या मनांत असेल तसें घडेल असा विचार करून नरसीनें कीर्तन करण्याचें सोडलें नाहीं.

लोकांत चाललेली चर्चा राजाचे कानीं गेली. तेव्हां त्यानें संन्याशाची सभा भरवून तिच्यांत नरसीचा निवाडा करण्याचें ठरविलें. त्या सभेंत कंद-मुळें भक्षण करणारे सतरा संन्यासी उपस्थित झाले. चर्चा ऐकण्यास गांव-करीही जमले. तेव्हां राजानें नरसीस विचारलें, तूं स्त्रियासह नटासारखा नाचतोस आणि शेवटीं सांगतोस कीं, मला वैकुंठनाथानें हार दिला. वैष्ण-वपणा कसला व हा तुझा धर्म कोणत्या प्रकारचा?

त्यावर नरसी म्हणाला–

भाई मुने हरिगुण गावानी टेव पडी, मारा नाथजीने न मूकुं एके घडी
विधायुं मन मारुं नव रहे अळगुं, प्रभुसाथें मारे प्रीत जडी.
ए दिवस उद्यमनें गयो तो, ते लेने तुं जणी;
आखा दिवसने रळीखपी आव्यो, भाभीए न पायुं पाणी
मे जण्युं ध्रुवनी पेरे करूं रे, एवी वात उर आणि
मात ध्रुव वचने तपने चाल्या, तेम अमारे भाभी गोराणी
अेम मन निश्चे कीधु, हरिगुण गांऊ वखाणी
पोते पोतानुं बिरद पाळशे, पूरण प्रीत प्रमाणी
जेणे नामानुं छापरुं छाई आल्युं, आपी कबीरनें अविचळ वाणी
तेपे तो हूं हरिनो वहालो, छबीलोजी आपशे पाणी
अेवां अेवां वचन सुणी मारा. भाभी ते बोल्या वाणी
उठो दिवरिया, हुं हसती हुती, तत्क्षण आपुं पाणी
धन्य धन्य वहालो भाभीहृदेमां, वसिया सारंगपाणी
म्हणे नरसैयो ते दहाडानी, छबिलाशुं प्रीत बंधाणी

सारांश–भाई, मला हरिगुण गाण्याची सवय जडली आहे. माझ्या नाथजीस मी क्षणभर मुद्धां विसरूं शकत नाहीं. हरीनें वेधलेलें मन त्याच्या वेगळें राहूं शकत नाहीं. देवावर माझें प्रेम जडलें आहे. तें कसें जडलें तें ऐक. एके दिवशीं मी कामास गेलो होतो. सारा दिवस काम करून दमून आल्यावर माझ्या थोरल्या भावजईनें मला प्यायला पाणी सुद्धां दिलें नाहीं. माझ्या मनांत आलें कीं, आपण ध्रुवबालाप्रमाणें करू, सापत्न मातेचे शब्द ऐकून ध्रुव वनांत गेले तसें हिचे शब्द ऐकून घर सोडून जाऊं व हरीचे गुण गाऊं तो आपलें ब्रीद सांभाळील. त्याच्या पूर्ण प्रीतीची उदाहरणें आहेतच. ज्यानें नामदेवाचें छपर शेकारलें व कबीरास उत्तम वाणी दिली त्याचे गुण गाइल्यास मी त्यास प्रिय होईन व तो छबीला मला पाणी देईल. हे माझे शब्द ऐकून भावजय म्हणाली "भाऊजी उठा, मी तुमची थट्टा करीत होते. आता पाणी देते" भावजयीच्या हृदयांत ज्यानें प्रवेश केला त्या सारंगपाणीची धन्यता होय. त्या दिवसापासून माझी प्रिय कृष्णजीवर प्रीती जडली."

नरसीचें बोलणें ऐकून राजा म्हणाला–

**कोण छे छबीलो ने कोण नाथ, कोणे मूक्यो तारे मस्तक हाथ ?**
**विषय शृंगारमा तूं भिन्यो हरि मळवानो तुं मारग कहे**
**लंपट पणुं तुं मुकी दे अबोल्यो अध्यात्म ग्रहे**
**ज्ञान वैराग्यनें पंथे पळे गर्भवासनो फेरो टळे**
**आ सउ संन्यासी कहे छे तने पछे कहोश वार्योनही मने**
**भोम भमे नरसैं कां भमे गुरुवीण ज्ञान आवेनही क्यमे ?**

सारांश–तुझा प्रियकर कोण, नाथ कोण आणि तुझ्या डोक्यावर कोणी हात ठेविला ? विषय शृंगारांत तू निमग्न राहून हरी मिळविण्याचा मार्ग सांगतोस ! हा लंपटपणा तूं सोडून दे. अध्यात्म ग्रहण कर. ज्ञान व वैराग्याच्या वाटेनें जा. तरच तुझ्या गर्भवासाचा फेरा टळेल. हे सगळे संन्यासी तुला हेंच सांगतात. असें म्हणूं नकोस कीं, मला कोणी सांगणार भेटलें नाहीं. नरसी मनांत म्हणाला, भ्रम हा राजास झाला आहे. मला झालेला नाहीं. गुरुशिवाय ज्ञानप्राप्ती कां होणार नाहीं ?

नरसीनें आपली पूर्वीची हकीकत राजास सांगितली. बालपणीं नरसी भावजईवर रुसून वनांत गेला. तेथें शंकरांनीं प्रसन्न होऊन " वर माग " म्हणतांच तुम्हाला प्रिय तें मला द्या असें म्हणाला. शंकरांनीं नरसीस कृष्णप्रभूची रासलीला दाखविली. त्यावेळीं शंकरांनीं नरसीच्या हातांत दिवटी धरण्यास दिली होती. नरसीचें अंतःकरण पाहून कृष्णप्रभूनीं आपली लीला गावयाची त्यास आज्ञा केली. त्याप्रमाणें नरसी ती लीला गाऊं लागला.

त्यावर राजा म्हणाला–आज कलियुग आहे. देवानें केलें तें आपण करणें अयोग्य होय. देवानें गोवर्धन उचलला, दावानल प्राशन केला. कालियाच्या डोक्यावर नृत्य केलें. नवीन गाई गोपाळ तयार करून ब्रम्हदेवाचा गर्व हरला, तसें आपल्याकडून होणार नाहीं. तेव्हां–

**" तू था संन्यासी, जइ रहे काशी, भलो होय तो निर्गुण गानी रे "**

नरसी म्हणाला– देवानें विषयीं लोकही तारले आहेत. त्यासाठीं त्याला अधिक वेळ लागला नाहीं. राजा, मी आपल्या डोळ्यांनीं कृष्णलीला

पाहिली आहे. माझ्यापुढें तूं मुक्तीचें गुण गाऊं नकोस (सांभाळय भीम मे दीठा विनोदी (कृष्ण) तमो मुक्ति वाणी न गावोरे)

राजा म्हणाला–देव आपल्या हृदयांत आहे असें तू म्हणतोस तें कसें शक्य आहे? जमीनीहून मोठा पर्वत, पर्वतांत मंदराचल मोठा, तो मंदराचलही समुद्रांत बुडतो, तो समुद्र पृथ्वी धारण करते, ती पृथ्वी ही शेषमस्तकावर एकाद्या कणिकेप्रमाणें दिसते, तो शेषही ज्याच्या गळयांतील असा मोठा शंकर, तो शंकरही विराट कृष्णाच्या मुखांत, एवढा मोठा हरी तो तुझ्या हृदयांत कसा?

त्यावर नरसी उत्तरला–"साचु सगपण (सांयरेपणा) शामळानुं, विसरीयुं ते तारी छातडी ये" छातीच्या आकाराची गोष्ट सोडून दे. श्रीकृष्णाचा सोयरेपण हाच सत्य आहे. "मारा बालाजीनें प्रेमरस भावे रे" माझ्या प्रियकृष्णास प्रेमरस आवडतो. त्याचें रूप एकदा पाहिल्यावर मी माझ्या हृदयांतून त्याला काढणार नाहीं.

राजा म्हणाला–तूं बोलण्यांत पटाईत दिसतोस. तुझा हरी तुला हार देईल, तेव्हां मी खरें मानीन.

तें ऐकून नरसीनें कृष्णप्रभूची प्रार्थना केली–" देवा, तू भक्ताचे मनोरथ पूर्ण करणारा आहेस असें म्हणतात. सुदामजीला तूं इंद्राचें वैभव दिलेस. आज तूं कृपण कसा झालास? कालियासारख्याच्या फडावर तूं नाचलास तें बळ तुझें कुठें गेलें? तूं माझ्या हाकेस धावून येत नाहींस. तूं राधाजीजवळ जाऊन बसला आहेस काय? तूं शिशुपाल जरासंधादिकांचा नायनाट केलास. नरसी आज तुझें स्मरण करीत आहे. या बालकाचें रक्षण कर"

तें ऐकून रघुनाथाश्रम नामक संन्यासी म्हणाला–

"अरे, रामजीचें नांव घे. त्यानेंच तुझा भवबंध तुटेल. तुझें काम कृष्णाकडून होणार नाहीं. राजीवलोचन, भवदु:खमोचन दीनानाथास दयाळू अशा रामाला सोडून तूं गाई चारणाऱ्या गोपाळास काय धरुन बसलास? तुला हार मागायचा तो रामाजवळ माग." नरसी म्हणाला–अरे संन्याशा मी म्हातारा होईन तेव्हां राम राम म्हणेन. ज्यानें कृष्णाला पाहिले तो

त्याला सोडूं शकणार नाहीं. कृष्णच माझी माता, पिता, सखा, सहोदर आहे. (कृष्णजी मात मारे, कृष्णजी तात छे सगां सहोदर कृष्णजी सही.) सनकादिकांना वंद्य असा हरी माझ्या हृदयांत रहात आहे. हे संन्याशा तू भ्रमांत पडूं नकोस. कृष्ण कृष्ण म्हणून गर्जना कर."

राजानें तें बोलणें ऐकून रामाची स्तुती करण्यास सुरवात केली, व रामनामाची गर्जना करण्याचा उपदेश नरसीस केला. तेव्हां नरसी म्हणाला– अरे रामदासा, तुझें बोलणें राहू दे. तुझी भक्ती दंभानें भरलेली आहे. खरा रामसेवक समदृष्टी असतो. त्यास रामांत व कृष्णांत अंतर दिसत नाहीं.

तें ऐकून नरसिंहाश्रम म्हणाला–मी २६ वर्षे काशींत राहून आत्मविद्या अभ्यासिली. छत्तीस वर्षे प्रयागांत व मथुरेस राहिलों. तरीही स्वप्नांत सुद्धा मला कृष्णजी दिसला नाहीं. कित्येक वर्षे नैमिषारण्यांत व पुष्करांत काढली तरी दिसला नाहीं. मग तुझ्या सारख्यास तो कसा दिसेल? तेव्हां तूं सर्व सोडून संन्याशी हो.

नरसी उत्तरला–अरे संन्याशा, तुझ्या ठिकाणीं कृष्णसेवेचा आनंद चाखण्याची शक्ति नाहीं. अंगास राख चोपडून तूं भीक मागतोस व माझा हेवा करतोस. हें सर्व सोडून तूं माझ्या शामचें स्मरण कर. गळ्यांत माळ घालून वैष्णव हो.

नरसीचें भाषण ऐकून उपस्थित असलेला अद्वैताश्रम नांवाचा संन्याशी उभा राहिला. तो म्हणाला:– "नरसी, तू कपटी आहेस. तू माळा, तिलक, मुद्रा धारण करतोस, यावरून तुला ब्राह्मण म्हणतां उपयोगी नाहीं. स्वधर्म सोडून तूं सगुण ब्रह्माची उपासना करतोस. तुला अक्कल असेल तर श्रीकृष्णास सोडून निर्गुणाची उपासना कर."

नरसी म्हणाला:– "माझा प्रभू सोडून देऊन सुटण्यासारखा नाहीं. अरे संन्याशा, शुकसनकादिक ज्याचे गुण गातात तो देव कसा सोडतां येईल? विषयीं लोकांच्या उद्धारार्थ तर माझ्या प्रभूनें अवतार धारण केला आहे. माझ्या रसिक रंगी अशा कृष्णास मी जसा पाहिला तसेंच त्याचें गाणें गात आहे. राधाजीबरोबर हिंदोल्यावर विरहत असलेला पाहिला व त्या रूपांतच त्यानें माझ्या हृदयांत प्रवेश केला आहे."

राजा म्हणाला:– "नरसी, अजून तरी तूं कृष्णास सोडून रामाचें नांव घे."

नरसी म्हणाला:– "राजा, माझा हेवा वाटत असल्यामुळें लोक वाटेल ते बोलतात. त्यांना भक्तीचें वर्म मुळींच कळत नाहीं. त्याच्या बरोबर ज्याचें मन रमलें, तो त्याशिवाय राहूंच शकत नाहीं."

त्यावर गोविंदाश्रम नामक संन्याशी म्हणाला:– "देवाची प्राप्ती गुरुशिवाय होत नसतें, असें असून गुरुवांचून तुला देव मिळाला असें कसें सांगतोस? आम्हीं संन्यास धारण करून अष्टांग योग साधला, दंडकमंडलू धारण केले तरी सुद्धां आम्हांस परमपद मिळालें नाहीं. तूं तर टाळ वाजवून नाचून आणि गाऊन गोविंद मिळविल्याच्या गोष्टी करतोस. ही गोष्ट शक्य नाहीं. मी तुला ॐकाराचा उपदेश करतो तो ग्रहण कर."

नरसी:– "संन्यास धारण करून कांहीं साध्य साधणार नाहीं. वैष्णवाखेरीज दुसरा कोणीही तरत नाहीं. तूं तर वैष्णवाची निंदा करतोस. म्हणून तूं नरकाचाच अधिकारी आहेस. लोक संन्याशी कां होतात हें मला ठाऊक आहे. बायको मेल्यावर उद्वेग येतो अगर घरांत खायला मिळत नाहीं म्हणून संन्याशी होतो. प्रेमभक्तीशिवाय कान बधिर होइतों फुंकलें तरी कांहीं उपयोग नाहीं. तुझ्या ॐकाराचें तूं लोणचें घाल. आणि माझ्याबरोबर वृंदावनास चल. कमंडलू फेकून दे व हातात टाळ घे."

**(तारा ओंकारनुं करने अथाणु। (लोणचें) मारी साथे वृंदावन चलो रे ।। भणे नरसैया मेल (फेक) तारूं (तुझें)। कमंडल करमा आ ताल झाल (घे) रे।)**

राजा :– तूं वाकडे बोलतोस व परमहंसाची निंदा करतोस?

नरसी :– माझ्या हृदयांतील शामाचा मी प्रियभक्त आहे. हें संन्याशी कसें ओळखणार? अति आनंदानें मी हरीचे गुण गातो व तुम्ही लोक रागानें जळता. प्रेमरसाचा आस्वाद शंकर, शुक, व्रजनारी व नरसीच जाणतो

**(प्रेमरसनो स्वाद शंकर जणे, के जणे शुक योगीरे।**
**अेक जणे छे व्रजनी नारी, बीजे नरसैया भोगीरे ।।)**

त्यावर सहचरानंद नामक संन्यासी म्हणाला, "वैराग्याशिवाय देव मिळणार नाहीं. तुला आत्मज्ञानाशिवाय दर्शन कसें होईल ? तुझ्या शृंगार वर्णनानें व लंपटपणानें देव प्राप्त होणार नाहीं. तरी तूं हें सर्व सोडून वैरागी हो."

नरसी :– "डोई मुंडून टोपी घातली म्हणजे बैरागी होत नाहीं. आम्ही वैष्णव असून आमचें लग्न कृष्णाशीं लागलें आहे. ज्याची ममता नाहींशी झाली तोच खरा बैरागी होय. भिक्षा मागतो व द्वेष करतो त्या जोग्यास आसुरी म्हटलें पाहिजे. संसारांत राहून अलिप्त असणारा व सर्वांशीं समदृष्टीनें पहाणाराच खरा वैरागी होय. तुझें पुण्य अभिमानानेंच खाऊन टाकलें आहे. तुला प्रेमाचा रंग लागलेला नाहीं तेव्हां हें भगवें वस्त्र सोडून दुसरीं वस्त्रें परिधान कर."

तें ऐकून माधवानंद नामक संन्यासी म्हणाला–" वैष्णव असून तूं फार बडबडतोस. हरिजन असतो त्याचें अंगीं नम्रता असतें. शुकादिकांनीं सुद्धां वैराग्य धारण केलें होतें."

नरसीः– भिक्षावृत्तीला तूं भुलूं नकोस. लक्ष्मीवराबरोबर लग्न लागलें नाहीं तोंवर हें सर्व खोटें आहे. भक्तीशिवाय भगवें धारण करणें हें दुःखास्पदच होय.

राजा–नरसी, तू खरी भक्ती केलीच नाहींस. खरी भक्ति म्हणजे निर्गुण ब्रम्हाचीच. तू तर निर्गुणाची निंदा करतोस. तेव्हां तुला त्याचा शाप लागेल.

नरसीः– भक्तास कधीं शाप बाधत नाहीं. दुर्वासाचें उदाहरण ध्यानांत घे. त्यानें अंबरीष राजासारख्या भक्तास शाप दिला, तेव्हां उलट तो त्याचें अंगावर येऊन सुदर्शन चक्र त्याच्या ( दुर्वासाच्या ) पाठीमागें लागलें.–

राजाः–देवाचा हार तुला विचारानें मिळेल. तूं उत्तम वस्त्र परिधान करतोस, हें अयोग्य आहे. आतां दोन घटकाच रात्र उरली आहे. तर तूं हे संन्यासी सांगतात तसा विचार कर.

राजाचें भाषण ऐकून नरसीनें कृष्ण प्रभूची प्रार्थना केली:-

" देवा, तुझ्या भरंवशावर मी निर्भयतेनें बोलत आहे. राजा तर मला मारावयास तयार झाला आहे. सारे संन्यासीही माझ्या विरुद्धच बोलत आहेत. मी एकटाच आहे. ही अगदीं आणीबाणीची वेळ आहे. तूंच माझें रक्षण कर "

अद्‌भुताश्रम:–असा हट्ट करून देवाचा हार तुला मिळणार नाहीं. हट्टानें मनुष्याचा दैत्य बनतो. रावण व दुर्योधनाची उदाहरणें पहा. तूं जर योग्य भक्तीच केली नाहींस तर देवानें तरी तुझें रक्षण कां करावें?

नरसिंहाश्रम:–नरसी, तूं कृष्णलीला पाहिली म्हणतोस तें सारें स्वप्नच होय. खरा उपाय म्हणजे श्रीपादास शरण जाणें हाच.

त्यावर नरसी म्हणाला:–तुमची मतें अज्ञान आणि अबुद्ध असल्यामुळें तुम्हीं चौघे चार तऱ्हेचा उपदेश करतां. तुम्हास प्रेमाची खरी रीत माहीत नाहीं.

अच्युताश्रम:–" तू गर्वानें बोलतोस. त्यापेक्षा गप्प कां बसत नाहींस?"

नरसी:–" देवानें मला तोंड दिलें आहे, तर मी गप्प का राहीन? परम प्रेमस्वरुप अशा कृष्णाची लीला मी कां गाऊं नये? मुनी दुःखी होते म्हणून त्यांनीं मौन धारण केलें. हरिरस प्याल्याखेरीज कुणाचीही भूक भागणार नाहीं. हरिरस पिऊन जी तृप्त झाली तींच खरी मनुष्यें होत. त्यांचेंच सर्व पापपुण्य धुतलें जातें."

केशवाश्रम:–" मन निर्मल करून तूं सीतापतीचें स्मरण कर. साधनांची निंदा करू नकोस. साधन खरें असलें तरच साध्य प्राप्त होतें. सर्व सोडून तूं रामनाम घे."

नरसी:–" संन्यागा, तुझा राम राहुं दे. त्यांचें काम मरायचे वेळेस आहे. जन्मापासून जोगी, कुटुंब त्यागी, स्वत:ची बायको हरवणारा असा तुझा राम, त्याचा भक्त असलेमुळें तुला कृष्णाची भक्ति समजणार नाहीं."

नरसीनें देवाची पुन्हां प्रार्थना केली व म्हटलें, " प्रभू तू सत्यभामेसाठीं स्वर्गांतील पारिजात आणलास. मी तुला फक्त एक हार मागत आहे. तूं कां बरें झोंपलास?"

प्रसादपुरी:–" नरसी, तुझ्या कर्मानेंच देव झोंपला आहे. वेद शास्त्रें सांगतात कीं विषयरस जेथें आहे तेथें विष्णुभगवान् नाहीं. राम सोडून तू विषयरस गातोस. खरा नारायण निजला नाहीं. पण तू जेव्हां शृंगार गातोस तेव्हां तुझा नारायण झोपला."

नरसीनें देवास प्रार्थिलें:–" प्रभू तूं सत्यास सहाय्य कर. हे सर्व संन्याशी तुझा महिमा जाणूं शकत नाहींत. त्यांना वाटतें, मी विषयरस गातो पण हे विषयरसाचें गायन नसून माझ्या हृदयांतील तुझ्या प्रेमाचा तो उल्हास आहे. शुकसनकादिक सुद्धां हरिलीलेचा रस चाखण्याची इच्छा करतात. हरीला गाण्यानें सर्व कार्यें सिद्धीस जातात."

ब्रम्हभारती:–" नरसी, हट्ट करून तुला कांहीं मिळणार नाहीं. हा तुझा हट्ट भलत्या वेळीं आहे. तूं वायूचा निरोध कर; शरीर शोषण कर; तर तुला प्रत्येक घरांत राम दिसेल. तूं आमच्या सारखा योगी हो."

नरसी:–" अरे आम्हीं भोगी आहोत. ज्यानें पाप केलें असेल तो योगी होईल. जटा वाढवून वैकुंठ मिळत असेल तर वडाचें झाडही वैकुंठास जाईल. दंड धारण करून परमेश्वर मिळत असेल तर हातांत लाकडाची काठी धरणाऱ्या अंधळ्यास तो मिळाला पाहिजे. अंगास भस्म लावून भगवान मिळत असेल तर गाढव राखेंत लोळतें, त्यास तो मिळाला पाहिजे."

( भोगी रे भोगी, अल्या अमे भोगी रे भोगी। जेना पाप होय ते थाय जोगी ।। जटा धरे जगदीश मळे तो, वड वैकुंठे चाले रे। दंड धरे दीनानाथ मळे तो, आंधळा लाकडी धाले। भस्म लोळे भगवान मळे तो गर्दभ छारमा ( राखेने ) लोटे रे ।। )

रात्र संपत चालली तसतसा राजाचा क्रोध वाढत चालला. नरसीनें प्रभूचा धांवा चालविला–" प्रभू तुझ्या नामाचाच केवळ आश्रय मला आहे.

तुझे भक्त कोटयावधी आहेत पण मला तू एकटाच आहेस. ( मारे तो ताहारा नामको आशरो ।..तारे सेवक कोटी छे शामला । मारे तो एक छे आश तारी ॥ ) करुणामुखानें आळवीत असतां नरसी म्हणाला " प्रभू मी तुझा इतका धावा करीत असतां तू अजून जागा होत नाहींस? कुंभकर्ण व मुचकुंद यांच्याहीपेक्षा तुला निद्रेनें अधिक घेरलेलें दिसतें." तें ऐकून श्रीकृष्णप्रभू मोठयानें हंसलें. सर्व सभा आश्चर्यचकित झाली असतां " मेहेता, हार घे, हार घे " ( ल्यो मेहेताजी, ल्यो मेहेताजी, एवी बोल्या बात रे । ) म्हणत प्रभूनें आसनावरून खाली उतरून नरसीस कडकडून आलिंगन दिलें व आपल्या कंठांतील हार त्याचे कंठीं घातला! धन्य तो नरसी की ज्यानें आपल्या रंगीला छबीला प्रभूस प्रेमपाशांनीं बांधलें! धन्य ते सभाजनांचें नेत्र कीं, ज्यांनीं देवभक्तांचा तो अपूर्व प्रीति संगम पाहिला! धन्य तें प्रांगण कीं, जेथें मानवांच्या संतप्त हृदयास निववणारा प्रेमाश्रूंचा वर्षाव झाला.

# भक्तश्रेष्ठ सूरदास

सूरकबित सुनि कोन कवि जो नहि सिर चालन करे ।।धृ।।

उक्ति चीज अनुप्रास वरन अस्थित अति भारी । वचन प्रीती निर्वाह अर्थ अद्‌भुत तक धारी । प्रतिबिंबित दिवि दृष्टि हृदै हरिलीला भासी । जनम कर्म गुन रूप सबै हरिलीला परकासी ।। विमल बुद्धि गुन ओरकी जो यह गुन श्रवननि धरै ।। सुरकवित सुनि०।।

——नाभाजीकृत भक्तमाला

सुरदासजीचें कवन । जयाच्या श्रवणीं पडे जाण । ऐसा कोणता कवि-जन । सिर न डोलवी तयातें ।। जयाची उक्ति चमत्कारिक । अनुप्रासाचें वर्ण देख । तयाची ठेवण असें सम्यक । थोरपण तैसेंची ।। ऐसें कवित्वीं केलें भाषण । ज्यांत प्रीतीचा निर्वाह पूर्ण । ऐके चरणामाजी जाण । अर्थ अद्‌भुत ठेविलासे ।। कांहींच न दिसें नेत्रास । दिव्य दृष्टी असें त्यास । हरिलीलेचा हृदयीं भास । प्रतिबिंबित जयाच्या ।। जें जें हरीचें आचरण । जन्मकर्म स्वरूप पूर्ण । सर्व प्रकाशिलें वाणी करून । किती महात्म्य वर्णू त्याचें ।। सुरदासें जे वर्णिले गुण । ते जो श्रवणीं ठेवी पूर्ण । तयाचाही बुद्धिगुण । निर्मल होतसे हरिकृपें ।।

——भक्तिप्रेमामृत

( भक्तमालेचा मराठी अनुवाद )

१ मिराबाई, तुलसीदास, सूरदास प्रभृति प्रेमळ भक्तांचीं नांवें माहीत नाहींत असा मनुष्य भरतखंडांत विरळाच सांपडेल "मीराके प्रभु गिरिधर नागर" 'बारक कहिये कृपालु तुलसीदास मेरो' 'सूर पतित तुम पतित

उधारन ' यासारखीं गोड कडवीं कोणी रस्त्यावरून एकतारीवर म्हणतांना सहज कानीं पडली तरी ती ऐकणाराच्या हृदयाचा ठाव घेतल्याशिवाय राहात नाहींत. मग तीं घोळून घोळून गाइल्यास अंतःकरणांत प्रेमाच्या लहरीवर लहरी उचंबळून येतील यांत काय नवल ? प्रेमळांचे शब्द प्रभूला सुद्धां नाचवितात मग इतरेजनांची काय कथा ? एकट्या अंतःकरणांत तेवत असलेला प्रेम–दीप सहस्त्रावधि हृदयांतील प्रेम जागे करतो आणि सहस्त्रावधि कुटुंबांत प्रेमाचीं कारंजीं नाचवितो. मनुष्य सर्व विसरूं शकेल पण प्रेमाचा चटका जीवास लावणारे शब्द विसरतां येणार नाहींत. प्रेमाचा चटका हेंच जीवाचें अमृत होय. हें अमृत विनामोल प्रेमळांच्या शब्दांतून वोसंडत असतें. असें सांगतात कीं एकदा अकबर बादशहाचे कानीं सुरदासांचीं मधुर पद्यें पडलीं तेव्हां त्यांचीं सर्व पद्यें संग्रहीत करावीत या हेतूनें त्यानें ' जो कोणी सूरदासांची पद्यें आणून देईल त्यांस प्रत्येक पद्याच्या मोबदला म्हणून एक मोहोर देण्यांत येईल ' असें प्रसिद्ध केलें, पुढें या युक्तीनें सुरदासांचीं पद्यें गोळा केल्यावर त्यांतील खरी कोणती व बनावट कोणती हें ओळखण्यास्तव त्यानें अग्निदिव्यांतून तीं पद्यें काढली. बनावट होती तीं अग्नि–आहारी गेली. व खुद्द सुरदासांची होती त्यांना अग्नि स्पर्श करूं शकला नाहीं.! ही कथा ऐतिहासिक सत्याचे दृष्टीनें न पाहतां आपण लाक्षणिक अर्थानें घेतल्यास ती सुरदासांच्या पद्यांची थोरवीच व्यक्त करते व त्यांच्या अमरत्वाची ग्वाही देते असें म्हणावयास प्रत्यवाय नाहीं.

२ सूरदासांचें अंतःकरणाचें ऐश्वर्य त्यांच्या ग्रंथांतून आपणास स्पष्ट दिसतें. त्यांच्या चरित्राविषयीं मात्र फारशी माहिती उपलब्ध नाहीं. चालत आलेल्या गोष्टीवरच आपणास बरेचसें अवलंबून रहावें लागतें व त्या गोष्टीही अनिश्चित आहेत. सूरदासांच्या कालाविषयीं आपणास अनुमान करतां येण्याजोगें आहे. सूरदासांच्या ' साहित्य लहरी ' नामक ग्रंथांत सदर ग्रंथ रचनेचा काल संवत् १६०७ (इ. स. १५५१) हा दिला आहे. सुरसारावली ग्रंथांत असें म्हटलें आहे कीं– " गुरुप्रसाद होत यह दरसन सदसठि बरस प्रवीन " गुरुच्या कृपेनें मला सदुसष्ठाव्या वर्षाचें दर्शन होत आहे. सुरसागर हा सुरदासांचा कृष्णलीलापर मोठा ग्रंथ आहे. त्याची विषयसूची म्हणजे

सूरसारावली होय व साहित्य लहरी हा सूरसागरांतील निवडक कवितांचा संग्रह होय. तेव्हां हे दोन्ही ग्रंथ एकाच ग्रंथावरून तयार झाले असल्यामुळें दोहोंच्या रचनाकालांत विशेष अंतर असणें शक्य नाहीं. तेव्हां १६०७ तून ६७ वजा जातां १५४० रहातात व त्यावरून सूरदासांचा जन्मकाल संवत् १५४० (इ. स. १४८४) च्या सुमारास असला पाहिजे.

सूरदास हे वल्लभाचार्य (इ. स. १४७९–१५३१) व त्यांचे पुत्र गोस्वामी विठ्ठलनाथ (इ. स. १५१६–१५८६) यांचे समकालीन होते. **'श्रीवल्लभ गुरू तत्व सुनायो लीलाभेद बतायो' व 'थपि गुसाई करी मेरी आठ मद्धे छाप'** या वचनावरून सुरदास हे वल्लभाचार्यांना गुरुस्थानीं मानीत होते व गुसाई म्ह. गोस्वामी विठ्ठलनाथ यांनीं सुरदासांना अष्टछापांत स्थान दिलें होतें असें दिसतें. वल्लभाचार्यांचे चार व गोस्वामी विठ्ठलनाथांचे चार शिष्य मिळून होणाऱ्या आठ शिष्यांच्या मंडळास अष्टछाप ही संज्ञा आहे. सूरदासांचा आयुष्य–काल ८० वर्षे होता अशी प्रचलीत कथा आहे. भक्तमालाकार नाभाजी हे जवळ जवळ सुरदासांच्या कालांतच होऊन गेले. त्यांनीं केलेलें सुरदासांचें वर्णन प्रारंभीच्या अवतरणांत दिलेंच आहे. सुरदास हे जन्मांध होते असा त्यांच्या कांहीं पद्यांतून उल्लेख आहे. (उदा. **करमहीन जनमको अंधो, मोते कौन न करो ।।**) व प्रचलित कथाही तशीच आहे. सूरसागरांतील सूक्ष्म वर्णनावरून ते अंध नसावेत असा कांहींचा तर्क आहे.

ऐनेअकबरी नामक अकबर बादशहाच्या रोजनिशींत बाबा रामदास व त्याचा पुत्र सूरदास हे दोघे दरबारचें कवि होते असा उल्लेख आहे व त्यावरून सुरदास हे अकबर बादशहाचे दरबारीं होते असें कांहीं ग्रंथकार अनुमान काढतात. परंतु सुरदासांच्या ग्रंथांत तसा कोठें उल्लेख नाहीं किंवा त्यांनीं कोठें अकबराची स्तुतीही केलेली नाहीं. तसेंच भक्तमालेंत सूरदास मदनमोहन नामक कवीचा उल्लेख असून त्याचा व अकबराचा संबंध दाखविला आहे. नामसादृश्यावरून वरील तर्क जुळविलेला दिसतो.

३ सूरदासाचे एकंदर तीन ग्रंथ उपलब्ध आहेत. १ सूरसागर, २ सूरसारावली, ३ साहित्य लहरी. सूरसागर हा ग्रंथ भगवान् गोपालकृष्णाची

लीला ज्यांत अत्यंत मधुर पद्यांत गाइली आहे असा प्रेमार्णवच होय. भगवंताची लीला सुरदासांनी सव्वालाख पद्यांत गावयाचा संकल्प केला. त्याप्रमाणें त्यांनीं १ लाख पद्यें रचली व नंतर त्यांचें हातून रचना झाली नाहीं म्हणून प्रभूंनीं स्वत: पावलाख पद्यें रचून आपल्या जिवलगाचा संकल्प पुरा केला. प्रभूंनीं जीं पद्यें रचलीं ती ओळखण्याची खूण म्हणजे त्या पदांचे शेवटीं सूरश्याम असें नांव घातलेलें आढळलें ही होय अशी आख्यायिका आहे. सव्वालक्ष ही संख्या बहुसंख्यावाचक आहे. सूरसागर हा खरोखरच प्रेमसागर आहे. यांत कविता श्लोकबद्ध, दोहे अगर चौपाया या सारखी नसून निरनिराळ्या रागरागिण्या मधील उत्तम गवयांनीं गाण्याजोगीं अशी अत्यंत मधुर अशी चार हजारचेवर गीतें आहेत. त्यामध्यें संपूर्ण श्रीमद्भागवतकथा आली आहे. पण मुख्यत्वेंकरून दशमस्कंधच गाइला आहे. एकंदर ४१३२ गीतांपैकीं ३६३२ गीतें दशमस्कंधाची असून प्रथम स्कंधाची २१९, द्वितीयाची ३८, तृतीयाची १८, चतुर्थ १२, पंचम ४, सहावा ४, सप्तम ८, अष्टम १७२, एकादश ६ व द्वादश ५ अशी संख्या आहे. संपूर्ण ग्रंथ शुद्ध व मृदुल व्रजभाषेंत आहे. सूरसागरांत श्रीमद्भागवतांतील कथा असली तरी तो केवळ रूपांतर नसून सूरदासांनीं कृष्ण प्रभूच्या चरित्रांतील मधुर प्रसंगांचा प्रियतेनें मनसोक्त विस्तार केला आहे. उदा. दशम स्कंधांतील सुप्रसिद्ध अशा भ्रमरगीताचे मूळ संस्कृत ग्रंथांत दहाच श्लोक असून उद्धवगोपींच्या संवादाच्या संपूर्ण अध्यायाचे ६९ श्लोक आहेत. कृष्णप्रभूचा संदेश गोपी विनीत भावानें ऐकून घेऊन त्याविरुद्ध अवाक्षरही काढीत नाहींत असें मुळांत आहे. सुरदासांनीं या प्रसंगावर अतिशय मार्मिक व मधुर अशी सुमारें ५०० पदें रचिली आहेत व त्यामध्यें गोपींच्या मुखांतून योग आणि निर्गुण यांचें यथार्थ वैगुण्य आणि भक्तिप्रेमाची श्रेष्ठता वर्णिली आहे. व्रजभाषा ही मराठी वाचकांस समजावयास जड जाते. तुलसीदासाच्या रामायणाचें ज्याप्रमाणें मराठी भाषांतर उपलब्ध आहे त्याप्रमाणें सुरदासांच्या सूरसागराचें अवश्य व्हावयास पाहिजे. व्रजभाषापारंगत अशा एखाद्या मराठी लेखकाकडून तें प्रसिद्ध होईल तो सुदिन.

सूरसारावली हा स्वतंत्र ग्रंथ नसून सूरसागराची पुरवणीच आहे. त्यांत सूरसागराची विषयसूचि आहे. साहित्यलहरी हा दृष्टिकूट नामक

काव्य प्रकारांच्या पदांचा संग्रह आहे. त्यांत एक शद्ब अनेकार्थांनीं वापरलेला असतो. अथवा शद्बांचे उघड दिसणारे अर्थ नसून ते विचित्र अर्थानें वापरलेलें असतात. उदा.

**सखीरी सुन परदेसी की बात ।**
**अरध बीच दै गये धामको हरि–आहार चलि जात ।**
**ग्रह नक्षत्र अरु वेद अरद्ध करको बरजै मुहि षात ।**
**रवि पंचम संग गये स्याम घन ताते मन अकुतात ।**
**कहु सहुक्त कवि मिले सूर प्रभु प्रान रहत न तो जात ।**

अर्थ–सखे, परदेशी गेलेल्या प्रिया विषयीं ऐक. तो मला पंधरा दिवसांत येतो म्हणाला पण महिना (सिंहाचा आहार=मास=महिना) निघून चालला. मी जर ग्रह (९) नक्षत्रें (२७) वेद (४) याचें अर्धे खाल्लें तर मला कोण थांबवील (सर्व मिळून ४० त्याचे अर्धे २०=विष) सूर्यापासून पांचवा (म्ह. बृहस्पती=जीव) घनश्यामाबरोबर गेल्यामुळें माझें मन व्याकूळ झालें आहे. सुरदास म्हणतात माझा प्रभु मला कधीं भेटेल? तो भेटला तरच प्राण राहील नाहींतर जाईल.

४ सुरदासांना वल्लभाचार्यांबद्दल अत्यादर होता. "**भरोसो दृढ, इन चरणन तेरो । श्रीवल्लभ–नखचंद्र छटा बिनु सब जग माँझ अंधेरो ।**" असें सुरदासांनीं म्हटलें आहे. सुरदास हे वल्लभाचार्यांच्या अनुयायांपैकीं होते तथापि त्यांच्या ग्रंथांत वल्लभाचार्यांच्या पुष्टि व मर्यादा मार्ग, तसेंच शुद्ध सांसारिक, मुक्त, देव–मानव–विषयक कल्पना अथवा सत्कार्यवाद, आविर्भाव, तिरोभाव इ. तात्विक परिभाषा आढळत नाहीं. एक कृष्णप्रेमाची तन्मयता सर्वत्र पसरलेली आहे. तात्विक उहापोहापेक्षां त्यांच्या अंतःकरणांत अखंड कृष्णरस पाझरत असलेलाच ग्रंथांतही दृष्टोत्पत्तीस पडतो. नमुन्यादाखल सूरसागरांतील कांहीं पदें देतो.

राधेची पूर्ण प्रीति सुरदास वर्णितात–

**राधा परम निर्मल प्यारी ।**
**कहति हौ मन कर्मना करि हृदय दुविधा टारी ।**
**श्यामको एक तुही जान्यो दुराचरनी और ।**
**जैसे घट पूरत न डोले अध खुलौ डमडौर ।।**

(राधा ही अत्यंत निर्मल नारी होय. अगदी अंतःकरणापासून मी हे निःसंशय सांगतो. राधे, तूंच कृष्णास ओळखलेंस. इतर सर्व दुराचारीच आहेत. पूर्ण कुंभ निस्तब्ध असतो परंतु अर्धा भरलेला मात्र डगमगतो)

व्रजवासी जनांनीं राधेचा उपहास केला, कारण त्यांनीं राधेचें प्रेम जाणलें नाही.

**रविको तेज उलूक न जाने तरति सदा पूरन नभ ही री ।**
**विषको कीट विषहि रुचि माने जाने कहा सूधारस ही री ।**
**सूरदास तिल तेल सुवादि स्वाद कहा जाने घृत ही री ।**

(सूर्य नेहमी पूर्ण तेजानें प्रकाशतो परंतु दिवाभीतास तें काय समजणार? विषांतील कीटकास विषच आवडतें, त्यास सुधारस कसा रुचणार? नेहमी तेल खाणारास उत्तम तुपाचा स्वाद कसा समजणार!)

कृष्णप्रभू प्रेमरुप व त्याची प्रियंप्रतीती राधा, तेव्हां राधाकृष्णांची रासलीला ही अखंडच आहे. या अखंड रासाचें वर्णन सुरदासांनीं अति सुरस केलें आहे.

**नित्य धाम वृंदावन श्याम । नित्यरूप राधा व्रज वाम ।**
**नित्य रास जल नित्य विहार । नित्य मान खंडिताभिसार ।**
**ब्रम्हरूप एई करतार । करन हार त्रिभुवन संसार ।**
**नित्य कुंज सुख नित्य हिंडोर । नित्यहि त्रिविध समीर झकोर ।**
**सदा वसंत रहत जहा भास । सदा हर्ष जहँ नही उदास ।**
**कोकिल कीट सदा तल रोर । सदा रूप मन्मथ चित-चोर ।**
**विविध सुमन वन फूलें हार । उन्मत मधुकर भ्रमर अपार ।**
**नव पल्लव वन शोभा एक । विहरत हरि संग सखी अनेक ।**
**कुहु कुहु कोकिला सुनाई । सुनि सुनि नारि भई हरषाई ।**

अर्थ--वृंदावन क्षेत्र आणि श्याम हे अखंड आहेत. राधा व व्रज सुंदरी याही नित्य आहेत. रासलीला, जलक्रीडा, प्रेमकलह, प्रेमभेटीची निराशा ही नित्य आहेत. तो प्रभूच ब्रम्हा असून तोच सृष्टी निर्मितो आणि संहार

करतो. कुंजांतील सुख आणि समीरणाच्या त्रिविध लहरीही नित्य आहेत. त्या ठिकाणीं वसंत ऋतु सर्वकाळ असून सर्वकाळ आनंदी आनंद आहे, दुःख मुळीच नाहीं. कोकिलादि विहंगांचें सदा कूजन असून प्रभूचें मदना-प्रमाणें चित्त–चोर रूप नित्य शोभत आहे. वनांमधील वृक्षांच्या शाखांवर चित्रविचित्र फुलें फुललेलीं असून उन्मत्त मधुकर अखंड गुंजारव करीत आहेत. वनांतील नवपल्लवांची शोभा अनुपम असून अनेक सखीजन हरी-बरोबर विहार करीत आहेत. कोकिलेचा कुहूकुहु ध्वनी ऐकून सर्व नारी प्रमुदित होत आहेत.

हा अद्भुत रास पाहून विमानांतून सुरगण सुमनांचा वर्षाव करितात, व्रजांत जन्मण्याची धन्यता गातात.

**सुरगण चढि विमान नभ देखत ।**
**ललना सहित समन गन जन्म धन्य व्रजकोही लेखत ।**
**धनि व्रजलोग धन्य व्रजबाला विहरत रास गोपाल ।**
**धनि बंसी वट धनि यमुना तट धनि धनि लता तमाल ।**
**सबते धन्य धन्य वृंदावन जहीं कृष्ण को बास ।**
**धनि धनि सूरदास के स्वामी अद्भुत राचो रास ।**
**यह छबि तिहूं भुवन कहुं नाही जो वृंदावन धाम ।**
**सुंदर त्रय गुन रस का सीवां सूर राधिका श्याम ।।**

**( धनि = धन्य; सबते = सर्वाहुन )**

–वृंदावनांतील या प्रकारची शोभा त्रिभुवनांत कोठें नाहीं. राधिका आणि श्याम हे सृष्टीच्या सौंदर्याची व माधुर्याची परम सीमा होत.

**वृंदावन हरि, यदि विधि क्रीडत सदा राधिका संग ।**
**भोर निसा कबहूं नहि जानत सदा रहत यकरंग ।**

वृंदावनांत हरि आणि राधिका क्रीडन करीत असतां त्यांना दिवस रात्र समजत नाहीं. ते सदा एकरसांत तल्लीन असतात.

“ **सूरदास प्रेमकथा सबही ते न्यारी** ” प्रेमकथा ही इतर सर्व गोष्टी-हून निराळीच आहे. ती वेदाला सुद्धा अगम्य आहे. प्रभु प्रीतिला कसा वश आहे हें सूरदास वर्णितात–

**निगमते अगम हरिकृपा न्यारी ।**

**प्रीतिवश श्याम कि राइ कि रंक कोउ, पुरुष कि नारी नाहि भेद कारी । प्रीति वश देवकी गर्भ लीनो वास, प्रीति कि हेत व्रज भेष कीनो । प्रीति के हेतु यशुमति दियो पयपान, प्रीति के हेतु अवतार लीन्हो । प्रीति के हेतु वन हेतु चारत कान्ह, प्रीति के हेतु नन्द सुवन नामा । सूर प्रभूको प्रीति के हेतु पाइये प्रीति के हेतु दोउ श्याम श्यामा ।**

सारांश–प्रभूची कृपा ही वेदास अगम्य असून ती कांहीं औरच आहे. राजा अथवा रंक, पुरुष अथवा स्त्री हा भेद प्रभूच्या ठायी नसून तो एकल्या प्रेमासच वश आहे. प्रीतीस्तव शामानें देवकीच्या उदरांत वास केला व प्रीती करिताच त्यानें गोपवेश धारण केला. प्रीतीकरिता त्यानें यशोदेचे स्तनपान केलें व प्रीतीकरिताच त्यानें अवतार धारण केला. प्रीतीकरिताच तो वनांत गाई चारीत हिंडला व प्रीतीकरिताच त्यानें नंदनंदन हें नाम धारण केलें. सूरदास म्हणतात कीं प्रभु केवळ प्रीतीनेंच वश होतो. श्याम व श्यामा ही दोन्हीं रूपें त्यानें प्रीतीस्तव घेतली.

**प्रीति के वश्य मे है मुरारी ।**

**प्रीति के वश्य नटवर वेष धारयो प्रीति वश करज गिरिराजधारी । प्रीति के वश्य व्रज भये माखनचोर प्रीति के वश्य दाँवरी बंधाई । प्रीति के वश्य गोपी रवँन प्रियनाम प्रीति के वश्य तरु यमल मोक्ष दाई । प्रीति वश्य नन्द बंधन वरुण सदन गये प्रीति के वश्य वनधाम कामी । प्रीति के वश्य सूर त्रिभुव विदित प्रीति वश सदा राधिका स्वामी ।**

–हा मुरारी प्रीतीला वश आहे. प्रीतीला वश होऊन त्यानें नृत्य करावयाचा वेष घेतला व गोवर्धन पर्वतास आपल्या करांगुलीवर धरलें. प्रीतीला वश होऊनच हा गोकुळांतील लोण्याची चोरी करणारा बनला व स्वतःला त्यानें दाव्यानें बांधून घेतलें. प्रीतीमुळेंच याला गोपीजनप्रिय असें नाम प्राप्त झालें व त्यानें यमलार्जुनांची मुक्तता केली. प्रीतीला वश होऊनच यानें वरुणलोकी जाऊन नंदास सोडविलें व प्रीतीमुळेंच यानें कामी होऊन कुंजवनांत क्रीडा केली. राधिकेचा स्वामी प्रीतीलाच वश आहे हें साऱ्या त्रिभुवनास विदित आहे.

## योग आणि भक्ति

सूरदासजींच्या सूरसागरामध्यें श्रीकृष्णांनीं उद्धवास गोपीकडे सांत्वनार्थ पाठविलें त्या प्रसंगांतील उद्धवांच्या व गोपींच्या संवादाची कथा अत्यंत रमणीय आहे. त्या संवादांत योगाचा पूर्ण निषेध करून प्रेमभक्तीचें श्रेष्ठत्व दाखविलें आहे. त्यांतील कांहीं वेचे देऊन लेख समाप्त करूं.

उद्धव हा ज्ञानी होता. प्रभूच्या विरहानें व्याकूल झालेल्या गोपींचे सांत्वन करण्यासाठीं पाठवितांना प्रभू त्यास म्हणतात-

**उधो यह तुम निश्चय जानो ।**

**मन क्रम वच मैं तुमहि पठावत व्रजको तुरत पलानो । पूरण ब्रह्म अलख अविनाशी ताके तुम हो ज्ञाता । रेख न रूप जात कुल नाही जाके पितु नहीं माता । इह मति दै गोपिन को आबहू बिरह नदी मे भासति । सूर तूरन तुम जाइ कहो इह ब्रह्म बिना नहि आसति ।**

--उद्धवा, मी कायावाचामनेंकरून तुला सांगतो. तू ताबडतोब वज्रास जाण्यास निघ. ज्याला नाम, रूप, कुल, जात, मातापिता-कांहीं नाहीं अशा अविनाश, निर्गुण ब्रह्माचा तू ज्ञाता आहेस. गोपी विरहनदींत बुडत आहेत त्यांना हें ज्ञान शिकवून परत ये. ब्रह्माशिवाय जगांत दुसरें कांहीं नाहीं असें त्याना सांग.

ब्रह्मज्ञान शिकविणाऱ्या उद्धवास गोपी म्हणाल्या-

**योग सो कौने श्रीहरि पाये**

**निज आज्ञातप कियो विधाता कब्र रस रास खिलाये । जोग जुगति संकर आराधी परम तत्व नव लाये । भुज धरि ग्रीव कबही नंद-नंदन हिलि मिल कब सुर गाये । भक्त विरह कातर करुणामय वेद निरंतर गाये । को है योग सुनत इह उधो सूर श्याम मन भाये ।**

--श्रीहरी योगानें कोणास मिळाला आहे? त्याच्या आज्ञेनें ब्रह्मदेवानें तप केलें परंतु त्या ब्रह्मदेवास रासलीला कधी मिळाली? शंकर योगाभ्यास करून परम तत्वज्ञानी झाले परंतु नंदनंदनानें त्यांच्या गळ्यांत

हात घालून त्याजबरोबर कधी मंजुल गान केलें? वेद ज्यास गातात असा तो करुणामय प्रभु भक्त विरहानें अत्यंत व्याकुल होणारा आहे. उद्धवा, एथें तुझा योग कोण ऐकणार? आमची मनें श्यामानें केव्हां हिरावून घेतली आहेत.

**संग मिली कहूं का संग बात।**
**यह तो कथत योग की बाते जामे रस जरि जात।**

(एक गोपी म्हणते–) मी आता कोणाबरोबर बोलू? हा उद्धव तर (जीवनांतील अत्यंत श्रेष्ठ व मधुर अशा) रसाची राख करणाऱ्या योगा-बद्दल बोलत आहे!

**उधो, तुम हो निकटके वासी।**
**यह निर्गुण लै ताहि सुनाबहु जे मुडिया बसै कासी।**

—उद्धवा, तू ब्रह्माजवळ रहाणारा आहेस. ते तुझें निर्गुण ब्रह्म काशीमध्यें मुंडण करून राहिलेल्यांना शिकीव!

**इन हिय हेरि मृगी सब गोपी सायक ज्ञान हये। योग अग्नि की दावा देखियत चहूं दिसी लाई दये।**

—या गोपी हरिणीप्रमाणें आहेत असें त्यानें (उद्धवानें) ओळखलें. म्हणून त्यानें चारी बाजूस योगरूपी अग्नि पेटवून ज्ञानरूपी बाण आम्हांवर सोडला.

**तुमसो प्रेमकथा को कहिवो मनहु काटिवो घास।**

—उद्धवा, तुझ्या बरोबर प्रेमालाप करणें म्हणजे गवत कापीत बसण्याप्रमाणें होय.

**(उधो) तेरो बुरो न कोई मानै।**

**रसकी बात मधुर नीरस सुनि रसिक होइ सो जानै। दादुर बसै निकट कमलन के जन्म न रस पहिचानै। अलि अनुराग उडत मन बांध्यो कही सुनत नही कानै। सरिता चली मिलन सागरको कूल सबै द्रुम मानै। कायर बकै लोभ ते, भागै, लरै ते सूर बखानै।**

--उद्धवा, तुला कोणी वाईट समजत नाहीं. रुक्ष गोष्टी ऐकील्यानेंच रसिकांना रसाळ संवादाची माधुरी कळते! बेडूक जन्मभर कमळाच्या शेजारी राहूनसुद्धा त्याला सुवासाची वार्ताही नसते. परंतु भ्रमरमात्र सप्रेमानें त्यावर झेपावतो व तो इतर कोणतीही गोष्ट ऐकत नाहीं. सरिता (आपल्या प्रियकर) सागराशी मिलन पावण्याकरितां धावते व तीरावरील सर्व वृक्षास उमळून टाकते. भ्याड मनुष्य नुसता बडबडतो व पळून जातो. लढवय्याचे गुण शूरासच कळतात.

**उधो, योग तबहि ते जान्यो ।**

**जा दिन तें सुफलक सुत के संग रथ ब्रजनाथ पलान्यो । ता दिन ते सब छोह मोह गयो सुत पति हेतु भलान्यो । तजि माया संसार तर्क जिय व्रज बनिता बृज ठान्यो । नंद मंद मुख मौन रही धरि तनु तप तेज सुखान्यो । नंद नंदन मुरली मुखपर धरी उहै ध्यान उर आन्यो । सोइ रूप योगी जेहि भूले जो तुम योग बखान्यो । ब्रह्मउ पचि मुए ध्यान करत ही अन्तउ नहि पहिचान्यो । कहो सुयोग कहा लै कीजै निर्गुण ही नहि जान्यो । सूर उहै निजरूप श्याम को है मन माह समान्यो ।**

उद्धवा, ज्यावेळीं सुफलकाच्या पुत्राबरोबर (अक्रूराबरोबर) ब्रजराज रथामध्यें बसून पळून गेला त्याचवेळीं आम्हास योग म्हणजे काय हें समजलें! त्या दिवसापासून आमचा शोक मोह सर्व नाहीसा होऊन आम्ही आपल्या मुलांना व पतींनाही विसरलों. माया व संसार विसरून व्रजवनितांनीं एका व्रजासच हृदयीं धरिलें आहे. त्यानीं आपलें नेत्र आणि मुख झाकून पूर्ण मौन धरिलें आहे. तपानें त्यांची शरीरें शुष्क झालीं आहेत. अधरांत मुरली धरलेल्या प्रभूच्या रूपाचेंच ध्यान त्यानीं धरिलें आहे. तू जें योगाचें ध्यान सांगितलें व ज्याला पाहून योगी स्वतःस विसरतात तेंच तें रूप होय. ब्रह्मदेवानें ध्यान करतां करतां अन्त होण्याची वेळ आली तरी तो जाणू शकला नाहीं. असल्या सुयोगाशीं आम्ही काय करावे तें सांग. उद्धवा, आम्हाला तें निर्गुण कळत नाहीं. प्रभूचें सगुण रूपडेंच आमच्या हृदयांत शिरलें आहे.

गोपींचे भाषण ऐकून उद्धव प्रेमसागरांत मग्न झाला, त्याचा ज्ञानगर्व नाहीसा होऊन तो भूमीवर गडबडा लोळू लागला. प्रेमळ गोपगोपींच्या

चरणधूलीनें पावन झालेल्या पवित्र व्रजाकडे पाहून त्याच्या हृदयांत सुखोर्मी दाटल्या–

**सुनि सुनि उधो प्रेम मगन भयो । लोटत धर पर ज्ञान गर्व गयो । निरखत व्रजभूमि अतिसुख पांवै । सूर प्रभूको पुनि पुनि गावै ।**

याप्रमाणें आपला सर्व योग बुडवून टाकून उद्धवरुपी मधुकर मधुपुरीस (मथुरेस) जाण्यास निघाला:– **सूर मधुप उठि चलै मधुपुरी बोरि योग को बेरो ।**

प्रभूची भेट झाल्यावर तो म्हणाला–

**माधो जू मैं अति ही सुख पायो । अननो जानि संदेश साजि करि व्रज मे मिलन पठायो । क्षमा करो तो करौ वीनती उनहि देखि जो आयो । सकल निगम सिद्धांत जन्म कर श्याम उन सहज सुनायो । नहि श्रुति शेष महेश प्रजापति जो रस गोपिन गायो । कथा गंग लागी मोही तेरी उह रस सिंधु उमहायो । तुम्हारी अकथ कथा तुम जानो हमे जिन नाथ बिसरायो । सूर श्याम सुंदर यह सुनि सुनि नैनन नीर बहायो ।**

( माधो = माधवा; साजिकरि = तयार करून; पठायो = पाठविले; उमहायो = निमज्जन केलें.)

उद्धवाची कथा ऐकून प्रभूच्या नेत्रांतून अश्रुधारा वाहू लागल्या.

सुरदासांची सर्वच कविता अत्यंत प्रेमळ आणि हृदयस्पर्शी आहे त्यांचा सूरसागर हा प्रेमसागरच आहे. त्यांत जितकावेळ निमज्जन करावें तितकें थोडेंच आहे.

# नजीर

प्रभु गोपालकृष्णाच्या मोहक लीलेनें व्रजवासी जनांनाच वेड लावलें असें नव्हे तर त्या लीला सकल जीवमात्रांनाही वेडे करणाऱ्या आहेत. प्रभूचें चरित्रच अति गोड व प्रेमळांना जीवनामृत पाजणारें आहे. प्रभूच्या बाललीला, वनक्रीडा, यमुनातीरावरील मधुर मुरलीनाद व कुंजांतील अनुपम्य रास–किंबहुना प्रभूची सारीं कर्मे भक्तजनांच्या हृदयसागरावर प्रेमाच्या अनिवार लहरी उमटविणारी आहेत. त्यामुळें मिराबाई, सूरदास, श्रीज्ञानोबारायादि सकल संतजनांनीं प्रभूचें चरित्र गाइलें आहे. श्रीज्ञानोबाराय, नाथमहाराज, तुकोबाराय इत्यादि संतांच्या गौळणी, विरहिणी व मिराबाई सूरदास प्रभृतींची पद्यें गातांना प्रभूच्या अधरामृताचे प्राशनानें उन्मत्त झालेल्या मुरलीचा उन्माद गायकाचे अंगीं संचरल्यास काय नवल? संत, प्रभूच्या गुणानुवादास मोहित झाले एवढेंच नव्हे तर प्रभू निर्गुण आहे म्हणणारे इस्लामी सुफी साधुसुद्धां प्रभूचा केशकलाप, कमलनेत्र, आणि मुरलीरव यांनीं वेडे होऊन त्यांचे गुणानुवाद करते झाले.

अशा इस्लामी धर्मांतील सुफी पंथीयांतच नजीर नामक कवीची गणना होते. तो स्वत: धर्मोपदेशक असून मुलांना शिकविण्यांत त्याचा काल जात असे. उर्दू भाषेंतील याची कविता श्रेष्ठ प्रतीची समजली जाते. अकबर बादशहाची आवडती राजधानी अकबराबाद अथवा आग्रा एथील ताजगंजांत हा रहात असे. याचा जन्म इ. स. १७४० चे सुमारास एका गरीब घराण्यांत झाला. ही वेळ मोगल साम्राज्य अस्तंगत होऊन गेल्याची होती. आग्रा शहर उजाड होऊन तेथील मोठमोठीं श्रीमान् व अधिकारसंपन्न घराणीं खालावलीं होतीं. परंतु अशाही स्थितींत नजीरनें स्वकष्टानें विद्या संपादन

करून तिचें दान करण्यांत व मधुर कविता रचण्यांत आयुष्य घालविलें. आग्र्याचे लोक यास साधूप्रमाणें मानीत व त्यास शहा नजीर म्हणून संबोधीत. सन १८२० त वयाच्या ८० व्या वर्षी त्यानें देह ठेवला. त्याची समाधि ताजगंजांतच आहे.

नजीरचा कवितासंग्रह विविध आहे. त्यांत त्यानें गोपाळकृष्णाची बाललीला, रासक्रीडा वगैरे प्रसंगावर कविता रचल्या आहेत. त्या उर्दू भाषेंत असल्या तरी सुबोध व रसाळ आहेत. सुफी हे निर्गुण प्रेमाचे उपासक खरे पण प्रेमाचा स्वभावच मूर्त रूपानें अवतीर्ण होणें हा असल्याकारणानें नजीरसारख्या सुफी पंथीयानें नंदनंदनाचें गीत मोठ्या प्रेमभरानें गावें हें साहजिकच आहे. त्या कवनाकडे आपण वळू.

प्रभूच्या मंगल जन्मकालाचें नजीर वर्णन करतो–

**फिर आया वा एक वक्त ऐसा जो आये गरभ मे मनमोहन ।**
**गोपाल मनोहर मुरलीधर श्रीकृष्ण किशोरन कमलनयन ।**
**घनश्याम मुरारी बनवारी गिरिधारी सुंदर श्यामबरन ।**
**प्रभु नाथ बिहारी कान्ह लला सुखदाई जग के दुःखभंजन ।**
**जब साइत परगट होने की वाँ आई मुकट धरैया की ।**
**अब आगे बात जनमकी है जै बोलो कृष्ण कन्हैया की ।।**
**फिर आधी रात हुइ जिस दम और हुवा नछत्तर रोहिणी भी ।**
**शुभ साइत नेक महूरत से वाँ जन्मे आकर कृष्ण जभी ।**
**उस मंदिर के अंधियारे मे जो और उजाली आन भरी ।....**

(साइत=समय. नछत्तर=नक्षत्र. उजाली=प्रकाश)

प्रभूस घेऊन वसुदेव यमुनेंतून चालला त्यावेळीं–

**फिर आये जमुनापास ज्यूंही जमुना जी देखीं बहुत चढी ।**
**यह साच हुवा मन बोच उन्हें पैर इस जलमे कैसे धरिये ।**
**है रैन अंधेरी संग बालक इस बिपता मे अब क्या करिये ।**
**यू मनमे ठहरा फिर चलिये फिर आपहि मन मजबूत हुवा ।**

भगवान दयापर आस लगा वाँ जमुनाजी पर ध्यान धरा ।
यह ज्यूं ज्यूं पाँव बढाते थे वह पाणी चढना आता था ।
यह बात लगी जब होने वाँ वसुदेव गये मनमे घबरा ।
तव पाँव बढाये बालक ने जो आप से और भीगे जलमे ।
जब जमुना ने पद चूम गिये जा पहुँचे पार वह एक पनमे ।।

प्रभूच्या बाललीला किती कौतुकाच्या–

यारो सुनो य दधि के लुटैया का बालपन ।
और मधुपुरी नगर के बसैया का बालपन ।
मोहन सरूप नृत्य करैया का बालपन ।
बन बन के ग्वाल गौवें चरैया का बालपन ।
ऐसा था बासुरी के बजैया का बालपन ।
क्या क्या कहू मै कृष्ण कन्हैय्या का बालपन ।

सारे मिळून कृष्ण प्रभूचा जयजयकार करा–

सब मिलके यारो कृष्णमुरारी की बोलो जै ।
गोविंद छैल कुंजबिहारीकी बोलो जै ।
दधि चोर गोपिनाथ बिहारी की बोलो जै ।
तुमभी नजीर कृष्ण मुरारी की बोलो जै ।।

प्रभूच्या मधुर मुरलीरवांत केवढें प्रेम भरलेलें होते–

जब मुलिधरनें मुर्ली को अपनी इधर धरी ।
क्या क्या परेम प्रित भरी उसमे धुन भरी ।
ग्वालों मे नन्दलाल बजाते वो जिस घडी ।
गौवे धुन उसकी सुनने को रह जाती सब खडी ।
मोहन की बांसुरी के मै क्यां क्यां कहू जतन ।
लै उसकी मनकी का मोहिनी धुन उसकी चितहरन ।

उस बासरी का आन के जिस जा हुआ बजन ।*
क्या जल, पवन, नजीर, पंखेरू व क्या हिरन ।
सब सुनने वाले कह उठे जै जै हरी हरी ।
ऐसी बजाई कृष्णकन्हैयाने बांसुरी ।

(*या बासरीबरोबर तुलता येईल असें कोणतें जल, वायु, पक्षी अथवा सुवर्ण आहे?)

कन्हैयाच्या रासाची किती बहार–

है रूप कृष्णजी का देखो अजब अनूप ।
और उनके साथ चमके है सब गोपियो का रूप ।
महताबिना छुटे है गोया खिल रही है धूप ।
इस रोशनी मे देख के वह. रूप और सरूप ।
हर आन गोपियो का यही सुख विलास है ।
देखो बहार आज कन्हैया को रास है ।

या रासांत राधा म्हणजे तारकांत चंद्रमाच!

हँसती हुइ जो फिरती है साथ उनके गोपियाँ ।
है उनमे राधा ऐसो कि तारो मे चंद्रमा ।।

प्रभूचें प्रियरूप साऱ्याच अंतःकरणाला मोहविणारें आहे मग ते हिंदु असो वा इस्लामी असो–हे आपणास नजीरच्या त्रोटक वचनावरून दिसून येते.

२०४५७ वि:
क्रमांक १०७३ नों: दि:

# रसखान

प्रेमाहून गोड रस जगांत दुसरा कोणताही नाहीं. प्रेमच जगाचें जीवन आहे. प्रेमाचा वेध लागून ज्यांच्या अंतःकरणास अहोरात्र झुरणी लागली ते धन्य होत. प्रेमाच्या नव्हाळीचा एक क्षण जरी वांटयास आला तरी जीवनाची संपूर्ण सांगता होते मग क्षणक्षणा प्रेमविरहाचे कढ ज्याच्या हृदयांतून निघत आहेत त्यांचें भाग्य कोण मापूं शकणार आहे ? या प्रेमाचीच सघन मूर्ति प्रभू गोपालकृष्णाच्या रूपानें अवतीर्ण झाली. प्रभूचें चरित्र म्हणजे माधुर्याची खाणीच. प्रभूच्या मनोहर बाललीला यमुना तीरावरील रचिलेला नि कुंजांतील रास, दुष्टांचे निर्दळण–प्रभूंचें सर्वच चरित्र गोड. या गोडीनें गोकुळांतील गोपिकाच वेधिल्या असें नव्हे तर सकल भक्तहृदयें या गोडीचें प्राशन आकंठ करीत आलीं आहेत व आजही ती गोडी अविट आणि अमर अशा प्रेमरसाचा वर्षाव करीत आहे. अशा गोष्टीस लुब्धलेल्या रसखान नामक भक्ताचा परिचय आज करून देत आहे. रसखान हे जातीनें मुसलमान होते परंतु प्रेमळांना एकच जात माहीत असते. ते प्रभूचे प्यारे असतात आणि प्रभू त्यांचा प्यारा असतो.

रसखान यांचा जन्म दिल्लीस अकबर बादशहा राज्य करीत असतां इ. स. १५८३ मध्यें पठाण घराण्यांत झाला. त्यांचें मुळचें नांव 'इब्राहिमखान पठाण' होतें. असें सांगतात कीं एकदां श्रीकृष्णप्रभूची चित्रकारानें काढलेली सुंदर छबि यांचे पहाण्यांत आली. त्या छबीनें खान मोहित झाले. हा प्रसंग ज्या स्थानीं घडला त्या स्थानीं प्रभूची रसाळ चरित्र कथा चालली होती. खानानीं विचारलें कीं, "यह सावली सूरतवाला कहाँ रहता है ? और उसका नाम क्या है" त्यावर हा वृंदावनांत रहातो व याचें नांव

रसखान (रसाची खाणी) आहे असें त्यांना कळल्यावर त्यांनीं एकदम वृंदावनाची वाट धरली. प्रभूचें रसाळ चरित्र आणि मनमोहन मूर्ति आठवून त्यांचे सर्वांग पुलकित होत होतें व सद्‌गदित अंतःकरणानें एक एक पाऊल पडत होते. वृंदावनासमीप आल्यावर तर त्यांचे नेत्रांतून अविरत अश्रुधारा वाहूं लागल्या. ते धावत प्रभूच्या मंदिरापाशी आले. परंतु त्यांना मंदिरांत जाण्यास प्रतिबंध झाला! प्रेमळांचें हृदय पुजारी कसें ओळखणार? खानांना अत्यंत दुःख झालें. मंदिरासमोर बसून त्यांनीं प्रभूस हाक मारण्यास सुरवात केली. तेथें प्रभूची पूजा करणारे व नित्यदर्शन घेणारे होते परंतु प्रभूला हाक मारणाऱ्या हृदयाची मात्र त्यांना ओळख नव्हती. रसखान हे कोणी 'पागल' आहेत असें लोकांनीं समजून उलट त्यांना त्रास देण्यास मात्र सुरुवात झाली. तीन दिवस अन्न नाहीं, पाणी नाहीं, अशा स्थितींत प्रभूला हांक मारण्यांत गेले. शेवटीं प्रभूला राहवलें नाहीं. मंदिरांतून धांवत बाहेर येऊन त्यांनीं आपल्या प्रियभक्तास आलिंगन दिलें. व त्या क्षणापासून 'इब्राहिमखानाचे' 'रसखान' बनले. रसखानांनीं उर्वरित आयुष्य प्रभूची गीतें गाण्यांत घालविलें व इ. स. १६६० च्या सुमारास प्रभूचिंतनांत देह सोडला.

रसखानांच्या कविता प्रेमळ आणि कृष्णभक्तीनें ओथंबलेल्या आहेत.

**गाव गुनी, गनिका, गंधर्व औ ।**
**नारद सेष सबै गुन गावै ।।**
**नाम अनन्त गनन्त गनेस – ज्यो ।**
**ब्रह्मा त्रिलोचन पार न पावे ।।**
**जोगी, जती, तपसी अरु सिद्ध ।**
**निरंतर ज्याहि समाधि लगावे ।।**
**ताहि अहीरकी छोहरिया ।**
**छछियाभरि छाछपै नाच नचावै ।।**

गणिका, गंधर्व, नारद, शेषादि सर्वजण ज्याचे गुण गातात, ज्याच्या अनन्त नामांची गणति गणेश, ब्रह्मा, शंकरादि देवासही करतां येत नाहीं, योगी, तापसी, सिद्ध ज्याचे निरंतर ध्यान करतात त्या प्रभूस गवळ्याच्या मुली चमचाभर ताकासाठीं नाचावयास लावतात!

**या लकुटी अरु कामरियापर, राज तिहू पुर को तजि डारौ ।**
**आठहु सिद्धि नवो निधिको सुख, नन्दकी गाइ चराइ बिसारौ ।।**
**रसखानि, कबौ इन आखिनसो, ब्रजके बन–बाग–तडाग निहारौ ।**
**कोटिक हो कलधौतके धाम, करील की कुंजन ऊपर वारौ ।।**

प्रभूच्या हातांतील काठी आणि कांबळी यावरून त्रिभुवनींचीं राज्यें ओंवाळून टाकावींत. नंदाच्या गाई चारण्यांत अष्टसिद्धी आणि नव–निधींची सुखें विसरावींत. रसखानास त्या व्रजांतील उपवनें आणि तडाग या डोळ्यांनीं केव्हां बरे पाहावयास मिळतील? शुद्ध कांचनांची कोटयावधि मंदिरें प्रभूच्या स्रंजवनावरून ओंवाळून टाकावींत!

**मानुष हौ तौ वहि रसखानि, बसौ ब्रज गोकुल गाँवके ग्वारन ।**
**जो पसु हौ तौ कहा बसु मेरौ, चरौ नित नन्दकी धेनु मंझारन ।।**
**पाहन हौ तौ वही गिरिको, जो धरयौ कर छत्र पुरंदर–धारन ।**
**जो खग हो तौ बसेरो करौ मिलि कालिंदी–कूल–कदंबकी डारन ।।**

सारांश मी मनुष्य असेन तर गोकुळांतील गोपामध्यें राहीन, पशु होईन तर नित्य नंदाच्या गाईबरोबर चरेन. पाषाण झालों तर गोवर्धन पर्वतावर राहेन आणि पक्षी झालों तर कालिंदीतीरावरील कदंब वृक्षावर विश्रांति घेईन.

दुसऱ्या एका कवितेंत रसखानांनीं गोपीचें वर्णन केलें आहे. एक गोपी प्रभुच्या विरहानें वेडी झाली. ती वेडयाप्रमाणें चाळे करूं लागली तेव्हां निरनिराळे लोक जादू टोण्याचे अनेक उपाय करूं लागले. कोणी गोड बोलून समजावू लागले परंतु त्यांतील कोणासही सुचलें नाहीं की मोहनाच्या हातांतील ज्या मुरलीनें तिला वेड लाविलें ती मुरलीच जाळून टाकावी!

प्रभूच्या अधरामृताचें प्राशन करणाऱ्या मुरलीचा कोणास हेवा वाटणार नाहीं? एक गोपी म्हणाली–"मी कृष्णाप्रमाणें डोक्यांत मोरपिसें खोवीन, गळयांत गुंजमाळा घालीन, पितांबर नेसेन, हातांत काठी घेऊन गाई राखीन. परंतु कृष्णाच्या अधरामृताचें पान करणाऱ्या मुरलीला मात्र मी आपलें अधर लावणार नाहीं!"

या उदाहरणावरून रसखानांच्या ठिकाणीं कृष्णरसाची केवढी खाणी उघडली होती तें दिसून येईल व अशीच खाण आपल्या जीवनामध्यें उघडावी अशी कोणास आस वाटणार नाहीं?

# रहीम

१ भक्ति प्रेमसुख हें जीवाचें जीवन असल्यामुळें हिंदू वा मुसलमान या दोघांनाही तें सारखेच प्रिय वाटल्यास नवल नाहीं. प्रभु गोपालकृष्णाची मूर्ती म्हणजे प्रेमसुखाचा सागरच होय. त्यांत निमज्जन करणाऱ्या नजीर व रसखान या दोघा मुसलमान कृष्णभक्तांचा परिचय वाचकांना पूर्वी करून दिलेलाच आहे. या दोघाखेरीज रहीम, यारीसाहेब, कारेखा, इन्शा, लतीफ हुसैन, यकरंग, फरहत, काजी अशरफ महमुद, आलम, सय्यद कासिम अली वगैरे अनेक कृष्णभक्त होऊन गेले. त्यांना उद्देशून श्रीवियोगी हरिजींनीं म्हटलें आहे कीं,–"अनेक ऐसे मुसलमान हरिजन हो गये हैं, जिन्होनें कृष्णमंदिरमे मक्केका नूर देखा, और व्रज वीथियोंकी रजमें लोट लोटकर उस प्यारेको रझानेके लियें एक निरालीही नमाज पढी," या सर्वांच्या चरित्राविषयीं मात्र फारच थोडी माहिती उपलब्ध आहे. या माहितीच्या आधारें रहीमचा अल्प परिचय या लेखांत देत आहे.

२ रहीमचें संपूर्ण नांव अब्दूल रहीम खान खाना असें होतें. याचा जन्म इ. स. १५५३ त झाला. अकबर बादशहाचा मुख्य प्रधान बहिराम खान हा रहीमचा पिता होय. पित्याचें मृत्यूनंतर रहीमला प्रधानपद मिळालें. अकबर बादशहा हा विद्वानांचा चाहता होता. त्याच्या भोवतालच्या विद्वज्जनांच्या प्रभावळींत अबुल फाझल व फैझी यांच्या खालोखाल रहीमचीच विद्वत्ता चमकण्याजोगी होती. रहीम हा विद्वान त्याचप्रमाणें शूर आणि उदारही होता. व या सर्वाहून श्रेष्ठ अशा कृष्णभक्तीनें त्यांचें हृदय तुडुंब भरलेलें होतें. अरबी व फारशी या भाषांच्या अध्ययनाबरोबरच त्यानें संस्कृत व हिंदीचेंही अध्ययन केलें होतें. यानें रहिम दोहावली अथवा सतसई

रासपंचाध्यायी, रहिमरत्नावली वगैरे अनेक काव्यात्मक ग्रंथ रचिले. महासाधु तुलसीदासजी यांचे व रहीमचे सख्यत्व होतें. व सुरदासांची कविता रक्षण करण्याचें बरेचसें श्रेय रहीमला आहे असें म्हणतात.

मेवाडचा राणा प्रतापसिंह याशी अकबराचें युद्ध चालू होतें. रहीमही लढत होता. त्यांत प्रतापसिंहाचे हातीं रहीमचा जनाना पडला, परंतु राण्यानें तो जनाना रहीमकडे परत पाठविला. या राण्याच्या औदार्याचा परिणाम रहीमचें मनावर अत्यंत होऊन त्यानें पुढील एका प्रसंगीं अकबराचें मन प्रतापसिंहावरील स्वारीच्या विरुद्ध वळविलें. प्रतापसिंहावर रहीमनें कांहीं दोहेही रचले आहेत. अकबराच्या पश्चात त्याचा पुत्र जहांगीर गादीवर आला. त्यावेळीं रहीमला पदच्युत होऊन कैदेत पडावें लागलें. त्यांतून कशीतरी सुटका करून घेऊन रहीम चित्रकूटावर जाऊन राहिला. तेथें श्रीतुलसीदासजींची व रहीमची भेट झाली असें म्हणतात. इ. स. १६२९ त रहीमनें इहलोकची यात्रा संपविली.

३ रहीमनें कृष्णभक्तीपर कविता लिहिली ती अत्यंत मधुर आहे. एके ठिकाणीं त्यानें प्रभूच्या मनमोहन मूर्तीचें वर्णन केलें आहे–

**छबि आवन मोहन लालकी ।**
**काछिनी काछे कलित मुरलिकर, पीत पिछौरी सालकी ॥**
**बंक तिलक केसरको कोने, दुति मानो विधु बालकी ॥**
**बिसरत नाहि सखी मो मनते, चितवनि नयन बिसालकी ॥..**

याप्रमाणें हातांत मुरली असलेल्या पीतांबरधारी, कपाळास केशरी तिलक असणाऱ्या, बाल चंद्राप्रमाणें ज्याची कांति शोभत आहे, ज्याच्रे विशाल नेत्राची मोहिनी अंतःचक्षूसमोरून हालत नाहीं अशा मोहनलालाचें वर्णन करून शेवटीं रहीम म्हणतात–

**यह सुरूप निरखै सोइ जानै, या रहीम के हालकी ॥**

हें सुंदर रूप ज्यांनीं पाहिलें त्यांनाच रहीमची अवस्था कळेल!

शरच्चंद्रिका समयीं यमुना तटाकीं प्रभूंनीं मुरली वाजवितांच सर्व गोपी आपल्या पतिसुतादिकांनां सोडून प्रभूकडे धावल्या त्याचें वर्णन रहीम करतात.

( मालिनी वृत्त )

शरद–निशि–निशीथे चांदकी रोशनाई
सघन–घन–निकुंजे कान्ह बन्सी बजाई ।।
रति, पति, सुत, निद्रा, साइयां छोड भागी
मदन शिरसि भूयः क्या बला आन लागी ।।

रासोत्सव काली विलसणाऱ्या सुंदर श्यामचें रूप पहा–

कलित ललित माला वा जवाहर जडा था
चपल चखनवाला चांदनीमे खडा था ।
कटि–तट–बिच मेला पीत सेला नवेला
अलिबन अलबेला यार मेरा अकेला ।।

० ० ० ०

कठिन कुटिल काली देख दिलदार जुलफे
अलि–कलित–विहारी आपने जीकी कुलफे ।
सकल शशि कलाकौ रोशनी–हीन लेखौ
अहह ब्रजलल्लाकौ किस तरह फेर देखौ ।।
जरद बसनवाला गुलचमन देखता था
झुक–झुक मतवाला गावता रेखता था ।।
श्रुति युग चपलासे कुण्डले झूमते थे
नयन कर तमाशे मस्त व्है घूमते थे ।।

४ वरील कवितावरून रहीमच्या अंतःकरणांत असलेल्या कृष्णप्रेमाचें रूप पहावयास मिळतें. शेवटीं रहीमच्याच शद्बांत त्या श्यामलरूपाच्या भेटीची व अधरामृत प्राशनाची आस करू या–

पकरि परम प्यारे सांवरेको मिलाओ
असल अमृत–प्याला क्यों न मुझको पिला ओ ?

# कबीर व नामदेव

कबीरांचा उल्लेख संतांनीं मोठ्या आदरानें केला आहे. एकनाथ महाराजांनीं पांडुरंग मूर्तीचें वर्णन करतांना "कासे कसिला पीतांबर। तो हा जाणावा कबीर" असें म्हटलें. तुकोबांनीं पंढरी हें आपलें माहेर असून आपणास गण गोत कोण कोण आहे हें सांगतांना—"नागो जगमित्र नरहरी सोनारा। रोहिदास कबीरा सोइरीया" असें म्हटलें आहे. जनाबाईनीं वैष्णवांची नामावळी सांगतांना "वैष्णव तो कबीर चोखामेळा महार। तिजा तो चांभार रोहिदास" असें वर्णिलें आहे, व नामदेवांच्या कीर्तनाचा प्रसंग वर्णितांना "नाचतां नाचतां देवाचा गळला पितांबर! सावध होई देवा ऐसा बोले कबीर" असें म्हटलें आहे. संशोधकांनीं कबीराचा कालनिर्णय करण्याचा प्रयत्न चालविला आहे. कांहींच्या मतें ( डॉ. क्षितीमोहनसेन ) कबीर हे नामदेवांच्या नंतर होऊन गेले असें आहे. परंतु वरील उल्लेख, परंपरेनें चालत आलेली कबीर व जनाबाई यांच्या भेटीच्या प्रसंगाची गोष्ट व खुद्द कबीरांचीं पदें पाहतां कबीर हे नामदेव-समकालीन वाटतात. तेव्हां झालें त्या संशोधनापेक्षा अधिक संशोधन या बाबतींत झालें पाहिजे.

कबीरांनीं नामदेवांचा उल्लेख "नामादरजी" म्हणून केला आहे. परमेश्वराच्या विश्वव्यापी रूपास हें दरजी ( शिंपी ) रूपक करून त्याचें वर्म कोणी जाणत नाहीं असें म्हटलें आहे. "उन दरजीका कोय मरम न पाया। बिन धागे जासा ( कपडा ) अजब बनाया।। जलकारे कपरा पवन का रे धागा! जोरत जोरत तिन रुतु बागा।। कहत कबीर ये सुरत जामा न्यारी। उन दरजीकी खुदरत प्यारी।।" एका पदांत जनाबाईच्या भेटीचा उल्लेख आहे. पांडुरंग व पंढरीचें वर्णनही आवटे प्रतीच्या संतगाथ्यांत दिलेल्या हिंदी पदांत आहे.

उदा. ठाडे विटपर निकट कटिपर । कर पीतांबर धारी ।
शंख चक्र दो हात विराजे । गोवर्धन गिरिधारी ।
भीमाके तट निकट पंढरपूर । अजब छेत्र सुखदाई ।।
वीना और मृदंग बजावत । संतनकी बादशाही ।।
छोड दिया वैकुंठ सुख हरी । भाव भगतका भूका ।।
कहत कबीर हरीसे मीठा । लागत तुलसी बुका ।।
सब आलमका रखनेवाला । विठ्ठल पंढरपुरवाला ।।
निशान झेंडा दिये डेरे । चंदरभागामे हुवा मेला ।।
आखाडी एकादशीसे कबीर । भगत हुवा चेला ।।

यावरून आषाढी वारीसही कबीर आले असले पाहिजेत असें दिसतें. " लीला विनोदें संसार तरिजे रया " या ज्ञानेशांच्या शिकणुकीची छाया कबीरांच्या पुढील पदांत दिसते.

सांवलिया गिरिधारी लाला । खबर लेना मेरी ।।
खबर लेना मेरी नही तो । होयगी तेरी मेरी ।।
भोजन देना तो अच्छा देना । खासी सिरापुरी ।।
बीडा देना तो अच्छा देना । खासी लंवग सुपारी ।।
कपडा देना तो अच्छा देना । देना भडक जरतारी ।।
घोडा देना तो अच्छा देना । उप्पर अद्बागिरी ।।
जोरू देना तो अच्छा देना । सब संतनकू प्यारी ।।
बेटा देना तो अच्छा देना । जिकिर करेगा तेरी ।।

नामदेव व जनाबाईच्या संगतींत देवाजवळ हट्ट करण्यास कबीर शिकले असले पाहिजेत. कबीरांचा सत्पुत्र कमाल यानें आपल्या एका पदांत उत्तरेस कबीराचा बोलबाला तर दक्षिणेस नामदेवांचा बोलबाला असल्याचें वर्णिलें आहे.

दखनम्यानें नामा दरजी । उनोका बंदा विठ्ठल है ।।
और सेवा कछू न जाने । अंदर भीतर केशव है ।।
ज्युतर (उत्तर) म्यानें भयो कबीरा । रामचरणका बंदा है ।।
उनोका पूत कहे कमाल । दोनोका बोलबाला है ।।

# अवतारांचा कळस

तुका हा तुका हा परब्रम्हरूपीं । तुकिता तुका तुकला सस्वरूपीं ।
तुका स्वामीचें नाम वाचेसि गातां । बहूसा निळा पावला वर्म हाता ।।
गुरू माउली साउली हे अनाथा । स्नेहाळूपणें पूरवी सर्व आस्था ।
अपत्या दिना पाजुनि प्रेमपान्हा । कशी रक्षिते अंगसंगीं अभिन्ना ।।

—श्रीनिळोबाराय

ऐकतां तुझें वचन मन होय उन्मन ।
सच्चिदानंद गाभा तुजठायीं पूर्ण ।

—रामेश्वरभट्ट

कृपासागरें नांव निर्माण केली । असंख्यात बुद्धी तरोनिच गेली ।
पुढेंहि तरायासि ऊपाय केला । म्हणोनि तुका मृत्युलोकासि आला ।।

—वामन

पिता माता भ्राता स्वजनगण वा गोतहि तुका ।
तयावीणें माते इतर न रुचे हेत इतुका ।।
तुका पादाब्जीचा मन–मधुप माझा मधु पितो ।
तुका हाचि इंदू, मम मन–चकोरा सुखवितो ।

—पांडुरंग

१ माउली श्रीसद्गुरु तुकोबारायांचा अवतार म्हणजे सर्व अवतारांचा कळस होय. " झाला अवतारांचा कळस । पिका आला ब्रम्हरस ।।" श्रीज्ञानेश्वरमाउलींनीं भागवतधर्माचा पाया घातला. अमृतानुभवासारखा ग्रंथ साऱ्या विश्वास दिवाळसण म्हणून दान दिला. अज्ञानाच्या धांडोळ्याकरितां

तीनशेंच्यावर ओव्या खर्ची घातल्या. त्या सर्वांचें सार श्रीतुकोबारायांनीं एका ओळींत सांगितलें. " दीप घेउनिया धुंडिती कंधार। भेटे हा विचार अघटित ।।" ज्या चिद्विलासाचा सिद्धांत ज्ञानेश्वर माउलींनी अनेक दृष्टांतांनीं पटविण्याचा अट्टाहास केला तोच तुकोबारायांनीं गोड वाणींत गातां गातां जनमनाच्या भूमींत पेरला. " आवडी धरोनी आलेती आकारा। केला हा पसारा याजसाठीं ।। तें मी तुझें नाम गाईन अखंड। आणिक पाखांड नेणें कांहीं " भगवंताच्या जीवावरील अगाध प्रेमाच्या अर्णवाचें दर्शन सकळां जनांस व्हावें याकरितां ज्ञानेश्वरी झाली. तुकोबारायांनीं तो अर्णव आपल्या अभंगवाणीच्या दोन ओळींत साभावून ठेविला. " भक्तसमागमें सर्व भावें हरी। न सांगतां करी सर्व काम ।। सांठविला राहे हृदय संपुटीं। बाहेर धाकुटी मूर्ति उभा ।।" ज्ञानेश्वर माउलीकडे ज्यावेळीं धरणेंकरी ब्राम्हण आपणास ज्ञान प्राप्त व्हावें असा हट्ट घेऊन बसला त्यावेळीं त्यांनीं दृष्टांत देऊन त्यास आपल्या परमप्रिय जिवलगाकडे–तुकोबारायाकडे पाठविलें. तुकोबारायांनीं माउलीच्या मनोगतानुसार ज्ञानाची परमसीमा त्यास शिकविली. " नको कांहीं पडों ग्रंथाचिये भरी। शीघ्र व्रत करी हेंचि साच ।। देवाचिया चाडे आळवावें देवा। ओस देहभावा पाडोनिया ।।" रामेश्वरभटजींनीं तुकोबारायांचा द्वेष केला. अभंगवाणीचीं अमृतवचनें देहूच्या डोहांत बुडवावयास लाविलीं. त्याचा परिणाम अनघडशहाचें पुष्करणींत स्नान करणाऱ्या रामेश्वरभटजींच्या अंगीं दाह उत्पन्न झाला. तो शांत होण्यास्तव ओल्या वस्त्रांच्या घड्या अंगावर घेऊन ज्ञानेश्वरमाउलींचीं त्यांनीं करुणा भाकली. त्यांनीं रामेश्वरास तुकोबारायाला शरण जाणेस सांगितलें. तेव्हां भटजींनीं आपल्या शिष्यासमवेत पत्र लिहून महाराजांचेकडे पाठविलें. तुकोबारायांना तें वर्तमान कळतांच मागील सर्व विसरून रामेश्वरभटजींना अभंग पाठविले–त्यांतील " दुःख तें देईल सर्व सुख फळ। होतील शीतळ अग्निज्वाला " हीं वचनें वाचतांच भटजींच्या अंगाचा दाह शांत झाला. भटजींनीं धावत जाऊन तुकोबारायांचे पायावर पश्चात्तापदग्ध होऊन लोटांगण घातलें, व म्हटलें–पंडित वैदिक अथवा दशग्रंथी। परी सरी न पवती तुक्याची ।। शास्त्रेंही पुराणें गीता नित्य नेम। वाचिती परी वर्म न वळे त्यासी ।। कर्मअभिमानें वर्णअभिमानें। नांडले ब्राम्हण कलियुगीं ।। तैसा

नव्हे तुका वाणीं व्यवसाई । भाव त्याचा पायीं विठोबाचे ।। अमृताची वाणी वरुषला शुद्ध । करी त्या अशुद्ध ऐसा कोणी ।। जपतप यज्ञें लाजविली दानें । हरिनाम कीर्तनें करूनिया ।।.

आपल्या अंगाचा दाह शांत होण्यासाठीं रामेश्वरभटजींनीं वेद उपनिषदांचीं पारायणें सुरूं केली होती परंतु त्यानें दाह शांत न होतां अधिकच वाढला. तुकोबारायांच्या अमृतवचनानें त्यांस शीतळता प्राप्त झाली.

२ एकट्या रामेश्वरभटजींचा दाहच तुकोबारायांच्या वाणीनें शांत झाला असें नव्हे तर सकल जीवमात्रांच्या अंतरीचा सुखदु:खाचा दाह शांत करून अक्षय ओलावा निर्माण करण्याचें सामर्थ्य त्या वाणीमध्यें अखंड वास करीत आहे. ती वाणी ऐतिहासिक व देशकालवाचक कार्यकारणभावानें बद्ध नसून कोणाही जीवास कोणाही देशकालांत व कोणाही अवस्थेंत सुखविणारी आहे. तहान आणि जल यांचा संबंध ज्याप्रमाणें देशकालानें मर्यादित नाहीं त्याप्रमाणें तुकोबारायांची अभंगवाणी आणि मानवी जीवन यांचा संबंधही देशकालानें मर्यादित नसून तो चिरंतर जिव्हाळ्याचा आहे. महाराजांनीं जगांतील सुखदु:खाचें सर्व आघात सोसले, जननिंदा सोसली परंतु जगावर मेघवृष्टि केली. "नाहीं विचारीत । मेघ हागंदारी शेत ।।" याप्रमाणें कोणाच्या गुणदोषाकडे न पहातां सर्वांवर कृपादृष्टीच्या धारा ओतल्या. "बाप करी जोडी लेकराचे ओढी । आपुली करवंडी वाळवूनी ।। एकाएकी केला मिराशीचा धनी" या उक्तीप्रमाणें त्यांनीं सायास करून मिळविलेलें प्रेमधन तुम्हा आम्हा सर्वांना विनासायास दिलें आहे. प्रपंचामध्यें जीवास, पावलों पावलीं काळजी वाटत असते. त्या काळजीनें जीवनाचें रोप खुरटून जात असतें. अशा प्रसंगीं तुकोबारायांचीं वचनें जीवास आधार देतात--

**नित्य उठोनिया खायाचीच चिंता । आपुल्या तूं हिता नाठविशी ।।**
**जननीचें पोटीं उपजलासी जेव्हां । चिंता तुझी तेव्हां केली तेणें ।।**
**चातका लागुनी मेघ नित्य वर्षे । तो तुज उदास करील केवी ।।**
**पक्षी वनचरें आहेत भूमीवरी । तयालागी हरी उपेक्षिना ।।**
**तुका म्हणे भाव धरुनि राहे चित्तीं । तया तो श्रीपती उपेक्षिना ।।**

पांडुरंग सांभाळील ही बोधाची वात संतवचनानें सारल्याबरोबर सर्व जीवन प्रकाशमय होतें. सुखदुःखाच्या सर्व अवस्थेंत प्रेम–धनावरून दृष्टि हलत नाहीं. नफा नुकसान कांहीं झालें तरी तें जीवाच्या प्रिय संपत्तीपर्यंत पोहोचूं शकत नाहीं. सर्व अवस्थांत त्या संपत्तीचा वाढीनें उपभोगच होत राहतो हें तुकोबारायांच्या वचनांचें सामर्थ्य आहे. विठ्ठल सुखा विठ्ठल दुःखा। तुकया मुखा विठ्ठल.।।

३ श्रीतुकोबारायांचीं वचनें म्हणजे ज्ञानाचा व भक्तीचा कळस होय. कळस म्हणजे प्रियबोधाचीं ती अखेरची सीमा होय. या पलीकडील बोध कोणाचाही नाहीं. अद्वैताचें ज्ञान हा ज्ञानाचा शेवट नसून प्रिय–बोध हेंच परम श्रेष्ठ ज्ञान होय. अद्वैत द्वैताशीं संगीं आहे–तें प्रीतीनें संयोगी आहे व या संयोगाचें संगसुख इंद्रियांत भोगतां येणें हें सत्य ज्ञान होय. "अद्वैतीं तो माझें नाहीं समाधान । गोड हे चरणसेवा तुझी ।।" हा तुकोबारायांचा सिद्धांत आहे. इंद्रियें व विषय ही जनरूढीची भाषा आहे. त्या रूढीस धरून विषय-त्यागाची वा विषयभोगाची भाषा वापरली जाते. परंतु त्याग व भोग या दोन्ही आडवाटाच आहेत. विषय नसून प्रभूच्या चरणाच्या गोडीचें तें व्यक्त स्वरूप आहे ही प्रतीतीच साच होय. या नजरेनेंच विषयाची भीति वाटणार नाहीं. व त्यासाठीं दीनत्व अगर लाचारताही वाटणार नाहीं. आहे त्या अवस्थेंत दृष्टि पिकणें ही संतवचनाची किमया होय. संतांचीं वचनें कामिल असतात. श्रीतुकोबारायांचीं साधीं सोपीं वचनें, दिसावयास किती सुगम पण परिणामीं जीवास वेध लावणारीं आहेत. 'संपत्ति, लौकिक, जगांतील निरनिराळे व्यवहार यांचा त्याग न करतां, परंतु हृदयांत त्याचा नाद न रहातां भक्तिप्रेमसुखाचा तीं अखंड जीवास नाद लावणारीं आहेत. या नादांतच जीवनाचें सार्थक व कल्याण सांठविलेलें आहे, हा नाद जीव-नांत सतत राखणें हेंच संतांचें अवतारकार्य आहे. हा नाद जेथें जेथें जागा आहे तेथें आपणास उमगलें नाहीं तरी तुकोबाराय पाठीशी उभे राहून राखण करीत आहेत.

४ आपल्या लेकराची काळजी हें पित्याचें स्वरूप, त्याप्रमाणें तुको-बारायांचे अभंग–यांत सर्व विश्वाची काळजी सांठविली आहे–हेंच त्यांचें

स्वरूप होय. तीच त्यांची " जीवाचें जीवन व अमृताची तनु " होय. अभंगाचीं अक्षरें म्हणजे तुकोबारायांचें प्रत्यक्ष दर्शनच होय. प्रत्येक अभंगाचे शेवटीं " तुका म्हणे " ही अक्षरें आहेत. तीं त्यांनीं जीवावरील कारुण्यभावानें उघडलेले नयनच होत. तुकोबाराय बीजेस सदेह वैकुंठास गेले म्हणजे ते कोठें गेले नसून प्रत्येक जीवाच्या निजप्रियतेच्या ठायीं वास करून राहिले आहेत. मानवी जीवनास हा फार मोठा आधार व विश्रांतिस्थान आहे. कांहीं गोष्टी कमी असण्यानें कोणी खंत बाळगण्याचें कारण नाहीं. ईशसत्तेंत ओघानें गोष्टी घडत असावयाच्याच. संतवचनांची श्रीमंती मात्र सार्‍यांना सुलभ आहे. त्या संपत्तीच्या ऐटीमध्यें जीवनाचे श्वास वहावेत. त्या धनाच्या उन्मादांत पाउलें पडावीत. अन्य कशाचा अभिमान वा थोरवी व्यर्थ आहे. ती केव्हांतरी खालीवर होईलच. सत्संगतीची थोरवी सदा वर मान करूनच ठेवील. सत्संगति कशी मिळेल, संत कुठें शोधावेत, याकरितां कोणी वणवण फिरावयास नको. तुकोबारायांचीं अक्षरें हीच सत्संगति–तीं आवडीनें गाणें हेंच संतहृदयास सुखकर आलिंगन होय. संत वचनें गातांना तीं ज्यांचीं वचनें आहेत ते सदैव पाठीशीं व सन्मुख उभे आहेत. ते आपणांस आपल्यासारखे करून घेतील असा विश्वास बाळगावा. आपल्या बाळाचें आरोग्य कसें वाढेल, त्यास कोणतीही उणीव कशी न वाटेल याची सर्व काळजी पिता करतो. बालानें केवळ त्याच्या अंगाखांद्यावर खेळावयाचें एवढेंच. त्याप्रमाणें श्रीतुकोबारायांचे अभंग गाणें म्हणजें त्यांच्या अंगाखांद्यावर खेळणेंच होय. त्यायोगे आपलें सर्वांग पुनीत होऊन शरिराच्या प्रत्येक परमाणूंत संतप्रीती जागी होईल. "तुका म्हणे लागो अखंड समाधि । जावें प्रेमबोधीं बुडोनिया " अशी प्रेमाची सहज समाधि साध्य होईल.

# बहिणाबाई

१ श्रीतुकोबारायांचा अवतार म्हणजे सर्व अवतारांचा कळस " झाला अवतारांचा कळस । पिका आला ब्रम्हरस ।।" याप्रमाणें प्रेमरसाचें परिपक्क फल अशी तुकोबारायांची मूर्ती ज्यांनीं डोळयांनीं पाहिली ते धन्य होत. " धन्य म्हणवीन इहलोकींच्या लोका । भाग्यें आम्ही तुका देखियला ।।" हीं अक्षरें तुकोबारायांनींच लिहून ठेविलीं. ज्यांनीं त्यांच्या दर्शनसुखाचा सोहळा भोगला त्यांची अंतरप्रतीतीच या अक्षरावाटें सगुण झाली. संतांच्या विभूती या केव्हांतरी आकाशांत वीज चमकून जावी त्याप्रमाणें चमकतात. त्या वारंवार दृष्टीस गोचर होणाऱ्या नसतात. क्षणभर वीज चमकावी, घनांचा वर्षाव होऊन विश्वभर जलधारा वहाव्यात व सर्व पृथ्वीचा ताप नाहींसा होऊन शीतळाई यावी त्याप्रमाणें संत भूतलावर येऊन आपल्या अमृतवृष्टीनें विश्वाचीं दुःखें लयास नेतात, हृदयाच्या आर्द्रतेनें लहानाथोरांस आपल्या पोटीं सामावतात व त्या संतसगतीचें गोड सुख अनुभवितांना रात्र आणि दिवस कसें निघून गेले, हे कळण्याचीही अवस्था नसतां पुन्हां अदृश्य होतात. विभूतीचें गुणगान करणारास आधुनिक जगांतील कांहींजण भोळे म्हणतील परंतु याचें कारण संतांचें विभूतिमत्व त्यांच्या ओळखीच्या आटोक्यांत आलेलें नसतें हेंच होय. ज्यांना संतहृदयाची ओळख झाली, त्यांना त्यांच्या गुणांच्या गायनास शद्ब अपुरे वाटतात व कितीही गाइलें तरी जीव आसावला व अतृप्तच रहातो. थोर विभूतीच्या संगतीच्या लाभाचें वर्णन कार्लाइलनें केलें आहे, तें किती यथार्थ आहे ? तो म्हणतो–

" One comfort is, that Great Men, taken up in any way, are proftiable company. We cannot look however

imperfectly upon a great man, without gaining something by him. He is the living fountain, which it is good and pleasant to be near. The light which enlightens, which has enlightened the darkness of the world, and this not as a kindled lamp only, but rather as a natural luminary, shining by the gift of Heaven as I say, of native original insight, of manhood and heroic nobleness; in whose radiance all souls feel that it is well with them"–Heroes & Hero-worship. PP. 2

२ तुकोबारायांच्या संगतींत असलेल्या व त्यांच्या जिवलग बनलेल्या मंडळींत निळोबाराय पिंपळनेकर, महादाजीपंत कुलकर्णी देहूकर, गंगाराम-बुवा मवाळ कडूसकर, संताजी जगनाडे, सुदुंबऱ्याचे गवरशेट वाणी, लोह गांवचे शिवबा कासार व नावजी माळी इत्यादि मंडळी होती. तुकोबारा-यांवर त्यांची अत्यंत प्रीति व निष्ठा होती. या जिवलग मंडळीखेरीज आणखी कांहीं व्यक्ति त्या संत मुकुटमणीच्या अमृतवाणीनें ओढल्या गेल्या. त्यापैकीं बहिणाबाई या एक होत. बहिणाबाईचा स्वभाव जात्याच गोड व अत्यंत भाविक परंतु त्यांना तितकाच कठोर सासुरवासही होता. या अत्यंत जाचां-तही तुकोबारायांचा वेध केवळ त्यांच्या पीयूषधारावत् वचनांनीं लागला व प्रतिकूल परिस्थितीस बाजूस सारून वाढीस लागला. त्याचें फळ म्हणजे बहिणाबाईंना तुकोबारायांचें दर्शनाची सुवर्णवेळा लाभली व आयुष्याचा कांहीं काल त्यांच्या संगतींत घालविण्याचें भाग्य उदयास आलें. सत्संगतीच्या ओलाव्यानें बहिणाबाईच्या ठिकाणीं अभंग–वचनांची स्फूर्ति होऊन त्यांनीं रसाळ कविता रचली आहे. त्यांत त्यांनीं स्वतःचें चरित्रही अतिशय गोड अशा वाणींत वर्णिलें आहे. तुकोबारायांच्या चरणावर आपलें जीवन अर्पण करणाऱ्या या संतकन्येनें आपली परंपरा एका अभंगांत वर्णिली आहे.–

**आदिनाथें उपदेश पार्वतीसी केला । मत्स्येंद्रें ऐकिला मत्स्यगर्भीं ।।**
**शिवहृदयींचा मंत्र पैं अगाध । जालासे प्रसिद्ध भक्तियोगें ।।**
**तेणें त्या गोरक्षा केलें कृपादान । तेथोनी प्रगट जाण गहिनीप्रती ।।**

**तेथोनी ज्ञानेश पावले प्रसाद । जाले ते प्रसिद्ध सिद्धासनी ।।**
**सच्चिदानंदबाबा भक्तीचा आगरू । त्यासी अभयवरू ज्ञानें केला ।।**
**पुढें विश्वंभर शिवरूप सुंदर । तेणें राघवीं विचार ठेविलासे ।।**
**केशवचैतन्य बाबाजी चैतन्य । ज्ञालेसे प्रसन्न तुकोबासी ।।**
**एकनिष्ठ भाव तुकोबाचरणीं । म्हणोनी बहिणी लाधलीसे ।।**

या परंपरामालिकेचा विशेष म्हणजे बाबाजींची पूर्वमालिका ज्ञानेश्वर महाराजांशी कशी संबंधित आहे हें दाखविलें आहे हा होय.

३ वेरुळानजिक देवगांव हें बहिणाबाईचें माहेर. तेथेंच बहिणाबाईचा जन्म शके १५५० त झाला. त्यांच्या वडिलांचें नांव आऊजी कुलकर्णी व आईचें नांव जानकी. बहिणाबाईच्या जन्मानें उभयतां मातापित्यांना आनंद झाला व त्यांनी आपल्या कन्येचें बारसें थाटांत केलें. त्यानंतर आऊजीस वेरुळच्या वाटेनें जात असतां सोन्याची एक मोहोर सांपडली. ती शुभ शकून समजून तो परत घरीं आला व त्यानें आपल्या कन्येबद्दल एका ज्योतिषास विचारलें. त्यानें "बोलती देवलसी होईल भाग्याची"। "आयुष्याचें बळ फार आहे" असें सांगितलें. तें त्याचें बोल खरेच होते. कारण बहिणाबाईंना भक्ति–प्रेमाची गोडी लाभली व ७१ वर्षांचें दीर्घायुष्यही लाभलें. बहिणाबाईच्या पाठीवर त्यांच्या पित्यास दोन पुत्र झालें. देवगांवापासून जवळच शिऊर आहे तेथील रत्नाकर पाठक यांच्याशीं बहिणाबाईचा विवाह झाला. लग्नानंतर चार वर्षांनीं आऊजीवर कठीण प्रसंग गुदरला. त्यांच्या भाऊबंदांनीं वृत्तीबद्दल कलह मांडला. शेवटी रत्नाकर यांनीं मध्यें पडून सर्व ऋण वगैरे फेडलें. मात्र गावांत रहाणें अशक्य असल्यामुळें आऊजी, त्यांचीं बायको, मुलें, जावई व बहिणाबाई ग्रामत्याग करून निघाली. ती फिरत फिरत पंढरीस आली. " पांडुरंगमूर्ती देखोनी पवित्र ! संतोषले नेत्र इंद्रियेसी "....जीव जावो परी पंढरीचें स्थळ । न संडावें जळ ऐसें वाटे ।। याप्रमाणें बहिणाबाईच्या अंतःकरणाची अवस्था झाली. परंतु तेथें पांच दिवस क्रमिल्यावर सारी मंडळी निघाल्यावर त्यांनाही निघणें भाग पडलें. पुढें ती मंडळी कोल्हापुरीं आली. तेथें ब्राम्हणाचें घरी तीं राहिली. त्यानें बहिणाबाईच्या पतीस आपणास मिळालेली गाय दान केली. तिला एक वासरू होतें. त्याचा लळा बहि-

णाबाईस लागला व तें वासरू बहिणाबाईवाचून चारा पाणी खात नसे अगर गाईसही पीत नसे. त्यावेळीं कोल्हापुरास जयराम स्वामी वडगांवकर हे आले असून त्यांच्या कथा चालू होत्या. त्या कथेसही बहिणाबाई बरोबर तें वासरू जाई व कथेकाळीं स्फुंदू लागे. ही सर्व हकीकत बहिणाबाईंनीं फार गोड वर्णिली आहे. " गायीचें ते वत्स तेंहि असे कपिला । माझे ठायीं तिला हेत बहू ।। मोच सोडी तरी वत्स रिघे दोहा । करितां दोहावा सवें माझी ।। पाणी मीच पाजो तृण घाली मीच । मजविण काच मनीं वाहे ।। मी जाय पाणिया ओरडे तें वत्स । गाय वाय पुच्छ सवें चाले ।।...रात्रीचे अवसरीं वत्स निजे सेजे । पुराणी ते फुंजे श्रवणकाळीं ।।" बहिणाबाई कथेस गेल्या तेव्हां वत्सही तिच्याबरोबर जाऊं लागले. परंतु लोकांस बसावयासही जागा नाहीं तेथें हें वासरू कशाला, असें म्हणून लोकांनीं त्यास हाकलतांच तें ओरडूं लागलें. बहिणाबाईंनाही रडूं कोसळलें. जयरामस्वामींच्या ध्यानीं हीं गोष्ट येतांच त्यांनी लोकांचें निवारण करून बहिणी व तिचें वासरू दोघांनाही येण्यास अनुज्ञा दिली. व तीं दोघे वरचेवर कथेस जाऊं लागली. लोक कौतुक करूं लागलें. बहिणाबाईचा नवरा अतिशय रागीट होता त्यास हें सहन झालें नाहीं व त्यानें अकरा वर्षांच्या आपल्या पत्नीस ताडण करून तिचा छळ केला. तेव्हां जयरामस्वामींनीं येऊन त्याला समजाऊन सांगून सुटका केली. जयरामस्वामी हे कथेंत तुकोबारायांची वचनें म्हणत असत (स्वामींच्या हातच्या कीर्तनाच्या टिपणांच्या वह्या अद्याप वडगांवला त्यांचे गादीवरील पुरुषांकडे आहेत व त्यांत तुकोबारायांचे अभंग दिलेलें आहेत) ही अभंग वचनें ऐकून बहिणाबाईंना तुकोबारायांचा वेध लागला. ज्या मूर्तीच्या मुखांतून ही अमृतवाणी निघाली तिच्या भेटीस्तव तिचा जीव झुरूं लागला. व तो प्रतिदिनी वाढूं लागला.

४ कांहीं दिवसांनीं बहिणाबाईचा ळळा लागलेलें वासरूं गतप्राण झालें. बहिणाबाईचा शोक अनावर होता व त्या अन्नपाण्यावांचून चार दिवस मूर्च्छित पडल्या. शुद्धिवर आल्यावर ज्या महाभागाच्या मूर्तीनें त्यांना वेध लाविला त्यांची सारखी आठवण होऊन त्यांचा जीव पाण्याबाहेर काढलेल्या

भाशाप्रमाणें तळमळूं लागला. तुकोबांच्या हृदयवेधी वचनांची वरचेवर आठवण होऊं लागली व त्या अहोरात्र नामस्मरण करूं लागल्या.

**न दिसे आणिक नेत्रापुढें जाण । नामाचें स्मरण मनीं राहे ।।**
**पूर्वील हरिकथा आइकिल्या होत्या । त्या मनीं मागुत्या आठवती ।।**
**तुकोबाचीं पदें अद्वैत प्रसिद्ध । त्यांचा अनुवाद चित्त झुरवी ।।**
**ऐशी ज्याचीं पदें तो मज भेटतां । जीवास या होता तोष बहू ।।**
**तुकोबाचा छंद लागला मनासी । ऐकतां पदासी कथेमाजीं ।।**
**तुकोबाची भेटी होईल तो क्षण । वैकुंठासमान होय मज ।।**
**तुकोबाची कानीं ऐकेन हरिकथा । होय तैसें चित्ता समाधान ।।**
**तुकोबाचें ध्यान करोनी अंतरी । राहे त्या भीतरीं देहामाजीं ।।**
**बहिणी म्हणे तुका सद्‌गुरु सहोदर । भेटतां अपार सुख होय ।।**
**मत्स्य जैसा जळावांचोनि तडफडी । तैसीच आवडी तुकोबाची ।।**

या प्रमाणें श्रीतुकोबारायांचा ध्यास घेतलेल्या बहिणाबाईंना सातवे दिवशीं तुकोबारायांच्या भेटीचा दृष्टांत झाला. " तंव अकस्मात् सातविया दिनीं । नामसंकीर्तनीं घोषयुक्त ।। तुकारामरूपें येवोनि प्रत्यक्ष । म्हणें पूर्व-पक्ष सांभाळिजे ।। नको करू चिंता असें मी तुजपाशीं । घेई अमृताशी हातीचिया ।।" तुकोबा व पांडुरंग एक आहेत ही बहिणाबाईची खात्री झाली " पांडुरंग–तुका पांडुरंग–तुका । वेगळीक देखा होय केवी ।।...तुकोबाची बुद्धि पांडुरंगरूप । मन तें स्वरुप तुकोबाचें ।। तुकोबाचें नेत्र तेही पांडुरंग । श्रोतृ ते अभंगरूप त्याचे ।। तुकोबाचे हात लिहिताती जें जें । तेंचि तें सहज पांडुरंग ।। अशा अत्यंत गोड अक्षरांत बहिणाबाईंनी श्रीतुकोबारायाचें स्वरूप वर्णिलें आहे. त्या दिवसापासून बहिणाबाईचा कायापालट झाला व तुकोबारायांच्या प्रीतीनें भारलेल्या मुलीचें दर्शनास गावचे लोक येऊ लागलें. तें पाहून त्यांच्या भ्रतारास पुन्हां क्रोध आला. तो तुकोबारायाची व भक्ति-प्रेमाची निंदा करू लागला व शेवटीं बहिणाबाईचा त्याग करून निघून जाण्याचें त्यानें ठरविलें. तें पाहून बहिणाबाईंना अत्यंत दुःख झालें. पति कितीहि कोपला तरी आपण पतीशी अनन्य असावें ही वृत्ती त्यांचे ठाई जागी होती. त्या वृत्तीनें तिनें तुकोबांचा धावा केला. उदईक निघून

जाण्याचें पतीनें ठरविलें त्या दिवशी त्याच्या शरिरास व्याधी झाली व दाह होऊं लागला. असे सात दिवस गेले तेव्हां संत निंदेनें हें घडलें म्हणून त्यास अनुताप झाला व त्याची बुद्धि पालटली. तुकोबाच्या गांवांतच जाऊन राहू असा त्यानें संकल्प केला. "होवो आता कल्याण किंवा अकल्याण। आम्ही तो संपूर्ण भक्ती करू ॥ तुकोबाचे गांवा जावोनिया राहो। मनींचा दृढावो धरोनीया ॥ ऐसी पालटली भ्रताराची बुद्धि। स्वामी कृपानिधि अंतरसाक्ष ॥"

५ यानंतर बहिणाबाई आपल्या पति व आईबापासमवेत देहूस आल्या. तेथें इंद्रायणीचें स्नान करून पांडुरंगाचें दर्शन घेण्यासाठीं राउळांत आल्या असतां श्रीतुकोबारायांचें प्रत्यक्ष दर्शन घडलें. तुकोबाराय त्यावेळीं आरती करीत होते. "तुकोबा आरती करीत होते तेंथ। नमस्कारें स्वस्थ चित्त केलें ॥ स्वप्नीं जो देखिला तेंच ध्यान तेथें। देखिले नेमस्त पूर्ण दृष्टी ॥" श्रीतुकोरायांना वंदन करून त्यांचें रूप डोळाभरून पाहिलें व देहूमध्यें वास केला. देहूंत रहाण्याची व जेवणाची सोय तुकोबारायांचे जिवलग कोंडाजी यांनीं केली व 'तुकोबारायांची कथा येथें नित्य होते व तुम्ही रहा' असा त्यांनीं आग्रहही केला. "नित्य हरिकथा होतसे देऊळीं। तुकोबा माऊली वैष्णवाची ॥ रहा येथें तुम्हा भक्षावया धान्य। देऊं हेहीं पुण्य आम्हां घडे ॥ बहिणी म्हणे मग राहिलो देहूस। धरूनी हव्यास तुकोबाचा ॥" तुकोबारायांचा परमप्रीतीचा वोरस अशी हरिकथा ऐकून बहिणाबाईच्या हृदयांत सुखाचे हेलावें येऊं लागले व रात्रंदिन तुकोबाचा ध्यास लागला "रात्रंदिन निद्रा नये तिळभरी। तुकोबा अंतरी प्रवेशला ॥ बहिणी म्हणें येती सुखाचे डोलावे। जाणती अनुभवे जाणती ते ॥" परंतु तुकोबारायांचा हा सहवास त्यांना फार काळ लाभला नाहीं असें "तुकाराम तेथें देखतां देखत। जाले अकस्मात गुप्तरूप ॥" या ओळीवरून दिसतें. तुकोबाच्या निर्याणानंतर बहिणाबाईंनी देहूंत तीन रात्रीं घालविल्या. पुढें त्यांना तुकोबारायांचा दृष्टांत होऊन कवित्वाची स्फूर्ति झाली व त्यांनीं अभंग रचना केली. त्याप्रसंगाचें वर्णन त्यांनीं केलें आहे.

टाळचा चिपुळचांचा ध्वनी आइकतां । आनंद हा चित्तीं समावेना ॥
लावियलें नेत्र निद्रेंत जागृती । तुकाराम मूर्ती देखियली ॥
ठेवियला हस्त मस्तकीं बोलून । दिधलें वरदान कवित्वाचें ॥
बहिणी म्हणे नेणें स्वप्न कीं जागृती । इंद्रियांच्या वृत्ति ओसरल्या ॥
आनंदे सद्गद जाहलीं इंद्रियें । तुकाराम-पाय आठवले ॥
होउनी सावध उघडिलें नेत्र । आठवला मंत्र षडक्षरी ॥
ठसावाला ध्यानीं मनाचिये ठायीं । आणिक तें कांहीं आठवेना ॥
बहिणी म्हणे हात घातला मस्तकीं । देह तो या लोकीं आढळेना ॥
घट हा बुडावा जैसा डोहाआंत । न फुटतां ओतप्रोत पाणी ॥
वाटे उठो नये जीव जाय तरी । सुख तें अंतरीं हेलावलें ॥
बहिणी म्हणे जैसा लोटला समुद्र । हृदयाकाशीं इंद्र बोले वाचा ॥

यानंतर बहिणाबाईंनीं नामस्मरण, भक्ति, सद्गुरु महिमा इत्यादि विषयावर अभंग रचना केली. "जय मायें ज्ञानदेवी । शब्दरत्नजान्हवी । प्राशितां तोय तुझें । सुख होतसे जीवी ॥" अशी ज्ञानेश्वरीची गोड आरतीही त्यांनीं केलेली आहे. निळोबारायांनीं बहिणाबाईची केलेली आरतीही उपलब्ध आहे. बहिणाबाईंनीं शके १६२२ आश्विन शुद्ध १ स शिऊर येथें देह ठेविला. निळोबारायांनी ज्यांना विणा दिला ते शंकरस्वामी शिऊरचेच. शंकरस्वामी समाधिनजीकच बहिणाबाईंची समाधि आहे.

# कचेश्वर

न लगे चंदना पुसावा परिमळ । वनस्पती मेळ हाकारूनी ।।
अंतरीचें धावे स्वभावें बाहेरी । धरिताही परी आवरेना ।।
—श्रीतुकाराममहाराज

कमल उमललें म्हणजे भ्रमर आपोआप धावत येतात. त्यांना आमंत्रण देऊन सांगायला नको कीं "या, आणि आल्हाददायक सुगंधाची लूट करा." त्याचप्रमाणें संत सज्जन जन्मास आले कीं त्यांच्या हृदयींचा भगवत्प्रेमाचा सुगंध दाही दिशांस दरवळू लागतो. आणि त्या सुगंधाची रुचि असणारे मधुप संत—निवासांत जमू लागतात. श्रीसंत मुकुटमणि तुकाराम महाराज श्रीक्षेत्र देहूस अवतरल्यावर असाच प्रकार झाला. त्यांच्या कीर्तनावर लुब्धलेले भ्रमर त्यांच्या चरणाभोंवती रुंजी घालू लागले. संतांच्या संगतीची गोडी चाखण्याचें भाग्य ज्यांच्या वांटयास आलें ते धन्य होत. संतांच्या प्रिय दृष्टीनें सतत न्हाऊन निघणें, संतांच्या प्रियवचनाच्या श्रवणानें हृदय सतत प्रेमानें आर्द्र असणें, संत चरणाच्या वंदनानें सतत मस्तक पवित्र होणें, संत—हृदयाच्या आलिंगनानें तनु रोमांचित होणें या गोष्टी ज्यांच्या भाग्यास आल्या त्यांचा हेवा स्वर्गीच्या देवांनींसुद्धां करावा मग मानव करतील यांत काय नवल ? श्रीतुकोबारायांच्या प्रेममूर्तीस भाळलेले श्रीनिळोबाराय, महादाजीपंत, रामेश्वरभट, गंगाराम मवाळ इत्यादि त्यांचे अनेक जिवलग होते. त्या जिवलगांपैकींच कचेश्वर हे होत.

कचेश्वरांचें जन्मस्थान चाकण असून ब्रम्हे उपनांवाच्या ब्राम्हणकुलांत ते जन्मास आले. बाळपणीं हे फार हूड होते परंतु श्रीतुकोबारायांचें दर्शनानें यांची वृत्ति पालटली व भजनाचा छंद लागला. एकदा यांना विषप्रयोग

झाल्यानें धापेची व्यथा लागली. त्यावेळीं यांना कोणी सांगितले कीं अंबाजीपंत लोहगांवकर यांचेकडे श्रीतुकाराम महाराजांच्या प्रासादिक अभंगाच्या वह्या आहेत. त्यावरून ते देहूस आले. तेथें महाराजांच्या दर्शनाचा योग आला.-

**प्रत्यक्ष तुकोबा करीतसे कथा । आनंदे सर्वथा डोलतसे ।।**
**कर्दळी हेलावे जैशी चंडवातें । तैसे तुकोबातें देखियले ।।**

प्रेमानंदांत नाचत असलेली तुकोबारायांची सावळी मूर्ति पाहून त्यांना अत्यंत आनंद झाला. त्या दिवसापासून त्यांना तुकोबांचा ध्यास लागला. पुढें तुकोबांनीं स्वप्नांत येऊन अनुग्रह केला व कचेश्वर कथा, कीर्तन करूं लागले. त्यांची धापेची व्यथाही नाहींशी झाली. कचेश्वरांनीं अभंग वृत्तांत आपलें चरित्र लिहिलें आहे. त्यात वर्णिलें आहे कीं-

**ठेवियला माझ्या माथ्यावरी हात । स्वयें झाला गुप्त स्वप्नामाजीं ।।**
**तेथूनिया स्फूर्ती तुकोबानें दिल्ही । येर दिवशीं केली कथा दीनें ।।**
**स्वरताळ ज्ञान नव्हतें ठाऊकें । कथा कवतुकें करविली ।।**
**व्यथा जे जे होती ते ते सर्व गेली । प्रचित घडली माझी मज ।।**
**मग म्या सोडिली लौकिकाची लाज । इतराशी काय काज माझें ।।**

याप्रमाणें लौकिकाची लाज सोडून कचेश्वर भजनानंदांत नाचून रमू लागले. जातिवर्णाचा अभिमान सोडून सर्वांशीं प्रेमानें मिसळू लागले. हे तेथाल ब्राम्हणांना सहन झालें नाहीं व त्यांनीं कचेश्वरांच्या वडिलाकडे गाऱ्हाणीं नेण्यास सुरवात केली.

**ब्राम्हण म्हणती यास काय झालें । कांहीं संचरलें महद्भूत ।।**
**बापापाशी द्वेषें सांगती गाऱ्हाणें । तुमच्या पुत्रानें बुडविलें ।।**
**लाज येते आम्हा वैदिक आमचा । पुत्र हा तुमचा म्हणोनिया ।।**
**नाचतो बाजारीं यासी शिक्षा करा । येऊं नका घरा देऊं तुम्ही ।।**
**भलत्यासी हा हो करितो नमन । देतो आलिंगन लघु वर्णा ।।**

या गाऱ्हाण्यामुळें बापासही क्रोध आला. आपल्या मुलास संतांनीं वेडा केला म्हणून त्यानें संतांची निंदा केली व थोडेसें अन्नवस्त्र देऊन घराबाहेर

काढलें! पुढें पंढरीरायावर भरंवसा ठेऊन ते चाकणजवळील रानांत झोपडी बांधून राहिले. तेथें त्यांना प्रभुकृपेनें कांहीं कमी पडलें नाहीं.

इच्छा झाली चित्तीं निस्पृही असावें। स्थळ दिल्हें देवें तळचापाशीं ॥
काष्टें तोडावी ना संकल्प म्या केला। देवें सिद्धी नेला पण माझा ॥
विहीर खणावी ऐशी झाली वांच्छा। देवें तीही इच्छा पुरविली ॥
पुजाविशी वाटे महाविष्णुमूर्ति। देवें अवचिती तेही दिली ॥
विस्तीर्ण असावें स्थळ कथेसाठीं। देवानें शेवटीं पूर्ण दिल्हें ॥

भक्तीभाव गांठी असल्यावर प्रभू कांहींही उणें पडू देत नाहीं याची त्यांना पूर्ण प्रतीती आली.

मागें पुढें देव मज सांभाळीतो। बाळातें पाळितो माय–बाप ॥
जाऊ नेदी कोठें आपुल्या वेगळें। न धरी निराळें बाळकाशि ॥
संकटाचा कांहीं येवो नेदी वारा। वारितो पर्भारा स्वामी माझा ॥

अशा रीतीनें आपुल्या आवडीच्या कथाकीर्तनांत कांहीं व्यत्यय न येतां प्रभूनें आपणास कसें सांभाळलें यांचें स्मरण होतांच त्यांचा कंठ सद्-गदित होऊन नेत्रीं अश्रु वाहू लागत.

किती उपकार आठवू स्वामीचे। सर्व खेळ याचे अगणित ॥
अनंत ब्रम्हांड व्यापुनी भरला। पुरोनी उरला निराळाची ॥
इच्छेवीण काडी पानही न हाले। जग चाले बोले सत्ता त्याची ॥
हानी मृत्यु लाभ उत्पत्ति प्रलय। स्थिति समुदाय कर्ता तोची ॥
याचा पार वर्णी ऐसा कोण आहे। शेषाही संपूर्ण वर्णवेना ॥
वेद नेति नेति स्तवितां शिणले। तटस्थ राहिले अधोमुखें ॥
ब्रम्हादिक अंत पाहता भागले। साधक शिणले ठायीं ठायीं ॥
तोचि कृपा करी जरी दीनावरी। भुक्ति मुक्ति चारी दासी होती ॥
वर्म आहे थोडें स्वामीचें आइका। भक्तिभावें एका वश्य होतो ॥

कचेश्वरांनीं खेड व चांडोली या गांवीं पांडुरंगमूर्तीची स्थापना केली. श्रीतुकोबारायांची यांनीं आरती केली आहे तीमध्यें तुकोबारायांच्या रूपाचें वर्णनें सांपडते–

**आरती तुकोस्वामी । भक्तिभाव दे नामीं । तारका गुरुराया । निज सारजा माया ।।धृ.।। निर्गुण गुणवंता । तुकाराम समर्था । मागुता भेटी देई । पायीं ठेवीन माथा ।।१।। वर्तुळ दोंद पोट । नेत्र नासीक कंठ । देखिल्या दंतपंक्ति । तुकाराम समर्था ।।२।। देखिलें रूप जैसें । हृयास दाविजे तैसें । सावळें रूप बापा । त्याचें लागलें पीसें ।।३।। उंच ना ठेंगणा हो । ध्यानीं हेंची हें राहो । मानसीं कचेश्वरा । गुरु तुकोबा पहाहो ।। आरती तुको स्वामी ।।४।।**

या वर्णनावरून श्रीतुकाराम महाराजांचा वर्ण सावळा, पोट वर्तुळाकार दोंदिलयुक्त व बांधा समप्रमाणांत असलेला होता असें दिसून येतें.

थोरले शाहू दिल्लीश्वराच्या बंदींतून सुटून साताऱ्यास जात असतां त्यांना कचेश्वरांची भेट झाली व त्यांचेवर श्रद्धा जडली. सातारचें राज्य प्राप्त झालेवर शाहू महाराजांनीं कचेश्वरांना पुष्कळ द्रव्य देऊं केलें परंतु यांनीं त्याचा स्वीकार केला नाहीं. हें पाहून रामचंद्र खटाटोपे नांवाचा कचेश्वरांचा शिष्य होता त्याचें नांवें सहा गांवें इनाम दिलीं. तीं पुढें रामचंद्र खटाटोपे यांनी कचेश्वरांच्या पुत्रांच्या नांवें करून दिलीं. सातारा जिल्हृयांतील १ सासवडे, २ अतीत व पुणें जिल्हृयांतील, ३ वाकी बुद्रुक, ४ चांडोली ५ धावडी व ६ पांगरी होत. शाहू महाराजांनीं कचेश्वरास गुरुस्थानीं मानल्यामुळें त्यांना ‘ राजगुरु ’ म्हणू लागले व त्यांच्या वंशजांचे आडनांव ‘ राजगुरु ’ पडलें.

कृष्णातटाकी उंब्रज येथें शके १६५३ फाल्गुन शु।। द्वितीयेस कचेश्वरांनीं देह ठेविला. कृष्णावेणीसंगमावर माहुलीस यांची समाधि व पादुका असून प्रतिवर्षी अतीत येथील त्यांचे वंशज येऊन पुण्यतिथी साजरी करतात.

**भक्त भागवत जीवन्मुक्त संत । महिमा अत्यद्‌भुत चराचरीं ।।**

# संत वाङ्मयाभ्यासाची आधुनिक दिशा

१ संत वाङ्मयाचें परिशीलन करणाऱ्यामध्यें असा एक वर्ग असतो कीं, ज्यांची संत–वचनावर पूर्ण श्रद्धा व निःसीम प्रीति असते. या श्रद्धेनें व प्रीतीनें त्यांचें जीवन संत–वचनाशीं समरस होऊन हळूंहळूं त्यांत संतत्वाचा उदय वाढत्या भरानें होत असतो. संताच्या शिकवणुकीच्या तात्विक विवरणाची त्यांना गरज वाटत नाहीं. दुसरा एक वर्ग असा असतो कीं, संत–सारस्वताबद्दल त्यांना आदर वाटतो व त्या आदराबरोबरच संताच्या शिकवणीचीं सर्व अंगें समजून घेण्याची तळमळ असते. आधुनिक शिक्षणाच्या संस्कारानें दृष्टीला एक प्रकारचें नाविन्य आलेलें असतें व वाङ्मयाच्या अभ्यासाचें भिन्न भिन्न दृष्टीकोन उपलब्ध झालेलें असतात. या सर्व दृष्टींनीं संत वाङ्मयाचा अभ्यास होणें इष्ट आहे. उदाहरणार्थ, इतिहास संशोधकांची दृष्टी घेऊं. इंग्रजी शिक्षण प्रचलित झाल्यापासून कांहीं वाईट परिणाम एतद्देशीयावर झाले त्याप्रमाणें चांगलेही झाले. त्या चांगल्या परिणामांत इतिहास–संशोधनाची दिशा उपलब्ध होण्याची गोष्ट गणतां येईल. जुनी हस्तलिखितें शोधून काढणें, त्यांचा काल ठरविणें, पाठशुद्धि पहाणें व शक्य तो, मूळच्या स्वरूपांतील लिखाण उजेडांत आणणें या गोष्टी अत्यंत महत्वाच्या आहेत. धुळ्याच्या श्री. देवांनीं रामदासी वाङ्मयाचें संशोधन पराकाष्ठेचें केलें आहे. त्याच प्रमाणें ज्ञानेशादि संताच्या वाङ्मयाचें संशोधन कसोशीनें होऊन मूळ संहिता ज्या स्वरूपांत उगम पावल्या त्या रूपांत मिळण्याची सोय व्हावयास पाहिजे. ज्ञानेश्वरी, नाथ भागवत, तुकोबारायांचे व सर्व संत मंडळांचे अभंग इत्यादि वाङ्मय त्या त्या कालीं संपूर्णपणें लिहून ठेवण्याची फारशी काळजी घेतली गेली नाहीं. तुकोबारायांचे

कितीतरी बहूमोल अभंग न लिहून ठेविल्यामुळें अज्ञात असतील. तुकोबारायांचे वेळीं त्यांची निःसीम भक्त मंडळी होती पण महाराजांच्या मुखांतून निघालेली प्रत्येक ओळ लिहून ठेवावी, अशी बुद्धि कोणास सुचली नाहीं. यांत कोणाचा कमीपणा दाखवावयाचा हेतु नसून एक महत्वाचें कार्य कसें अपूर्ण राहिलें हे दिग्दर्शित करणें आहे. तुकोबारायांची अभंगवाणी संपूर्णतथा त्या वेळींच कोणी भक्तानें लिहून ठेविली असती व तीच गाथा आज आपल्या हातीं लाभती तर केवढी आनंदाची गोष्ट घडली असती, असें प्रत्येक संतप्रेमी जनांस वाटेलच, तथापि आहे ती परिस्थिती स्वीकारून या वाङमयाचा ज्या ज्या दिशेनें धुंडाळा घेता येईल त्या त्या दिशेनें घेतला पाहिजे, ज्ञानेश्वर महाराजांच्या अमृतानुभवावर नाथांची टीका असावी असें अनुमान करण्यास जागा आहे. परंतु आज ती उपलब्ध नाहीं पुढें मागें ती हस्तगत झाल्यास नाथांच्या मुखांतून या महत्वाच्या ग्रंथावरील अत्यंत मोलाचें विवरण ऐकण्याची संधि वाचकांना प्राप्त होईल. नामदेवरायांचे किती तरी अभंग अद्याप अमुद्रित आहेत. तंजावरच्या ग्रथसंग्रहालयांत त्यांची हस्तलिखित अमृतवाणी मुद्रकाची वाट पहात आहे.

२ संत–बोध ह्या तत्कालीन समाजाला उद्देशून होता. त्या कालची समाज–रचना, आचारविचार, चालीरीती. लोकांची राहणी, आर्थिक परिस्थिती, भिन्नवर्गीयांचे परस्पर संबंध इत्यादि इतिहासाची पार्श्वभूमि समजून घेणेंही अगत्याचें असतें. या बाबतींतही महाराष्ट्राचा सांस्कृतिक व सामाजिक इतिहास अद्याप तयार व्हावयाचा आहे. निरनिराळ्या संशोधकांची सामुग्री एकत्र आणून, त्यांतील सत्यत्व पारखून व अधिक माहिती मिळवून तें कार्य व्हावयास पाहिजे. राजकीय इतिहासांत राजे, लढाया, सनावळ्या इत्यादि गोष्टी भरलेल्या असतात. याच्या उलट सामाजिक इतिहास समाजाचा प्रवाह कोणत्या वळणानें व कोणते भिन्न भिन्न तुषार उधळीत वहातो याचें वस्तुकथन करतो. राज्यें पालटली तरी समाज, त्यांतील चालिरिती व विचार पालटतात असें नाहीं. ते पालटण्याची कारणें वेगवेगळीं असतात. राजकीय स्थित्यंतर हें त्यातील एकादें कारण असू शकेल अगर सामाजिक स्थित्यंतरामुळेंही राजकीय स्थित्यंतराची भूमिका

बनविली गेलेली असेल. देशांतील धर्म, कला, वाङमय, तत्वज्ञान, आर्थिक संबंध यांच्या मिश्रणानें सामाजिक इतिहांस बनत असतो व भिन्न परंपरा उदयास येत असतात. या सर्वांचें सूक्ष्म निरीक्षण करून व सर्व तऱ्हेच्या सामुग्रीचा उपयोग करून ट्रेव्हेलिन सारखा इंग्रजी ग्रंथकार जेव्हां आपल्या देशाचा (म्ह. इंग्लंडचा) सामाजिक इतिहास चटकदार भाषेंत पण वस्तु-स्थितीचा निदर्शक असा लिहीतो तेव्हां तो अत्यंत उद्बोधक होतो. व या नमुन्याचा ग्रंथ महाराष्ट्राच्या इतिहासाबद्दल केव्हां तयार होईल असें वाटूं लागतें. संतबोध हा तत्कालीन समाजास उद्देशून होता असें वर म्हटलें आहे त्याचा अर्थ तो केवळ त्या समाजा करतां म्हणजे विशिष्ट काल व देश यांच्यापुरतांच मर्यादित होता असा मात्र नव्हें. तत्कालीन समाजावर त्यांची दृष्टी खिळलेली होती. या दृष्टीनें संतवाङमयांतील तात्विक दृष्टी हा त्याचा गाभा होय. संतवाङमयांत ज्याप्रमाणें उत्कट भावनावशता व दृढ श्रद्धामयता आहे. त्याप्रमाणें तर्कशुद्ध व सुसंब्रद्ध असें तत्वज्ञानही आहे. या तत्वज्ञानाचें बलावर मानवजातीस भक्तीच्या साम्राज्यांत उचलून नेण्याची शक्ति त्यांत सामावलेली आहे. (The Mystic may be a philosopher, but is not necessarily so–His mystic experienee is sufficient for his own elevation into Divinity, but if he philosophises, he may raise thinking humanity into a Divine Kingdom of Ends–Prof. R. D. Ranade, Mysticism in Maharashtra P. 494.) संतवाङमयाचा संशोधनदृष्टया व अभ्यास उपयुक्त आहे. परंतु त्यांचें तत्वज्ञान दृष्टीआड करून तो अभ्यास चालतां कामा नये. संत–कार्याचें मुख्य क्षेत्र धार्मिक आहे. त्या धार्मिक क्षेत्रांत एक विशिष्ट तत्वज्ञान अनुस्यूत आहे.

३ संताचें चरित्रांतील प्रसंगाचें वा ग्रथांचें ऐतिहासिक संशोधन, त्यांचें सामाजिक कार्य, वाङमयांतील रसार्द्रता इत्यादि गोष्टीबद्दल अलीकडे लेख प्रसिद्ध होऊं लागले आहेत, हें संतवाङमयाच्या अभ्यासाचें दृष्टीनें सुचिन्ह होय. परंतु कोणत्याही दृष्टीनें लिहिलेल्या लेखनांत वर सांगितलेली तात्विक बाजू न जाणून लिहिण्याची प्रथा पडल्यास त्यांत अपुर्तेपणा दिसून

येतो. याबद्दल हल्लींच्या निरनिराळ्या मासिकांतून प्रसिद्ध झालेले तीन लेख उदाहरणादाखल घेऊं. पहिला लेख अखंड भारताच्या दिपावली अंकांतील रा. कृ. वा. पुरंदरे "तुकाराम व रामेश्वर," दुसरा लेख प्रा. सरदार यांचा "नवभारत" मासिकाच्या ऑक्टोबरच्या अंकांतील "महाराष्ट्रीय संतमंडळाचें ऐतिहासिक कार्य" व तिसरा लेख "साहित्य पत्रिकेच्या जुलै–सप्टेंबर अंकांतील प्रा. वाळिंबे यांचा "अध्यात्माला शृंगाराची पुरवणी" हा होय. रा. पुरंदरे यांच्या लेखांत रामेश्वर भटांच्या चरित्रांतील माहिती सांगून त्यावरून त्यांच्या व तुकाराम महाराजांच्या गुरुशिष्यसंबंधाचीं कांहीं अनुमानें काढली आहेत. लेखाचा सारांश असा कीं, रामेश्वर भट्टाचे गुरु श्रीतुकाराम महाराज असें समजतात, पण भट मजकुरांना वैराग्यप्राप्ति होण्यास तुकाराम महाराजांचा सहवास व त्यांची कृपा कारणीभूत झालेली दिसत नाहीं." रामेश्वर भटांचा परमार्थाकडे ओढा अगोदर पासून होता व त्यांनीं तुकोबारायांची गांठ पडणेंपूर्वी आळंदी क्षेत्रीं वास केला होता. त्यांना वैराग्यप्राप्ति होऊन ज्ञानेश्वर महाराजांच्या भक्तीमार्गाचे उपासक बनले असें लेखक म्हणतात. यांत वस्तुस्थिती बरोबर पण त्यावरून काढलेलें चुकीचें अनुमान असा हेत्वाभास घडला आहे. रामेश्वरांना परमार्थाची आवड असेल व ते आळंदीसही राहिलें असतील पण तेथें राहून त्यांनीं समाराधना केल्याचा उल्लेख आहे. समाराधना म्हणजे भक्तीमार्गाची उपासना नव्हे. वैराग्य म्हणजे भक्ती नव्हे. तुकोबारायांच्या संगतीनें त्यांना भक्तीचें वर्म उमगलें व सद्‌गुरु म्हणून त्यांची आरती केली या गोष्टी प्रसिद्ध आहेत. संतांच्या प्रेमबोधाची दृष्टी नसल्यामुळें लेखकाच्या हातून केवळ आळंदीचा वास, वैराग्य, व समाराधना यांच्या आधारावर चुकीची इमारत रचली गेली आहे. इतकेंच नव्हे तर 'तुकोबारायांची योग्यता कळण्याचें अगोदर रामेश्वर हे त्यांच्याशीं विरोधी होते या गोष्टींतही त्यास खोडसाळपणाचा प्रचार दिसत आहे! आळंदींत राहून कर्मठपणानें वागणारी माणसें आजहि सांपडतात. तेव्हां नुसत्या आळंदींत रहाण्यानें ते पूर्वी तुकोबारायांचे विरोधी नव्हते हें म्हणणें टिकूं शकत नाहीं.

४ " महाराष्ट्रीय संतमंडळाचें ऐतिहासिक कार्य " नांवाचें एक पुस्तक प्रा. सुंठणकर यांनीं लिहिलें असून तें अलीकडेंच (१९५०) प्रसिद्ध झालेलें आहे. पुस्तकाचें परीक्षण प्रा. सरदार यांनीं आपल्या लेखांत केलें आहे. प्रा. सुंठणकरांच्या लेखनाची भूमिका मार्क्सप्रणीत वस्तुवादाची असून ती प्रा. सरदारांना तत्वतः मान्य आहे. पुस्तकांच्या तपशीलांतील कांहीं विधानावर उदा. भक्ति ही पळवाट आहे, संतवाङ्मयाच्या वचनांतून शेतकऱ्यांची दारिद्रावस्था दिसते. इ. वर टीका केली आहे. पुस्तकांचें नुसतें परीक्षण नसून हा लेख स्वतंत्र म्हणून मानावयास हरकत नाहीं. मार्क्सच्या इतिहास-मीमांसेचें समतोल स्पष्टीकरण, पाश्चात्य देशाच्या इतिहासाची चौकट तत्कालीन महाराष्ट्राच्या परिस्थितींत बसविण्याचा फोलपणा, तत्कालिन युरोपच्या परिस्थितीशीं तुलना व त्यांतील भेद या गोष्टींच्या थोडक्यांत पण निःसंदिग्ध विवेचनांत लेखकाच्या सूक्ष्म व गाढ व्यासंगाची साक्ष पटते. संत चळवळींतील सामाजिक संघर्षाच्या मुद्यावर विवरण करतांना संताच्या कार्याचें महत्वमापन केलें आहे त्या बाबतींत मात्र मतभेदास जागा आहे. संताचें प्रत्यक्ष कार्य हें धार्मिक क्षेत्रांतील आहे. धार्मिक क्षेत्रांतसुद्धां केवळ आचार विचारांचा पालट व तत्कालीन चालीरीतींत सुधारणा एवढेंच मर्यादित क्षेत्र दृष्टीपुढें ठेवलेलें नसून ईश्वर, जीव व जगत् याविषयीं बोधांतच त्यांनीं क्रांति केलेली आहे व हा बोध कोणत्याही देशकाल परिस्थितींत मानवी जीवनास श्रेष्ठ पुरुषार्थ प्राप्त करून देण्यास समर्थ आहे. संतांचें सामाजिक कार्य, हें अप्रत्यक्षरीत्यां घडलेंलें आहे. " शास्त्र प्रामाण्याला व जातिव्यवस्थेला धक्का न लावतां वारकरी पंथानें स्त्रीशूद्रादिकांना आत्मविकासाचा मार्ग खुला करून दिला " असें प्रा. सरदार म्हणतात. शास्त्राचें बाबतींत संत वाङ्मयांतून कांहीं गौरवाचे उद्गार दिसले तरी ते सिद्धांतरूप नव्हते. स्वतःचा बोध पुढें मांडताना संतांनीं शास्त्रावरही निर्भीडपणें टीका केली आहे. (वेद अत्यंत कृपणु जाहला । ज्ञा. म. प्रेमेवीण श्रुतिस्मृति ज्ञान वृथा जाण नृपनाथा ॥ ए. म. वेद आम्हावरी रुसोनिया गेला । आम्ही त्यांच्या बाला धरिलें कंठी ॥ तु. म.) जातिव्यवस्थेच्या बाबतींत संतांनीं प्रत्यक्ष सामाजिक चळवळ केली नाहीं. परंतु ती ज्या पायावर रचली गेली पाहिजे त्याचें दिग्दर्शन केलें आहे. त्या दिग्दर्शनाचे आधारें कार्य करणें हें

काम समाज–सुधारकांचें आहे. व्यक्तीचें मूल्य जातीवर अवलंबून नसून त्याच्या ठिकाणीं व्यक्त होणाऱ्या भक्तीवर असते ही गोष्ट संतांनीं स्पष्ट सांगितली आहे.(जाती व्यक्ति पडे बिंदुलें । जेव्हां भात्रें होती मज मीनले । जैसें लवणकण घातले । सागरामाजीं ।। ज्ञा. अ. ९--४६१) भक्ति ही मानवी जीवनाचा केंद्र आहे व या केंद्रास पोषक असणारी समाजव्यवस्था श्रेष्ठ, हें ध्वनित होतें. भक्ति ही पळवाट, म्हणजे ऐहिक दुःखाचा विसर पाडून मनुष्यास कोणत्या तरी काल्पनिक वातावरणांत गुंगवून ठेवणारी प्रवृत्ति नव्हे हें सांगतांना प्रा. सरदार म्हणतात " वारकरी पंथानें तर स्त्री शूद्रांतील जडत्व नाहींसें करून एक कार्यप्रवर्तक निष्ठा उत्पन्न केली." पण त्यांनीं या निष्ठेचें केलेलें स्पष्टीकरण मान्य होण्याजोगें नाहीं. " शास्त्रीय शोधाच्या अभावी बाह्य सृष्टीवर प्रभुत्व गाजविण्याची उमेद जोपर्यंत मानवामध्यें नव्हती, तोंपर्यंत त्याच्या व्यक्तिविकासाला आध्यात्मिक अधिष्ठानाची निःसंशय गरज होती." या म्हणण्यांत मनुष्याचें जीवनास आध्यात्मिक अधिष्ठानाची आवश्यकता कांहीं विशिष्ट कालांतच होती असा अभिप्राय व्यक्त केला जातो. फ्रेंच तत्ववेत्ता कॉम्ट यानें मनुष्याची प्रगती आधिदैविक, अध्यात्मिक व आधिभौतिक अशी होत असते असें आपल्या मानवता–वादाचें विवेचन करतांना प्रतिपादन केलें आहे. त्याचाच अनुवाद वरील वाक्यांत आढळतो. परंतु हा मानवता–वाद कसा अपुरा आहे त्याचें विवेचन मागें (" संतवाणीचा अमृत–कलश " पृ. १४४–१५०) त केलें आहे, तें जिज्ञासूंनीं पहावें. अध्यात्मिक गरज ही मानवीजीवनाची सततची गरज असल्यामुळें संतांचें कार्य त्याकालीं होऊन गेलें व आता नवयुगाचे कालीं त्याची गरज संपली आहे, असें म्हणणें बरोबर नाहीं. प्रा. वाळिंबे यांच्या लेखांत ज्ञानेश्वरींतील रसाळ स्थळांचें विवेचन आलें आहे. या लेखाचा मथळा " अध्यात्माला शृंगाराची पुरवणी " असा दिला आहे. त्यावरून लेखकाच्या मनांत अध्यात्म व शृंगार याचा विरोध असावा असें दिसतें. अध्यात्माची कल्पना त्यांनीं संकुचितपणानें स्वीकारली आहे. ज्ञानेश्वर महाराजांचें तत्वज्ञान हें संन्यासमार्गी व प्रपंच विन्मुखतेचें नाहीं. त्यांच्या तत्वज्ञानाची बैठकच चिद्विलासात्मक आहे. त्यामुळें जगाकडे

पहाण्याची त्यांची प्रतिभा रसभावानें फुललेली आहे. अमृतानुभवासारख्या केवळ तात्विक ग्रंथांतही "प्रिया सावायिली होय । ते अंगीचें अंगीं न समाये । येऱ्हवी तेथेंचि आहे । तारुण्य कीं'।। १०–२२ (तरुणस्त्रीचें अंगीं तारुण्य असतें पण प्रियकराचें आलिंगनानें तें उचंबळून ओसंडतें) असा अत्यंत रसिक दृष्टांत आढळतो. प्रा. वाळिंबे ज्ञानेश्वर महाराजांनीं केलेल्या रसाळ वर्णनाबद्दल म्हणतात कीं "संवेदनाचें तत्वज्ञान प्रमाण मानणारा एकादा आधुनिक कवि ज्या तन्मयतेनें मानवी विकाराचें वर्णन करील त्याच तन्मयतेनें ज्ञानेश्वरांनींही अत्यंत रसिकतेनें असें वर्णन प्रसंग मिळेल त्याठिकाणीं केलें आहे." पण संवेदनावादी कवि हा केवळ संवेदनसुखांत गर्क असतो. ज्ञानेशांच्या रसिक अक्षरांत परतत्वस्पर्श सामावलेला आहे म्हणूनच "कैवल्याही चढावा । करीत विषयसेवा । जाहला भृत्य भज्यू कालोवा । भक्तीच्या घरी" (अमृ. ९–३०) असें त्यांनीं भक्तीचें अत्यंत रसिक रूप वर्णिलें आहे. ही विषयासक्ति नसून परमभक्ति आहे. जगाकडे रसिकतेनें पहाणें ही ईश्वरानुरक्ति आहे हा बोध त्यांत आहे. तेव्हां रसिकतेची अध्यात्मास जोडलेली पुरवणी अगर मागाहून चिटकविलेली पुस्ती नसून तो अध्यात्माचा आविष्कार आहे.

# अनुभवामृताचा परिपाक

१ श्रीज्ञानेश्वरमाउलींचा अनुभवामृत ग्रंथ हा जगांतील तत्वज्ञानाच्या ग्रंथांचा मुगुटमणी होय. "तळहातीं डोलत देखिजे आवळां" या उक्ती-प्रमाणें परमतत्वाचें स्वरूप वाचकांना सहज समजावें, महालाभाचो राशि प्रत्येक मानवाच्या दारीं उभी रहावी, कोत्या समजुतीचे कण अंतःकरण व बुद्धि यावरून साफ उडून जावेत, दृश्यावरून ज्ञानावर व ज्ञानावरून प्रीती-वर नजर जाऊन प्रत्येक जीवमात्राच्या हृदयांत प्रेमाचो नव्हाळो अंकुरित व्हावी व ती सुफलित होऊन जीवन धन्य व्हावें, या कळकळीनें माउलींनीं हा ग्रंथ विश्वाला सन्मुख ठेविला. श्रीगुरुची कृपा स्वतः भोगून विश्वाला त्या परमसुखाचे सहभागी करावें, ही उत्कट लालसा या प्रत्येक अमृत अक्ष-रांच्या मुळाशीं आहे.

**परी गा निवृत्तिराया । हातातळीं सुखविलें तूं या ।**
**परी निवांतचि मिया । भोगावें कीं तें ।।**
**परी महेशें सूर्याहातीं । दिधलीं तेजाची सूती ।**
**यया भासा अंतर्वर्ति । जगचि केलें ।।**
**चंद्रासी अमृत घातलें । तें तयाचि कायि येतुलें ।**
**कीं सिंधू मेघा दिधलें । मेघाचि भागू ।।**
**दिवा जो उजिवडु । तो घराचाचि सुरवाडु ।**
**गगनीं आथि पवाडु । तो जगाचाचि कीं ।।**

अनु. १०-१-४

( अर्थ–श्रीनिवृत्तिराया ! आपण माझ्या मस्तकावर हात ठेऊन मला परम सुखी केलेत ! आतां तें सुख मी स्वस्थपणें सेवन करावें हें खरें; परंतु

परमेश्वरानें सूर्याला जी प्रकाशाची देणगी दिली, तिनें त्यानें सर्व जगत् भरून सोडलें. चंद्राला अमृत दिलें आहे तें तरी त्याच्याचसाठीं कोठें आहे ? किंवा मेघाला जें समुद्राचें पाणी मिळतें ते मेघांकरितांच असतें काय ? दिव्याचा जो प्रकाश, तो सर्व घराच्या सोयीकरता, तसेंच आकाशाचा जो विस्तृतपणा तोही साऱ्या जगाकरितांच असतो.

ग्रंथ समाप्तीच्या वेळेस ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात–

**म्हणोनि ज्ञानदेवो म्हणे । अनुभवामृतें येणें ।**
**सणु भोगिजे सणें । विश्वाचेनि ।।** १०–३१

–या अनुभवामृताचे योगानें सर्व विश्वानें आनंदाची दिवाळी करावी.

२ ज्या ज्ञानांतून अनुभवामृतासारखें उतुंग तत्वज्ञान बाहेर पडलें तेंच ज्ञान पंढरीच्या वाटेवर खांद्यावर पताका घेऊन वारकऱ्यांच्या समवेत बापरखुमादेवीवराच्या वेधानें विरही होऊन नाचूं लागलें! व म्हणूं लागलें कीं,–

**" अवघाची संसार सुखाचा करीन । आनंदें भरीन तिहीं लोक ।।**
**जाईन गें माये तया पंढरपुरा । भेटेन माहेरा आपुलीया ।।**

त्याच ज्ञानानें आपुल्या जीवीचें गुज मोकळेपणानें सांगितलें. माझ्या जीवीचीं आवडी । पंढरपुरा नेइन गुढी ।। पांडुरंगीं मन रंगलें । गोविंदाचें गुणीं वेधलें ।। जागृति स्वप्न सुषुप्ति नाठवें । पहातां रूप आनंदी आनंद सांठवे ।। बापरखुमादेवीवर सगुण निर्गुण । रूप विटेवरी दाविली खूण ।। त्याच ज्ञानानें पंढरीच्या वाटेचें वर्णन केलें–

**पंढरीचे वाटे अनंत घडती याग । वैकुंठीचा मार्ग तेणें संगें ।। जप तप अनुष्ठान क्रिया धर्म । हें जाणताती वर्म संतजन ।। भक्तिमार्ग फुकटा आनंदाची पव्हे । लागलीसे सवे पुंडलिका ।।**

त्याच ज्ञानानें शूर धीर वारकऱ्यांचें कौतुक केलें व स्वतः वारकरी म्हणविण्यांत धन्यता मानली.–कायावाचामनेंजीवें सर्वस्वें उदार । बापरखुमादेवीवरा विठ्ठलाचा वारीकर ।। पंढरीच्या वाळुवंटांत जागर क्षीरापती व नटून कीर्तन करण्याचा उपदेश केला–" पंढरपुर म्हणिजे भूवैकुंठ । ब्रम्ह

तव उभेंचि दिसताहे नीट । या हरिदासासी वाळुवंट । जागरणासी दीधलें ।। म्हणोनि करा करा रे क्षीरापती । नटानटा कीर्तनवृत्ती ।।" "त्याच ज्ञाननाथानें विठ्ठलरायाच्या" "भक्तीचा सौरस" जीवाच्या हृदयांत जागा करून त्याच्याकडे "हे पीयुषापरिस गोड वाटत । पंढरीरायाचे भक्त भेटत ।।" अशा आसावल्या नयनांनीं पाहिलें.

३ श्रीज्ञानेश्वरमाउलींच्या अनुभवामृतावर अनेक आधुनिक लेखकांनीं आपली बुद्धी चालवून त्याचें सार मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्या सर्वांवर माउलींच्या तत्वज्ञानाची मोहिनी पडली आहे परंतु त्यांच्या पूर्वग्रहयुक्त अंतःकरणामुळें त्या तत्वज्ञानाच्या गाढतेचा ठाव ओळखू शकले नाहींत या लेखकांपैकीं प्रमुख नांवे म्हणजे, डॉ. पेंडसें, डॉ. रानडे, प्रि. दांडेकर व श्री. पांडुरंग शर्मा ही होत. यापैकीं पहिल्या तिघांवर शांकरमताची छाप असल्यामुळें निष्कर्ष काढतांना कोणी ज्ञानेशांना शांकरमतानुयायाप्रमाणें लेखिलें आहे तर कोणी ज्ञानेशांच्या स्वतंत्र बोधास अर्धवट संमति दिली आहे. रा. पांडुरंग शर्मा यांनीं स्वतंत्र बोध मान्य केला आहे. परंतु त्या स्वतंत्र बोधाच्या अंतरंगांत सांठविलेल्या अमृताची गोडी किती मोलाची आहे व त्या गोडीतून उगम पावणाऱ्या अमृतवेलीस भक्तिरसाची फळें कशीं लिगटलीं आहेत हें पहाण्याचे ऐवजी या बोधाचा उगम कोठे सांपडतो का हे पहाण्यास पांचरात्र, शिवसूत्रें वगैरे पोथ्या चाळण्यांत ते गर्क झालेले दिसतात. फलभाराकडे दृष्टि न देतां बीजाचें स्वरूप काय याचा तर्क करीत बसण्यानें कसें विपर्यास घडलें आहेत तें पाहूं

४ डॉ. पेंडसे यांच्या "श्रीज्ञानेश्वरांचें तत्वज्ञान" या ग्रंथांत पुढीलप्रमाणें विधान आहे–"ज्ञानेश्वरांचा अमृतानुभव शंकराचार्यांच्या अध्यासभाष्यांतील प्रमुख व मूळ सिद्धांतांवरील विस्तृत प्रवचन आहे, असें म्हणण्याइतकें साम्य त्या दोघांच्या विचारप्रणालींत खात्रीनें आहे" (पृ. ३१२) वास्तविक शंकराचार्य या अध्यासासच अविद्या म्हणतात व प्रमाणप्रमेय व्यवहारांना अविद्याकल्पित मानतात. तर ज्ञानेश्वर महाराज हे ज्ञाता, ज्ञान व ज्ञेय ही त्रिपुटी एका संवित्चेंच कार्य मानतात. अनुभवामृतांतील ७ वें

प्रकरण अज्ञानखंडन हें अध्यासाचेंच खंडन करणारे आहे. म्हणून डॉ. पेंडसे यांचें म्हणणें केवळ आग्रहाचेंच ठरतें व हीच दूषित दृष्टि ठेवून त्यांनीं जागोजाग चुकीचीं बिधानें केलीं आहेत.

पृ. २६४ वर ते म्हणतात कीं, द्वैताच्या उपपत्तीपुरतें शंकराचार्य व ज्ञानेश्वर महाराज हे दोघे अज्ञान मानतात. हें विधान ज्ञानेशांची "द्वैत-दशेचें आंगण। अद्वैत वोळगे आपण। भेद तंव तंव दूण। अभेदासी" ही ओवी दृष्टीसमोर असतां करणें धाष्टर्याचें आहे. ज्ञानेशांच्या स्फूर्तिवादाचा अर्थ "अजातवाद" करण्यापर्यंत त्यांची मजल गेली आहे. (पृ. २८७) अजातवाद हा जगत् झालेंच नाहीं असें सांगतो तर स्फूर्तिवाद हा जगद्रूपानें ज्ञानच आपली प्रतीति घेत आहे असें म्हणतो. प्रतीति ही मिथ्या नसून साच आहे तेव्हां या दोहोंचें ऐक्य मानणें चुकीचें आहे. अजातवाद हा संन्यासधर्माची जननी आहे तर स्फूर्तिवाद हा भक्तियोगाचा उगम आहे. ही गोष्ट डॉ. पेंडसे यांच्या ध्यानीं आलेली दिसत नाहीं. ज्ञानेशांचा व शंकराचार्यांचा भेद दाखवितेवेळीं, त्यानीं एकाचा भक्तीवर भर आहे तर दुसऱ्याचा संन्यासावर आहे असें मोघम म्हटलें आहे. त्याचप्रमाणें शंकराचार्य हें अद्वैत व एक देवतावाद भिन्न मानतात तर ज्ञानेश हे दोही एकच मानतात असें म्हटलें आहे. हा भेद कां दिसतो याचा खोल विचार मात्र त्यांनीं केला नाहीं. वास्तविक त्यांनींच दाखविलेला भेद अत्यंत महत्वाचा आहे व त्या भेदाच्या मुळांशीं दोघांच्या ईश्वर, जीव व जगत् या विषयींच्या बोधाचीच भिन्नता आहे. शंकराचार्य हें ईश्वरास मायोपहित ब्रम्ह मानतात म्हणून त्यांच्या मतें ईश्वरही मिथ्या, भक्तही मिथ्या, तर त्याच्या उलट ज्ञानेश्वर हें ईश्वर व परब्रम्ह यांत भिन्नता मानीत नाहींत व भक्तीचा अनुभव साच व श्रेष्ठ आहे असें स्वाभाविकरीत्या प्रतिपादन करितात.

५ प्रि. दांडेकर यांनी अनुभवामृताची महती पुढीलप्रमाणें गाइली आहे. "साधुवर्य श्रीज्ञानेश्वरमहाराज यांचा अनुभवामृत ग्रंथ महाराष्ट्र-भाषेंतील अध्यात्मिक तत्वज्ञानांच्या ग्रंथांत अत्यंत श्रेष्ठ ग्रंथ आहे, हें पुरावे देऊन सिद्ध करण्याची गरज नाहीं....ज्ञानराजांनीं आपल्या अनुभवास

सिद्धांताचें रूप देऊन तद्विसंगत असे प्रमुख, बौद्धांचा शून्यवाद, सांख्याचा प्रकृतिपुरुषवाद इत्यादि जे वाद आहेत त्यांचें संशोधन करून ते विसंगत कसें आहेत हें युक्तिपूर्वक दाखविलें आहे. हें दाखवित असतां अर्थात्‌च त्यांची दासी होऊन राहिलेल्या कल्पनाशक्तीचा त्यांनीं भरपूर उपयोग केला आहे. सत्–चित्–आनंद अथवा अविद्या–विचार असला रुक्ष विषय, पण ज्ञानराजांच्या मुखांतून तो आला कीं, रसमयच होऊन जातो. त्यांची लेखणीं ज्याला लागेल तो विषय, रसाची सुपट मूर्तीच बनतो अशी अजब जादू त्यांच्या लेखणींत भरलेली दिसते. अनुभवामृत म्हणजे ज्ञानराजांनी निर्माण केलेली, अलंकारांनीं भरलेली, एक नवी अध्यात्मिक सृष्टिच होय असें म्हणावयास हरकत नाहीं" ( निरंजन रघुनाथांचे ग्रंथ–प्रस्तावना. )

या अध्यात्मसृष्टीचें महत्व जरी याप्रमाणें वर्णिलें असलें तरी तिचें स्वरूप काय? हा प्रश्न अधिक महत्वाचा आहे. तें वर्णन करतांना प्रि. दांडेकर यांच्या लिखाणावर कांहीं अंशानें शांकरमताचीच छाप दिसते. ज्ञानेश्वरमहाराजांच्या तत्वज्ञानास त्यांनीं "पूर्णाद्वैत" म्हटलें असलें तरी शंकराचार्य व ज्ञानेश यांच्यांत, एक अज्ञान गृहीत धरून अद्वैत सिद्ध करतात, तर दुसरे तें न धरतां सिद्ध करतात, यापलीकडे फारसा भेद नाहीं, असा त्यांचा आशय दिसतो. मायावाद सोडून ज्ञानेश्वर महाराज अजातवादाकडे वळल्यामुळें त्यांचें गौडपादाचार्यांशीं अधिक साम्य आहे, असेंही तें म्हणतात. यामुळें जीवनाच्या ध्येयासंबंधीही त्यांचें विचार भिन्न दिसतात. "मुक्त-कैवल्य म्हणजे अहं, इदंशून्य आपलें स्वरूप होऊन रहाणें" हा ज्ञानेशांच्या मतें मोक्षाचा अर्थ होय असें सांगून तेंच जीवनाचें ध्येय, असें ध्वनित केलें आहे. ( श्रीज्ञानेश्वरदर्शन भा. २ पृ. २५) अजातवाद व स्फूर्तिवाद भिन्न आहेत, हें मागें सांगितलेंच आहे. त्याचप्रमाचे अहं व इदं या दोन्ही पर-मात्मप्रेमाच्या स्फूर्तीच आहेत, हें अनुभवामृत प्र. १ मध्यें स्पष्ट दाखविलें असल्यामुळें या स्फूर्ति नाहींशा करून शून्यरूप होण्याचा प्रयत्न न करितां, या स्फूर्तीत असलेली प्रेमाची सांठवण अनुभविण्यांत जीविताचें साफल्य आहे, ही ज्ञानेश्वरमाउलींची खरी शिकवण आहे. ती दृष्टिआड केल्यानें मुळांतील तत्वज्ञानाचाही स्पष्ट उलगडा झालेला नाहीं.

६ डॉ. रामभाऊ रानडे यांच्या "Mysticism in Maharashtra" या ग्रंथांत अमृतानुभवावर एक स्वतंत्र प्रकरण आहे. त्यांत ज्ञानेश्वरमहाराजांच्या तत्वज्ञानांतील स्फूर्तिवाद हा स्वतंत्र आहे असें म्हटलें आहे. "It (Sphurtived) forms original contribution to philosophic thought" परंतु पुढें त्याच ग्रंथांतील समालोचनात्मक प्रकरणांत त्यास एक पुरवणी जोडली आहे. तें म्हणतात–We have to take into account the way in which Jnandeva argues against the Maya doctrine as ordinarily understood......But we must not suppose that Jnandeva was not a believer in the Maya docrine in its ethical and mystical aspects Metaphysically, no doubt–he advances the Sphurtivad in the Amritanubhava.......Ethically and mystically, however. we know in his Jnaneshwari, he cries aloft–आतां महदादि हे माया etc." (PP. 179) याचा अर्थ असा कीं, ज्ञानेशांनीं तात्विकदृष्टया स्फूर्तिवाद मानला तरी नैतिक व धार्मिकदृष्टया मायावादास मान्यता दिली आहे. परंतु एकदा मायावादाचा तात्विक पाया ढासळल्यावर त्याचें नैतिक व धार्मिक स्वरूप हें केवळ चुकीच्या कल्पना एवढेंच उरतें. ज्ञानदेव ज्या वेळेस जगास मायाकारित म्हणतात त्या वेळेस जग हा भ्रम आहे असा अर्थ अभिप्रेत नसून जग हें दिसतें त्याहून अधिक मूल्यवान आहे व त्याचा संबंध परमात्माच्या प्रेमस्फूर्तीशीं आहे, असा असतो. म्हणून नैतिक व धार्मिकदृष्टचाही मायावादास किंमत नाहीं. व हेंच डॉ. रानडे यांनींच उद्धृत केलेल्या ओवींतील शेवटल्या ओवींत दिग्दर्शित केलें आहे " एथ एकचि लीला तरले । जे सर्वभावें मज भजले । तया ऐलथडीयेच सरलें । मायाजळ ॥"

डॉ. रानडे यांच्या या समजुतीच्या घोटाळ्याचें मूळ त्यांनीं Mysticism ( गूढविद्या ) व भक्ति एकच मानिली आहे हें होय. वास्तविक या पुस्तकाचें नांव Bhakti cult in Maharashtra असें ठेऊन एकंदर विवेचन त्याच रोखानें व्हावयास पाहिजे होतें. परंतु तसा प्रकार न घडतां

नांवाचा व बोधाचाही विपर्यास झाला आहे. Mysticism हा प्रामुख्यानें योगमार्गच आहे. त्यांत नामस्मरणादि उपचार असले तरी ते योगास सहाय्यभूत म्हणून वापरले आहेत. तरी भक्तिपंथ हा शुद्ध नामस्मरणानें ईश्वरी प्रेम अनुभवावयाचा मार्ग आहे. (सुबोधपत्रिका–हीरकोत्सव अंक स. १९३३ मधील प्रो. वसंतराव नाईक यांचा Tukaram and mysticism हा मार्मिक लेख त्याचप्रमाणे "संतवाणीचा अमृत कलश" मधील 'तुकोबांचा अध्यात्मिक विकास' हा लेख पहा.)

७ अनुभवामृतांमध्यें स्फूर्तिवाद ग्रंथित केला आहे हें सर्वांना मान्य आहे. परंतु त्या स्फूर्तिवादाचेच अर्थ भिन्न भिन्न केल्यामुळें वरीलप्रमाणें विद्वान मंडळींचाहीं गोंधळ झालेला आहे. त्यामुळें स्फूर्तीच्या बीजांत सामावलेल्या प्रेमभक्तीच्या विशाल वृक्षाची जाणीव होत नाहीं. " जग असकी वस्तुप्रभा " (अमृ. ७. २८९) " इये स्फूर्तिकडोनी । नाहीं स्फूर्तीमात्रवाचोनी ॥ (५४५) ही अनुभवामृतांतील बीजवाक्यें आहेत. स्फूर्ती म्हणजेच प्रभा आणि प्रभा व स्फूर्ती या दोहोंचाही अर्थ प्रतीति असा आहे. (" जो प्रियूचि प्राणेश्वरी ") परमात्माच स्वतःची प्रतीति जगद्रुपानें घेत आहे हा मुख्य सिद्धांत आहे. या दृष्टीनें स्फूर्तीवाद हा, एकादा वाद नसून प्रेमप्रतीतिचा सिद्धांतच होय. या दृष्टीनें स्फूर्तीवाद न म्हणतां स्फूर्तीसिद्धांत हा शद्ब अधिक अन्वर्थक होय. या सिद्धांतानें जगाचें स्वरूप पालटतें. त्याचें मूल्य अनंत पटीनें वृद्धिगत होतें, विश्व ही केवळ इद्रियसुखाची भोगभूमि अगर त्यागभूमि नसून प्रभूच्या प्रियदर्शनाची सृष्टि हें पटतें. हाच सिद्धांत तुकोबारायांनीं अगदी सोप्या व घरगुती बोलींत सांगितला आहे " आवडी धरोनि आलेती आकारा । केला हा पसारा याजसाठीं ॥ तें मी तुझें नाम गाईन अखंड ॥ अहं ही प्रेमस्फूर्तीच व इदं ही प्रेमस्फूर्तीच. दृश्य जगताचा आधार प्रेमच, व आपल्या जीवनाचा आधार प्रेमच, हें पटतें; व त्या प्रेमाच्या लक्षांशानें त्याच्या भेटीची हुरहुर वाटते. जवळ आहे पण भेटत कां नाहीं हा विरह सुरू होतो. त्याच ज्ञानानें तत्वज्ञानाचा सिद्धांत मांडतां मांडतां तेंच ज्ञान विरहावर आलें, हें ज्ञानराजांच्या विरहिणीवरून स्पष्ट होतें. परंतु हा विरह सूफी साधुप्रमाणें निर्गुणांत न राहतां सगुणरूपाशीं त्यांनीं भोगला,

व जीवमात्रांस तो कसा भोगावा याची नीति शिकविली. या नीतीचा पंथ म्हणजे पंढरीची वाट होय. "प्रिया सावाइलें होय । तें आंगींचें आंगीं न समाये । येन्हवीं तेथेंचि आहे । तारुण्य कीं ॥" (अमृ. १०-१२) अंगीं तारुण्य असलें तरी प्रियाच्या आलिंगनानेंच तें व्यक्त होऊन भोगतां येतें त्याप्रमाणें अंगीं मिळून असलेली प्रेमस्फूर्ती व्यक्तरूपानें भोगली गेल्याखेरीज जीवास समाधान नाहीं—जीवनाची सफलता नाहीं—हें अनुभवामृताच्या स्फूर्तिसिद्धांताचें परम रहस्य आहे.

ही प्रेमस्फूर्तीच संतांनीं पंढरीच्या विटेवर उभी केली. "बापरखुमादेवीवरू हृदयींचा जाणुनी । अनुभवसौरसु केला ॥" अंगीं असणाऱ्या प्रेमाचें दर्शन विटेवर घ्यावयाचें, हा अनुभवाचा सौरस होय. या सौरसाचा सोहळा ती पंढरीची वारी. जगताच्या दृष्टीस वारकरी एका ठिकाणाहून दुसरीकडे चाललेला दिसतो पण अंतरप्रतीतिनें पाहिल्यास प्रेमसागरावरच तो बुडबुडा वहात असतो. सर्व देहमनबुद्धी व इंद्रियें एका प्रेमांत बुडून केवळ भक्तीचा सौरस उरलेला असतो. या सौरसाला लालचावूनच ज्ञानेश्वर माउलींनीं "माझ्या मनींची आवडी । पंढरपुरा नेइन गुढी ॥" म्हटलें व आपल्या लाडक्या सौंगड्यास गीतें गाइलीं :—

**उंच पताका झळकती । टाळ मृदंग वाजती । आनंद प्रेमें गर्जती । भद्रजाती विठ्ठलाचे ॥ आले हरीचे विनट । वीर विठ्ठलाचे सुभट ॥ ....... ऐसें एकांग वीर । विठ्ठलरायाचें डिंगर । बापरखुमादेवीवर । तिहीं निर्धारीं जोडिला ॥**

# वारकरी सम्प्रदायकी प्रेम-साधना

महाराष्ट्रके इस श्रेष्ठ प्रेमोपासक सम्प्रदायके आद्यप्रवर्तक श्रीपुण्डरीक महामुनि हुए। इस सम्प्रदायका प्रासाद निर्माण करनेके लिये श्रीज्ञानेश्वर महाराज इसकी नींव बने। श्रीनामदेवरायकी नामभक्ति इसका विस्तृत प्राङ्गण बनी। उसपर श्रीएकनाथ महाराजने श्रीमद्भागवतके खंभे खडेकर पूरा मन्दिर खड़ा किया। श्रीतुकाराम महाराज इस मन्दिरके शिखर बने। इस प्रकार संतोंद्वारा निर्मित इस विशाल सम्प्रदाय–मन्दिरका कुछ ऐसा ही वर्णन स्वयं श्रीतुकाराम महाराज कर गये हैं। इस मन्दिरकी ओर जानेका रास्ता कौन-सा है, कौन भगवान् इसमें विराजते हैं, उनके दर्शन करनेकी विधि क्या है और क्या उसका फल है, इन्हीं बातोंको संत-वचनोंके आधारपर यथामति यहाँ लिखते हैं।

वारकरी सम्प्रदाय सरूप-सम्प्रदाय नहीं प्रत्युत स्वरूप-सम्प्रदाय है। सरूप-सम्प्रदाय मूर्तिके ध्यानके द्वारा परमात्मलाभका साधन करता है और स्वरूप-सम्प्रदाय यह है कि स्वयं सर्वव्यापक चैतन्य ही भक्तिप्रेमके कारण सगुण रूपमें अवतीर्ण है–उस प्रियरूपका सेवन ही जीवनकी चरितार्थता है। सरूप-सम्प्रदायमें जीवात्मा और परमात्मा भिन्न माने जाते हैं और मूर्तिको साधन बनाकर अभेद लाभ करनेका प्रयत्न किया जाता है। परन्तु स्वरूप-सम्प्रदायमें जीवात्मा और परमात्माका अभेद स्वतःसिद्ध और स्वयम्भू है, उसके सगुण प्रियरूपका आस्वादन मानव-जीवनका परम साध्य है। यही स्वरूप-सम्प्रदायकी मान्यता है।

वारकरी सम्प्रदायके अधिष्ठाता पंढरपुरनिवासी श्रीविठ्ठल भगवान् हैं। भगवान्‌के अन्य अवतार किसीन-किसी विशिष्ट कार्यकी सिद्धिके लिये

२०४०१
१०४३ वि: निबंध २२१
नों. दि: 23।६।४६



हुए। जब-जब संतोंपर सङ्कट आये, तब-तब पृथ्वीसे दुष्टोंका भार न सहा गया और वह धेनुरूप धारणकर भगवान्‌के समीप गयी और तब दुष्टोंके संहारके लिये भगवान्‌ने अवतार लिया, यही सब अन्य अवतारोंके होनेका क्रम देख पड़ता है और फिर यह भी देखा जाता है कि जिस कार्यके लिये इस प्रकार भगवान् आये उस कार्यके हो चुकनेपर वे यहाँसे चले भी गये। पर भगवान् जो श्रीविठ्ठलरूपमें अवतीर्ण हुए सो केवल भक्ति-प्रेमसे मुग्ध होकर ही हुए और इसमें अन्य कोई कार्य-कारण-भाव नहीं है। श्रीपुण्डरीकके हृत्प्रेमसे ही श्रीभगवान् यहाँ पधारे हैं। केवल प्रेमके लिये ही ये प्रेमस्वरूप यहाँ विराज रहे हैं। श्रीनिलोबाराय कहते हैं कि 'स्वयं श्रीसच्चिदानन्द भगवान् पीताम्बरधारी श्यामसुन्दर श्रीविठ्ठलरूपमें इस ईंटपर अड़े हैं और भक्तोंको देख-देखकर सुप्रसन्न हो रहे हैं।'

वारकरी सम्प्रदाय इन्हीं प्रेमस्वरूप भगवान्‌का उपासक है। वारकरी शब्दका अर्थ ही है, प्रति वर्ष नियत समयपर पंढरीके इन प्रेममय भगवान्‌से मिलनेके लिये आना। इस 'वारी'—इस मिलन-यात्राका मर्म क्या है? किस प्रकारकी यह भक्ति है? भक्त और भगवान् जब एक ही हैं तब भक्ति कोई किसीकी किसलिये करता है? वारकरी सम्प्रदाय अद्वैत सिद्धान्तको माननेवाला है पर इस अद्वैतमें, वह यह दिखाता है कि, भक्ति हो सकती है, अद्वैत और भक्तिका कोई परस्पर-विरोध नहीं, बल्कि भक्ति अद्वैतानुभूतिकी सबसे ऊँची चोटी है।

'अमृतानुभव ग्रन्थ' में श्रीज्ञानेश्वर महाराज कहते हैं कि जब देव, देवल और परिवार एक ही पर्वतके अंदर उकोरे जा सकते हैं तो एक ही अद्वैतमें भगवान्, भक्त और भक्तिपरिवार क्यों नहीं बन सकते? जैसे फूल ही भ्रमर हों, युवती ही युवक बने, आम्रमञ्जरी ही कोकिल बने और सब रस ही रसना हो जायँ, वैसे ही भगवान् ही भक्त बनकर अपने ही प्रेमको अनुभव करते हैं। (अमृतानुभव ९।५) प्रेम ही प्रेमसे मिलनेके लिये विरही बना फिरता है।

यह केवल तत्वज्ञानकी बात हुई । तत्वका ज्ञान जीवनमें उतर आना चाहिये, तभी उसका आनन्द मिलता है । इस आनन्दका भोग ही भक्ति है । भक्ति केवल कोई बाह्य क्रिया नहीं है । भक्ति की नहीं जाती, हुआ करती है । भगवान् प्रेमस्वरुप है और यह प्रेम ही जगत् और मानव-जीवनका आधार है । प्रेमका स्वभाव है अनन्य होना । इसीलिये यथार्थमें भगवान् ही जीवके लिये अनन्य हैं । माँ अपने बच्चेके लिये अनन्य होती है । और अपने बच्चेपर प्रीतिकी वर्षा बराबर करती ही रहती है । उसी प्रकार भगवान् जीवपर सतत स्नेहकी वर्षा कर रहे हैं, इसीसे जीव-जगत् जी रहा है । बच्चा माँकी क्या सेवा कर सकता है ? माँने ही तो उसे नौ मास गर्भमे रखकर ' रजसे गज ' बनाया है । माताकी इस सतत स्नेह-वर्षाको जानकर बच्चा कभी पात्रमे जल भरकर माताको हाथमें ला दे सकता है । इससे माताको बहुत बड़ा सन्तोष भी होगा । बच्चा माताके प्रेमको जाने, यही भक्ति है । जहाँ प्रेमकी यह पहचान है वहाँ भक्तिकी श्रवणादि क्रियाएँ अनायास ही हो सकती हैं । पर इन सबका मूल है प्रेमकी पहचान । इस प्रेमके सेवनकी जो पद्धति है वही वारकरी सम्प्रदाय है ।

इस प्रेम-सेवनके लिये संतोंने पंढरी-धाम निर्माण किया और प्रेम-मूर्ति विठ्ठल भगवान् वहाँ आकर खडे हो गये । संतोंने सबके कहा-आओ, चाहे तुम किसी जातिके, किसी वर्णके, किसी गुणके हो, जैसे हो, जो हो, यहाँ आकर इस प्रेमका सेवन करो । आषाढकी शुक्ल एकादशी और कार्तिककी शुक्ल एकादशी पंढरीको 'वारी' है । प्रतिवर्ष इन दो वारियोंको कोई कर ले तो उतनेसे भी भगवान् प्रसन्न होते हैं । तुकाराम महाराज कहते है ये ही दो हांट हैं-इनमें जो कमाना हो कमा लो, और व्यापार फैलानेकी फिर कोई जरूरत नहीं । वारीके दिनोंमें पंढरीमें प्रेमानन्द की वर्षा होती रहती है ।

वारकरी सम्प्रदायमें आराध्य श्रीविठ्ठल भगवान्, क्षेत्र पंढरपूर, नियम पंढरीकी वारी और मन्त्र ' राम कृष्ण हरि ' है । गलेमें तुलसीकी माला, हाथमें पताक, भालमें गोपीचन्दन और बुका ये ही वारकरियोंके

मङ्गलचिन्ह हैं। रुचिके साथ भगवन्नाम–स्मरण ही इनका कर्म है, इसके अतिरिक्त अन्य किसी साधनकी आवश्यकता नही, तुकाराम महाराज कहते हैं 'नाम–संकीर्तन सुलभ साधन है, इससे जन्मान्तरोंके पाप जल जाते हैं। नाम लेनेसे मन शान्त होता और जिव्हासे अमृत स्त्रवता है और लाभके शकुन ही होते रहते हैं। श्रीज्ञानेश्वर महाराज कहते हैं 'तत्वमसि आदि महावाक्योपदेश नामका अर्द्धांश भी नही है।'

रुचिसे नाम–स्मरण रुचिसे भजन और रुचिसे ही कीर्तन वारकरी सम्प्रदायकी प्रेमपद्धतिके अङ्ग हैं। भजनमें पहले 'जय जय राम-कृष्ण-हरि' का घोष किया जाता है। जबतक भगवान्‌का रूप प्रियत्वके साथ हृदयमें प्रतिष्ठित न हो ले तबतक यह घोष किया जाता है। पीछे हृदयमें ध्यान स्थिर होनेपर 'सुन्दर तें ध्यान उभे विटेवरी।' यह अभंग कहकर 'विठोबा-रखुमाई' इस नामका भजन किया जाता है। इसके बाद उस प्रिय दर्शनका आस्वादन करते हुए जिन अभंगोंको गानेकी इच्छा हो वे गाये जाते हैं। इसके बाद फिर 'विठोबा–रखुमाई' का नामघोष किया जाता है। इसके अनन्तर अपने मनकी उस समय जैसी स्थिति हो उसके अनुसार करुणापरक, नामपरक अथवा विनयपरक अभंग गाये जाते हैं। गानेमें कलाकी अपेक्षा सहृदयतका ही होना अधिक आवश्यक है, इससे संतहृदयके साथ अपना हृदय मिल जाता और अनायास प्रेमप्रसाद प्राप्त होता है। यह स्मरण रहे कि भजन भगवान्‌का प्रत्यक्ष प्रेमसेवन ही है। अस्तु, इसके पश्चात् 'जय विठ्ठल' कहकर भजन किया जाता है और फिर अभंग कहकर 'ज्ञानेश्वर माउली ज्ञानराज माउली तुकाराम' यह धुन गायी जाती है। इसके बाद श्रीविठ्ठल, श्रीज्ञानदेव और श्रीतुकारामकी आरती करके 'ज्ञानबा तुकाराम' की धुन गाकर 'पुण्डलीकवरद हरि–विठ्ठल' के जयघोषमें भजन समाप्त किया जाता है।

कीर्तन की रीति–कीर्तन भगवान्, भक्त और नामका त्रिवेणी–सङ्गम है। संतोंने इस हरिकथाके विषयमें कहा है कि, 'हरिकथा माता है, वह श्रोताओंको जो दूध पिलाती है उससे कभी पेट नहीं भरता, वैष्णवजन इसे पीते

हुए कभी अघाते नहीं। इसको देखकर अमृत भी झेंपकर सामने नहीं आता।' कीर्त्तनमें श्रीहरिके सगुण चरित्रोंका वर्णन होता है। यह काम जितने अधिक प्रेमसे होता है उसमें उतना ही अधिक आनन्द है। कीर्त्तनकार स्वयं कीर्त्तनमें रँग जाय और श्रोताओंको रँग दे। दशमी और एकादशीको 'क्षीरापत'–प्रसाद बाँटनेकी प्रथा है।

दिनचर्या–वारकरी सम्प्रदाय प्रपञ्चको छोड़ देनेकी शिक्षा नहीं देता। श्रीएकनाथ, तुकारामादि संत प्रपञ्चमें रहते हुए हरिभक्ति कैसे की जाती है यही तो अपने उदाहरणोंसे दिखा गये हैं। अस्तु, वारकरियोंकी दिनचर्या इस प्रकार है–प्रातःकाल उठनेके साथ ही पहले श्रीविठ्ठलका स्मरण और वन्दन करना, इसके बाद प्रातःकृत्य स्नानादि करके तुलसीको जल देना और श्रीज्ञानेश्वरीकी पूजा करके उसकी कुछ ओवियोंका पाठ कर लेना। इसके बाद श्रीविठ्ठल, श्रीज्ञानदेव और श्रीतुकारामकी मानस–पूजा करके भोग लगाना और उनका उच्छिष्ट प्रसाद ग्रहण करना। भोजन करते हूए प्रत्येक कौरके साथ भगवान्का नाम लेना और नाम लेते हुए नामकी रुचिके साथ भोजन करना। इसके बाद संसारमें अपने जिम्मे जो काम–धंधा हो उसे सचाई और तत्परताके साथ करना। भगवान्का ही यह सारा विश्व-संसार है। इसमें जिसके जिम्मे जो काम भगवान्ने कर दिया है उसे प्रेमसे करना भगवान्का ही कर्मरूपसे भजन है। कामसे लौटनेपर सायंकाल शुचि होकर 'हरिपाठ' का नियमपूर्वक पाठ करना। रातको भोजनके पश्चात् बिस्तरपर बैठे–बैठे वीणा, करताल हाथमें लिये ऊपर कहे अनुसार श्रीविठ्ठल भगवान्का भजन करना और उसी भजनके आनन्दमें प्रभुचरणोंमें मस्तक रखकर सो जाना।

इस प्रकार वारकरी सम्प्रदायकी प्रेम–साधना भगवत्प्रेमका ही सेवन है। प्रेम ही साधन है और प्रेम ही साध्य। बन्ध–मोक्षादिकी कोई कल्पना इसमें नहीं है। हठयोगादिमें प्रमाद होनेसे जो भय है वह इसमें नहीं है, इसके विपरीत बालक यदि कहीं ठोकर लगकर गिर पडे तो जैसे माँ ही दौडी चली आती और बच्चेको उठा लेती है वैसे ही भगवान् इस मार्गमें अपने भक्तको सदा सर्वत्र सम्हाले रहते हैं!

# सूची


अ

अमृतानुभव– चिद्विलास व अकृत्रिम भक्ति ३१. व पासष्टी ३१. परिपाक २१२.

अॅवट (डॉ.)– ७३.

आइन्स्टिन्– १५१.

ऑस्कर वाइल्ड– १३७.

एकनाथ– अद्वैतभक्ति ७७. कीर्तन मर्यादा ५८. योग व भक्ति २४, २५.

एडिंग्टन– धार्मिक अनुभवाबद्दल विचार ५, १५१.

क

कचेश्वर– २०१–२०४.

कबीर– १८७–१८८.

कालिदास– ६८.

कॉम्ट (ऑगस्ट)– १४९, २१०.

ख

खासनीस– ७३.

ग

गॅलीलियो– १३०.

गृहस्थाश्रम– थोरवीबद्दल संतांचे मत १८.

गीते– संतांची व हिब्रू आणि खिस्ती उपासकांची ७८–७९.

गोल्डस्मिथ– ७२.

गोरांग प्रभु– ८२–१२२.

च

चार्वाक– देहात्मवाद २७.

ज

जडवाद– १३५–१५३.

व अनुभव १४१.

आणि धर्म १४९.

व मानवी स्वभाव १४७.

व मायावाद १३६.

व विकासवाद १४३.

व विज्ञान १४३.

परीक्षण १५०.

स्वरूप १३७.

जयराम स्वामी वडगांवकर– १९७

जोशी (डॉ. प्र. न.)– ३०.

ट

टिळक– भक्तीमार्गाबद्दल मत ३-४, भक्तीवरील आक्षेपांस उत्तर १५.

ट्रेन्हेलिन– २०७.

ठ

ठाकुरसिंग– ६७.

ड

डार्विन– १४५.

त

तुकाराम–

अभंग प्रेमतनु १९३.

अधमाशी अधम १२.

अवतार कार्य १८९–१९३.

आत्महत्येचा आतताईपणा ४०.

ईश्वर निष्ठा १३.

कचेश्वर कृत रूपवर्णन २०४.

कीर्तन मर्यादा ५८.

खरें ब्रम्हचर्य ४४.

गृहस्थाश्रम १०.

विविधजन व स्वहित १४.

जातिश्रेष्ठतेबद्दल मत ४१.
दयेचें स्वरूप ११.
दुर्जनाची मानखंडना १२.
देवाचा प्रसाद २.
देवाशी भांडण ३७.
देहदंडणाची विफलता ४३.
बहिणाबाई कृत वर्णन १९८.
भक्तीचा सिद्धपंथ १.
भगवद्भजनाचें सामर्थ्य २१.
भविष्याबद्दल मत ४०.
भिक्षेचें निंद्यत्व १३.
मोक्ष २९, ४७.
व रामेश्वर २०८.
वैकुंठ गमनाचा अर्थ १९३.
शारीरिक वैराग्याबद्दल मत १६
संन्यास व संसार त्याग ४५.
संसारासक्तीवर टीका ४५.
सोवळें व ओवळें ४६.
क्षुद्र देवता पूजन ४२.

थ

थॅकरे–७२.
थॉमसन् (जे. ए.)–१३२.

द

दांडेकर ( प्रि. शं. वा. )–२१४, २१५.
दिक्षित ( कै. )–६९.
देव ( शं. श्री. )–२०५.
देव– हृदयी सांठवण्याची रीत ६१.
देशपांडे ( वि. य. )–१२९.

ध

धर्म– विज्ञान व तत्वज्ञानाशी अविरोध १३१.
व समाज व्यवस्था १२१-१३४

न

नजीर– १७७–१८२.
नरसीमेहता– १५४–१६४.
नाम– प्रेमाचा जिव्हाळा ३२.
नामस्मरण–तत्वमसीहून श्रेष्ठ ३३.
निंबार्क– २८.
निसर्ग– शद्वाचा अर्थ १३७.
निसर्गवाद– भिन्न प्रक.र १३९.
नैय्यायिक– मोक्षाची कल्पना २७–२८.
न्यूटन– १३३.

प

पांडुरंग शर्मा– २१४.
पायथॅगोरस– १३०.
पेंडसे (डॉ, शं. दा.)–२१४, २१५.
पुरंदरे (कृ. पा.)– २०८.
प्रगति व पूर्णत्व– १२५.
प्रिंगल पॅटिसन (प्रो. )– ६८.
प्रेमचंद– ६६.
प्रेमविरह– ज्ञानेशांनीं वर्णिलेलें स्वरूप ३५.

फ

फ्रेझर– ७३.

ब

बहिणाबाई– १९४–२००.
बोध– आणि ज्ञान ५०.
महत्व ५३.
ब्रूनो– १३०.

भ

भागवत ( श्री. रा. के.)– ७३.
भक्ति– व अद्वैत ७६.
उघड समाधि २४.

चैतन्याची अंगभूत सहजस्थिति ३२.
टिळकांचे मत ३–४.
दुर्बळाकरितां व योग सबळाकरितां नव्हे २५.
पंचम पुरुषार्थ २६, २९.
व मोक्ष २६–२९.
आणि योग २०–२६.
व वैराग्य १५–२०.
व व्यवहार ९–१४.
संतप्रतिपादित श्रेष्ठत्व म्हणजे गौरव नव्हे २१.
संतांचा भक्तिपंथ १–२९.
समाधि सुखाहून श्रेष्ठ सुख २३
सिद्ध पंथ १.
सुलभता व प्रत्यक्षता ५–९.
स्वामी विवेकानंदांचें मत २.
स्वाभाविकता व श्रेष्ठता २.

म

मध्वाचार्य–मोक्षाची कल्पना २८.
मॅकनिकल (डॉ. निकल)–७४, ७५, ८०.
मॉर्गन (लॉइड)– १४६.
मोक्ष–चार्वाक मत १७.
नैय्यायिक मत २७.
मीमांसक मत २८.
शंकराचार्य, रामानुजाचार्य व मध्वाचार्य मत २८.
वैशेषिक मत २८.
शून्यवादी बौद्धमत २७.
मौलाना रूम– ३४.

य

यामा– ६६.
योग–ईश्वरास गौणस्थान २५.
दुर्घटता २३.
प्रेमवृत्तीचा नाश २४.
रूपरेषा २२–२३.
साधना व साध्य २२–२३.
व सांख्य तत्वज्ञान २२.
ज्ञानेशांचें मत २०, २१.

र

रवीन्द्र– ६६.
रसखान– १८१–१८३.
रसेल (बर्ट्रांड)– १५३.
रहीम– १८४–१८६.
डॉ. राधाकृष्णन्– १२८.
रॉटेन्जन– १५०.
रानडे (डॉ. रा. द.)–विरहावस्थेच्या मताचें परीक्षण ३५.
स्फूर्तिवादाबद्दल मत २१४, २१७.

ल

लॉरेन्स (डी. एच्.)– १२७.

व

वल्लभाचार्य– २८.
वारकरी संप्रदाय–आचार २२२.
दिनचर्या २२४.
प्रेमसाधना २२०.
भजन २२३.
वाळिंबे (डॉ. रा. शं.)–ज्ञानेश्वरीतील शृंगाराबद्दल मताचें परीक्षण २१०–२११.
विठ्ठल–योगदर्शन नसून प्रेमदर्शन ३४.
विरहावस्था–
संताची दृष्टि ३४.

डॉ. रानडे यांच्या मताचें परीक्षण ३५.
ज्ञानेशांचे मत ३५.
विवेकानंद– भक्ति योगाची निसर्ग सिद्धता २.
वैराग्य– प्रेमानें सहज २०. ज्ञानेशांनीं केलेलें लक्षण २०.
वैशेषिक– मोक्षकल्पना २८.

श

शंकराचार्य– मोक्षाची कल्पना २८, ७८.
शिशिरकुमार घोष– ३२.
शून्यवादी बौद्ध– मोक्षाची कल्पना २७.
शोपेनहार– १५२.

स

सरदार ( प्रा. गं. बा. )– संतांच्या अध्यात्माच्या मताचें परीक्षण २०८, २०९.
साहित्य– व जीवन ६९.
तत्कालिन व चिरंजीव ७१.
संतांची व्याख्या ६५.
सांख्यमत– २२.
सुठणकर (प्रा.)– २०९.
सुभेदार ( श्री. मनु. )– ७३.
सूरदास– १६५–१७६.
स्पेन्सर– विकासवादाचें तत्वज्ञान १४५.
हरिपाठ– देवाचें द्वार ३३.
हेकेल– १४६.

ज्ञ

ज्ञानेश्वर– अद्वैतांत भक्तीचा विहार ७७.
कीर्तनाचा नटनाच ५६.
गृहस्थाश्रम–त्यागाबद्दल मत १७.
नामस्मरणाचें महत्व ३२–३३.
वाह्यकर्म त्याग १९.
मोक्षाबद्दल मत २९.
योगाबद्दल मत २०, २१.
विरहिणीची भूमिका ३०–३६.
वैराग्याची व्याख्या १५.
वैराग्याचें लक्षण १९.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. १०८८
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे स्थळप्रत.
अनुक्रम २०४५१ वि
क्रमांक १०८८ नों. दि.

## संतवाणीचा अमृत–कलश

### ले. भा. पं. बहिरट एम्. ए.

यांत १ ज्ञानेश्वरीची भूमिका, २ संत सारस्वताचें सौंदर्य, ३ तत्वज्ञानाची दीपशिखा, ४ एकनाथ कृत अमृतानुभव टीका, ५ अमृतानुभवाचें तत्वज्ञान, ६ वैदिकधर्म व भागवतधर्म, ७ भागवतधर्म व रामदासी पंथ, ८ भागवतधर्म व महाराष्ट्रधर्म, ९ ज्ञानेश्वर–कन्या, १० उमर–खय्याम, ११ ख्रिस्तीधर्म व विज्ञान, १२ अर्वाचीन पाश्चात्य तत्वज्ञानाचा जनक देकार्त, १३ धर्म आणि आधुनिक वाद, १४ मौलाना रूम, १५ जीवन मूल्यांची उपासना, १६ तुकोबांचा अध्यात्मिक विकास, १७ प्रल्हाद महाराज–चरित्र व कविता, हे महत्वाचें लेख आले आहेत. सूची व प्रस्तावनेसह पृ. सं. २२० मूल्य ३ रु.

**कांहीं निवडक अभिप्राय–**

" संत वाङमयावर अधिकार वाणीनें लिहिणारे आधुनिक कालांत जे थोडे लेखक आहेत त्यापैकीं श्री. भा. पं. बहिरट हे एक आहेत..... लेख निरनिराळे असले तरी सर्वांतून संतबोधाचा धागा अनुस्यूत असल्यानें या लेखसंग्रहास एक सूत्रात्मक भरीव ग्रंथाचेंच स्वरूप प्राप्त झालें आहे. संतवाङमयाच्या अभ्यासकांस दीपदर्शनाप्रमाणें हा ग्रंथ सहाय्यभूत होईल."

**—केसरी,** पुणे.

"लेखक भागवत धर्माचे कट्टे पुरस्कर्ते आहेत. व संतवाङमयाचा त्यांचा अभ्यास वाखाणण्यासारखा आहे. भागवत धर्मावर आजवर ज्यांनीं ज्यांनीं अज्ञानानें वा जाणून बुजून टीका केली अशा सर्वांना त्यांनीं सडेतोड उत्तरें देऊन भागवत धर्माचें श्रेष्ठत्व प्रस्थापित केलें आहे. संतवाङमयाचा अभ्यास अद्यापही व्हावा तसा झालेला नाही. या पुस्तकाच्या वाचनानें या वाङमयाकडे वाचकांचें लक्ष वेधेल अशी आशा आहे."

**—पुढारी,** कोल्हापूर.

" भक्तिपंथी वाङमयाविषयी आत्मीयता आणि आकर्षण उत्पन्न करणारा, विद्वानांच्याही विचारांना चालना देणारा आणि जीवन विषयक

तत्वज्ञानाचा सर्वंकष व सूक्ष्म उहापोह करणारा ग्रंथ " अमृत-कलश " श्री. बहिरट यांनीं वाचकासमोर ठेविलेला आहे. त्यांतील मधुर रसाचें पान करीत संतांच्या सानिध्यांत घटका घालविणें विद्वानाना त्याचप्रमाणें सर्व साधारण वाचकांना सौख्यदायक होण्याजोगें आहे म्हणून त्यांच्या या अमृत-कलशाचा आस्वाद शक्य असेल त्यांनीं अवश्य घ्यावा अशी आमची आग्रहाची सूचना आहे."

—लोकवाणी, भंडारा.

" श्री. भा. पं. बहिरट यांच्या अधिकारी लेखणीतून उतरलेला संत-वाणीच्या रसग्रहणाचा हा 'अमृतकलश' संतवाङमयाचा व त्यांच्या भागवत-धर्माचा अभ्यास करू पहाणाऱ्या भाविक व त्याचप्रमाणें चिकित्सक वांच-कांनाही चांगलाच उपयुक्त होईल असा आहे."

—लोकसत्ता, मुंबई.

" संतांच्या शिकवणुकीवर व साहित्यावर जिव्हाळा आणि व्यासंग यांनीं परिपूर्ण भरलेले असे हे लेख आहेत....संतवाङमयाचा चिकित्सक अभ्यास अलीकडे वाढत चालला असून या अभ्यासाचें एक प्रतीक म्हणून या पुस्तकांकडे अंगुली निर्देश करण्यास हरकत नाहीं. हें पुस्तक वाचल्यावर श्री. बहिरट यांच्या व्यासंगाचें फळ वाचकांना मिळवून देणारा त्यांचा दुसरा ग्रंथ लवकरच हाती पडावा अशी उत्सुक इच्छा वाचकाला उत्कटपणें आण-वत राहील यांत संशय नाहीं."

—लोकमान्य, मुंबई

## सकळ-संत-गाथा

( ओळीचे अभंग ) **सं. भा. पं. बहिरट** एम्. ए. **गो. शं. राहिरकर** बी. ए. एल्एल्. बी. व **भो. भा. कंपनी** बी.ए.एल्एल्.बी.

सर्व संतांच्या चार हजाराचेवर प्रातिनिधिक अभंगांचा, विषयावर वर्गीकरण केलेला संग्रह. संतवाङमयाच्या प्रत्येक अभ्यासकास संग्राह्य. शब्द-कोश, प्रस्तावना, सूचीसह पृ. ७२५ मू. रु. ६

**प्राप्तिस्थानः—गोडबोले ग्रंथ भांडार, सदाशिवपेठ, पुणे व पंढरपूर, पुणे, मुंबई, कोल्हापूर, नागपूर एथील प्रमुख ग्रंथ विक्रेते.**

२०५०७

# The Philosophy of Jnanadeva

By B. P. Bahirat, M. A.

President—

Pandharpur Research Society.

Damy 8 vo. xii + 220 + 20 Pages. Price *Rs. 6/-*

" Mr. B. P. Bahirat M. A. has tried to bring out a synthesis of the philosophical teachings of Shri Jnaneshwar, the greatest saint of Maharashtra, with particular reference to the Amritanubhava. The Amritanubhava is a very difficult work and it is no simple job to deduce Jnaneshwar's teachings from it. Mr. Bahirat has succeeded well in his achievement. He has focussed his attention particularly on four topics, - Metaphysics, Cosmology, Nature of Jiva and Bhakti doctrine. He has also discussed the influences on the philosophical thought of Jnaneshwar from the times of the Upanishadas down to the age ot Shamkar and Gorakhanath. He has also made a comparison of the teachings of the Amritanubhava with those of Plotinus, Spinoza, and Bradley. It is a task of great labour and I think Mr. Bahirat has succeed well in his undertaking.

**Dr. R. D. Ranade** M A. D. Litt.

Ex Vice- Chancellor Allahabad University.

The Book is well worth aquring if only for the translation of the Amritanubhava at the end of it.

**-- The Statesman, Calcutta**

Though Jnanadeva, the 13 th century mystic poet-philosopher of Maharastra is a household name through out India as the author of the celebrated Jnaneshwari, the great comentary on Bhagwadgita and the chief exponent of Msharashtrian Bhakti-cult yet no mention of the contribution he made to Indian philosophic and religious thought has been made in the works of Indian Philosophy. To make up for this omission, Mr. Bahirat has brought out the prsent study.

Several other scholars have essayed expositions of the poet's thoughts, but they do not always conform to facts— In this book the partisans and conflicting views are properly examined, criticized and put in their proper place in the light of the views expressed in Jnanadeva's Amritanubhava and other poems — On the whole it is a well reasoned out work.

**The Hindustan Times, New Delhi.**

The work as evidenced by its name gives clear and concise idea of what Jnanadeva, the wellknown saint and genius of Maharashtra wrote and propounded in the latter half ot the thirteenth century A. D. The author is to be congratulated for an attempt, the first of its kind, at a clear exposition of the subject.

Mr. Bahirat's exposition of the philosophy of Jnanadeva is in fact, masterly. His style is easy and forms very interesting reading to one aquainted with the Indian philosophy. The study of the book may lead one to God-realization if taken in its true sense. An English rendering of Amritanubhava appended to the work will be really helpful to one desirous of aquiring mastery over the subject.

**--National Herald.**

This is the first attempt to present in English the Philosophy of Jnanadeva in a systematic form and to convey a clear vision of his lofty and integral idealism.

**--Amrit Bazar Patrika, Calcutta.**


**Distributors:—**

**Poona--** Godbole Granth Bhandar, Sadashiva Peth, Poona 2.
Oriental Book Agency, Shukravar, Poona 2.
The International Book Service, Poona 4.
The Deccan Book Depot, Poona 4.

**Bombay--** The Popular Book Depot, Lamington Road, Bombay 7
Taraporewalla & Sons, Hornby Road, Bombay 1.

**Nagpur--** Denett & Co. Sitabaldi. Nagpur.

**Delhi--** Oxford Book & Stationery Co., Scindia House, New Delhi 1.

**Ahamadabad--** The New Order Book Co , Ellis Bridge, Ahamadabad 6.

**Kolhapur--** Maharashtra Granth Bhandar, Mahadwar, Kolhapur.
School and College Book Stall, Kolhapur.

**Calcutta--** Euro-American Book Agency, 1, Chowranghee Place, Calcutta 13.
Firma K. L. Mukhopadhyay, 6-1, Banchcharam Akrur Lane, Calcutta 12.

REFBK-0010888